१९६६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य.
सं. क्र. 2050

# प्राचीन मराठी कविता

## खंड ५ वा

संपादक : ज. शा. देशपांडे

REFBK-0015573
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय

७५८६२
२२।३।७१

2090
= २०५०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने पुरस्कार दिलेले

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन

# प्राचीन मराठी कविता

## खंड ५ वा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

१५५६२ दि. ८।१०८१

२०६० ... २३।३।०१

नामदेवांची स्फुट आत्मचरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

ग्रं. क्र. १५५६८

मुंबई मराठी स्थळ प्रत

संपादक : ज. शा. देशपांडे

REFBK-0015578

REFBK-0015578

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय

प्रकाशक :
वासुदेव विष्णु भट
प्रमुख कार्यवाह
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
दादर–मुंबई १४

आवृत्ती १ ली : १९६६

किंमत तीन रुपये

मुद्रक :
पु. गो. पाटील
सत्कार प्रिंटींग प्रेस
अलिबाग, जि. कुलाबा

# प्रा स्ता वि क

आतांपर्यंत प्रकाशित झालेल्या 'प्राचीन मराठी कविता' खंडांत विठ्ठल कळपूरकराची रासक्रीडा, चोंभाच्या उषाहरणाची कांहीं पानें, नामा पाठकांचें स्फुट काव्य, कृष्णदासांची बाळक्रीडा, विष्णुदास नाम्याची चक्रव्यूहकथा, हयग्रीवाचार्यांचें गद्यराज इत्यादि काव्यांचा समावेश झाला. पांचव्या खंडांत नामदेवांची स्फुट आख्यानें घेतली असून शेवटीं टीपा व शब्दकोश जोडले आहेत.

नामदेव म्हटलें कीं ज्ञानेश्वरप्रभावळीतले आद्य नामदेव डोळ्यासमोर उभे राहातात. व ही सर्व आख्यानें त्यांचीच आहेत कां असा प्रश्न उपस्थित होतो. याचें कारण प्रकाशित काव्यांत अनेक कवींच्या काव्यांची भेसळ दिसते. तीच गोष्ट अप्रकाशित काव्यांची. संतचरित्रकार आजगांवकरांनीं (१) आद्य नामदेव (२) महानुभावीय नामदेव (३) नामा पाठक (४) विष्णुदास नामा (५) बाळक्रीडाकार व (६) संतचरित्रकार असे सहा नामदेव कल्पिले होते. या संबंधांत प्रथम प्रकाशित काव्यांचा प्रश्न पाहू. याबद्दल विचार करतांना नामदेवांच्या लिखाणाचें पुष्कळ आधुनिकीकरण झालें असल्याची शक्यता लक्षांत ठेविली पाहिजे.

छापील गाथेतल्या संतचरित्रांची भाषा अर्वाचीन असून त्यांत भानुदास, संताजी पवार इत्यादिकांची चरित्रें असल्यानें ही बहुतेक चरित्रें नामदेवांची नसावीत असा तर्क होतो. ध्रुवचरित्रांतल्या "राजा म्हणे बाळा देतो पंचग्राम। तो म्हणे आत्माराम देतो आहे ॥" व "चंद्रसूर्य तारा शशि ऋषि थोर। हे ज्या आधारें हिंडताती ॥" या ओळी उद्धवचिद्घनांच्या ध्रुवाख्यानावरून उचललेल्या वाटतात. बाळक्रीडेचे अभंग फार रसाळ आहेत, पण त्यांची भाषा व तीमधील बहिरंभटाचा उल्लेख शंका उपस्थित करतात.

महानुभावीय नामदेवांचें उल्लेख पाहूं गेल्यास स्मृतिस्थळ या एकनाथपूर्व ग्रंथांत "एकु दिसु नामदेव सींपा पंडितबासासीं भेटला. चर्चा केली व 'दिस गेले वायावीण' ये पदे केली" (स्मृति २४४) असा उल्लेख आढळतो. हें पद छापील गाथेंत आहे. एका वृद्धाचारांत (मराठी साहित्य पत्रिका, ऑक्टोबर १९३६) हाच उल्लेख येतो. दुसरा असा उल्लेख डॉ. य. खु. देशपांडे यांच्या 'महानुभावीय मराठी वाङमय' या ग्रंथांत असून त्यांत नामदेव (विष्णुदास नामा) यांनीं यक्षदेव ऊर्फ निवृत्तिदेव या महानुभावीय कवीला मराठींत गीताटीका करण्याची आज्ञा केली असें म्हटलें आहे. दामोदर पंडित व यक्षदेव यांना भेटणारे नामदेव ज्ञानेश्वरकालीनच असणार. हे व ज्ञानेश्वर प्रभावळीतले नामदेव निरनिराळे मानण्याचें कारण दिसत नाहीं. अन्य उदाहरणावरून नामदेवांना महानुभावीय वस्त्र चढवलें असण्याची शक्यता

जास्त वाटते. तसेंच विष्णुदास नाम्याच्या भारताच्या महानुभावीय व महानुभावीयेतर अशा भिन्न प्रती आढळतात व हरिश्चंद्रपुराणाची महानुभावीय प्रत आढळते. हें भारत व हरिश्चंद्र पुराण यांची महानुभावीयेतर प्रतींशी तुलना केल्यास साधारण आशय तोच, पण शब्दांत फरक असें दिसतें व या प्रकरणांतही मूळ काव्यांना महानुभावीय वेष चढवला गेला असें वाटतें.

नामा पाठक हे इ. स. १४५० च्या सुमारास एक कवि निश्चित होऊन गेले. त्यांचें स्फुट काव्य ' प्राचीन मराठी कविता ' खंड २ रा यांत प्रकाशित झालें असून, त्यांचा अश्वमेध हा ग्रंथ पुढें प्रकाशित होईल. त्यांनी रामायण व महाभारत यांवर रचना केली होती. त्यांच्या चंद्रहास आख्यानाच्या एका प्रतींत ( खंड २ रा पहा ) कवीचें नांव कुठें ' नामा पाठक ' तर कुठें विष्णुदास नामा येतें. महाभारताच्या द्रोणपर्वाच्या एका हस्तलिखितांत ( भारत इतिहास संशोधन मंडळ, क्रमांक १।१२ ) कवीनाम दोन अध्यायांत ' विष्णुदास नामा ' ऐवजी ' नामा पाठक ' असल्याचें आढळतें. नामा पाठकांचें हनुमंतगरूडाख्यान ( खंड २ रा ) थोड्याफार फरकानें ' विष्णुदास नामा ' कविनामानेंहि उपलब्ध आहे ( टीपा पहा ). या गोष्टी लक्षांत घेतां नामा पाठक स्वतःला ' विष्णुदास नामा ' म्हणून घेत असण्याची शक्यता दिसते.

आद्य नामदेव होऊन गेले यांत कांहीं शंका नाहीं. त्यांचा उल्लेख कबीर, कमाल, मिराबाई, नरसी मेहता इत्यादिक करतात. तसेंच इ. स. १५९५ च्या सुमारास शुकाख्यान कर्ता विष्णुदास नामा होऊन गेला हें ही त्या आख्यानांतील काळाच्या उल्लेखावरून नक्की होतें. पण याशिवाय ' विष्णुदास नामा ' हे कविनाम जसें नामा पाठकांनी वापरल्याची शक्यता वाटते, तशीच शक्यता तें कविनाम आद्य नामदेवांनीहि वापरल्याची आहे. याशिवाय अन्य कवींनींहि तें वापरलें असावें. विष्णुदास नाम्याचें महाभारत, त्याची स्फुट प्रकरणें, आख्यानें अजून हस्तलिखित स्वरूपांत आहेत. त्यांच्या निरनिराळ्या प्रतींत इतकी भिन्नता आहे कीं त्यांचें पाठभेद संपूर्ण देणें शक्य नाहीं. तीच गोष्ट नामा पाठकांच्या अनेक काव्यांची. महाभारताचें प्रकरण असा उल्लेख असणारी कित्येक कथानकें महाभारताच्या उपलब्ध हस्तलिखित प्रतींत सांपडत नाहीत. भारताच्या आदिपर्वाच्या प्रतींत २२०० ते ४६०० पर्यंत ओव्या आढळतात. कांहीं प्रती इतक्या भिन्न आहेत कीं विष्णुदास नामा नांव धारण करणाऱ्या निरनिराळ्या कवींची तीं रचना असावी असा तर्क करणें भाग पडते. त्याबरोबर भारताच्या कांहीं पर्वांना मूळ गाभा होता असेंहि दिसतें चक्रव्यूहकथेंत ( प्रा. म. क. खंड ३ रा ). कवि स्वतःला कृष्ण, कृष्णदास म्हणवतो. औंधच्या कर्णपर्वांत कांहीं अध्यायांत ' कृष्णदास नामा ' व ' विष्णुदास नामा ' ही दोन्ही कविनामें आहेत. त्यामुळें विष्णुदास नामा व कृष्णदास नामा यांचा संबंध काय हा प्रश्न उपस्थित होतो. एकनाथपूर्वकालीन एक भारत होतें असें मात्र वाटतें, व हें भारत नामा पाठकांचें तर नाहीं ना अशी शंका डोकावते.

प्रस्तुत ५ व्या खंडांत समाविष्ट केलेल्या काव्यांचा विचार करूं या. 'तीर्थावली' व 'कृष्णकथा' यांची हस्तलिखितें श. १५५६ च्या सुमाराची असल्यानें हीं काव्यें जुनी आहेत व ही गोष्ट काव्यांच्या भाषेवरूनहि दिसते. तीर्थावळी प्रकरणांत आरंभी 'नामा म्हणे' असा उल्लेख असून शेवटीं 'विनवी नामा दामोधरू' असें म्हटलें आहे. तीर्थावळी प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें नामदेव स्वतःचा पराक्रम आपणच सांगतील हें शक्य वाटत नाहीं व हें प्रकरण आद्य नामदेवांचें नसावें. या प्रकरणांत विप्र विश्वनाथाच्या अभिमन्युविवाहातील ओव्या घेतल्या आहेत ही गोष्ट विशेष होय. कृष्णकथेच्याबद्दल सध्या तरी असा प्रतिकूल पुरावा नाहीं.

हरिश्चंद्रपुराणाच्या तंजावर प्रतींत आरंभीच्या ओव्यांत 'मग नामदेव विनवी हरिचरणीं' (१।१५) ही ओळ असून शेवटीं 'नामा म्हणे विष्णुदास' असें येतें. या आरंभीच्या ओव्या धुळें प्रतींत नाहीत व निरनिराळे प्रतींचे फरक लक्षांत घेतां या उल्लेखांना अर्थ उरत नाही. हें पुराण इ. स. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत पोर्तुगीज-मधें भाषांतरित झालें व या भाषांतराचें धुळें प्रतीशी फार साम्य दिसतें. (जुन्या मराठी ग्रंथाची पोर्तुगीज भाषांतरें, मराठी संशोधन पत्रिका, जानेवारी इ. स. १९६०) फादर स्टीफन्ससमोर हें पुराण होते असें डॉ. स. गं. मालशे यांनी आपल्या पी एच्. डी. प्रबंधांत दाखवलें आहे. नामदेवांच्या नांवानें आढळणारे या कथानकावर अभंग, जनाबाईचें आख्यान, श्रीधरांचें पांडवप्रतापांतलें आख्यान, मुक्तेश्वरांचें आख्यान, कथाकल्पतरुतलें आख्यान या सर्व आख्यानांचें या पुराणाशीं बरेंच साम्य जागोजागीं दिसून येतें व या ग्रंथकारासमोर हें पुराण होतें असें निश्चित वाटतें. हें पुराण एकनाथ-पूर्वकालीन असल्याबद्दल शंका नाहीं. पण त्याची उपलब्ध भाषा यादवकालीन नाहीं व त कोणाच हा प्रश्न तसाच राहतो. त्यांत आणखी भर ही कीं काव्याची दोन सपशेल भिन्न आख्यानें आढळतात (नगरप्रत व दुसऱ्या प्रती) आणि याशिवाय एका महानुभावीय प्रतीनें आणखी गुंतागुंत करून ठेवली आहे.

बुधबावणी काव्यें अनेक असून त्यांत विषय सारखा, अनेक ओव्या एकच, पण फरकहि पुष्कळ आहे. एक प्रत महालिंगदासाच्या नांवानें आढळते. (मराठी साहित्य पत्रिका, जानेवारी १९६३) एका छापील बुधबावणींत नामदेवांनाच नमन आहे (नवें नवनीत, पृ. १२४) ही बुधबावणी काव्यें एकनाथकालाच्या आस-पासची असावीत. मुळकासुरवधांत फिरंग्यांचा उल्लेख (१।२१) असून फिरंगी रामाला आपलें जहाज देऊं करतात अशी विलक्षण गोष्ट कवि सांगतो. हें प्रकरण आद्य नामदेवांचें वाटत नाहीं. 'लवकुशाख्यान' हें विष्णुदास नाम्याच्या काव्यामधील एकच रामायणावरील उपलब्ध काव्य आहे. त्यांत कुठे कुठें 'मति विवेकनामा' कविनाम आढळतें. हे प्रकरण फार जुनें दिसत नाहीं. वस्त्रहरण प्रकरणांत अनेक पेठांची नांवे आहेत. त्याचें नामा पाठकांच्या वस्त्रहरणांशी

( खंड २ रा ) क्वचित् साम्य दिसतें. त्यांतला वऱ्हाणपूरचा उल्लेख पाहतां काव्य आद्य नामदेवांचें नसावें. तुळमीआख्यान जनमेजयाला सांगितलें गेलें. व त्याची भाषा अगदीं सामान्य आहे. गरुडाख्यानाबद्दल वरती चर्चा केली आहे. या खंडांत समाविष्ट केलेलें गरुडाख्यान लहान आहे. ही लहान मोठी गरुडाख्यानें पाहतां मूळ कोठलें व कोणाचें हा प्रश्न उभा राहतो. उपलब्ध आख्यानांपैकीं कुठल्याचीहि भाषा फार जुनी नाही. संतावळीआख्यानकर्ता विष्णुदास नामा आद्य नामदेव नव्हे ही गोष्ट स्पष्ट आहे. तो आद्य नामदेवांचीच गोष्ट सांगतो. हा विष्णुदास नामा कुठचा हें सध्या ठाऊक नाहीं.

थोडी दुसऱ्या छापील व अप्रकाशित प्रकरणांची माहिती उपयुक्त होईल. जोग गाथेंत ३९ ओव्यांचे पंढरिमहात्म्य आहे. श्रीसमर्थवाग्देवता मंदिरांत बाडांक ७९३ मधें या प्रकरणाच्या ३४ ओव्या आहेत. छापील ३, ९, १०, २४, २६, ३१, ३२, ३७ या ओव्या त्यांत नसून हस्तलिखिताच्या ३०, ३१, व ३२ या ओव्या छापील प्रतींत नाहीत. एकादशी माहात्म्याच्या छापील प्रतींत १८८ ओव्या आहेत पण एका हस्तलिखितांत १२१ ओव्यांचें प्रकरण आढळतें. छापील उपमन्यु आख्यान ३२ ओव्यांचें तर एक हस्तलिखित २८ ओव्यांचें आहे. म्हाळसेनकथा (द्रोणपर्व) छापील गाथेंत मिळते पण उपलब्ध द्रोणपर्वें भिन्न आहेत. कलियुगमहिमा हें प्रकरण स्वर्गारोहण पर्वाचा भाग असल्याचें दिसून येतें. ( साहित्य सहकार, जानेवारी १९६४ ). चांदोरकरांना उपलब्ध झालेल्या १५३ ओव्यांच्या कपोताख्यानाचा कर्ता विष्णुदास नामा असावा असें त्यांना वाटलें. ( नामदेवराय व विष्णुदास नामा, भा. इ. सं. मं. पाण्मासिक इ. स. १९१२ ). या आख्यानांत कवीच्या गुरूचें नांव रामभारथी होतें. या आख्यानातलें कविनाम विष्णुदास नामा नसून नुसतें विष्णुदास आहे व त्यांत उध्दृत केलेल्या ओव्या तंजावर येथें उपलब्ध असलेल्या ओव्यांशी ताडून पाहिल्यावर दोन्ही आख्यानें एकच ठरतात. तंजावर प्रतींत कविनाम विष्णुदास नरसिंह असें आहे. त्यामुळें हें प्रकरण विष्णुदास नाम्याचें नसून दुसऱ्या कुठल्या तरी कवीचें दिसतें. हें प्रकरण मराठी संशोधन पत्रिकेंत प्रकाशित होईल. सांगण्याजोगी गोष्ट अशीं कीं असली छोटी प्रकरणें प्रकाशित करणेंहि आतां कठीण होत चाललें आहे. अशी लहान प्रकरणें पूर्वी एका मासिकांत प्रकाशनार्थ घेतली जात, पण हल्ली नाहीं. इतकेंच नव्हें तर चांभाच्या उपाहरणाची पृष्ठें चांभा कोण हें ठाऊक नसल्यानें त्या मासिकाकडून ती परत आली. त्याच मासिकांनें चांग हा शब्द चिनी भाषेतून आल्याचा भयंकर शोध लावला. दुसऱ्या एका नियतकालिकांचें पूर्वीचें वैशिष्ट्य हें होते कीं त्यांत जुन्या मराठीची लहान प्रकरणें छापली जात. या मासिकाच्या संपादकांनीहि अशी प्रकरणें आपण छापत नाही असें कळवलें. आतां या नियतकालिकात आधुनिक वाङ्मयचर्चा असतें व जुन्या मराठीबद्दलचा लेख अगदीं अपवादात्मक असतो.

आणखी एक दोन अनियतकालिकांची निराळीच तऱ्हा आहे. उरली फक्त मराठी संशोधन पत्रिका. ती नीट चालेल अशी आशा करतो.

हें थोडेसें विषयांतर झालें. आद्य नामदेवाचें ग्रंथकर्तृत्व कोणतें हा महत्त्वाचा प्रश्न अनिर्णीत राहतो. एकनाथानी 'जयांचें ग्रंथ पाहतां' ( भागवत १।१२२ ) या ओवींत उल्लेखिलेल्या कवीश्वरांपैकीं एक नामदेव होत. कृष्णदास दामा हा प्राचीन कवि नामदेवांनी भारत लिहिल्याचें आदरपूर्वक सांगतो ( नवें नवनीत पृ. १३८ ) हें कसें ? मात्र नामदेवांच्या अभंगांचे अवलोकन केल्यास त्यापैकीं पुष्कळ अभंग आद्य नामदेवाचे असावेत व नामदेवांचें काव्य मुख्यतः भक्तीपर असावें असें वाटतें. श्री. ग. वि. कविटकरांनी नामदेवांचे ग्रंथसाहिबांतल्या अभंगाशिवाय दुसरी अनेक हिंदी कवनें व पदें गोळा केली असून त्यांचें मराठी अभंगाबरोबर पुष्कळ साम्य आढळतें. हिंदी कवनांचे मूळ स्वरूप मराठीइतकें बदलले नाहीं असें कित्येक हिंदी अभ्यासकांनी सांगितलें. यावरूनहि मराठी अभंगांत बरेचसे अभंग आद्य नामदेवांचे आहेत ही गोष्ट जास्त उघड होते. या हिंदी कवनांचा विशेष अभ्यास होणें जरूर आहे. नामदेव व तत्संबंधित कवींच्या काव्याबद्दल उद्भवणारे सर्व प्रश्न सोडवण्यासाठीं त्यांच्या काव्यांच्या जुन्यांत जुन्या व लहानांत लहान प्रतींचें प्रकाशन झालें पाहिजे. या दृष्टीनें हा खंड तयार केला. असें या विषयांत आणखी पुष्कळ काम होणें जरूर पण तसेंच ते कठीण आहे. निरनिराळ्या ठिकाणच्या प्रती अवलोकनार्थ एकत्र आणणें फार अवघड काम. एका विद्वानांच्याकडे असलेले एक त्रुटित हस्तलिखित–ज्याचा त्यांना कांहीं उपयोग नाहीं–अभ्यासासाठीं मिळवण्याचे सर्व प्रयत्न फुकट गेले. अविद्वान् लोक मात्र फार आस्थेनें मदत करतात एवढी तरी समाधानाची गोष्ट आहे. आतां नामदेव गाथा समितीचें प्रकाशन बाहेर पडणार आहे. त्या समितींत विद्वान् मंडळी असून तिला साधनांची उणीव नसल्यानें ती नामदेवांच्या काव्यावर जास्त प्रकाश पाडील असा भरवंसा वाटतो.

ही आख्यानें गोळा करतांना नजरेस आलेल्या कांहीं बाबींचा उल्लेख करणें अवश्य वाटतें. अनेक व्यक्ती व संस्था हस्तलिखितें गोळा करतात. त्यांच्याकडे प्रकाशनाची सोय नाही, पण ती टिकवण्याची अथवा त्यांचे फोटो किंवा फिल्म घेण्याची व्यवस्था नाही. एकदां पाहिलेलें हस्तलिखित दुसऱ्या खेपेला असेल असा नेम नाहीं. कांहीं हस्तलिखितें माझ्या डोळ्यादेखत नष्ट होऊन गेली. अशी आपल्याकडे अवस्था असतांना ती परदेशांत गेली तर बरें असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं अनेक वृत्तपत्रांचे संपादक सांगतात की प्राचीन वाङ्मयग्रंथाबद्दल लिहूं शकतील असे लेखक आमच्याकडे नाहीत. पण असे लेखक दाखवल्यावर त्यांनी लिहिलेला मजकूर छापला जाईना. कै. प्रा. कोसंबींच्यापेक्षां नटांची माहिती छापणें त्यांना महत्वाचें वाटतें असें कळून आलें.

धुळें येथील श्रीसमर्थ वाग्देवतामंदिर, राजवाडे संशोधन मंदिर, तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालय, औरंगाबादचे एकनाथ संशोधन मंदिर, पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळ या संस्थांच्या मदतीमुळ प्रस्तुत खंड तयार करतां आला. राजवाडे संशोधन मंदिराचे श्री. द. रा. भट यांनी तत्परतेनें माहिती पुरवली. अहमदनगरच्या नगरपालिकेनें ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय स्थापन केलें असून त्यांत श्री. बाबासाहेब मिरीकर व श्री. ना. वि. पाठक यांच्या प्रयत्नानें अनेक हस्तलिखितें गोळा झाली आहेत. नगरला मी गेलो तो सुटीच्या दिवशीं पोचलो. तथापि नगरपालिकेचे मुख्य अधिकारी श्री. रा. ग. तेली यांनी आपला वेळ खर्च करून वस्तुसंग्रहालय मला उघडून दिलं व श्री. कटारिया यांनी मला हस्तलिखितें दाखवण्यांत सुटीचा वेळ खर्च केला. एकनाथ संशोधन मंदिराचे माजी कार्यवाह श्री. वा. ह. धारपुरे यांनी दृष्टी बरोबर नव्हती तरी एक प्रकरण मला नकलून पाठवले. मुंबईतल्या हिशेब खात्यातले माझे एक सहकारी श्री. मो. वा. साने यांनी परिश्रमपूर्वक अनेक हस्तलिखितांच्या नकला करून मला दिल्या. श्री. ग. ह. ऊर्फ तात्यासाहेब खरे, श्री. ग. वि. कविठकर, डा. स. गं. मालशे, श्री. देवीसिंग चौहान यांच्या बरोबर उपयुक्त चर्चा करतां आली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयानें हें कार्य हातीं घेतलें व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळानें प्राचीन मराठी कविता खंड तीन ते सहा या खंडांना रु. ४१२५ चें अनुदान दिलें. या सर्व संस्थांचा, व्यक्तींचा व महाराष्ट्रांतील वाङ्मयाबद्दल आस्था बाळगणाऱ्या सामान्य लोकांचा मी फार ऋणी आहे.

ज. शा. देशपांडे

रुक्मिणी निवास,
पहिली गल्ली, हिंदु कॉलनी
दादर, मुंबई १४.
१२–२–६६

# अनुक्रमणिका


| | | | | पृष्ठें |
|---|---|---|---|---|
| १ | नामदेव तीर्थावळी | ... | ... | १ |
| २ | कृष्णकथा | ... | ... | ६ |
| ३ | हरिश्चंद्रपुराण कथा | ... | ... | १२ |
| ४ | बुधबावणी | ... | ... | ५३ |
| ५ | मुळकासुरवध | ... | ... | ६० |
| ६ | लवकुशाख्यान | ... | ... | ८२ |
| ७ | वस्त्रहरण | ... | ... | १०३ |
| ८ | तुळसीआख्यान | ... | ... | ११० |
| ९ | गरुडाख्यान | ... | ... | ११६ |
| १० | संतावळीआख्यान, ( कमळाकर ब्राम्हणाची कथा ) | ... | ... | १२० |
| ११ | परिशिष्ट :-- | | | |
| | १ टीपा | | | १२५ |
| | २ शब्दकोश | | | १३४ |
| | ३ शुध्दिपत्र | | | १३९ |

राजा ... ग्रंथालय, ...
क्रमांक ...७५८६२... दि ...९।२।८५
... 2050 ... दि. 23/3/87
९५४६८

श्रीराम

# नामदेव तीर्थावळी

|| श्री गनेसायेन्म : श्री सरस्वतीयन्म :
श्री भोवानीय नम : तीर्थावळी :
वो नमु गणवर्या गणपती : ब्रह्मतनया सरस्वती : ॥ १ ॥
नामा म्हने नाममहीमा : आवडी मोटी पुरुसोतमा : ॥ २ ॥
प्रयागसंगमी त्रीवेनी : तेथे सकळ तीर्थाखानी : ॥ ३ ॥
गंगा येमुना सरस्वती : तीघही स्वानंदे पेळती : ॥ ४ ॥
ते सकळी हरी रंगन : समोर माधवाचें स्थान : ॥ ५ ॥
संगमीचे वालवंट : संत बैसले घनदाट : ॥ ६ ॥
ते मी सांगेन सकल : माहा पवीत्र नीर्मळ : ॥ ७ ॥
नामा कासीये नीघाला : संत समुदा मीळाला : ॥ ८ ॥
करे हरीकीर्तन साजीरें : जें जें दीधले वीटले : ॥ ९ ॥
पोव्हा मीळाला वहुवछे : मार्गी चालतो आनंदे ॥ १० ॥
वैस्णव समुदा मीळाला : गळां तुळशीचीया माळा : ॥ ११ ॥
गोपीचंदनाचे टीळे : नाम्याने अती ते मीर्वीले : ॥ १२ ॥
वाजवीती टाळ घोळ : सवे स्त्रुतीये मांदळ : ॥ १३ ॥
ध्वजा पताका मीर्वीती : वैस्णव हरीनामे गर्जती : ॥ १४ ॥
मार्गी चालती स्थीरे स्थीरें॥ वैस्णवा वर ढळती चंवरे : ॥ १५ ॥
अैसा मार्ग कर्मुनी : आले राजभुवना स्थानी : ॥ १६ ॥
घोसा नामाचा आयेकीला : तंवे तो सुलतान काये बोलला : ॥ १७ ॥
नामयाचे नाही चीती : म्हने जये जये कमलापती : ॥ १८ ॥
मलवंस अंहकारें भुलीला : हा मुसलमान की जे भला : ॥ १९ ॥
वछ गाये जी आनीली : अनुनीयां उभी केली ॥ २० ॥
वछ बांधुनी ठेलीले : गाईते छेडकुनी पाडीले : २१ ॥
गाये वधुनीया मास : गांधुनी आनीले उलासे : ॥ २२ ॥
छोड देई तुं वीठला : आव बे नामा कहो अला : ॥ २३ ॥
भगत गावता है धंदा : सच हये रे येक खुदा ॥ २४ ॥
क्या तु करता है नादानी : बहुत खुब मुसलमानी : ॥ २५ ॥

आव बे नामा खाना खाउ : नहीं तो अदल तुझे फुर्माउ : ॥ २६ ॥
अैस्या सुलतानाच्या बोला : नामा खदखदुन हासला : ॥ २७ ॥
नामा ह्मने हो येईल : हेच कळा करून दाखवीन : ॥ २८ ॥
असुद मास जी देखती : वैसणव थरथरा कांपती : ॥ २९ ॥
कैसी घडली हो द्रुमती[1] : खोटे लागले हो संगती : ॥ ३० ॥
पाहा काये कैसें जाले : संगतीचे फळ लागले : ॥ ३१ ॥
येक बोलती नीकूंट धीट : नाम्या आह्मा येकच नट : ॥ ३२ ॥ :
नामा वीनवे राजीयांते : कांही वीनवीत असु तुमते : ॥ ३३ ॥ :
आधी क्रीतंन करावं : मग भोजन करावे : ॥ ३४ ॥ :
आ[2] नेमची आमुचा : तुह्मी जानावा जी सांचा : ॥ ३५ ॥ :
तथें बोलती जी प्रधान : नाम्या करी क्रीतन : ॥ ३६ ॥ :
अैस्या प्रधानाच्या बोला : राजा आज्ञ देता जाला : ॥ ३७ ॥ :
मग टाळ म्रुदांग आणउनी : नामा राहीला हरीक्रीतनी ॥ ३८ ॥
नामाने क्रीतन मांडीले : केसवचरनी मन रंजीले : ॥ ३९ ॥ :
तर तुं माझा रे गोसांवी : आतांच येथें प्रचीती दावी : ॥ ४० ॥
तुझीया नांवाचा भर्वसा : पावीं वा रुसीकेसा : ॥ ४१ ॥
पीतयाने पुत्र वीध्वंसीला : तो तुवां अढळ पदीं बैसवोला : ॥ ४२ ॥
बळ दुध मागु लागला : त्यासी खीरसागरू दीधला : ॥ ४३ ॥
राज गांजीला पांनडी : तो सोडून आपुले प्रोढी : ॥ ४४ ॥
कोंले कपटरूप केले : तें तुवा सांचे करुनी दाखवीले : ॥ ४५ ॥
अैसी अनंत तुझी लीळा : राधावलभा गोपाळा ॥ ४६ ॥
बाप त्र हरी अकळा : राधावलभा गोपाळा ॥ ४७ ॥
धरत्री डुलु लागली : तेव्हा दाढेसी धरीली : ॥ ४८ ॥
प्रल्हादा मांडले संकस्ट : रूप धरीले वीकट : ॥ ४९ ॥
भत्क प्रल्हादु रक्षीला : हीरनेकसीफ वीडारीला : ॥ ५० ॥
अैसा भत्का वीळाईतु : ह्मनौन मी तुते सामरीतु[3] : ॥ ५१ ॥
स्रापे जाला अंबरूसीसी : तो तुवां घातला पाठसी : ॥ ५२ ॥
वेद संखासुरें नेले : ते तुवां मागुतेनं आनीले : ॥ ५३ ॥
ब्रह्मे गौवळें नेली : तीतुकींया तुवां केली : ॥ ५४ ॥
कवना कळुं नाही दील्ही : जेथेंचे तेथें संपादीली : ॥ ५५ ॥

---

१ दुर्मती.

२ हा

३ स्मरितु ?

सुदामयां भेटी दील्ही : वाटे ताटीका वधीली : ॥ ५६ ॥
पांडव असती वनवासी : अंन पुरवीसी रूसीकेसी : ॥ ५७ ॥
बाप बळी रघुवीरू : सीळासहीत बांधला सागरू : ॥ ५८ ॥
बाप बळीयांचा राना : त्वा वधीलें कुंमकर्ना : ॥ ५९ ॥
तेतीस कोडी देवो बांधुडी । ते सोडवीली आपले प्रोढी : ॥ ६० ।
बाप बळीयाचा राना : त्वा वधीलें रे रावना : ॥ ६१ ॥
अैसे पवाडे अनंत : नाभा नाभी नाम्या ह्मणत : ॥ ६२ ॥
अैसा भल्का पावलासी : मजवरी नीस्टुर का जालासी : ॥ ६३ ।
द्रुस्डी[1] कंसाते मारीले : राज उग्रसेना दीधलें : ॥ ६४ ॥
वसुदेव देवकीं बां दोही : रे सोडविली आपुले प्रोढी : ६५ ॥
सुदामा दळीद्रीं पीडीला : कृष्ण मागावया आला : ॥ ६६ ॥
मुस्टीक पोहे बांधुनी गांठीं : तुझी घेउ आला भेटी : ॥ ६७ ॥
अतीत करुनी बोलावीलें : कवना कळुं नाहीं दील्हे : ॥ ६८ ॥
ब्राह्मन उद्वेगे व्यापला : क्रुस्णा मागावया आला : ॥ ६९ ॥
मुस्टीक पोहे बांधुनी ये गांठी ॥ तुझी घेऊ आला भेटी : ॥ ७० ॥
थोर चींताग्रस्त जाला : ॥ ७१ ॥
क्रुस्ण मैत्र सांगितला : तो आवघाची व्रीथा गेला ॥ ७२ ॥
अैसा त्रुस्टे व्यापीला : ब्राह्मन सामोरा चालीला : ७३ ॥
गाई वछासी थीरारे : पुढें चरती अपारे : ॥ ७४ ॥
आंबे जाळी नी केकती : केळी नारेळी दीसती : ॥ ७५ ॥
उंस द्राक्षाचे मंडप : ठाई ठाई वाहातातो राहाट : ७६ ॥
पानवडीच्या परवडी : बरव्या दीसतांती वडी ॥ ७७ ॥
सेवक संवे घेउन जाती : राजा सुदामा वळगती ॥ ७८ ॥
सुदामयां आईके कानी : हे तों जाली लोक हांसती : ॥ ७९ ॥
पाहा हो द्वारके जाने न होते : आह्मालागी कोन हांसतें ॥ ८० ।
अैसा सामोरा चालीला : रचना देखता जाला ॥ ८१ ॥
हाटीं बैसले नानावटीं : रत्न वीकताती हाटीं ॥ ८२ ॥
घेउनी चंदनाची उटी : बैसले वानपुत्र : ॥ ८३ ॥
थटीचारमतीयार : सोने वीकतील सोनार ॥ ८४ ॥
बैसले परीकार : वानपुत्र : ॥ ८५ ॥
तार्नी पार्‍हेटीं बाळके : सुंदरी खेळवीती कौतुके : ॥ ८६ ॥
दारी तुळसीची व्रंदावने : ठाई ठाई होतात कीर्तने : ॥ ८७ ॥

---

१ दुष्टी.

×× ह्मणे मी मार्ग चुकलो : मागुता द्वारकेसी आलो : ॥ ८८ ॥
ऐसा सामोरा चालीला : रचना देखता जाला : ॥ ८९ ॥
मग देखता जाला : कवन पाटन पुसु लागला : ॥ ९० ॥
हांसुन बोलती सुंदरी : नगरा नाम सुदामपुरी : ॥ ९१ ॥
पाहा हो द्वारके जाने न होते : आम्हालागी कोन हांसते : ॥ ९२ ॥
अैसा सामोरा चालीला : रचना देखता जाला : ॥ ९३ ॥
अस्त्री झोपडां होती मांडीली : ते तवं नीजमंदीरी देपीली ॥ ९४ ॥
येक चंवरे ढाळीती : येक वीडीया देती : ॥ ९५ ॥
हातीं घेउनी दर्पन : येक दाषवती दुन्हुन : ॥ ९६ ॥
उच नीच कर जलरेषा : येक रेषती सुरेषा : ॥ ९७ ॥
अैसा र(ा) नीवासु देपला : मग तो आनंदु पावला : ॥ ९८ ॥
सुदामया वीचारे मनी : पईल राजयाची रानी : ॥ ९९ ॥
क्रुस्णे काही नाही दील्हे : आतां इसी याचु भले ॥ १०० ॥
येथे कांहीं प्राप्ती होईल : ते घरासी नेईन : ॥ १०१ ॥
अैसा त्रुस्टे व्यापीला : ब्राह्मन सामोरा चालीला : ॥ १०२ ॥
बोले स्वस्ती कल्यान : बरेवं राज वो मंडन : ॥ १०३ ॥
हांसुन बोलली सुंदरी : आझुन कैचे जी भीकारी ॥ १०४ ॥
क्रुस्णे वींदान केले : तुम्हा कळु नाही दीधले : ॥ १०५ ॥
या जी या जी कस्टलेती : आपल्यासी दील्हे कमळापती ॥ १०६ ॥
तारटीं घालुनी आरती : जाली सुदामा वोवाळती ॥ १०७ ॥
मगं भावें ववळीला : ब्राह्मन वीस्मीत जाला : ॥ १०८ ॥
पास पांतो तयेची : हे तवे आमुचे घरीची : ॥ १०९ ॥
सुदामा पाहे आपनाते : तवे देखीले अळंकारांवस्त्राते : ॥ ११० ॥ ॥ छ ।
बाळके अळंकारसीं आली : येउन सुदामा भेटली : ॥ १११ ॥
तवं लोकीं सन्मानीले : नेउन भद्रावरी बैसवीले ॥ ११२ ॥
मदनमस्त कुंजर : पुढें डोलती आपार : ॥ ॥
त्रुग[1] सुंगारून आनीले : आनुनीया उभे ठेले ॥ ११३ ॥
तेथे वाजती नेस्यान : तेने गर्जत गगन : ॥ ११४ ॥
परतुनी पाहे भद्रावरी : चंवरे ढलती दोन्ही करी : ॥ ११५ ॥
तेथें मांडुले पेखने : बरवे सुस्वर गाने : ॥ ११७ ॥
म्रुदांग टाळ आळवने : सुंदर नाचती नाचवनी : ॥ ११८ ॥
सभा दाटली घनदाट : तेथे वाखानती भाट : ॥ ११९ ॥

१ तुरंग ?

कृष्णारायाचे पोवाडे : सभे वाखानीती गाडे : ॥ १२० ॥
अल्प मागावया गेला : चौ पदार्थे सुखी केला : ॥ १२१ ॥
अैसे कवन वेगे नीर्मीले : नीर्मुनीया तुम्हा दीधले ॥ १२२ ॥
अैसी अकळ तुझी करनी : केसीराया चक्रपानी ॥ १२३ ॥
केसीराया जी माहेरा : वेगीं पाव जी दातारा : ॥ १२४ ॥
तुची देव कृवाबंतु : नको पाहु माझा अंतु : ॥ १२५ ॥
देवे धावा आयेकीला : सुद्रसेनांसीं उठीला : ॥ १२६ ॥
कवन गांझे माझा भक्त : गरुडा येई तु अरुता : ॥ १२७ ॥
लक्षेमी पुसीते वीस्णुतें : कवने गांजीले कवनातें : ॥ १२८ ॥
अैसा कवन आहे भक्त त्यासीं राउळ जानीत : ॥ १२९ ॥
वीस्णु सांगे लक्षेमीपुढें : नाम्या मांडले सांकडे : ॥ छ ॥ ॥ १३० ॥
माझा नामा गांजीला : तो वेगीसीं पाहीजे भला : ॥ १३१ ॥
संख चक्र गदा पद्म ये घेउनीयाच्याऱ्ही : मग बैसेला गरुडावरी ॥ १३२ ॥
लक्षमीनारायणाच्या बोला : गरुड तथुनी उडाला : ॥ १३३ ॥
नाम्यानें आकासीं पाहिलें : येता गरुडाते देषीले : ॥ १३४ ॥
पैल गरुडावरी वारीतें वीस्णु सारीषा येता देषे : ॥ १३५ ॥
दडवा दडवा हरी धावत नाभी नाभी नामा ह्मनत ॥ १३६ ॥
गरुड येऊनी उतरला : येतां नाम्याने देषीला : ॥ १३७ ॥
तेथें अळंकार मीर्वीती : दीव्बे तेज दीव्बे मुर्ती : ॥ १३८ ॥
मुगुट कुंडले झळाळ नेत्र दीसती वीसाळ : ॥ १३९ ॥
वाहेवंटी वीरकांकने : सोभे मुद्रीकेचें लेने ॥ १४० ॥
स्वरूप सुंदर सुंधारीत : सोभे मुद्रीकेचें लेने : ॥ १४१ ॥
ब्रह्म तत्व येज्ञ पवीत्र : बाहे दक्षनी मीर्वीत : ॥ १४२ ॥
अैसा घननीळु सांवळा : रूळे वैजयेंती माळा : ॥ १४३ ॥
कासे सोभे पीतांबरू : चरनी ब्रीदांचा टोडरू : ॥ १४४ ॥
अैसा आला धवधवीतु : माझा नामा नामा करीतु : ॥ १४५ ॥
चुकल्या बाळकाची माये : जेवी उतावळी पाहे : ॥ १४६ ॥
आली क्रुपेची माउली : द्रुस्टी द्रुस्ट येकची जाली ॥ १४७ ॥
नामा चरनी लोटला : देवो सन्मुपु लागला : ॥ १४८ ॥
अस्वपात ढळमळीत देवो पीतांबरें पुसत : ॥ १४९ ॥
कवन तुझे वाटे गेला : माझा नामा कस्टी जाला : ॥ १५० ॥
देवा तुं सकळांही जानसी : मज कासया पुससी : ॥ १५१ ॥
मार्गी कासीयेचे चालने अवघड मांडीयेले सुलताने ॥ १५२ ॥
गाये वधुनीयां मास : रांधुन आनले उलासे : ॥ १५३ ॥

देवें सुंद्रसेन सांवरीले : नाम्याने हातींचे घेतले : ।। १५४ ।।
इतुकीयासीं काये चींता : वीस्णु जाला जी बोलता : ।। १५५ ।।
ये रे नाम्या इकडे पाही . तुज मजसीं वेगलीक नाहीं : ।। १५६ ।।
हा घेई माझा बोल : जें करसील ते होईल : ।। १५७ ।।
वीस्णु नामा लागती कानी : नामा आनंदाचे ध्यानी ।। १५८ ।।
गुज नीवीचे[1] सांगती ।। दोघे घदपदा हासिती : ।। १५९ ।।
अेसा वैस्णवांसे मेळी ।। उभा राहीला वनमाळी : ।। १६० ।।
नामाने नाचत नाचत जाउनी : फुले अंजुळी घेउनी : ।। १६१ ।।
फुलें सकळी येकवाटली : नेउनी रायापुढें ठेवीली ।। १६२ ।।
मलीवंळ अहंकारें भुलीला : अन हा देशत्र फीरला ।। १६३ ।।
जर उठविसी गाईते : तरी संत मानीन तुते : ।। १६४ ।।
अस्तीग[2] होती पडली : तेही येकवाटली : ।। १६५ ।।
तयावर अत्वाना घातली : तयावरी वस्त्रें झांकोनी : ।। १६६ ।।
नामा लागीयेला चरनी : त्याने मांडीयेला आलवनी : ।। १६७ ।।
उठी उठी वो गाई : येथे गोपाळ आला पाही : ।। १६८ ।।
थोड पा वउतासाटी : तुं जालिसी वो कस्टी : ।। १६९ ।।
घांदावरी घेउनीया घोंगडे : बोल बोलीतो बोवडे : ।। १७० ।।
पाये घालुनी देव्हंडा ।। केरे केरे हा बो·ीला : ।। १७१ ।।
गाये षडपडुनी उटीली : नामा चालू लागली : ।। १७२ ।।
वळ बांधुनी ठेवीले : तेंही सोडुनीच दील्हे : ।। १७३ ।।
गांई वळा भेटी जाली: वैस्णव वाजवीती टाळी : ।। १७४ ।।
गयाकडे करुनीया तोंड : वेष्णव दापवती बोघड : ।। १७५ ।।
हरीचे क्रीतन करीती : प्रेमे आनंदे नाचती : ।। १७६ ।। ।।छ।। ।।छ।। ।।छ ।।

।। श्रीराम ।।

## कृष्णकथा

।। श्री गनेसाये नम: श्रीसरस्वतीये नम: श्री भवानीये नम: दीधली आळींगने भुसने : हस्तीवारुची आंदने ।। आनी गा वस्तु परीयेसा ।। १४ ।। अर्थी[3] आरुढलें वोहोर: उभवर्ग अती नार : कंसु

१ जीवींचे ?

२ अस्तीगत ?

३ रथी ?

घोलावा सोहोदर : नगराबाहीर नीघाली : ॥ १५ ॥ हरीषें नीरभये अंत-
कर्नी : तवं स्वर्गीची जाली आस्त्रनी : समस्त आइकती स्रवनी : गगनी काये
बोलीले ॥ १६ ॥ अरे कंसा अवधारी : येन्हे देवकीचा आठवा गर्भु जो
मुरारी : तो तुज वैरी : नीर्दळील : ॥ १७ ॥ देवईउदरी अठवा बाळ : तो
कंसालागीं काळ : तुज मारीतां नलगे वेळ : बोलीतां नीवांती ॥ १८ ॥ कंसु
आइकोनी वीस्मीतु : म्हने हे न चुके नीमीतु : म्हनउनी जाला भयाचकीतु :
मग वीचारीत मनामाजी ॥ १९ ॥ म्हने हे देवकी बहीन ईचेनी पुत्रे मज
बंधन : काये न सरे इजवांचुन : म्हनुन मारु धावीनला : ॥ २० ॥ षर्ग
काढुनी माहारगे : हानु धावीनला वेगें : नोवरी पळे नोवऱ्यामागे : हात
बोडवी दैनरुपे : ॥ २१ ॥ जैसा पीळनी पारधी प्रगजळीला अग्नु : की
हस्तनी पंचायतेनु : की व्याघ्रामुषी धेनु : प्रानु देहे सांडु पाहे ॥ २२ ॥ दोधें
चळचळा कापती वसुदेव आला काकुळती : गाया प्रयेसी गा वीनंती : तु
पवीत्रु सत्याचा : ॥ २३ ॥ अस्त्रीहत्या आनी बहीन हे थोर चुकवी पतन :
तु तरी स्याहाना आनी सज (न) : पाहे वीचारुन मनासी : ॥ २४ ॥ अगा
भुपती परीयेसी : आह्मा बोहोरगते वधीसी : हे दोस न घडे तुह्मासी : तु कां
ननसी सुजाना रे : ॥ २५ ॥ आनीप येक परीयेसी वचन : जेन्हे चुके हें
पतन अनीगु हे टळे आदान : मंत्रु सांगईन तुजलागी ॥ २६ ॥ हत्या न
घइजे येन्हे वेळे : आह्मा ठेवीजे वंदीसाळे : ईसीही येईल आठवे बाळ : ते
तु सांभाळी आपुले : ॥ २७ ॥ आठवा बाळु तुझा वैरी : त्यासी मन
माने ते करी : हे देवकी सोहोदरी : नोको मारी बापुडी रे : ॥ २८ ॥
यैसे वचन आइकोनी : कंसे वीचारीले मनी : म्हने हो जाबाई हे
बहीनी : वांचावी न का बधावी : ॥ २९ ॥ जैसा प्रजगु[1] पवळीला :
तो पावीनादे वो[2] प्रुलवीला : की वायो अग्नी उदकी सींपीला :
सांतु जाला कंसु तो : ॥ ३० ॥ मग ते बोहोर मुरडवीले : बहुतेनी
वेगेसी आनीले : आनुन बंदीसाळे ठेवीले : बेडीया जोडुनी दोघासी :
॥ ३१ ॥ छ ॥ वज्रलेपाचीये भुवनी : सांटवीलीं तें दोन्हीं : कुलुपा कवाडें
लाउनी : ठेउनी बहुत परीवारू : ॥ ३२ ॥ तेथें रीघु नाहीं पवनासी : द्रुस्टी
न पडे रवी ससी ॥ कोन्ही न बोलती तयासी : अैसीं पडलीं बंदीषानी :
॥ ३३ ॥ येका रायावांचुनी : कोन्ही न दे अंन पानी : अैसी गुंतली
बंदीषानीं : तेथें सीरानी गोस्टीची ॥ ३४ ॥ कस्ट भोगवीना अपार : तंव
देवकी जाली गर्भधर : पुर्न बांढीनलें उदर : हेर सांगती रायापासी ॥ ३५ ॥

---

१ भुजगु ?
२ मुळात ' वो ' आहे. भुलवीला !

पुरले नव मास संपुनें : तवं देवकीसी जाला कवन : टाहो केला बाळकानें : तव रापने धांवीनले : ॥ ३६ ॥ तेनें जानवीले कंसासी : प्रसुधी जाली देवकीसी : राव पातला बंदीसाळेसी : तवं ते थरथरां कांपती : ॥ ३७ ॥ पुढुनी उचलीलें बाळक : तव देवकीये करी सोक : बंधुराया रापी येक : तुवा आठवे वधीजे ॥ ३८ ॥ तवें तो क्रोधें जाला काळ : तवं के आसुडीले बाळ : घेउनी नीघाला तो चांडाळ : तळमळ करीती बापुडी रे ॥ ३९ ॥ जैसे पीळती पारधी : मग पस्पीनी होये अंधी : की पाडसे माहाफंदी : मग कुरंगीनी चरफडी : ॥ ४० ॥ जैसी वदा[1] लागुनी गाये ॥ तैसें दुप देवकीये माये : कंसु वेगवतरू जाये : येमुनेतीरी पातला : ॥ ४१ ॥ बाळ चरनी धरीले त्यान्ही : कावे दोन चारी फीरउनी : सीळेवरी उपटीले संत्रानी : त्रीभुवन कंटाळीले ॥ ४२ ॥ अैसा वर्तला अंकांतु : अैसीं बाळके वधीली सातु ॥ दुषीये जाली ते बहुतु : कृपा भाकती ते कारूना ॥ ४३ ॥ तो चांडाळ दुराचारी : पाप आचरीला संसारी : देवाधर्मा नाहीं उरी : नरे नारी त्रापती : ॥ ४४ ॥ त्याचे पापें पीडलें जन : रूस्येस्वरासीं नाही मान : बहु त्रासी गाई आनी ब्राह्मण : यौगीजन कस्टती : ॥ ४५ ॥ धेनुरूपे हे मेदनी : कृपा भाके दैनवानी : धावी धावी गा चक्रपानी : पापें भंगुनी बुडती असे ॥ ४६ ॥ तेतीस कोडी देव सुरवर : आनी यासी[2] सहस्र रूस्येस्वर : येथें कीनर पुरंधर : समग्र जाले येकवाट : ॥ ४७ ॥ मग तें गेले षीरसागरी : मग तेही अस्तवीला श्री हरी : देवा बुडाली हे धरीत्री : येने पै परीयेसा ॥ ४८ ॥ देवे दीधला नाभीकारू : ह्मने आह्मी घेईजे अवतारू : आह्मी येउन हा नीर्धारू : आतां उसीरू न करीजे : ॥ ४९ ॥ देवे योगमाया पाचारीली : तीयेसी आज्ञा कैसी केली : ह्मने तु अवतरी वहिली : नंदायेस्वदे उदरी : ॥ ५० ॥ पाहा हो श्रुस्टी याचे करन : कवना न कळे हे वींदाने : आह्मी मथुरेसी अवतरने: साहे करनें वीस्वाचे : ॥ ५१ ॥ देवकी वसुदेवालागुनी : ठवीले असे बंदी-षानी : अमीत रस्पपाळ असोनी : घटकी करूनी रापनी ॥ ५६ ॥ तये रात्रीचे अवस्वरी : मोहनी घालुनी सकळावरी : नीद्रा आपली अपारी घुमें घोरी घातली ॥ ५७ ॥ देवकी जागुती होउनी पाहे : तव येक बाळ स्वरूप आहे : माता वीस्मीत होउनी राहे : ह्मने हे काये देखती असो ॥ ५८ ॥ मागुते पाहे वीचारूनी : तव तो चत्रभुज नीर्वानी : लक्षमी अर्धांगी देपुनी : मनी वीस्मीतु राहीली : ॥ ५९ ॥ कासे

१ वद्या ?
२ ऐंशी ?

कासुनी पीतांबरू : संकचक्रगदाधरू : अनेग भुसने श्रीधरू नाभीकारू देतु असे : ॥ ६० ॥ असे नवल पै वर्तले : देवकी वसुदेवासीं दाषवीलें : दोघा आचीर्ये वाटलें : पुडती धरीलें बाळरूप : ॥ ६१ ॥ मग तें पाहाती येकमेका : तव तेनीसुध बाळ (का) : काही न देषती आनीका : माया मोहो कवळीली : ॥ ६२ ॥ पहिली कंसें बाळे वधीली : ते वसुदेवासी आठवीली : नेत्री अस्वपाते आली : कारूना केली उभवर्गी : ॥ ६३ ॥ ह्मने मी अपराधी पापीस्ट : पुर्वजन्माचा अती द्रुस्ट : देव धर्मी हा कनीस्ट : सेंवटीं कस्ट भोगवीले ॥ ६४ ॥ मी नीकर्मीनी दैवे : कां जन्मवीले सदासीवे : म्या कवना सने जावे : दुप सांगावे कवनापासी ॥ ६५ ॥ येक फळ नासे कवनाचे : त्यासी दुप हा स्त्रुस्टीचे : म्या मरन देपुनी साताचे : या प्रानाचे काये काज ॥ ६६ ॥ जैसा नदीमाजी तरुवरु : कीं तें दीपकेवीन मंदिरु : कीं तेवी उदकेवीन मरूवरु : ज्ञानेवीनु जैसा ॥ ६७ ॥ अंध चुके वनांतरी : की प्रानी वुडे महासागरी : तैसा नीपुत्रीये सवंसारी : का श्रीहरी जन्मवीलें : ॥ ६८ ॥ म्या कायो पंत्की भेदु केला : की क्षुधार्थी जेवीता उठवीला : की ध्यानस्ती योगी आलवीला : ह्मनुनी स्त्रापु पडीला असा : ॥ ६९ ॥ बा रे मज पापीयाचे कुसी ॥ बाया तु का रे जन्मलासी : आतां कैसेनी वाचसी कोठे लपउ तुजलागी ॥ ७० ॥ आता येइल तो माहाकाळ : तुज मागीता मग काय वेळ : अती नीस्टुर तो चांडाळ : तव तो बाळक बोलीला : ॥ ७१ ॥ तव बोले जगजीवन : तुह्मी पुर्व जन्मीचे ब्राह्मन : मी तुह्मा आलो प्रसन : तुह्मी मागितले वरदान : पुत्र वीस्गुसारीषा ॥ ७२ ॥ मी गुतलो भाकेवचनी : मग पहा त्रीभोवनी : मजसारीषा नाही कोन्ही : कोठुनी उमजे जैसा ॥७३॥ तुह्मी सुन पाप्रुली[1] दोघे कस्ट जालेती उभवर्गे ह्मनुनी मी धावीनलो वेगे : टाके याचे मोडेन ॥ ७४ ॥ ब्राह्मने अवधारीजे : मज गोकुळी नेइजे : येस्वदेपुढा ठेवीजे : येइजे कन्या घेऊनीया ॥ ७५ ॥ वसुदेव ह्मने रे बापा : दारी वाटा लावील्या कुलुफा : जमुना भरली आहे तापा : रात्रीरूपा आपुलीये ॥ ७६ ॥ नाभी ह्मने नारायेनु : माझा लावीजे वाम चर्नु : मार्गी होइल पाहे गुनु : यावें फीरूनी वेगेसीं ॥ ७७ ॥ इतुकें श्रीरंगु बोलीला : मग वसुदेव उठीला बाळ उसंगी घेतला : मग नीघाला वेगेसी ॥ ७८ ॥ झाकुनी पीतांबरे पटकुळी : धरीला हृदयेकमळी : तुज रखो रे महाकाळी : चंद्रमौळी कृपा करे ॥ ७९ ॥ अवो कुळदेव्या षेचरी : माहामाया आगोचरी ॥ या बाळासी रक्षा करी : परमेस्वरी जगदंबे वो ॥ ८० ॥ परमात्मया पुरुसोत्तमा : तुजसी हा सहस्रनामा ॥

१ पावली ?

रक्ष्या करी गा परब्रह्मा नीजधामा नारायेना रे ॥ ८१ ॥ ऐसे ह्मनुनीया द्वारेसी : कुलुपा पडील्या भुमीसी : बाहीर नीघाला वेगेसी : रात्री कैसी प्रकासीली ॥ ८२ ॥ अभ्र दाटले अंबरी : वीजा लवती चहुंफेरी : मेहोगर्जना होये थोरी : मुसळाधारी वर्सतुसे : ॥ ८३ ॥ पाउस वरुसे झडी. वाकडी : हाती धरीले न सापडी : येमुना पातली झडाडी : पुर दोन्ही थडी घु घु वाहातुसे ॥ ८४ ॥ गोकुळामाजी प्रवेसला : तवं सकळ लोकु नीजीला : नंदादारी आला : तंव कवाडें मोकळीची ॥ ८५ ॥ तेथें नवलपरी देषीली : येस्वदेसीं प्रसुदी[1] जाली आपुन नीद्रीस्तु घुमीली : कन्या जाली तयेलागी ॥ ८६ ॥ तेथे ठेवीला अनंतु : आपु(ण) कन्या असे घेतु : तेथोनीं नीघाला त्वरीतु : काये वीचारीतु मनासी ॥ ८७ ॥ ह्मने मी कैसा दैवहीनु : परीयेसु हातीचा सांडुनी : गोटे घेतसे वेचुनी : मी अज्ञानु हतभंगी[2] ॥ ८८ ॥ कांचन टाकुनी हातीचे वोझे वाहातुसे पीतळेचे : पाप संचीत कर्माचे : हे वाचे तऱ्ही दैवाचा ॥ ८९ ॥ जऱ्ही हे कन्या वाचो जींवे : तरी संसारी मी सदैवे : येसे कल्पीत मनोभावे : वसुदेवो आला बंदीसाळे ॥ ९० ॥ बा देई पुढां सोडी : तवं दोघां चरनी गुंतली वेडी : कुलुफा लागलीया कवाडी : टाहो फोडी बाळक : ॥ ९१ ॥ तव ते रक्षेपाळ जागैले : त्याही कंसासी जानवीले : मग सकळासी आचीर्ये जाले : काये वर्तले परीयेसा : ॥ ९२ ॥ कंसु पातला झडकरी : आला बंदीसाळेसी : बाळ उचलुनी धरीले करी : रोदना करी देवकी ॥ ९३ ॥ ह्मने रे पापीयोसी : तुजलागी अवतरीला रुसीकेसी : आता जागवी रे आपनासी मग आकासीं संचरीली : ॥ ९४ ॥ कंसु भयाचकीतु वीचारी : भाला कडतडला जीव्हारी : तळमळ सुटली अभ्यंतरी : नीजमंदीरी प्रवेसला : ॥ ९५ ॥ मग उदयो जाला दीनकरू : भद्री वैसला कंसासुरु : समस्त मेळवीला परीवारु : मग वीचारु आरंभीला ॥ ९६ ॥ कंसु ह्मने प्रधानासी : प्रसुधी जाली देवकीसी : कन्या जाली तीयेसी : गेली अत्राक्षीं[3] वधीता : ॥ ९७ ॥ तीनें सांगीतले नवल चोज : ह्मने रे जन्मला गोपीराज : ते माहावीव्र वाटत ह्मनौनी तुज : पुसतु असे ॥ ९८ ॥ तव ते मीनीये(ले) मंडळीक : वीचारुनी बोलीले सकळीक : अजी काल बाळक : जन्मले तक्षे (?) करूनी वधीजे ॥ ९९ ॥ म्हनुन हेर पाचारीले : तयासी राये सांगीतले : आजीकाळी बाळक जन्मले : नीरुतें केलें पाहीजे : ॥ १०० ॥ तव येक बोलती तये वेळी : आजी रात्री जी गोकुळी : येस्वदेसी प्रसुदी जाली पुत्रु व्याली नीभ्रांती ॥ १ ॥ तव

१ प्रसूती
२ हतभागी
३ अंतरिक्षी

बोलीला कंसासुरु : ते जो मारुनी ये लेकरु : तयासी देईन (सु)वर्नभारु : ह्या नीर्धारु परीयेसा ॥ २ ॥ इतके आइकता पुतना ॥ ह्मने आइक बंधु सजना मी वधीन त्याला कवना : चींता न करावी ॥३ ॥ ऐसे बोलुनीया सभेसी : वीडा उचलीला पैजेसी कंसु हरीषीला मनासी : मग ते कैसी नीघाली : ॥ ४ ॥ जेव्हा पातली काळघडी : तैसी परी आदरीली कुडी : वेडी जाली पडयेती ॥ ५ ॥ वीष भरुन दोन्ही अस्तनी : झडकरुनी नीघाली आपनी : पावली नंदाचे भुवनी : ह्मने येस्वदेलागुनी ॥ ६ ॥ तु तरी माझी सजनी : पुत्रजाला तुजलागुनी : बहुत हरीषु माझ्या मनी पाहावया-लागुनी अलीये : ॥ ७ ॥ तेंं हरीषे कही न माये : भस्ते जाले वो सर्षीये : हासती अहे वेघे : ॥ ८ ॥ मज दाखवी बाळ ताना थोर वोसंडे आला पान्हा : ऐसे बोलली पुतना तवं तो कान्हा काये करी : ॥ ९ ॥ तीचा मनोभाव देखुनी : रोजना करी चक्रपानी : पोट[1] कपाटीं लाउनी : घेउन आली येस्वदा : ॥ १० ॥ पुतना बोले : क्षेउदे[2] पीडेले बाळ तानुले : ह्मनुनी उच्गी घेले : स्तनी लावीले आपुलीये ॥ ११ ॥ बाळु बहुत करी आपेक्षु[3] : तीसीं झोंबला कृस्ण सर्पु : मीठी धारीता सुटीला कापु : आपे आपुन सांभाळे : ॥ १२ ॥ थोर येती असे कांकुळती : अस्टै आंगे आकों-चती : तीडीक मस्तकी उठती : ह्मने श्रीपती धावने : ॥१३॥ चर्नघाते हानुनी : असुद सोकीलें श्रीहरी : तोंड कीउलवानें करुनी : ह्मने श्रीहरी धाव धावने : ॥१४॥ अवो सोडवी येस्वदेमाये : वायां गोकुळा आलीये : अजी प्राने माये जालो कस्टीये : तरी मी नये मागुती : ॥ १५ ॥ प्राने केले व्याकुळे : तीने लावीले दोन्ही डोळे : वदन पसरुनी आवघरू सकळे : येकवाटील्या : ॥ १६ ॥ प्रान गेला तो नीघुनी : पडलीसे धरनी : वरी लोळतो चक्रपानी : गौळणी करीती नवल वो : ॥१७॥ : पहा हो दैवाची आगळी : कवन भया पुरूमत काळी : माळीग्राम ठेवती वाळी अंतकाळी होये मुक्ती ॥ १८ ॥ तरी तो साक्षे उभा हरी घेळे पुतनेचीये उगवरी : मुक्ती दीधली तये नारी : चीप करूनी सांडीली ॥ १९ ॥ इतका देखुनी चमत्कारू : गौळ्या मनी वीस्मो थोरू : ह्मनती अकळ हें लेकरू : याचा पारू नेनवे : ॥ २० ॥ मातु गेली कंसापासी ह्मनती नीर्दळीली पुतनेसी : कंसा भये थोर मानसी : अता कैसी बुधी करू ॥ ३१ ॥ ऐसा करीती संप्रधारू : वीनवे नामा दामोधरू : अवतरीला सांरंगधरू तो दातारू भक्तांचा ॥ २२ ॥ नदा हरीनाम घेइजे

---

१ पोटी कपट ?

२ क्षुधे !

३ आक्षेपु पाहिजे

वाचे : पाप टळेल जन्माचे : बंधन तुटे कर्माचे : पद प्रेमाचे पावीजे ॥ १२३ ॥ प्रसंगु ॥ १ ॥ समाप्त ॥
॥ राम नाम ॥ ॥ राम नाम ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

# हरिश्चंद्रपुराणकथा

## विष्णुदास ( नामा ) कृत

श्री गणेशाय नम : ॥ चौदा विद्यांचा प्रकाशु । तो नमावा गणेशु । महाविघ्ना करि नाशु । सनत्समात्रे ॥ १ ॥ कुभाव अतिलेने । तो वर्णावा गुरुगणे । तेणे नासति महाविघ्ने । गणपतिप्रसादे ॥ २ ॥ तो ज्ञानांकुर काढी । आणि विघ्न मात्र मोडी । कविजनासि सांडि । अज्ञानपडळ ॥ ३ ॥ त्यासी संध्यारागाचा मुगुटु । मस्तकि असे प्रगटु । ऐसा वदु तो आलाटु । गणराजु ॥ ४ ॥ अरुणरंगी अलोहितु । तयाते अति अमित्यु । म्हणोनि श्रोते वर्णितु । येकचित्त होउनिया ॥ ५ ॥ तो प्रसन्न जाला लंबोदरु । म्हणोनि मस्तकि ठेविला करु । मति विस्तारु । तेणे जाला ॥ ६ ॥ प्रसन्न जाला गणेशु । म्हणोनि तुझिये वाचे वसो रसु । मग करि श्ररसु । सारदेचा ॥ ७ ॥ आतां वंदु सारदा माता । म्हणोनि चरणावरि ठेविला माथा । कृपा करि मज अनाथा । दीनावरी ॥ ८ ॥ अवो प्रसन्नमुर्ति अमुर्ति । सर्वबीजा आदिशक्ती । माझी केव्हडि प्राप्ती । तुज वर्णावया ॥ ९ ॥ ऐसा राजा होय या क्षिती । म्हणोनि करीतुसे विनंति । माझी चोखाळ मति । करि माता ॥ १० ॥ तव बोलिलि सारदा । आता आमचिया विनोदा । कवित्व वरदा । दिधला वर ॥ ११ ॥ ऐसे बोलोनि जननि । प्रसन्न जाहि भवानि । ग्रंथ करी सुज्ञानि । अरे पुत्रा ॥ १२ ॥ मग म्हणे कैलासराजा । तुज प्रणिपातु माझा । आणि सनम्ता द्रिजा । दंडवत माझें ॥ १३ ॥ वाल्मीक महाकवि । तयाते मि विनवि । मज अनुज्ञा द्यावी । अज्ञानासी ॥ १४ ॥ ऐसी आज्ञा मागोनि । निरोपु दिधला कविजनि । मग नामदेव विनवि हरिचरणी । कथा सांगेन हरिचंद्राचि ॥ १५ ॥ जो आगमि प्रसिद्ध हरि( श्चंद्र ) चक्रवर्ति । आणि पुराणे त्यासि वानिति । जो राव येशकिर्ति । सूर्यवौंसि ॥ १६ ॥ नवखंड पृथ्विवरि । हरिश्चंद्र राजे करि । (स) कळ रायामाझारि । माहामेरु ॥ १७ ॥ सप्त द्विपावति । जो सूर्ये काळि आर्पति । त्याचिये संपति । वाचे वर्णवेना ॥ १८ ॥ जयासाटि कोटि कुंजर । तेरा शते अर्बुजे असिवार । येरा पायेभार । कोण गणि ॥ १९ ॥ सकळ त्रिजगति । ज्याच्या माळा नुपरति । ऐसि वारुवा नाहि मीती । तयाजवळी ॥ २० ॥ थोर तेजाचे आथिले । जैसे कनकाचे वोतिले । जैसे चित्रिचे

लिहिले। चित्रकारे ॥ २१ ॥ जरि सुर्यो अति वेगा। तरि व्यो सांडिति मार्गा। यासिया तुरंगा। घरि साटि कोटि ॥ २२ ॥ काये वर्णु त्या तेजियासि। संस्था नाहि दळभारासि। तो रावो सूर्येवौंशासि। पवित्र किर्ति ॥ २३ ॥ जे राये प्रुथ्विचे जिंकिले। ते गीरिकपाटि घातले। येक शरणांगत करुनि स्थापिले। आपुले सेवक ॥ २४ ॥ मग सनाथ केलि वसुंधरा। वेशि नाहि पाइका चोरा। यैसी चराचरा। नुलंघितिति स्वापद ॥ २५ ॥ ज्या रायाच्या नगरि वेव्हारी। सुखे राजयापरि। तथिल्या लोकाचारि थोरी। वोलवना ॥ २६ ॥ नुसति सुवर्णाचि मंदिरे। वरि झळकति हिरे। घोर परारे। माणकुळियाचे ॥ २७ ॥ त्यासि किर्तिचे चळणें। येरा जडित सुरगें। परि मठुचि पांघुरणें। जयाचा नगरी ॥ २८ ॥ अैसा तो लोकु श्रीमंतु। तेथे सर्वकाळ वसतु। जयाच्या नगरि असे प्रगटतु। क्रीडेलागी ॥ २९ ॥ अैसी ते देखोनि रचना। नारद आला त्या भुवना। संतोष जाला त्याचिया मना। अद्भुत देखा ॥ ३० ॥ पावोनि ते विश्रांति। म्हणे काय करावि अमरावति। याचिया उपमा द्याव्यापुरति। आणिक नाहि ॥ ३१ ॥ म्हणोनि प्रवेशला ते नगरी। नारदमुनि गेला भीतरी। तंव देखिले स्थान। मंडलिकांचे ॥ ३२ ॥ शाहानव कुळीचे सुभट। त्याचिया माथांचे मुगुट। ते होतानि पदपीट। रावो जोहारिति ॥ ३३ ॥ नारदाते देखोनि चक्रवर्ति। रावो उभा ठेला भावो भक्ति। साष्टांग नमस्कारि प्रेमप्रीति। राजा हरिश्चंद्र ॥ ३४ ॥ षोडश उपचारि पुजा केलि। म्हणे आजि वैष्णवेसि भेटि जालि। दृष्टि त्याचि वोल्हावलि। रूप पाहाता ॥३५॥ अैसा देखोनि रायाचा आदरू। नारद सुखि जाला थोरू। मग पुसुनि वेगवगत्रु। निवता जाला ॥ ३६ ॥ मग आला इंद्रसभेसि। तो देखिला सकळिका रूसि। नमस्कारू केला सकळासि। अयोध्या वानिता जाला ॥ ३७ ॥ हे सप्तहि द्विपावति। देखिले बहु नृपति। परि हरिश्चंद्रासारिखा क्षिति। आनिक नाहि ॥ ३८ ॥ पुण्यवंत विचित्रु। आचारधर्मे पवित्रु। जेणे निर्दाळिले शत्रू। प्रुथ्विचें ॥ ३९ ॥ तंव वसिष्ट संतोशला। तेवेळि विश्वामैत्र कोपला। जैसा घृते सिंपीला। वैश्वानरू ॥ ४० ॥ विश्वामित्र म्हणे वसिष्टासि। तु पुसे हित सूर्येवौंशासि। म्हणोनि हरिश्चंद्रासि। वानिसि मज पुढे ॥ ४१ ॥ किं मेरू वारुळा सरि। किं सागरापुढे थिलरि। कि जोति दिनकरि। आपुले तेज मिरवी ॥ ४२ ॥ कल्पतरुपुढे कनेरु। काच काये चिंतामनिहुनि थोरु। वायोपुढे पायेस्त्ररु। काये वानिसि रे ॥ ४३ ॥ सूर्येवौंशा न यावे उणे। म्हणौनि वसिष्ठा तुझे बोलणें। विश्वामित्र म्हणे वचणे। हरिचंद्रासि ॥४४॥ मि जरिसत्व ढळिन याते। तरि कांहि प्र(ति)ज्ञा बोला पा येथें। ते वेळि विश्वामैत्र वसिष्टाते। काये बोलता जाला ॥ ४५ ॥ अगा त्याचे सत्व भंगे जरि। तरि मी मी ब्रह्मकल्प सुरापान करी। कां दक्षणा मागेन

घरी । अंत्याजाच्या ॥ ४६ ॥ सिखासुत्र जरि तजिन जाण । ना तरि असत्याचे लक्षण । स्नानेविण भोजन । करि द्विजु ॥ ४७ ॥ नातरि अविद्या संचरीन । का विप्राच्या वृत्ति हिरेन । नातरि कुळक्षत्रि घेणे दान । अधमाचें ॥ ४८ ॥ नातरि कन्या विकुन द्रव्य घेती । तेणे कुटुंब पोसिति । त्या पापाप्रति । मि लिपेन ॥ ४९ ॥ हरिचंद्र चक्रवर्ति । सत्व मांडी नृपति । तरि म्या पूर्वज आपल्या हाति । वधिले जान ॥ ५० ॥ तव ईंद्रसभेआतु । असे विश्वामैत्र बोलतु । जो तपे सामर्थ्ये अद्भुतु । जेंणे दुसरि सृष्टि केलि ॥ ५१ ॥ तो म्हणे तप उत्कृष्ट केले । म्या तिन्हि लोक जिंकले । स्वर्ग असे उरले । भोगावया ॥ ५२ ॥ जे उन्मेष लोचन । म्या केले सूर्याचे अवलोकन । निरोखि सुदले मन । वरुषे कोटि दाहा ॥ ५३ ॥ आणि भोजनि ग्रासि लोहचूर्ण । तपता सूर्ये माध्यान । केले पंचाग्निसाधन । उष्णकाळीं ॥ ५४ ॥ आणि रितकुंडी हिंवतु । होतो दाहा सहस्त्र कोटि जपु । म्हणें म्या जिंतिला मृत्यु । तपोबळें ॥ ५५ ॥ त्या पुण्याच्या रासी । हरिचंद्र उत्तरे अनायासि । तरि अवघे दिधले तयासि । अैसे जाण ॥ ५६ ॥ तवं तयासि वसिष्ठ म्हणें । हे साच हो बोलणें । हे शुभासिर्वचने । फळो पा तुज हरिचंद्रा ॥ ५७ ॥ तव तयावरि पुरेंधरु । आणि ब्रहस्पति देवाचा गुरु । परि दोघा वेवाद लागला थोरु । ते नाईकति काहिं केलिया ॥ ५८ ॥ गाधिरायाचा कुमरु । परि आचरे सत्कर्म थोरु । ते पापे द्विजवरु । जाला असे ॥ ५९ ॥ वसिष्ठ तव ब्रम्हबिज । विश्वामैत्र क्षेत्रतेज । म्हणोनि जयाचे जे सहज । ते चुको नये ॥ ६० ॥ अैसे दोघे पडिले अभिमाना । थोर प्रतिज्ञा केलि जाणा । मग केले गमना । विश्वामैत्रे ॥ ६१ ॥ ते वेळि वसिष्ठ माहामुनि । तो सूर्यवौंशा अभिमानी । झडकरि आला टाकुनि । अयोध्येसि ॥ ६२ ॥ महिमेचि मर्यादा जयापासि । निपजति मंत्राच्या रासि । तो उजविये दृष्टि सूर्यवौंशासि । पाहातु असे ॥ ६३ ॥ वेदशास्त्राच्या द्विपाआतु । जो परमार्थ असे भरितु । जयाचेनि नावें असे तरतु । सूर्यवौंशु ॥ ६४ ॥ तया वसिष्ठाचा दरुषणें । होय पापासि पुरश्चरणें । तो केवळ निधाने । मुक्तिचे ॥ ६५ ॥ वसिष्ठ आला लोक म्हणतु । ते वेळी रावो सामोरा येतु । मग सन्मान केला बहुतु । राउळा आंतु आणिला ॥ ६६ ॥ विधियुक्त मधुपर्क केला । अत्रिपुत्रे रुशेचरणावरि माथा ठेविला । बहुसन्माने अलंकारिला । तो द्विजवरु ॥ ६७ ॥ तव विश्वामित्रे आपण । गुप्तसिशे धाडिले दोघे जण । तेथे आईका(या) वचण । वसिष्ठाचे ॥ ६८ ॥ विश्वामैत्रु म्हणे आम्हा दोघासि । वादु जाला ईंद्रसभेसि । ते जरि सांगीतले रायासी । तरि सत्व मिथ्या ॥ ६९ ॥ तरि प्रतिज्ञाहानि जालि । पैज विश्वामैत्रे जिंतिलि । म्हणोनि परिसावया बोलि । पाठविलें दोघेजण ॥ ७० ॥ तव ते नायेकति त्याचे वचना । निघोनि गेले ततक्षणा । पातले स्थाना । विश्वामैत्राचे

॥ ७१ ॥ म्हणति रुसिगयासि। वसिष्ट कांहि नोवलेचि। अधिक विश्वामै-
त्रासि। अभीमान पडला ॥ ७२ ॥ मग वसिष्ट म्हणे नृपनाथा। आम्हि
स्थानासि जावो आतां। तुझिये भेटिचिया आर्ता। आलो येथें ॥ ७३ ॥
तु जरि सत्वसिंधु जाण। पवित्र तुझे अंतकरण। म्हणोनि तिहिं लोकि
आख्यान। वाखाणिले असे ॥ ७४ ॥ तु याचका विन्मुख नोहेसि। चोखाळ
येश तुजपासि। तेणें उजियेडु दाहि दिसि। तुवां केला ॥ ७५ ॥ तुझियेनि
येशे ब्रम्हगोळु। अवघा जाला चोखाळु। सागरु हळु। भरला असे ॥ ७६ ॥
तो येकवटिता जाण। खोटि वळिताहि सळले कन। ते जाउनि रुतले गगनि।
त्याचि तारांगणे जालि ॥ ७७ ॥ चंद्र दिसे गगनि। ते तुझे येशमधुनि।
कांहिं मिठु घातले लोनि। ते तेथे ठेविले ॥ ७८ ॥ नाना तुझिया येशासि।
उपमा देउ नये चंद्रासि। आंगी कळंकु तयासि। लागला असे ॥ ७९ ॥
आणि तुझा ठाई कळंकु नसें। महेशाचे आंगी दिसे। म्हणुनि जातुसे।
गोत्रधामा ॥ ८० ॥ तुझिये येशाचा दडकु पाउस पडला। तो कर्दळि गर्भि
मुराला। मग तयाचा जाला। उदयेभास्कर ॥ ८१ ॥ परि हे असे बोलणें
किति। वसिष्ट म्हणे गा चक्रवर्ति। जे राजे प्रजांते पाळिति। ते नांदति
चिरंजिवित ॥ ८२ ॥ असे राज्यासि जतन करावे। आणि पारधि तुवा नव
जावे। काहिं दुःख नेदावें। रुसिवृंदा ॥ ८३ ॥ सांडावे पारधिचे वेसन:
न करावे सिधाश्रमा गमन। ईतुके माझे वचन। करावे तुवा ॥ ८४ ॥ अवो
तारामति सुंदरि परियेसि। तु पवित्र दोहीं वौसि। सकळहि धर्म जानसि।
घराश्रमिचे ॥ ८५ ॥ जे भ्रताराचि आज्ञा पाळि। उत्तर नुलंघि वचने काळि।
ते वाखाणिजे पतिव्रता भुमंडळि। पुण्योस्त्रि ॥ ८६ ॥ परि तुं पतिव्रतासिरो-
मणि ॥ न चुकेसि अतित अभ्यागत पुजनि। याचि धर्मास धन तुझे गुणी।
पतिव्रते माये ॥ ८७ ॥ ईतुके सांगोनि दोघा। वसिष्ट निघाला वेगा। आम्ही
जाउनिया प्रयागा। अनुष्टाणासि ॥ ८८ ॥ तो न पवता अर्ध घडि। पावला
प्रयागाचि थडि। तयाते उत्कंठा येवडि। कवणाकारणे ॥ ८९ ॥ जया राया-
चिया सत्वा येईल उणे। म्हणोनि तेथें केले पेणे। तपे रुसि आनंद तेणें।
त्रीवेणिसि ॥ ९० ॥ त्याचिया सत्वा व्हावे जतन। वसिष्टे मांडिले अनुष्टाण ॥
तेथें बैसला धरूनि ध्यान। तो ब्राम्हऋषि ॥ ९१ ॥ तव विश्वामैत्र सत्व
ढाळवया लागुन। थोर प्रतिज्ञा बोलोन। सिद्ध आश्रमि बैसोन। मांडिले
वहन ॥ ९२ ॥ मग पाहोनि स्थान भूमि। बैसला सिद्ध आश्रमि। तेथें अभि-
च्यारि कर्मि। प्रवर्तले ॥ ९३ ॥ आकारे छेडिलि यौत्के। रचिलि छडकोन
तेथें। सावे रुत्विज उद्गाते। सासष्टि विप्रा ॥ ९४ ॥ तंव तेचि अथर्वणि।
बैसले नग्न होउनि। आंगीं उटि घेउनि। सेंदुराचि ॥ ९५ ॥ स्वानंद कनेरा-
चिया माळा। घातलिया (अ)सति गळा ॥ आणि लल्हाटि टिळा। रक्तचं-

दनाचा ॥ ९६ ॥ मग तिळा कुंथे आज्ञे आव्हानिला । तो कुंडाभाजि प्रवेष्टिला । हाति सुरवा घेतला । रक्तचंदनाचा ॥ ९७ ॥ मग ते अवश्वरि । अर्चि देवता मातंगेश्वरि । तिचि षोडस उपचारि । पुजा केलि ॥ ९८ ॥ मग तियेजवळि । बैसका केलि वेताळि । भैरव झोटिंग क्षेत्रपाळी । तेही आले तेथें ॥ ९९ ॥ तेथें उतितिया द्राक्षि केळि । आणि नारेळि फोफाळि । धुम्राचेनि मेळि । गगन झांकोळले ॥ १०० ॥ तया कुंडाभोवतें । चउषष्ट पत्रे लाविली वोते । तयाचेनि दृष्टि (पातें ?) । उन्मतपणे ॥ १ ॥ येक मद्यद्रवे भरुनि पात्रें । देवि आणुं दो नयेन मत्रे । मंगळ यज्ञ पवित्रे । चालुनि परमुचि ॥ २ ॥ तेथे विश्वामैत्रु आपण । हाति बांधले अभिच्यारि कांकन । येरे ते करिताति वहन । अकरा कोटि मिळोनि ॥ ३ ॥ ऐसि ते मातांगेश्वरि देवता । पुरवि आमचे मनोरथा । म्हणोनि पुजा करिता जाला तेथें । रुसिरावो ॥ ४ ॥ तेवेळि जालि पुर्णाहुति । मातांगेश्वरि जालि तृप्ती । मग काय जालि बोलति । तृप्त होउनिया ॥ ५ ॥ मग देवता जालि प्रसन्न । मग विश्वामैत्रे आपण ।... । काय बोले ॥ ६ ॥ मग म्हणे देवतेते । प्रसन्न जालिसि माते । तरि श्वापदे बहुते । जन्म दावित पैं ॥ ७ ॥ ते वेळि दिवसाचि येक कोडि । तया स्वापदा पृथ्वि थोडि । यासि होमापुढी । निपजविलि ॥ ८ ॥ ऐसे बरुशे दिवसपर्येंत । व्याघ्र जन्मले बहुत । ते वेळि पुरले मनोरथ । तया राजरूसिचे ॥ ९ ॥ मग व्याघ्र करिता न चलती वाटा । लोक वरपड जाले कष्टा । दिसांत चहुकडे थोटा । स्वापदाचे ॥ १० ॥ ते व्याघ्र मनुषे नेति । तेथे मार्गु कैसे वाहाति । ते वेळि प्रजा आल्या धांवति । हरिचंद्रापासि ॥ ११ ॥ जि स्वापदे बहु उदेलि । तिहि सिवार खादली । आमची जिविते बुडाली । काये किजे स्वामिया ॥ १२ ॥ दुष्टे तोचि निर्दाळिति । आणि शांति प्रतिपाळिति । ते राजे नांदति । बहुत दिवस ॥ १३ ॥ पोटिच्या बाळकाचे परी । प्रजाचा प्रतिपाळ करि । तो टाकि अमरपुरि । विमानि बैसोनियां ॥ १४ ॥ राजा आयेकोनि त्याचि विनंति । विचारिले आपुले चिति । आतां कैसि युक्ति । करावि ॥ १५ ॥ आपणाते म्हणवि राजा । आणिका गांजिता देखे प्रजा । तरि उरे ये पुर्वजा । वेताळिसा ॥ १६ ॥ आजि नाईको याचे बोलणे । तरि येईं कवणा पे गार्‍हाणें । तेणें जरि वसिष्ट कोपणे । तरि चरणा करु दंडवत ॥ १७ ॥ ऐसि मनि करूनि संकल्पना । परिवारू हाकारिला ततक्षणा । पारधि निघाले वना । व्याघ्राचिया ॥ १८ ॥ ते वेळि जोडि वाडि कित्तेका । चतुरविधि पारधि आईका । निघाले राजपुत्र आईका । पारधिसि ॥ १९ ॥ रथि बैसले भरूनु वाघुर । राउ निघाला बहु- । असंक्ष्या[1] नाहि दळभार । घोलियासि[2] ॥२०॥

---

१ संख्या. २ घोडियासी ?

चालिले गुढरिले गजघंट । पाखरिले तुरंगाचे साट । ते वन वडिले घनदाट । चहुंकडे ॥ २१ ॥ जाळि पसरिलि फॅसि । वाघुरा चिरिल्या दाहा दिसि । सरोवर फांसि । वेढियेले ॥ २२ ॥ रान पांगले भोवते । मग सावजे पळत येत । वाघरेमध्ये पडोनि मरत । असंख्यात ॥ २३ ॥ खर्गे घेऊन येति । त्याचि जिव्हा रेखाति । तेणें श्वापदे मरति । बहुसाल ॥ २४ ॥ ऐसि पारधि रावो खेळतु । आटु सावजाचा भवतु । सवे सुखास चालतु । तारामती ते ॥ २५ ॥ ऐसा काढावा काढोनि । हरिचंद्रभेणे पळोनि । ते वेळि विश्वामित्र देखोनि । कोपा चढला ॥ २६ ॥ ते वेळि राजऋषिचि करणि । नवि हरणि रचिल्या दोन्हि । म्हणे तुं (म्ही) जाउनि । आणावा सिधाश्रमा ॥ २७ ॥ ते वेळि त्याचया वचना । माज जाला तया हरिणा । ते देति कीरगना । आलि रायापासि ॥ २८ ॥ देखिलि झळकत कांति गोमटि । त्यावरि पडलि रायाचि दृष्टि । हरिचंद्र लागला पाठी । तयाचिया ॥ २९ ॥ घावो देउन तुरंगा । मग निघाला वेगा । जातुसे लागा । हरिचंद्र ॥ ३० ॥ ऐसि आलि त्या सिधाआश्र-मांतु । तेथे रिघो भ्याला हरिचंद्रु । तो ठाये पाविंत्रु[1] । देखिला राये ॥ ३१ ॥ वनशृंघारिले अपुर्व । कोकिळा करिति स्वरव । मयोरे नाचति तांडव । पक्षि गुजवुजिति ॥ ३२ ॥ तया स्थाना(पा)सि । हरिचंद्र आला तारामतिसि । वन औघे चौफारि । दोघे अवलोकिति ॥ ३३ ॥ तव तेथें विश्वामैत्रें । रचिले सीवभुवनातें । तो प्रसाद असे दिसते । माहामेरु ॥ ३४ ॥ तव राये म्हणे अद्भुत स्थान । दिसतसोचि भुवन । ते देखोन जाण । हरला सिणु रायाचा ॥ ३५ ॥ उदकाचे सरोवर दिसति । सुवर्णकमळे विवर्जिति । मग राव म्हणति । येथें स्नान करूं ॥ ३५ ॥ वानिं पारधि खेळता । हत्या जालिया बहुता । त्या हरति समस्ता । स्नानमात्रे ॥ ३७ ॥ परिवार सांडिला दूरि । राहिले जवाळि दोनि च्यारि । आणि तारामती सुंदरी । सेवा करि रायाचि ॥ ३८ ॥ स्नान करुन सरोवरी । रावो आला शिवाइलाभीतरी । सोडस उप-चारि । पूजिला देवो ॥ ३९ ॥ तव विश्वामैत्रे केलि मावकरणि । दोघि रचि-लिया रानि । नाचति त्या दोघिजनि मातांगीनि । अति सुंदरा ॥ ४० ॥ त्याचि स्वरुपता पाहाता । तिरि( मिरि ? ) मातांगीनि तत्वता । गायेन आरंभिले तत्वता । त्याहि मातांगी ॥ ४१ ॥ असो तया दोघि जनि । विश्वामैत्राचिया मातांगीनि । धाडिलियाचि तया हा( रवा )वयालागुनि । हरिचंद्राचें ॥ ४२ ॥ विष्णुदासु नामा म्हणे परियेसा । तो वादु पडियेला महेषा । लटके म्हणाल तरि पुसा । श्रोतयासि ॥ १४३ ॥ छ प्रसंग ॥ १ ॥ संपूर्ण ॥ छ छ

---

१ ‘ पवित्र ’

# प्रसंग ॥ २ ॥

वों नमो श्री सचिदानंदाये नमः ॥ आयेकोन तयांचे गाणे । राजा संतोषला मनें । काये द्यावे या कारणे । विचारितु असे ॥ १ ॥ मग गायेने संतोषला । राजा उचितासि आला । मग काये बोलता जाला । तये गाणिवेसि ॥ २ ॥ रावो म्हणे तुम्ही मागा दोघीजणि । जे काये असे तुमच्या मनि । येरि म्हणति वेधला आमचा गुणि । आतां जाईल कोठें ॥ ३ ॥ त्यासि द्यावया शृंगारू । राये काहाडिला आंगिचा अळंकारु । येरि म्हणति सुंदरु । अळंकारा चाड नाहि ॥ ४ ॥ विश्वामैत्राचेनि प्रसादपणे । आम्हा काये असे उणें । परि येथें येणें याचिकारणें । तुमचिये भेटिसि ॥ ५ ॥ मन्मथाचे शरि । विंधिले आमचे जिण्हारि । तुं मदनमुर्ति अवधारि । राया हरिचंद्रा ॥ ६ ॥ जिकावया मन्मथाते । श्रेष्टिनें रचिले तुमते । आम्ही रूपे देखिलि बहुते । परि तुज सारिखा नाहि ॥ *७ ॥ ये वसुंधरेभीतरि । आम्हि पुरुप देखि(ले) कोटिवरि । परि तुझि न देखो न सरि । लावण्याचि ॥ ८ ॥ तरि आम्हा आंगभोग दिजें । आंगी प्रत्यांगी आलंगीजे । आमचे मन सुखी किजे । राया हरिचंद्रा ९ ॥ आणिक भलतिये दिसि । करिसि सोनियाच्या रासि । परि सुख न देखासि । आम्हावांचुनि ॥ *१० ॥ तंव सत्यकिर्ति प्रधान होता जवळा । ते अवेशला त्याचि वेळा । म्हणे माझिया नृपति अवकळा । ऐसि बोलति ११ ॥ घाला घाला रे बाहेरि । चांडाळणि पापीणि माहारि । पाप बोलति उतरि । त्या माहारि बोळखिल्या ॥ १२ ॥ ऐसें प्रधाने बोलोन । बाहिर दवडिलि येथुन । मग गेल्या विश्वामैत्रा टाकुनि । त्या सांगति वृतांतु ॥ १३ ॥ उसक बुकस रडति दोघि जनि । आल्या विश्वामैत्रा टाकुनि । तयावेळी त्या राजऋषिसि । आला कोपु ॥ १४ ॥ मग उठला क्रोधे कांपत । सवे बडवे निघाले बहुत । आला सिविया देत । रायापाशी ॥ १५ ॥ मग म्हणे अरे चांडाळाच्या कुमरा । पापीया अधमा हरिचंद्रा । तुज नाहि लागला दरारा । माझा विश्वामैत्राचा ॥ १६ ॥ तु मज प्रमाणें नेणासि । मागे तुझिया त्रिशंकासि । बैसणें इंद्रसभेसि । म्याचि केले ॥ *१७ ॥ केला चांडाळपणा वेगळा । मग अमरलोकि सरता केला । तुझिया पित्यासि मोक्ष दिधला । म्या हरिचंद्रा ॥ *१८ ॥ ते अवघे विसरलासि । आणि धर्म होउनि प्रवर्तलासि । म्हणोनि गांजिसि । माझिया भुवनाते ॥ *१९ ॥ वासिष्ठाचिया पुत्रासि । मग केले ते नेणासि । कोण्हि न सांगति तुजपासि । त्याचि गोष्टि ॥ *२० ॥ हा रे माझिया आश्रमासि । तुज यावया चाड कायेसि । बहुत गर्वे जातोसि । राजमदे

॥ २१ ॥ म्या पाळिलि होति स्वापदे । ते मारिलि त्वां समस्ते । चांडाळा मातलासि मदे । राज्याचेनि ॥ २२॥ ते वेळि तारामति सुंदरि । माथा ठेविला चरणावरि । म्हणें चुकि जालि जि अवधारि । आमच्या ठाई ॥ २३ ॥ सत्यकिर्ति प्रधाने साहिले । मग राये दंडवत घातले । क्षमा करा जि अैसे म्हणितिले । चुकलो आम्हि ॥ २४ ॥ येरू म्हणे कैसि करावि क्षमा । तुवा नासु कला माझिया आश्रमा । अरे पापीयां अधमा । श्वापदे माझि उपद्रविलि ॥ २५ ॥ येथे वैर नाहि कोण्हासी । तुवा वधिले त्यासी । ऐसा चांडाळ होसि । दुरात्मा ॥ २६ ॥ करितोसि नवखंडि (पृथ्वि)चे राज्य । ते(हिं) न पुरे(चि) तुज । म्हणोनि दाउ आलासि मज । (आपुली प्रौढी) चांडाळा ॥ २७ ॥ येसियाचे न पाहिजे मुख । आम्हासि उपजाविले दुःख । अैशा (परीस) पातकियास । नसे त्रिभुवनि ॥ २८ ॥ अैसा विश्वामित्र निघाला कोपोनी । तव रावो विचारि मनि । मागुता आला फिरोनि । शिवभुवना ॥२९॥ तेथे[1] विनवि विश्वामैत्राते । स्वामि अपराध घडला माते । म्हणउनि चरण नमस्कारिते । येरू गेला निघोनि ॥ ३० ॥ मग हरिचंद्रे विश्रामु केला । तारामतिचे मांडिवरि माथा ठेविला । राजा स्वप्न देखता जाला । निद्रेमाजि ॥ ३१ ॥ स्वप्नातु येकु ब्राम्हणु आला । रायापुढे उभा ठाकला । तेणें आशिर्वाद केला । वेदपूर्वक ॥ ३२ ॥ स्वामि काये मागाल ते देईन । भाक दे राया सत्यवचन । *
ब्रम्हा विष्णु रुद्र तिघे जन । साक्ष ठेविले ॥ ३३ ॥ तव मागीतली नवखंड क्षिति ॥ ब्राम्हण म्हणे जालो तृप्ति । आता (क)डीयाळ अंकुश दे आमचे हाति ॥ तितुका संकल्प घातला ॥ ३४ ॥ तुझि लेखणि असे केउति । ते दे माझे हाति । राये दिधाली सिद्यवंति । ब्राम्हणासि ॥ ३५ ॥ राये अवघेचि दिधले त्यासि । ब्राम्हण संतोषला मानसी । । तव आणिक देखिले विवसि । स्वप्नामाजि ॥ ३६ ॥ बाबरझाटीचे थोर । अति काळे भयासुर । अैसे देखिले शरीर । विशाल पैं ॥ ३७॥ ते टेकिले देखे गगनासि । हाति प्रचंड गदा त्यासि । ते हानत रायासि । मानेवरि ॥ ३८ ॥ अैसा वोथरे दाटला । मग गजबजुनि उठला । हरि नारायेण म्हणोनि बैसला । भोवते पाहातुसे ॥ ३९ ॥ ते वेळि थापटि तारामति । म्हणे सावध व्हावे जि नृपति । तुम्हा काये अवस्था अवचिति । जालि सांगा ॥ ४० ॥ तव रावो म्हणे. म्या येक । स्वप्न देखिले ते आईक । ब्राम्हणा दिधले सकळिक । राज्य आपुले ॥ ४१ ॥ कडियाळे अंकुश लेखणि । म्या समर्पिलि पाये धुउनि । आणिक नवखंड मेदनि । दिधलि ब्राम्हणालागुनि ॥ ४२ ॥ यैसे देखिले स्वप्न । तेणें संतो-

[1] तेथे विनउ लागला देवतें–पाठ

# प्रसंग ॥ २ ॥

ओं नमो श्री सच्चिदानंदाये नम : ॥ आयेकोन तयांचे गाणे । राजा संतोषला मनें । काये द्यावे या कारणे । विचारितु असे ॥ १ ॥ मग गायेनें संतोषला । राजा उचितासि आला । मग काये बोलता जाला । तये गाणिवेसि ॥ २ ॥ रावो म्हणें तुम्ही मागा दोघीजणि । जे काये असे तुमच्या मनि । येरि म्हणति वेधला आमचा गुणि । आतां जाईल कोठे ॥ ३ ॥ त्यासि द्यावया शृंगारू । राये काहाडिला आंगिचा अळंकारु । येरि म्हणति सुंदरु । अळंकारा चाड नाहि ॥ ४ ॥ विश्वामैत्राचेनि प्रसादपणें । आम्हा काये असे उणें । परि येथें येणें याचिकारणें । तुमचिये भेटिसि ॥ ५ ॥ मन्मथाचे शरि । विंधिले आमचे जिण्हारि । तुं मदनमुर्ति अवधारि । राया हरिचंद्रा ॥ ६ ॥ जिकावया मन्मथाते । श्रेष्टिनें रचिले तुमते । आम्ही रुपे देखिलि बहुते । परि तुज सारिखा नाहि ॥ ७ ॥ ये वसुंधरेभीतरि । आम्हि पुरुप देखि(ले) कोटि-वरि । परि तुझि न देखो न सरि । लावण्याचि ॥ ८ ॥ तरि आम्हा आंगभोग दिजें । आंगी प्रत्यांगी आलंगीजे । आमचे मन सुखी किजे । राया हरिचंद्रा ९ ॥ आणिक भलतिये दिसि । करिसि सोनियाच्या रासि । परि सुख न देखासि । आम्हावांचुनि ॥ १० ॥ तंव सत्यकिर्ति प्रधान होता जवळा । ते अवेशला त्याचि वेळा । म्हणे माझिया नृपति अवकळा । ऐसि बोलति ११ ॥ घाला घाला रे बाहेरि । चांडाळणि पापीणि माहारि । पाप बोलति उतरि । त्या माहारि वोळखिल्या ॥ १२ ॥ ऐसें प्रधानें बोलोन । बाहिर दवडिलि येथुन । मग गेल्या विश्वामैत्रा टाकुनि । त्या सांगति वृतांतु ॥ १३ ॥ उसक बुकस रडति दोघि जनि । आल्या विश्वामैत्रा टाकुनि । तयावेळी त्या राजऋषिसि । आला कोपु ॥ १४ ॥ मग उठला क्रोधे कांपत । सवे बडवे निघाले बहुत । आला सिविया देत । रायापाशी ॥ १५ ॥ मग म्हणे अरे चांडा-ळाच्या कुमरा । पापीया अधमा हरिचंद्रा । तुज नाहि लागला दरारा । माझा-विश्वामैत्राचा ॥ १६ ॥ तु मज प्रमाणें नेणासि । मागे तुझिया त्रिशंकासि । वैसणें इंद्रसभेसि । म्याचि केले ॥ १७ ॥ केला चांडाळपणा वेगळा । मग असरलोकि सरता केला । तुझिया पित्यासि मोक्ष दिधला । म्या हरिचंद्रा ॥ १८ ॥ ते अवघे विसरलासि । आणि धर्म होउनि प्रवर्तलासि । म्हणोनि गांजिसि । माझिया भुवनाते ॥ १९ ॥ वासिष्टाचिया पुत्रासि । मग केले ते नेणासि । कोण्हि न सांगति तुजपासि । त्याचि गोष्टि ॥ २० ॥ हा रे माझिया आश्रमासि । तुज यावया चाड कायेसि । बहुत गर्वे जातोसि । राजमदे

॥ २१ ॥ म्या पाळिलि होति स्वापदे । ते मारिलि त्वां समस्ते । चांडाळा मातलासि मदे । राज्याचेनि ॥ २२॥ ते वेळि तारामति सुंदरि । माथा ठेविला चरणावरि । म्हणे चुकि जालि जि अवधारि । आमच्या ठाई ॥ २३ ॥ सत्य-किर्ति प्रधाने साहिले । मग राये दंडवत घातले । क्षमा करा जि अैसे म्हणि-तिले । चुकलो आम्हि ॥ २४ ॥ येरू म्हणे कैसि करावि क्षमा । तुवा नासु कला माझिया आश्रमा । अरे पापीयां अधमा । श्वापदे माझि उपद्रविलि ॥ २५ ॥ येथे वैर नाहि कोण्हासी । तुवा वधिले त्यासी । ऐसा चांडाळ होसि । दुरात्मा ॥ २६ ॥ करितोसि नवखंडि (पृथ्वि)चे राज्य । ते(हि) न पुरे(चि) तुज । म्हणोनि दाउ आलासि मज । (आपुली प्रौढी) चांडाळा ॥ २७ ॥ यैसियाचे न पाहिजे मुख । आम्हासि उपजविले दुःख । अैशा (परीस) पातकियास । नसे त्रिभुवनि ॥ २८ ॥ अैसा विश्वामित्र निघाला को-पोनी । तव रावो विचारि मनि । मागुता आला फिरोनि । शिवभुवना ॥२९॥ तेथे[1] विनवि विश्वामैत्राते । स्वामि अपराध घडला माते । म्हणउनि चरण नमस्कारि ते । येरू गेला निघोनि ॥ ३० ॥ मग हरिचंद्रे विश्रामु केला । तारामतिचे मांडिवरि माथा ठेविला । राजा स्वप्न देखता जाला । निद्रेमाजि ॥ ३१ ॥ स्वप्नातु येकु ब्राम्हणु आला । रायापुढे उभा ठाकला । तेणें आशिर्वाद केला । वेदपूर्वक ॥ ३२ ॥ स्वामि काये मागाल ते देईन । भाक दे राया सत्यवचन । ब्रम्हा विष्णु रुद्र तिघे जन । साक्ष ठेविले ॥ ३३ ॥ तव मागीतली नवखंड क्षिति ॥ ब्राम्हण म्हणे जालो तृप्ति । आता (क)डीयाळ अंकुश दे आमचे हाति ॥ तितुका संकल्प घातला ॥ ३४ ॥ तुझि लेखणि असे केउति । ते दे माझे हाति । राये दिधाली सिव्रवंति । ब्राम्हणासि ॥ ३५ ॥ राये अवघेचि दिधले त्यासि । ब्राम्हण संतोपला मानसी । तव आणिक देखिले विवसि । स्वप्नामाजि ॥ ३६ ॥ बाबरझाटीचे थोर । अति काळे भयासुर । अैसे देखिले शरीर । विशाल पैं ॥ ३७ ॥ ते टेकिले देखे गगनासि । हाति प्रचंड गदा त्यासि । ते हानत रायासि । मानेवरि ॥ ३८ ॥ अैसा वोथरे दाटला । मग गजबजुनि उठला । हरि नारायेण म्हणोनि बैसला । भोवते पाहातुसे ॥ ३९ ॥ ते वेळि थापटि तारामति । म्हणे सावध व्हावे जि नृपति । तुम्हा काये अवस्था अवचिति । जालि सांगा ॥ ४० ॥ तव रावो म्हणे. म्या येक । स्वप्न देखिले ते आईक । ब्राम्हणा दिधले सकळिक । राज्य आपुले ॥ ४१ ॥ कडियाळे अंकुश लेखणि । म्या समर्पिलि पाये धुउनि । आणिक नवखंड मेदनि । दिधलि ब्राम्हणालागुनि ॥ ४२ ॥ यैसे देखिले स्वप्न । तेणें संतो-

---

[1] तेथे विनउ लागला देवते-पाठ

षले माझे मन। तव येक देखिले दारुण। भयानक ॥ ४३ ॥ ऐसे येक देखिलें। ते आईक म्हणातिलें। तु वडिल। तारामतिये ॥ ४४ ॥ ऐसे देखोनी दाटलो वो घोरा। तेणे थोर लागला दरारा। तव तारामती सुंदरा। काये बोले ॥ ) म्हणे स्वप्ना करावे जि शांति। घाला अग्निमुखि आहुति। स्मरण करा श्रीपति। तेणे हरति दुष्टदोष ॥ ४५ ॥ तव प्रधानु म्हणे सत्यकिर्ति। (अहो) जि राया नृपति। काहि दान दिजे आपल्या हाति। ब्राम्हणासि ॥ ४६ ॥ ऐसे रायासि प्रधान बोलत। तव मागुता विश्वामित्र आला तेथ। तव उठोनि दंडवत। घातले राये ॥ ४७ ॥ मग म्हणे स्वामी। तेथे स्वप्न देखिले आम्हि। तयाचे व्याख्यान तुम्हि। सांगावे (आम्हासी) ॥ ४८ ॥ मग म्हणतुसे रुसेश्वरु। आगा इतुका न करावा विचारु। स्वप्नीचा निर्धारु। सत्य अथवा मिथ्या ॥ ४९ ॥ स्वप्नदृष्टि दिसे। ते जरि सत्य होतसे। तरि कासया परियासे। सिनति लोक ॥ ५० ॥ आतां असो ते आम्हि आलो तुजपासि। आईक आपुलिया कार्यासी। ते जरि देईन म्हणसी। तरि सांगेन तुज ॥ ५१ ॥ तरि आठ भार सुवर्णा। आम्हासि व्हावि दक्षणा। ते जरि संभवेल तरि म्हणा। देऊ आम्हासि ॥ ५२ ॥ तु तरि रावो सूर्येवंसि। धर्मका(र्या) विन्मुख नव्हेसि। ईछा याचकाची पुरविसि। तुं राया ॥ ५३ ॥ तव राव म्हणे दिधले जि दातारा। परि यावे लागेल अयोध्या नगरा। येरु म्हणे येथे तव संकल्प करा। मग नगरा येउ ॥ ५४ ॥ मग राये दिधलि भाक। संतोपला रुसियाचक। आता राया चला न लावावे दिवस। आमुचे द्रव्य देई ॥ ५५ ॥ मग रावो निघाला तेथुनि। राणि घातलि सुखासनि। वारु दिधला पालानुनि। तये समई ॥ ५६ ॥ आपण रावो पाई चालतु। पेनोवेनि मार्ग कर्मि पंथु। (ऐसा टाकिला प्रांतु)। अयोध्या जातु हरुषें ॥ ५७ ॥ मग बहुता दिवासि। रावो आला नगरासि। मग तेथिले मानासि। नगर शृंघारिले ॥ ५८ ॥ ते वेळि गुढिया उभविल्या नगरि। लागलिया मंगळ तुरे भेरि। खनोखनि उभिया नारि। पहावया रावो आणि तारामती ॥ ५९ ॥ चंदनाचे सडे घरोघरी। मोतियाचे चौक दारोदारी। कापुराचे मळन चहुमेरि। उधळत असे ॥ ६० ॥ सुवर्ण बांधालिया विदि। वरि चालतसे मांदि। अंबर गर्जे तसे नादि। लागल्या शंख भेरि निशाने ॥ ६१ ॥ धुपीयेलि हंसांची रचना। तो परिमळ उसळे गगना। उपरियाहुनि आंगना। पाहातु असाति ॥ ६२ ॥ येकिं फुलाचिया अरळावरी। चालति राजकुमारि। रावो रानि आलि म्हणोनि सुंदरी। उभिया असाति ॥ ६३ ॥ दोन्ही ढवळाराचीया हारि। वरून सिंपीतिं (सुंदरी)। (तुशार) कापुर कस्तुरि। रायावरि त्या

नायेका ॥ ६४ ॥ पुढे काठिकार धांवत । मांदि माघारि सागित । अैसे आले आनंदभरित । महाद्वारासि ॥ ६५ ॥ तेथे दारवठा निघता । कोल्हाळ जाला अवचिता । ते वेळी विश्वामैत्र जाला बोलता । ते परीयेसा श्रोतेनो ॥ ६६ ॥ सुखासनि तारामती । भीतरि जात होति । दारि माघारे लोटिति । विश्वामैत्राचा दुति ॥ ६७ ॥ मग वज्रपंजर ताडिला । पडदा सोखासनाचा फाडिला । आपण दारवंठा उभा ठाला । भीतरी जावो नेदी ॥ ६८ ॥ ते वेळी आसुडालि तारामति । लोटिलि सुखासना खालुति । मग (आवेशोनि) तियेप्राति । काये बोलता जाला ॥ ६९ ॥ उभि तरी कैसि निघासि । म्हणूनी धरली केसी । मग मागवया तिसि । काहाडिला सोट ॥७०॥ मग मारितुसे साटिवरी । मग विश्वामैत्र काये करि । तारामतिस मारि । वाहे पुर रुधिराचा ॥ ७१ मग आंगावरि वारा घालिंति । जैसि कर्दळि थरथरा कांपति । ऐसि आलि पळती । रायापासी ॥ ७२ ॥ तव करून रक्तांवर दृष्टि । विश्वामैत्रु लागला पाठि । मग दोहि कर संपुष्टि । (राये) विनवीले तयासि ॥ ७३ ॥ तेवेलि म्हणे स्वामी । काये अपराधु केला आम्ही । कोण चुकि जालि ते तुम्ही । सांगावि जी ॥ ७४ ॥ येरू म्हणे संकल्पु केला ब्राह्मणा । आतां अडठभार सुवर्णा । ते (कां माझी) दक्षणा । (न) दे आमुचि ॥ ७५ ॥ येथें चाळउनी आणिले मज । आणि नाचो निघालासि राज्याचे भोज । परि मि न सोडि तुज । घेतल्यावांचुनि ॥ ७६ ॥ आतों तुं भितरि निघोनि जासि । मग मीं मागो कोणापासि । कोणें प्रार्थावे दारवठकरियासि । तो म्हणेल (अ)वस्वरू नाहि ॥ ७७ ॥ तैसा मि नव्हे मागता । आपले त्वरित घेइन आतां । (तुवा) माझि वेवस्था । परिसिलि नाहि ॥ ७८ ॥ ते वेळि राये बोलाविला भांडारि । म्हणे द्रव्ये आणा झडकरि । येर उघाडिलि वोवरि । नवरत्नाचि ॥ ७९ ॥ मग आणुन द्रव्यासि । तयापुढे केल्या रासि । म्हणातिले विश्वामित्रासि । हात करा जि ॥ ८० ॥ अवलोकुन द्रव्यासि । रूसिने केले हास्यासि । माझेची मज (कैसे सावकाशि) । देवों आलासि चांडाळा ॥ ८१ ॥ येक वेळें संकल्पिले ब्राह्मणासि । ते मागुते कसे देसि । बरवे दान वाखाणिसि । लोकत्रयामध्यें ॥ ८२ ॥ हे दान देणें अैसे । हे तुज कवणे सांगितिले यैसे । काये गुरूचेनि उपदेशे । धर्म अैसा करितोसि ॥ ८३ ॥ हे नवखंड क्षिति । तुवा स्वप्नि घातलि माझे हाती । ते मागतोसि मागुति । हे राजेनिति नव्हे ॥ ८४ ॥ स्वप्नि सप्तसागर दिधले । आणि अंकुश कडियाले समर्पिले । ते तुझे मन कां भुलले । सांग राया ॥ ८५ ॥ आता स्वप्निचे नेदवों म्हणसि । तरि तैसेच सांग मजपासि । वायाचि उसिरू का लाविसि ।

जाउआम्हि ॥८६ ॥ तव रावो म्हणे गा ताता । हे बरवे जाले आता । मि[1] मुकलो समस्ता । पापावेगळा ॥ ८७ ॥ ऐसे जरी घडे । तरि देव फेडि साकडे । आम्हा उदेग कासिया येव्हडे । मग चरण धरिले विश्वामित्राचे ॥ ८८ ॥ हे विश्वामित्राचि आज्ञा ऐसि । जे प्रतिपाळ करावा प्रजासि । आता जाउ वारानासि । दरूशेना ॥ ८९ ॥ येरयेराते गांजिति । लहानाथोरा मारिति । म्हणोनि राजे नृपती । देवे रचिले तुम्हासि ॥ ९० ॥ धर्माते पाचारावे । अनाथ लोक प्रतिपाळावें । दुष्ट निर्दाळावें । रूसिरराया ॥ ९१ ॥ जो ज्याच्या धर्मा विधियोक्त । बोलिला असे येथोगीत । तो[2] नि श्री (ष्टी) आंतु । लोपोनि दावा रायासि ॥ ९२ ॥ ज्याच्या जो आचारु । तेणे तो चालवावा वेव्हारू । आणि प्रवर्तला अनाचारू । तोचि दंडावा ॥ ९३ ॥ जो जन्मला जे योनि(त)। त्याणे चालवावि आपुलि रित । अन सारखि होउ नेदावि रित । लोकामध्ये ॥ ९४ ॥ जे राजानित बोलिलि असे । आपणे राये वर्तावे तैसे । समर्थपणें अनरिसे । करु नये ॥ ९५ । करु नये बोलाचा पुरुषार्थु । न म्हणावे मि रावो येक समर्थु । ऐसे न मानावे अर्थु । (समर्थ) ईश्वरू सकळासि ॥ ९६ ॥ तेणे जे मर्यादा केलि । तेचि चालवावि चालि । जरि अपुलि परावि केलि । तरि कोपेल श्रीहरी ॥ ९७ ॥ आपुलेनि समर्थपणे । अन[3] अन्थें वर्तणें । तया रायाचे जिणे । भूमिभारू ॥ ९८ ॥ प्रजा पीडुन अपार । भरिति आपुले भांडार । तेणें पोसिति परिवार । थोर सुख मानिति ॥ ९९ ॥ आपुलिया सुखाकारणें । राज्य अद्भुत करणे । पुढें नाहीं पाहाणें । कर्म करणे पतनाचि ॥ १०० ॥ तैसा नोहे मि राज (बीज)। तुमचि कृपा असे मज । आतां हात करा हे राज्य । (आपुले) रासिराया ॥ १ ॥ मज इतुकेची करणें । जे जोडले तुमचे चरणे । तेणें निस्तरेन दारुणे । सौसारिक हे ॥ २ ॥ म्हणोनि चरणावरि ठेविला माथा । म्हणे राज्य सांभाळा जि आतां । हरिचंद्र जाला विनविता । सकळासि ॥ ३ ॥ मग बोलाविले भांडारि । आणि प्रधान कोठारि । म्हणे तुम्ही बरव्यापरि । बोळगावे (रुसिते) ॥ ४ ॥ मग रथ आणि कुंजर । भृतभृत्य आणि मातांग । पायेदळ सप्तांग । समर्पिले ॥ ५ ॥ मग बोलाविले नगरिंचे लोक । आणि वडवे सेवक । माहाजन मंत्रि परिचारिक । इतुके

---

१ मज वेगळें केलें समस्ता । पापापासुनी ॥ पाठ

२ तो ये सृष्टीआंत । आपण टळो नेदावा ॥ पुणेप्रत पाठ. या ओवींत 'लोपो नेदावा' एवढीच चवथी ओळ पाहिजे.

३ अनीतीनें–पाठ

निर्वाले त्यासिं ।। ६ ।। मग नगारिचि माणसें समस्ते । सिंविया देति विश्वामैत्राते । त्यासि अवस्य वहुत । कोपे रावो ।। ७ ।। रुसि म्हणे हे पावले अवधिया । माझि दक्षणा दे का राया । म्हणोनि (ततक्षणा) राया । खांबेसि बांधला ।। ८ ।। मग केंसि धरुनिं तारामति । आसुडिली खालुतिं । तीस मारितुसे आपल्या हाति । थापडिवरि ।। ९ ।। चडकणा लागतिं फडफडा । अशुध वाहतसे भडभडा । सकळ लोक (दाटुन उभडा) । रोजन करिति ।। १० ।। तव आले नगरिचे वेध्हारे । आम्हापासि आहातिं अमिंत्य भांडारे । (हे) आपण नृपवरे । हात करावा ।। ११ ।। उतराई व्हावे विश्वमैत्राचे रिंना । फिटावया याचि दक्षणा । तुमचे प्रसादे आम्हा काये उणे । असे स्वामिंया ।। १२ ।। तव म्हणे चक्रवर्ति । जे राजे प्रजाचे द्रव्य घेते । ते आपुले हातपाये खाति । उदरालागिं ।।१३।। नागउन प्रजाते । मग दान करावे येथें । हे नाहि आले येथें । सूर्यवौंशिसि ।।१४ ।। तव येउ म्हणे आम्हि येक । देउ आपुलिया सुखे । तुम्हा देखावे न लगे ईतुके ।। रावो म्हणे सर्वथा न घडे ।। १५ ।। तव विश्वामीत्रु म्हणे । तुज दुसरियाचे नाहिं घेणे । तरिं आणीक कैंचे देणें । चाळाविंतोसिं ।। १६ ।। म्हणोनिं अधिक मारिं तारामतिं । आंगीं साट वाजति । लोक दुःखि होति । हाहाकारु प्रर्वतला ।। १८ ।। तव[1] टाकुनि वेगवगत्रु । आला रोहिंदास पुत्रु । तव देखिला हरिचंद्रु । बांधला खांबोसिं ।। १९ ।। मातेसि पडति घाये । मग साष्टांगि पडत आहे । ते वेळिं विनाविंता जाला काये । तया विश्वामैत्राते ।। १९ ।। अहो मिं जि राहेन गाहाणा । निंस्तरेन तुमाचिं दक्षणा । उतराई होईना तुमचे रुणा । रुसिराया ।। २० ।। सोडा जि आमचा पिंता । कासया मारिंता माता । आम्हि सुवर्ण देउ आता । तुमचे जि ।। २१ ।। तव विंश्वामैत्र असे म्हणत । हा कवणाचा रें आला येथ । बहुत बडबड करित । मारुन दवडा परता ।। २२ ।। ते वेळि रावो म्हणे माझा कुमरु । तव अधिक खवळला विश्वामैत्रु (रुसेस्वरु) । जैसा घृते सिंपीला वैश्वानरु । तैसा रागे रुद्र जाला ।। २३ ।। मग म्हणे काय गे मज भेडसाविंतोसिं । आपुलिया पुत्राचा वडिंवारु दावीसी । हा जरिं गोसावि होता राज्यासि । तरिं का राज्य दिंधले ।। २४।। येवढा पुत्र असता । तरी मिं राज्य न घेता । यासिं जाणोनिंया आतां । राजे सांभाळिं आपुले ।। २५ ।। तवं तो रोहिंदासु म्हणे विश्वमैत्रातें । आम्हि प्राण देईन । जि येथें । परिं न टळो जि सत्वाते । पिंतयाचे भाकेपरते । काय थोर असे ।। २६ ।। राउळे हात करावे राज्याते । उतींर्न व्हावे हरिंचंद्राते । आणि हा निरोपु येथे । द्यावा स्वामिं ।। २७ ।। पितियाचे भाकेकारणें । सिर मोहनिस लागले देणें ।

---

१ ते ऐकोनि–पाठ.

म्हणोनिं वाणितिं पुराणे । तया रुखुमांगदाचे ।। २८ ।। अैसे तयाचे बोलणे अैकोनि । विस्वामैत्र विस्मयो करि मनि । ह्मणे धन्य धन्य मेदिनि । राज्ये (रावो) हरिचंद्र ।। २९ ।। सपुत्रि पिता पुत्रवंतु । येसा हरिचंद्र दिसतु । ते वेळि माथा असे तुकितु । विश्वामैत्रु ।। ३० ।। मग ह्मणे आमचे तप गेले । चित तियाचे येक जाले । मग काय बोलो आदरिले । तया हरिचंद्रासि ।। ३१ ।। म्हणे मज अवसि नवखंड पृथ्वि अर्पिलि आम्हासि । तरि तुवा न रहावे आमुचा देसि । आणि माझे द्रव्य कैसे देसि । ते सांग मज ।। ३२ ।। तव राव म्हणें नवखंडाबाहेरि । मी जाईन दुरि । तेथुनि भलतिया परि । द्रव्ये फेडिन तुमचे ।। ३३ ।। विश्वनाथाच्या गांवा जाईन । तेथें आपणयातें विकिन । परि राउळाचे सुवर्ण । फेडिन आउठभार ।। ३४ ।। राउळे दिसाचि मर्यादा करावि । तयावरि घडि लोटो नेदावि । (हे माझि क्रिया घ्यावि) म्हणोनि सिविले पांय ।। ३५ ।। आजिचि मासा दिवसा । फेडिन हा भर्वसा । माझे क्रियेसि विश्वासा । ईतुकि कृपा करावि ।। ३६ ।। अैसा चरणावरि ठेविला माथा । म्हणे मज आज्ञा द्यावि रुसिनाथा । मि जाईन आंता । वाराणसिस ।। ३७ ।। अैसि अनुज्ञेचि वचने (दिलि रुसीने) । निघालि तिघे जणे । तव विश्वामैत्र म्हणे । तारामतिसि ।। ३७ ।। आवो तु नीघालिसि केउनि । हळुच उतरलि खालुति । अैसि येते स्थिति । अळंकारु फेडी माझे ।। ३९ ।। हिरोनि घतलें लेणें । उतरिलि आंगावरिल भूषणें । उघडि केलि ततक्षणे । तये वेळि ।। ४० ।। मग तिघे उघडि निघालि । मग लोक बोलति बोलि । अैसे काये केले चंद्रमौळी । दुःखे रोजना करिति ।। ४१ ।। मग निघालि नगराबाहेरि । नमस्कारिलि अयोध्या नगरि । आता सूर्येवंशा तारि । देवराया ।। ४२ ।। मग प्रधान लोक तयात । ते येताति बोलवित । प्रधानाते राजा म्हणत । सुबुद्धि राहावे ।। ४३ ।। प्रजालोक पाळिजे । ऋषिचि सेवा कीजे । स्वधर्मे असिजे । प्रधानोत्तमा ।।४४।। ते वेळि सेळद्रिया । आरत्या घेउन आलिया । हरिचंद्रराजया । ओवाळिति ।। ४५ ।। नगरिचे लोक समस्त । निघाले बोलावित । मग राजा म्हणत । तुम्हि राहावे ।। ४६ ।। मागे धावति हडपेकरि । येक धावति सागळा करि । तंव ते अवस्वरि । ऋषि काये बोले ।। ४७ ।। मग म्हणतसे रायासि । हे जरि अवघे सवे नेसि । तरि तुवा काये आम्हासि । दिधले ते सांग ।। ४८ ।। गये अवघे लोक । परतवि अपुले सेवक । प्राणिमात्र देख । बाहे (रि) । डाविले ।। ४९ ।। तिघे जिवाचि सोयरि । निघालि अयुध्ये बाहेरि । पाये ठेविता भूमिवरि । खडे रुतति ।। ५० ।। सवे रोहिदास

[library stamp, partly illegible] ०५८६२ ... ८/१ ... २०५० ... २२।३।६९



कुमरु । चाले तारामतिचा ( धरुनि ) करू। तिघाश्रमु होतसे थोरू । मार्गी चालता ॥ ५१ ॥ मग विश्वामैत्र म्हणे सूर्याते । तुम्हि द्वादशकाळि तपावे येथें । नाहितरि शिक्षा ति लाविन येथें । जाण निभ्रांत ॥ ५२ ॥ ते वेंळि सूर्येकाळि । खडतर तपें भूमंडळि । म्हणे विश्वामैत्र आपिल ये वेळी म्हणोनि तपो लागला ॥ ५३ ॥ सूर्ये निघता असे तपतु । तेणे पृथ्वि तरतटा असे फुटतु । पाषाण फुटाति पर्वतु । तेणें तेजें ॥ ५४ ॥ विश्वामैत्रु म्हणे वरुणाते । (हे) जेणे मार्गे जाते । तेणे मार्गे तपोनि (तेथे) । (थेंब) असो नेंदि ॥ ५५ ॥ बावि पोखरणि अनेक । सरिता सरोवराचि उदके । (ते)थील जळे शोके । आटवावि तुवां ॥ ५६ ॥ मग तयाते घालि अव्हाटा । जिकडे तिकडे वोसा वाटा । अवघा काटा सगटा । चालता नये तयाते ॥ ५७ ॥ मग साउलि पायातलि दडति । निगुता मध्याना आला गभास्ति । (तेणे) कुर्माची पाठी (पुरति) । पोळतसे ॥ ५८ ॥ असे ओढवले दुर्धरू । तया तिघांचा सांडावया धिरू । परि तो सत्वाचा महामेरू । ढळेल कैसा ॥ ५९ ॥ चालता तेणे मार्गे । कर्पलि तीघांचि आंग । कासाविस जालि पाणि मागे । रोहिदास पुत्र ॥ ६० ॥ येरू म्हणे चाल बा पाणि पुढे आहे । म्हणोनि कडिये घेउ पाहे । तव तिचे राहिले हातपाये । शोकला कंठु ॥ ६१ ॥ अैसे उदकाविण । सांडो पाहाति प्राण । फुटले अंतःकरण । तयाचे (बहुत) ॥ ६२ ॥ तिघाचिया तोंडासि । पाणियाविण (मालिनता) आ(ली) कशि । कमळे पडलि का जैसी । वनवयाते ॥ ६३ ॥ पुत्र पाणि म्हणत । भूमिवरि पडत । ते वेळि मांडिले युगांत । हरिश्चंद्रासि ॥ ६४ ॥ असि तळमळित तीघे । रावो उदकालागी निघे । वावि तळे अनेके । शोधु निघे ॥ ६५ ॥ तीघे झरिआंतु । कुंड पोखरणि असे पाहातु । टाकि सरोवरे असे गिवासितु । कोठे उदक नाहि ॥ ६६ ॥ चाले जिवाचिया वोढी । ( प्रयासि टाकि गंगेचो थडी ) तंव ते धावता कोरडि । थेंबु नाहि तेथ तयेवेळी ॥ ६७ अभक्ताचें अंतःकरण जैसें । भीतारि परब्रह्म न वसे । सरोवर (दीसत) तैसे । उदकेविण ॥ ६८ ॥ मा निराची अवस्ता देखोनि । याचें तोंडिचें पळालें पाणी । म्हणोनि बावि पोखरणि । गितिया पडलिया ॥ *६९ ॥ अैसे हिंडोनि भोवता । परतोनि आला मागुता । देखें तया दोघांचि अवस्था । प्राण सांडो पाहे ॥ ७० ॥ मग बैसोन तयाजवळि । मुख । पुत्राचें न्याहाळि । पदरे वारा घाली । अैसि सावध केलि ॥ ७१ ॥ मग तेथुनि निघाला पुढति । पाई (ख)ड्ये उमटति । वाटे पाहति भवति । परि साउलि नाहि ॥ ७२ ॥ तव विश्वामैत्र ब्रह्मवेषे । हरिश्चंद्रा येता देखे । वृद्ध ब्राह्मण मार्गी न देखे । कानि नाइक बोलि ॥ ७३ ॥ अैसा येतसे काठि टेकीतु । मान

लखलखा हालतु । स्वस्ती गा येजमाना म्हणतु । म्हणोनी पुढें उभा राहिला ॥ ७४ ॥ हरिचंद्रे केले दंडवत । गोसावि कोठोन आलेत । येरु म्हणे गा नृपनाथ । आलो तुज देखोनिचा ॥७५॥ आमचि भार्या गर्भिनि । पुत्रासहित राहिलि वनि । थोर चालता अन्हवानि । तिया कष्ट जाले ॥ ७६ ॥ तरि पादरक्षा देई गा येजमाना । घेई तिया ब्राह्मणाचे पुण्या । तरि स्वर्गी अमृतपाना । घडेल तुज ॥ ७७ ॥ अठ्यानउ कोडि अर्बुज स्वर्गी । वाट अवघड वेगी । ते निस्थराल प्रौढि । येणें पुण्ये ॥ ७८ ॥ खांडियाचे धारेवरि चालता । जावे इतुका पंथ कमिंता । ते कष्ट हरति समस्ता । येणें पुण्यें ॥ ७९ ॥ मग पाद-रक्षा फेडोनि । तिघाजणी सामर्पिल्या ब्राह्मणालागोनी । आप(ण) अनवान्हि । निघाली ( तीघें जणें ) ॥ ८० ॥ मग म्हणे विजई होई गा राया । आमचि धड केलि काया । म्हणोनि दूर उभा ठाकोनिया । पाहातुसे ॥ ८१ ॥ मग निघालि तीघें । ते तापलिया मार्गे । पावो ठेंविता तव वेगे । फोड येति ॥ ८२* ॥ औसि तापलि कुपु त्याभितरि । पाये बुडाति घोटेवरि । अदृष्ट होवोनिया भितरि । पाहातुसे ॥ ८३* ॥ पाउले उपडिता सायासि । त्वचा नीघे त्यासरिसि । खडतर किर्णे सर्वांगासि । उठले फोड ॥ ८४ ॥ जे बैसे सदा सुखासनि । ते बाळक गेले करपुनि । तयाची अवस्था देखोनि । दोघें श्रमत असति ॥ ८५ ॥ मुख हुरपळुनि गेले । सर्वांग काळे जाले । कंठिं प्राण ठेविले । त्या बाळकाने ॥ ८६ ॥ विश्वामैत्रभेणें । सूर्यो तपे दारुणे । तटतटा फुटति पाशाने । तेथें कैचें वृक्ष ( वाचती ) ॥ ८७ ॥ सकल तापले त्रीभुवन । उग्र तप महादारुण । तेथें स्वप्नी जीवन । बोलो नये ॥ ८८ ॥ म्हणोनि ते निर्जल दिसे । अजुनि उदयो नसे । भ्याला विश्वामैत्रास । उदकाचा राजा ॥ ८९ ॥ असो औसि श्रमति । तिघे पंथु कमिंति । तव विश्वामैत्रे मांडिलि मति । ते अैक पां ॥ ९० ॥ मग पव्हे रचिलि तेथे । बरवि रचिली अद्भुते । वायोते म्हणतिले ऋपिनाथे । आपण राहावे ॥ ९१ ॥ नाना परिचि रचना । शृंगारिले त्या वना । मध्ये मांदिर जाणा । उभविलें ॥ ९२* ॥ असो ते अपार सांगणें । थोडियातचि आवरू कथने । मग काय करिता । विश्वामैत्रु ॥ ९३* ॥ नामा विष्णुदासु म्हणे आवधारा । पुढें काय वर्तले या अवसरा । कोड केले हरिचंद्रा । ते परियसा ॥ ९४ ॥ वोवि ॥ १९४ ॥ प्रसंग ॥ २ ॥

## ॥ प्रसंग ३ ॥

( देखोनी तया तीयाते येत । मग आपण नीघाला त्वरित । हातीं कळस घेऊन धावत । तयापासी ॥ पव्हे राखणाइताचेनि वेसीं । जवळी आला पात आलासीं (?) । म्हणे म्हीर राया श्रमलासी । उदक घेई पां ॥ चाल जाऊ भीतरी । ह्मणे बैस आरवार मंचकावरी । उदक प्रासन करी । तुझा श्रम हरेल ॥ )

श्रीगणेशाय नमः ॥ तव हरिचंद्र ह्मणत । तुमचे दरुपन जाले येथ । तेणें निवाले समस्त । आमचे मन ॥ १ ॥ पव्हेचे पीता पानि । त्याचिया सत्वा होये हानि । आपुले सुकृते देउनि । जये केले पुनीत ॥ २ ॥ अन्नछत्रि केलिया भोजन । जाये वरुषा दि(व)साचे पुण्य । अैसे हरिचंद्र बोलोन । ऋषि विचारि मनि ॥ ३ ॥ अगा येवडी अपदा होत । काये वीवेक वीचार ना करीत । हे घग-श्रमी धर्म समस्त । आतां हो मार्गस्त ॥ ४ ॥ शरीररक्षण हा धर्म म्हणती । भेलीया कवण कवणाते जाणती । जे आत्महत्या पडती । ते नेणेस तु ॥ ५ ॥ रावो म्हणे जी अधमा कैची गती । ते आळकेपने ये चित्ती । ( आणी ) मेलिया अपकीर्ती । न सोडि पाठि ॥ ६ ॥ म्हणोनि पुढारा मार्गी निघे । तव तारामति मागें । धावनि पव्हे ( चा राखणाइत ) करु वेगे । आला तेथें ॥ ७ ॥ मग म्हणे श्रीमंत राजकुमारी । माये उष्णे दगदगीलीसे भारि । चाल पव्हेभीतरि । हरेल तापु ॥ ८ ॥ पैल परि-चारिका आपुले हाति । तुझे पायेतळहाती । नावेक विजनवारा घालिती । होईल विसावा तुते ॥ ९ ॥ तेथ मलिया( निले ) नेले कण । उपजे तयासि सोने । स्वर्ग ठेंगणे तुम्हासि द्यावयाकारणे । निर्मिले असे ॥ १० ॥ तवं ते हरिचंद्राचि कुळवंति । काये म्हणतसे तारामति । अैसि नोहे माझि जाति । येथे बैसावया ॥ ११ ॥ शरीर दुःखे कष्टति । प्राण सांडिति आपुल्या स्थिति । तयाचि अविनास किर्ति । जगामाजि ॥ १३ ॥ येरु म्हणे अैसे तुझे काठिन मन । तरी आह्मासि बोलावया ( कवण ) कारण । तु निघालिसी मरण । पालवि बांधोनिया ॥ १५ ॥ मग मावेचा हरिचंद्र केला देखा । तो भितारी बैसविला मंचका । भोवतालिया परिचारिका । विडिया देती ॥ १६ ॥ मग तारामतिस म्हणतु । पैल पाहा वो तुझा प्राणनाथु । तुज असे बोलावितु । पहा पां येथुनि ॥ १७ ॥ बैसोनिया निरुता । फुले भरितु आहे माथा । आंगी चंदन चर्चिता । अवळा बाळा ॥ १८ ॥ अवो तुज पाचारी तो भीतरि । चाल जावो तेथवरि । तव तारामति करि । विस्मयो ( तेथें ) ॥ १९ ॥ मग म्हणे

तारामति । ऐसा जरि घडेल नृपाति । तरि सेसु का न सांडि क्षिति । आगला म्हणोनि ॥ २० ॥ मर्यादा सांडिल सागरु । पश्चमे उगवेल दिनकरु । का शीतळत्व ये वैश्वानरु । हिवा ऐसा ॥ २१ ॥ भक्ता विष्णु उपेक्षि जरि । पर्वत त सांडि वसुंदरि । तरि पव्हेभीतरि । रीघे हरिचंद्र ॥ २२ ॥ म्हणोनि निघालि ती पुढारि । न पाहे ते सुंदरि । विश्वामित्रु मानवला मनाभितरि । हे पतिव्रता निश्चित ॥ २३ ॥ म्हणोनि विस्मयो करि बहुत । तव मांगे रोहिदास येत । मग धाविनला त्वरित । विश्वामैत्र तयाजवळि ॥ २४ ॥ मग उचलुनि कडिये घेतला । आणि पव्हेद्वारी उभा केला । बाळा उदक घेई वहिला । मार्गी श्रमलासि ॥ २५ ॥ घेई भा( गी )रथिचे दर्शन । उदक करि गा प्राशन । तेणे निवेल अंतकरण । पापावेगळा होसिल ॥ २६ ॥ तव रोहिदास म्हणे । धर्माचिये साउलि बैसणे । आणि पव्हेचे पानि पिणे । हेन घडे ॥ २७ ॥ सूर्यवौशा होईल उणे । आणि विश्वामैत्राचे देणें सोने । – । या कर्मास नातळो ॥ २८ ॥ म्हणोनि पुढें निघाला मागुता । अपदा होतसे चालता । सत्व देखोनी ( विश्वामित्र ) तुकि माथा । म्हणे धन्ये तु ॥ २९ ॥ पाहा वो बाळकाचे सत्व । कैसा जातसे श्रमत । या तिघांचे चित्त । हित कारणे ( चळेना ) ॥ ३० ॥ मग धांवोनि गेला पुढा । वोनवा रचिला धडपुडा । तेणें झाडें जळत धडधडा । बोले वृक्ष ॥ ३१ ॥ ऐसा वोनवा लागला वनासि । ज्वाळा लागल्या आकाशीं । वनि आट श्वापदासि । भोवतुसे ॥ ३२ ॥ ऐसा आग्न प्रजळला भोवति । मग काये म्हणे ते तारामति । पति पुत्र न दिसति । न दिसे वाट लक्ष्मीपति ॥ ३३ ॥ वोनवा कवळितसे कैसा । अवघा धुर भरला घसा । बाया रोहिदासा कैसा । वाचसिल ॥ ३४ ॥ तव अधिक वोनवा झोंबे । आंगीं ज्वाळा झोंबति तांबे । तवं रोहिदासु गळा झोंबे । तारामतिचिया ॥ ३५ ॥ मग म्हणे बापा तुज को(ठे) लपउ । काये आपलिये उपरि समाउ । हा वोनवा विझउ । कवणेपरि ॥ ३६ ॥ देखोनि पुत्राचि वेदना । भीतरि पेटतसे मन । आणि बाहेर जळतसे वन । असमसाचे ॥ ३७ ॥ मग देखोनि तयाचि अवस्था । हरिचंद्र म्हणे गा गोपिनाथा । आम्हा मरण आले जि आतां । तीघाजनासी ॥ ३८ ॥ ( आता आम्ही जाउनि काये कारण ) । परि ब्राम्हणाचे राहिले रिन । ते व्हावे लागेल उत्तिर्ण । अनेक जन्मि ॥ ३९ ॥ मग म्हणतसे तारामतीसि । तु झनि दुचित होसि । नारायणाचे स्मरण मानासि । करावे तुवा ॥ ४० ॥ तो अवकाळीचा सोयरा । आणि प्रतिपाळकु चराचरा । आम्हा (सि) या दुर्धरा । ( पासुनि ) वेगळा ( करील ) ॥ ४१ ॥ तुं संवसारसागरीचा तारु । अवघा विश्वासि या आधारु । तोचि तो उतरि

पैलपारु । ( या दुःखाचा ) ॥ ४२ ॥ ऐसि दोघे निघालि बोलत । विश्वामित्र पाहतसे गुप्तरुपात । मग चुकविले येकमेकात । तया वोनवियातु ॥ ४३ ॥ धुराचे कलोळ असे येत । मग त्याने व्याकुळ जालि तेथ । मग ठेउन डोळ्यावरि हात । झांकिले नेत्र ॥ ४४ ॥ कैसे कवळित पातले ज्वाला । झोंबति तये वेळा । तेणे ते जालि व्याकुळा । मग चुकलि ॥ ४५ ॥ मग मागे राहिलि तारामति । पुढे गेला नृपति । पुत्र धरुनिया हाति । अंतरला दूरी ॥ ४६ ॥ मग पाहो लागली भोवते । तंव न देखे तया दोघातें । मग म्हणे तयाचिया प्राणाते । जाला नासु ॥४७॥ ते वेळि अग्न लागला आंगासि । वस्त्र येक होते तिसि । तेहि जळाले रुसिकेसि । धांव बापा ॥ ४९ ॥ अग्न पाठि लागला रे नारायणा । ते दोघे गेलि निघोन । आता पा ठेऊ प्राण । ( हरिश्चंद्र ) गिवसावया ॥५०॥ त्याचि शुधि करिता कोन्हि नाहि । आतां भिचि[1] घालिन ठाई । अग्नि बा आपुले हृदई ठाउ देई । मग स्वर्गलोकि हरिश्चंद्र भेटैल ॥ ५१ ॥ त्यासि संध्यास्नानासि वेळु । आणि वाट पाहे माझा बाळु । ते दोघे भुकेलु । काय जाले ॥ ५२ ॥ हा असो बहुत विचारु । म्हणउनि सामोरा केला वैश्वानरु । सूर्यास केला नमस्कारु । देहसंकल्प घातला ॥ ५३ ॥ आतां सांडिल हे प्राणातें । म्हणोनि विश्वामैत्र धांविनला तेथें । आकर्षुनिया अग्नितें । शांत केले ॥ ५४ ॥ सुटला समोरिल वारा । तेणें अग्नि पीटुनि माघारा । मग आपण ब्राह्मणाच्या रुपें समोरा । आला तयेपासि ॥ ५५ ॥ मग म्हणतु कवणाचि गे बाई । कवणे ठाई जासिल सइ । मग तिने त्यासि नमस्कारिले पाही । मग पुसो आदरिले ॥ ५६ ॥ अहो बा तुम्ही येणे मार्गे येता । येक पुरुष येक बाळक (जाता) । देखिल नाहित दोघे जन ( ताता ) । सांगा जि नारायेणा ॥ ५७ ॥ मग म्हणे कवणाचे नेणो दोन्ही । मृत्यु पावले ( असती वनी ) । वोणवियानि जळोनि । पडिले ते म्या देखिले ॥ ५८ ॥ येक पुरुष येक बाळु । दोघावरुनि गेलासे जाळु । पैल दिसतसे माळु । तेथे पडिले आहेति ॥ ५९ ॥ तुं मज सांगेसि येसिल वो । तरि मि दाखविन तयाचा ठावो । मग वोळखोन पाहो । कवणाचे (म्हणउनी) ॥ ६० ॥ येईन म्हणसि मज सांगातें । तरि दाखविन तुते । मग येरी म्हणे बा रे ताता ( दावी मातें ) । मग निघालि ॥ ६१ ॥ मग घेउन निघाला तिसि । तया मावेच्या मडियापासि । दोघेजना वोळखासि । पुरुप बाळ ॥ ६२ ॥ मावेच्या केलासे हरिश्चंद्रु । जवळि रोहिदास पुत्रु । तयोसि दाखवि विश्वामैत्रू । पाहे वो सुंदरे ॥ ६३ ॥ मडि दिसत आहे कैसि । हुरपळालि सिरे कैसिं । गेलि आंगीचि भोकासिं । तये वनांतरि

---

१ घालुनि घेईन डोही–पाठ

उद्धरिती ) । ( माहा ) सतिया होती जाणाव्या ॥ ८७ ॥ जे भ्रताराचे वचन स्विकारि । आपण माहादेवि पुजा करि । तेणें पुण्ये नरकाबाहेरि । काढिति त्याते ॥ ८८ ॥ तव तारामति म्हणे । आहे नीतिचे होये बोलणें । परि वैदव्य ( पणे ) जिणे । नको वैरियासि ॥ ८९ ॥ तरि तु जाणसि ते करि बाई । आम्हि लटिके सिकवावे काई । म्हणोनि ते ठाई । अदृष्ट जाला ॥ ९० ॥ मग मावळला दिनकरु । पडिला ( गडद ) अंधकारु । तारामतिये दुरंधरु । वोडवले ॥ ९१ ॥ मग प्रेते हाते उतरिलि । पुढे घेउनि निजेलि । तव काय माव केलि । तया ऋषिणें ॥ ९२ ॥ विशाल व्याघ्राचि उडि थोरि । अवचित पडलि तया मडियावरि । तव ते तारामति सुंदरि । हाक दिधलि तेथें ॥ ९३ ॥ हाकितां तया वाघा । वोडुन नेले तया दोघा । मग पोट फाडोनि वेगा । काहाडिलि आंतडी ॥ ९४ ॥ मग विश्वामैत्रु म्हणे आपण । आतां हे सांडिल प्राण । ईचे पाहो नये निर्वाण । मग दोघा दाखविले दृष्टि ॥ ९५ ॥ जवळिक पडलि कैसि । भेटि जालि त्या तीघासि । तारामति म्हणे रुसिकोसि । तुझि न कळे करणि आदिदेवा ॥ ९६ ॥ मग धाउनि आपुलिया बाळा । आलिंगण दिधले तया वेळा । म्हणें तुम्हासि देखिले डोळा । चरणासि लागली ॥ ९७ ॥

मग म्हणतसे रायाते । ( थोर युगांत वर्तेले माते ) । म्या ( मृत्य ) देखिले तुम्हाते । आपुलिये दृष्टि ॥ ९८ ॥ कुडि वोनव्याने पीटलि । आणि अनवसन वेवस्ता जालि । कि मजला घातलि भुलि । जगन्नाथें ॥ ९९ ॥ तव राव असे म्हणत । करणे देवाचे समर्थ । तुझे व्याकुळ केले चित्त । श्रमलिस वहुत ॥ १०० ॥ आतां असो हे मातु । रक्षीता विश्वनाथु । हलुहलु कर्मणी पंथु । निघालि तीघेजन ॥ १ ॥ निघाले आरण्ये वाटा । तेथे खैर बाबुला दाटा । मुरविंया तिखटा । आंगी काटे वरवडिति ॥ २ ॥ अैसियेपरि ( येक ) नगर ( वोस ) टाकिले । तव भयासुर देखिले । भूत वेताळ देखिले । नग्न खेळत ॥ ३ ॥ जाता जाता अटकलति । भूते वरून धांवा घेति । तिवे आकांत करिति । अैसियापरि दिवस मावळला ॥ ४ ॥ म्हणे आमचे वौंशिचा नृपति । तेणे सूर्यवंश धडौती । त्याचिया आपदा देखोनि गभस्ती । आपण अस्तमाना गेला ॥ ५ ॥ परि येथे आणिक असे विनंति । ( श्रोते ) अक्षेपु करति । म्हणति दारूण गा गभस्ति । पहिले का तपिनला ॥ ६ ॥ तरि विश्वाभैत्राच्या कोपामेण । सूर्ये तपीनला दारूण । परि कृपाळु अंतकरण । हरिचंद्राचे ॥ ७ ॥ असो तया तिघासि । तेथे रात्रि जालि कैसि । मग नवखंड भुवनासि । पडिला अंधकारू ॥ ८ ॥ भणभणित दाहि दिशी । ते काळरात्रि गगनग्रासि । सूर्ये असे भीतु ( तयोसि ) । आपुले मुख दाउ ॥ ९ ॥ अैसी काष्टि जाले भारि । रात्रि क्रामिली वोस नगरि । चालिली

॥ ६४ ॥ मग तयाते देखोनि वनि । तारामति आंग टाकि धराणि । ( म्हणे ) राया मज वनि । कां सांडिले ॥ ६५ ॥ ऐसे म्हणतसे तारामति हे काय जाले चक्रवर्ति । तुवा सिधि केलि केउति । मज सांडोनियां ॥ ६६ ॥ अगा सूर्यवैंशिया नृपति । तुवा कटकाई केलि केउति । हे अवधि सप्त द्विपावति । कवना निर्विलि ॥ ६७ ॥ अगा भूपाळा चुडामनि । मज मांडिले निरांजनि । कां गेलीत दोघे सोडोनि । आतां देह सांडिन ॥ ६८ ॥ कां गा मजसि जालासि उदासु । का माझा घेतला त्रासु । आतां निढळ सूर्येवैंशु । राहिला तुजविन ॥ ६९ ॥ अरे सुपुत्रा जगजेठि । उठि बाळा मजासि बोल गोष्टि । म्हणोनि ललहाट पीटि । मि जालिये परदेसि ॥ ७० ॥ का रे बा रुसलासि मजसि । उसिर जाला आरोगनेसि । आतां बुझावित तुजसि । उठ वेगि ॥ ७१ ॥ कां रे केले निष्ठुर चित्त । मी वाड वेळ पाहातुसे वाट । म्हणोनि मेळविले ललहाट । कटकटा काये जाले ॥ ७२ ॥ ऐसि ते तारामति सुंदरि । बुडालि दुःखाचे सागरि । तव विप्र म्हणे आपणयाते सावरि । तु जरि अंतुरि हो रायाचि ॥ ७३ ॥ तरि माझे वचन अवधारि । यांसि तरि जालि ऐसि परि । आतां आपुले हित विचारि । येथे व्याघ्र वहुत असति ॥ ७४ ॥ दिवसु गेला अस्तमाना । बाया करसि रुदना । हे अति भयासुर वन । येथे असे कोण ॥ ७५ ॥ मृत्यु जाला दोघासि । आतां तु रुदन कां करसी । तु पढियंती जयासि । तो निघोन गेला ॥ ७६ ॥ यासि कायेसि प्रीति करिसि । मेलि प्रेते पोटालिसि । सावजा वरपाडि होसि । जिवे जासि तुहि ॥ ७७ ॥ चतुर प्राहार रात्रिवरि । राहे माझा आश्रमाभितरि । दिवस उगवलिया मना येईल ते करी । राजबाळे ॥ ७८ ॥ मग म्हणे तारामति सुंदरि । मी न ये गा तुझिया आश्रमाभीतरि । जेथे निमाले भ्रतार । तेथेचि राहिन ॥ ७९ ॥ यासि अग्न देईन । मग मीहि उडि घालिन । स्वामीसांगात जाईन । विष्णुलोका ॥ ८० ॥ तेथेचि माझिया रोहिदासासि । मि थान देइन कैलासि । तयाविण घडिभरि कैसि । गमेल मज ॥ ८१ ॥ येरु म्हणे म्या आईकिली वार्ता । जे रुन असेल तुझिया प्राणनाथा । लोकाचे ब्रम्हस्व असता । तुम्हा मोक्ष कैचा ॥ ८२ ॥ यासि जाचना करिति थोरि । घालिति अघोर कुंडाभीतरि । ते कष्ट भोगावया सुंदरि । जाईन म्हणसि कासया ॥ ८३ ॥ स्वर्गी रिनकरियासि येवो नेदिति । तुम्हासि लोटोनि घालिति । त्यामध्यें तुं कुळवंति । तरि आइक वचन माझे ॥ ८४ ॥ तुवा कष्ट करावे दारुण । फेडावे आपले पतिचे रिन । तयाचिया ब्रम्हस्वा उत्तिर्न । करावे तुवां ॥ ८५ ॥ तु आपुला प्राण देसि । मग तो ( केवि ) उतिर्न होईल रुनासी । जो धर्म असे तो तुजपासि । आम्हासि सांगने लागेल ॥ ८६ ॥ मेलिया भ्रताराचि आज्ञा पाळिति । त्या उधरालागी पावति । ( आपुलिया पतीते

उद्धरिती ) । ( माहा ) सतिया होती जाणाव्या ॥ ८७ ॥ जे भ्रताराचे वचन स्विकारि । आपण माहादेवि पुजा करि । तेणें पुण्ये नरकाबाहेरि । काढिति त्याते ॥ ८८ ॥ तव तारामति म्हणे । आहे नीतिचे होये बोलणें । परि वैद्व्य ( पणे ) जिणे । नको वैरियासि ॥ ८९ ॥ तरि तु जाणसि ते करि बाई । आम्हि लटिके सिकवावे काई । म्हणोनि ते ठाई । अदृष्ट जाला ॥ ९० ॥ मग मावळला दिनकरु । पडिला ( गडद ) अंधकारु । तारामतिये दुरंधरु । बोडवले ॥ ९१ ॥ मग प्रेते हाते उतरिलि । पुढे घेउनि निजेलि । तव काय माव केलि । तया ऋषिणें ॥ ९२ ॥ विशाल व्याघ्राचि उडि थोरि । अवचित पडलि तया माडियावरि । तव ते तारामति सुंदरि । हाक दिधलि तेथें ॥ ९३ ॥ हाकितां तया वाघा । बोडुन नेले तया दोघा । मग पोट फाडोनि वेगा । काहाडिलि आंतडी ॥ ९४ ॥ मग विश्वामैत्रु म्हणे आपण । आतां हे सांडिल प्राण । ईचे पाहो नये निर्वाण । मग दोघा दाखविले दृष्टि ॥ ९५ ॥ जवळिक पडलि कैसि । भेटि जालि त्या तीघासि । तारामति म्हणे रुसिकोसि । तुझि न कळे करणि आदिदेवा ॥ ९६ ॥ मग धाउनि आपुलिया बाळा । आलिंगण दिधले तया वेळा । म्हणे तुम्हासि देखिले डोळा । चरणासि लागली ॥ ९७ ॥

मग म्हणतसे रायाते । ( थोर युगांत वर्तले माते ) । म्या ( मृत्य ) देखिले तुम्हाते । आपुलिये दृष्टि ॥ ९८ ॥ कुडि बोनव्याने पीटलि । आणि अनवसन वेवस्ता जालि । किं मजला घातलि भुलि । जगन्नाथें ॥ ९९ ॥ तव राव असे म्हणत । करणे देवाचे समर्थ । तुझे व्याकुळ केले चित्त । श्रमलिस बहुत ॥ १०० ॥ आतां असो हे मातु । रक्षीता विश्वनाथु । हलुहलु कर्मणी पंथु । निघालि तीवेजन ॥ १ ॥ निघाले आरण्ये वाटा । तेथ खैर बाबुला दाटा । मुरविंया तिखटा । आंगी काटे बरवडिति ॥ २ ॥ ऐसियेपरि ( येक ) नगर ( वोस ) टाकिले । तव भयासुर देखिले । भूत वेताळ देखिले । नञ खेळत ॥ ३ ॥ जाता जाता अटकलति । भूते वरून धांवा घेति । तिवे आकांत करिति । ऐसियापरि दिवस मावळला ॥ ४ ॥ म्हणे आमचे वौंशिचा नृपति । तेणे सूर्यवंश धडौती । त्याचिया आपदा देखोनि गभस्ती । आपण अस्तमाना गेला ॥ ५ ॥ परि येथे आणिक असे विनंति । ( श्रोते ) अक्षेपु करति । म्हणति दारूण गा गभस्ति । पाहिले का तपिनला ॥ ६ ॥ तरि विश्वामैत्राच्या कोपामेग । सूर्ये तपीनला दारूण । परि कृपाळु अंतकरण । हरिचंद्राचे ॥ ७ ॥ असो तया तिघासि । तेथे रात्रि जालि कैसि । मग नवखंड भुवनासि । पडिला अंधकारू ॥ ८ ॥ भणभणित दाहि दिशी । ते काळरात्रि गगनग्रासि । सूर्ये असे भीतु ( तयोसि ) । आपुले मुख दाउ ॥ ९ ॥ ऐसी काष्टि जालि भारि । रात्रि क्रामिली वोस नगरि । चालिली

तव देखिले काशिपुरी । तिर्थरावो ॥ १० ॥ देखिलि काशीपुरी । कळस सळकाति अंबारि । मग पाहाति दिनकारि । उदावो केला ॥ ११ ॥ जैसे सूर्याचेनि बिंबे । कळस मांदि उरावारि । भवति जडिलि मानिके । तिचे कर्णि ॥ १२ ॥ जेथ ब्रह्महत्येमेण । रिघाला विश्वामैत्रासि शरण । तया नग्राचे महिमान । कवणें वर्णावे ॥ १३ ॥ भीतरि पाप निवोन राहे । ते पंच क्रोसि बाहेर राहे । तवं देखिली गंगामाये । श्रीभागीरथी ॥ १४ ॥ जिचे उदक शुद्ध निर्मळ । वाहता दिसे गंगाजळ । जियेतें इंद्रादिक सकळ । नमस्कारिति ॥ १५ ॥ जिचि सहस्रमुखें किर्ति । अष्टदश पुराणें वानिती । (ते) अगाध (श्री) भागीरथी । तीही लोकीं ॥ १६ ॥ आणि गंगेतें का तारु होति । तया निदितें काय वानिति । तयाचि खोलि असें कळती । पाय उतारें ॥ १७ ॥ तैसि नव्हें भागीरथी । वाहतुसें सप्त पाताळाखालुति । सागर पावला उधरागति । तें भागीरथी वंदा तुम्ही ॥ १८ ॥ देखिलिया मनकर्णिकोसि । जें समाधान जालें जिवासि । महिमा नाहि कैलासि । तयोसि मुक्ति कैसी ॥ १९ ॥ म्हणोनि कैळासि निवासि । सांडोनि राहिला काशियेसि । ईश्वर होउन तियेपासि । वैसलासे ॥ २० ॥ ते नवखंडा वगळे कासि । म्हणोनि दुर्लभ महेषासो । तोचे चिंतन करिती मानसि । ब्रम्हादिक ॥ २१ ॥ तयासि स्वर्गी असे पतन । म्हणोनि सेविंति ते स्थान । मुक्तिचे निधान । काशिपुरी ॥ २२ ॥ आता असो हा विस्तारु । कथागर्भि शंकरु । पुढे काये वर्तला विचारु । तो आईका सकळिक ॥ २३ ॥ तीघी स्नाने केली । मग ते भागीरथि नमस्कारिली । माते म्हणे पोश सांभालि । माये (मनकर्णिके) ॥ २४ ॥ मग जाले तिलतर्पण । मौन्येचि सारिले अनुष्ठान । मग केले दर्शन । विश्वनाथाचे ॥ २५ ॥ बांधोनि विश्वनाथाचि पुजा । मग मागे सरला राजा । मग म्हणे विश्वनाथा माहाराजा । साष्टांग दंडवत घातले ॥ २६ ॥ देखिलि भवानि आणि शंकरु । दंडपाणि विघ्नेश्वरु । ते वेळि हरिचंद्र । संतोषला ॥ २७ ॥ तया प्रयागाभीतरि । तीर्थे कोटि बाहेरि । तेथे भांडारि । गौरि गोसावि ॥ २८ ॥ म्हणे नामा विष्णुदास । श्रोति द्यावा अवकाशु । पुढे कथा सुरेसु परिसावि ॥ २९ ॥ छ प्रसंग ॥ ३ ॥ वोविया ॥ १२९ ॥ संपूर्णप्रस्तु ॥

## ।। प्रसंग ।। ४ ।।

श्रीविश्वनाथ पाहुना[1] आला। तो तेथे गोसावि जाला। तव तेथे विनायेक भेटला। विश्वेश्वराचा ।। * १ ।। मग (बिंदु)माधवाते नमस्कारिले। काळभैरवाते पुजिलें। तिघिर्जन घातले। दंडवत ।। २ ।। ऐसें तये काशि-विश्वेश्वरी। हरिचंद्र नमस्कार करि। जवाळि तारामति सुंदरि। पतिव्रता ।। ३ ।। तीवे स्मरोनि हरिचरणा। भवति केलि प्रदक्षिणा। तव विश्वामैत्रु तत्क्षणा। पावला तेथें ।। ४ ।। जव रावो गेला भीतरि। म्हणे निकि गा अवघी (व)सुंधरी। तुवां आम्हाकारि। हिंडविलि ।। ५ ।। ऐसें तुझे करणे। आम्हासि दगद(ग) पाडणें। तुज वेठिं घातलि कवणे। दान करावया ।। ६ ।। तुझिया दानाकारणें। आम्हासि लागले येणें। आतां उसिर न लावणे। आमुचि दक्षणा देई ।। ७ ।। तुजमागें हिंडता। किति असावे नृपनाथा। अवघि पृथ्वि सांडोनि केविता। आलासि तुं ।। ८ ।। आतां साच असेंल तुझे वचन। तरि दे गा माझि दक्षणा। लटिकाचि (कां) ब्राम्हणा। घालिसी श्रमु ।। ९ ।। जळो ऐसें विलंबदान। बरवे करितोसि पुण्य। पाहा हो अवघें त्रिभुवन। हिंडविले ।। १० ।। हे तीर्थे कां काये करिति उतिर्णे। लटकाचि दगडि घालिसि प्राण। माझि दक्षणा दिधलीयाविन। गति नाही तुम्हासि ।। ११ ।। तिन वेळा मागावे रिन। जरि नेदिता होयें मरण। (तरि) अन्यंन्यें जन्मि स्वान। होउनि जन्मावें ।। १२ ।। तीन वेळा मागावें। येजमानातें सावध करावें। मग त्याहि परि तें(णें पाहावें)। हित (आपुलें) तो जाणें ।। १३ ।। आणि तो ब्राम्हण इतुकें न करि। तरि तो सत्य जन्मवरि। उपजें अधमाचा घरि। स्वान होउनि ।। १४ ।। आपुलियें वाचें दें दक्षणा। मग आळुकें करि मना। त्याचियें जिव्हेंसि होयें बंधना। मुका जन्म तो पावें ।। १५ ।। आणि आळुक्यातें मागता। तो कंठीं प्राण ठेविता। महिमा जाईल समस्ता। म्हणोनि देउनि घे ।। १६ ।। असो हे आम्हा काये चाड येणे। जे तुजपासि ईतुके धर्म सांगणें। आम्हि तरि येक दोन वेळा मागणे। येजमानासि ।। १७ ।। मर्यादेचा दिवस जाला। म्हणोनि येथे टाकुन आलो (मागावयाला)। मग हरिचंद्र बोलिला। उदईक उत्तिर्ण होईन ।। १८ ।। ऐसे बोले हरिचंद्रु। आता हा करणे नलगे विचारु। आजिचा अस्तमाना दिनकरु। उत्तिर्ण होईन मी ।। १९ ।। तुम्ही करितसा माझे हित। परी तुम्हा कष्टविले बहुत। आतां देईन जि त्वरित। अस्तमान न व्हता ।। २० ।। ते वेळि म्हणतिले तारामतिते। तुम्हि बैसलि असा येथें। मि उतराई

---

१ पाहोनी–पुणेप्रत पाठ

होउनि आपणाते । गीऱ्हाईक पाहेन ॥ २१ ॥ तो राजा हरिचंद्रु । निघाला ग्राहिक विचारु । त्याचिया सत्वाचा निर्धारु । परिसा सकळिक हो ॥ २२ ॥ त्रिसिखाचि मुद्रिका होति । ते देउन घेतले गवती । ते वेळि तो चक्रवर्ति । तिने[1] बांधले मस्तकि ॥ २३ ॥ मग तेणे वेउन माथे । म्हणे कोण्हि गीऱ्हाईक आहे येथें । आम्ही विकितो आपणातें । सांगे (लो)काप्रति ॥२४॥ देखोन माथाचे तृण । मिळाले नगरिचे जन । म्हणति या (राया)चे धन । काये जाले ॥ २५ ॥ हा का आपणयाते विकि । ऐसे पुसिले (नगर) लोकि । आतां सांगा गिऱ्हाईकि । धारणा आपुली ॥ २६ ॥ तव उठलि तारामति सुंदरा । म्हणे हे काये करिता प्राणेश्वरा । आम्हा सोडोनि विकरा । करिता आपला ॥ २७ ॥ असता मजसारिखि शक्ति । राउळ कां आपणाते विकिती । माझे द्रव्ये येईल किति । ते द्यावे (आधी) ॥ २८ ॥ मज कासया ठेवित (असा) । माझा उपयोगु पडेल कायसा । आम्ही उतराई होउ अम्हस्वा । दोघेजण ॥ २९ ॥ तव राउळ म्हणे मि आपुलेनि हातें । कैसे विकु तुम्हाते । (हें तव देखवेना माते) । मग तुम्हाते भलते हो का ॥ ३० ॥ विश्वामैत्रु म्हणे नृपति । तु जरि अस्त्रियेचि (करिसी) काकुळति । तुज येकलियाचे द्रव्ये येईल किति । ते सांगा(वे) ॥ ३१ ॥ हें तुज पढियेसि जिवेसि । आणि पुत्राते न विकु म्हणसि । तरि माझे द्रव्ये कैसे देसि । कवणाचे घर मारसि ते सांग ॥ ३२ ॥ ते वेळि हरिचंद्र नृपति । हाटि उभि केली तारामति । मग तृण आपुल्या हाति । बांधले माथा ॥ ३३ ॥ देखोनि माथाचे त्रुण । विश्व करितसे रूदन । अवघे नगर येउन । उभे राहिले पाहावया ॥ ३४ ॥ काशिपुरनीवासि । उभे राहिले तयापासि । स्नाना जात होते संन्यासि । तेहिं जवळि आले ॥ ३५ ॥ येक तपोनिधि महंत । मस्तकि जटाकंद मिरवत । नख चुंभळि वळत । तेहिं आले ॥ ३६ ॥ पंच नगरि मिळालि सभोवति । ऐसिये नारि ते कवण विकिति । म्हणोनि संभव ते पाहाती । तये वेळि ॥ ३७ ॥ पाहातां मुखाचि शोभा । उणें येतसे सूर्येबिंबा । आंगी कांति जैसि सुवर्णप्रभा । अति सुढाल ॥ ३८ ॥ ते श्रीमंत वेल्हाळ कैसि । परिपूर्ण लावण्यराशि । सर्वांगि लावण्यलक्षणवंति । आणिक नाहिं ॥ ३९ ॥ ऐसि ते सुंदरी गोमटि । विकावया उभी केली हाटि । तया लोकासि पापदृष्टि । पाहो नये ॥ ४० ॥ येक म्हणति अयोध्येचा चक्रवर्ति । याचि काये जालि संपति । आपलि येक म्हणति । कुळवंति का विकावी ॥ ४२ ॥ येक म्हणति यासि कां पडले रिण । देणे असे ब्राम्हणाचे सुवर्ण । ते व्हावया उतिर्ण । भार्या विकितुसे ॥ ४३ ॥

---

१ तृण—पाठ

अैसि वार्ता आयकोनि । मग आल्या कुंटिनि । आम्हासि उपजविका ये वचनि । धांविनल्या वहुत जनि तिस घ्यावया ॥ ४४ ॥ अैसिया कुंटनि पाहाति तारामति । म्हणति वाप श्रेष्ट तुझि गति । कैसे अमोलिक क्षीति । रत्न उपजविले ॥ ४५ ॥ ईस आम्हि घेउ विकत । काये द्यावि ईचि संपद । तव विश्वामित्र तयाप्रत । काये वोले ॥ ४६ ॥ म्हणे ईचे मोल ईसुके । सुवर्ण घ्यावे ईचे तुके । तव येरि म्हणति सुखे । देवो आम्ही ॥ ( ४१[1] ) ते वेळि वोलाविला भांडारणी । द्रव्यें आणविलि ततक्षणि । मग दिधले लेहोनि । ( तया ) विश्वामैत्रातें ॥ ४७ ॥ मग म्हणती राज-कुमरि । वैस या सुखासनाभीतरि । तुं काहिं खंति न करि । आपुलिये मनि ॥ ४८ ॥ तु उपरिया धवळारे नांदासि । रत्नाचा सिंहासनि उपविष्ट होसि । गादियावरि टेकसि । राजवाळे ॥ ४९ ॥ तुचि गोसाविन अवघीयासि । आम्ही तुझिया दासि । तू आम्हाते पोसि( सि ) । कुटुंबा-( सहि )ते ॥ ५० ॥ दासि थापटिति पाये । आणीतु ते देखति राये । ते वेळि मोकळि( लि ) धाये । तारामति( या ) ॥ ५१ ॥ मग येउनिया काकुळति । रायाते असे विनविति । म्हणति संपति वोपा जि मागुति । यासि याचि देणें ॥ ५२ ॥ तव येरू म्हणे आमते काये म्हणासि । जयाचे द्रव्ये लागसि । तो समर्थु आम्हा अवघियासि । सोडावया ॥ ५३ ॥ मग लागली विश्वामित्राच्या चरणा । म्हणे आलिये तुम्हासि शरणा । माझे राखावे प्राणा । कुळे तारावी माझी ॥ ५४ ॥ या करविति अन्य विभि-चार । तो आपण न करि निर्धार । साक्ष करुनिया शकर । देहे ठेविन येथेचि ॥ ५५ ॥ ते वेळि ( विश्वामित्रे ) मागुते । द्रव्य परतोनि दिधले त्याते । मग म्हणे कष्टविले आमते । येणे हरिचंद्रे ॥ ५६ ॥ ते वेळि कौसेकु विप्रु आला । रायाते पुसुं लागला । सांग म्हणे ईच्या मोला । काये द्रव्ये द्यावे ॥ ५७ ॥ तंव विश्वामैत्रु म्हणे कौसिकासि । तुं रायाते काय पुससि । मि समर्थु असे त्या तीघासि । विकावयालागी ॥ ५८ ॥ ईचेनि तुके सुवर्ण । रावो लागतसे माझे रुण । हे तीघे जण ( जान ) । मि विकितुसे ॥ ५९ ॥ जरि द्यावया असले तुजपासि । तरि करि द्रव्याचिया रासि । मग म्हणतिले विश्वामैत्रासि । द्रव्य घ्या हो ॥ ६० ॥ द्रव्य दिधले त्याप्रति । हाति धरिलि तारामति । अवघे लोक सिविया देति । हाहाकारु प्रवर्तला ॥ ६१ ॥ म्हणे अैसियासि दान कासिया देति । माणसे लोकाचि विकविति । राउ( ळ ) पडिलासे क्षिति । अैसे आम्ही देखतुसो ॥ ६२ ॥ पुत्र अस्त्रि विकणे । आणि ब्राम्हणा दान करणे । म्हणे अैसे जळो जिणें । या पुरुषाचे ॥ ६३ ॥ ते वेळि

१ ही ४१ वी ओवी इथें पाहिजे.

हरिचंद्र खोचला । मनि कांटाळा उटिला । मूर्छा येउनि ठे( क )ला । सत्वस्तंभेसी ॥ ६४ ॥ मग ते तारामति आलि परतोन । रायाच्या चरणा केले नमन । मज तुमचे दुर्लभ चरण । म्हणोनि पाया पडि- येलि ॥ ६५ ॥ कवण जाणे कैसि गति । कै भेटि होईल मागुति । मि तव मानासि असे चिंतिति । रात्रि दिवस ॥ ६६ ॥ तंव कैसेकु चा( ला )वो बाई म्हणत । ते वेळि निघालि आसुवे पुसित । म्हणे वा म्या काये करावे येथ । ते सांग मज ॥ ६७ ॥ येरु म्हणे ब्राम्हण करिति आरोगण । तयालागी निपजवी अन्न । तेणे होईल पुण्यपावना कुळ तुझे ॥ ६८ ॥ ते वेळि संतोषलि तारामति । हात परउपकारि लागती । म्हणोनि निघालि चालति । तयासवे ॥ ६९ ॥ ते वेळि दोघे येक( ले ) ठेले । तारामतिते निवडुन नेले । आकाश पडिलेसे वाटले । तारामतिते ॥ ७० ॥ वाप श्रेष्ट या विकटा । तीवा केल्या तिन वाटा । ऐसि घातालि अव्हाटा । विश्वामैत्रे ॥ ७१ ॥ तुटले तयाचे साजणे । विसंचलि तीवे जने । मग रोहिदासु म्हणे । पीतिया हरिचंद्रासि ॥ ७२ ॥ मी येकदा भेटेन आईसि । मागुता येईन तुम्हापासिं । ( राव म्हणे ) बापा कवणा भेटासि । तुटला संमंधु ॥ ७३ ॥ तरि एकदा भेटेन गा ताता । म्हणोनि चरणा- वरि ठेविला माथा । येरु म्हणे जाउन मागुता । लवकरि येई ॥ ७४ ॥ ( मग तो धाविनला वेगे । म्हणे आई उभी राहे गे । मज सांडुनीया गे । जातेसी कैसी ॥ ) तव तारामति म्हणत । पैल बाळक माझे येत । म्हणोनि क्षण एक तेथ । उभी राहिली ॥ ७५ ॥ तव कौसिके भकतिलि ततक्षणि । भूमिवारि पडलि उतारि । दुरुन हरिचंद्र लोचनि । पाहातुसे ॥ ७६ ॥ तव रोहिदासु जवळि आला । मातेच्या गळा झोंबिनला । ते वेळे पान्हा आला । जननियेसि ॥ ७७ ॥ मग थान देउनि तयाते । मुख पुसिले हाते । म्हणे मज पापीणिये ( येथे ) । कासिया आलास ॥ ७८ ॥ मि पुर्वि न भीइचि पातका । म्हणोनि मुकलिये बाळका । ते वेळि काळकौसिका । करुणा आलि ॥ ७९ ॥ तव ते तारामती । कौसिका येतसे काकुळति । दोन्हि चरण धरुनि हाति । विनवितसे ॥ ८० ॥ बा मज जिवदान दे म्हणत । तुम्हा पाळव असे पसरित । हेहि बाळक घेई विकत । ईतुके पुण्य घे रे ॥ ८१ ॥ पाडस हरिणि ते मेळवा । आम्ही दोघे करु सेवा । हा तुमचिया देवा । होईल बडवा ॥ ८२ ॥ म्हणोनि चरणावरि ठेविला माथा । ते वेळि करुणा उपजलि तयाच्या चित्ता । म्हणे यातेहि घेईन विकत ( आतां ) । मग चालिला ॥ ८३ ॥

ते वेळि तिघे निघालि मागुति । कौसिक रोहिदासु तारामति । तव हरिचंद्रा चित्ती । धाकु पडिला ॥ ८४ ॥ जरि ईते सांडिले मागुति । आणि मागेल आपुलि संपति । तरि विश्वामैत्रु कोपति । नेदिति हातिचे द्रव्य ॥ ८५ ॥ तव तो काळकौशिकु म्हणे । सांगा जि बाळकाचे द्रव्य देणें । हे दोघे आम्हाकारणें । पाहिजेति ॥ ८६ ॥ तव राव म्हणे अर्धभार द्या जि याचा । हा शिष्य होईल तुमचा । अैसे बोले वाचा । हरिचंद्र ॥ ८७ ॥ ते वेळि सुवर्ण देउनि तयाते । दोघे घेतलि तेथे । मग रावो म्हणे बापा येथें । सांडिले मज येकले ॥ ८८ ॥ दोघे निघालि ततक्षणा । राजा दुःखित अंतःकरणा । शेवटि येकलेपणा । न चुके माझा ॥ ८९ ॥ मग हरिचंद्र म्हणे । दोघि सेवा याचि बरवि करणे । तुम्ही देवालागि अन्योने । ( आणीत जावी ) पुस्पे पै ॥ ९० ॥ तव रोहिदासु पितियाते म्हणे । अैसे जळो जि माझे जिणें । तुमचि सेवा करणे । न घडे मज ॥ ९१ ॥ माझे जिवित भूमिभारु । मि कुसि जन्मलो पथरु । पितियासि उपकारु । नव्हेचि मज ॥ ९२ ॥ अैसे म्हणोनि लागला चरणा । ते दुःख न साहेचि माझिया मना । तव तो म्हणे दोघाजना । चला वेगी ॥९३॥ कौशिके दोघाजनाते नेले । दुःखे रायाचे हृदय फुटले । मग आवरिले । सत्व टळेल म्हणोनिया ॥ ९४ ॥ मग राये आपुलेनि हाते । तृण बांधले मस्तकाते । ( म्हणे ) कोणिहि विकत घ्यावे माते । या नगरामाजि ॥ ९५ ॥ दोनि भार सुवर्ण देणे । तेणे आमते विकत घेणे । आम्हि बांधलो रिणे । ब्राम्हणाच्या ॥ ९६ ॥ जया रायाचे तीतुके तुकणे । मेरुसि ये उणे । तेव्हडेनि घनवटपणे । कवणु असे ॥ ९७ ॥ याचेनि गंभिरपणे । सागराचे मान ठेंगणे । सुचितपणे निववणे । चंद्रासि पै नाहि ॥ ९८ ॥ क्षमा थोर प्रथ्वि( ये )सि । तरि ते प्रार्थी रायासि । हा गुण द्यावा आम्हासि । तुम्हि ( कृपा करुनी ) ॥ ९९ ॥ मग ते माथा बांधले तृण । विकि आपणया आपण । तव डोंब विरबाहो जाण । आला तेथें ॥ १००॥ दुरुनि मांदि आला सागित । हाति डाहाळा भोवंडित । आला । दुर्गंधी घाणत । उभा ठाकला ॥ १ ॥ ते वेळि मांदिया परत्या होत्या दूरि । बोसरुनिया माघारि नाहि भिति । मग शिरोनिया भीतरि । जवळि गेला ॥ २ ॥ तया द्रव्यासि नाहि मिति । जोडालि मढ्याचो संपत्ति । तया-साटि चक्रवर्ति । विकतु घेतसे ॥ ३ ॥ जो तेथें पावे मरण । तयासि जोडे अर्ध धन । ( ते ) घेतलियावांचुन कवण । जाळो नेदि ॥ ४ ॥ ( प्र )मान विश्वनाथाचे करवी । अर्धधन सांडवी ।

अधेयाचि कि यैसी ठेवि । ( तयाचे संततीलागी ) ॥ ५ ॥ अैसे किति गेले राये लक्षापति । तयाचे द्रव्ये वाटुन घेती । अैसे पैला ( सा )चिति । कोटिवरि ॥ ६ ॥ मग राये तवा गावा जाति । घरि गुढिया उभारिति । तेथिल्या मरणा टाकुन देति । वहुसुखे ॥ ७ ॥ जन्मोनि दंडिजे प्राण । आचरिजे गोमटे आचरण । व्हावया लागि मरण । तये गावि ॥ ८ ॥ तये स्थानि जाळिजेति । तया डोंवाचेनि हाते मुक्ति । ( देतसे ) तो देव भवानिपती । विश्वनाथु ॥ ९ ॥ अैस्ते ते गावि मरति । डोंवाचे हाति त्याचि संपति । कुवेरु थोरु धने म्हणति । वाचाविण ॥ १० ॥ अैसा तो डोंव अघोरू । न पाहत आला जि विचारु । आला गीन्हाईकि करू । हरिचंद्राचि ॥ ११ ॥ तेव्हां राये देखिले तयाते । विचारिले आपुलेनि चित्ते । म्हणे हा विकत घेईल माते । संपत्तिचेनि वळे ॥ १२ ॥ तरि माहारवडा पडिजे ते भले । परि ब्राम्हणाचे रिण ठेले । तरि आमुचे पूर्वज गेलें । अधोगति ॥ १३ ॥ ते वेळि डोंव म्हणे रायाप्रति । तुझे द्रव्ये द्यावे किति । सांगाव निगुति । येकेचि वोले ॥ १४ ॥ तव रावो म्हणे डोंबाते । द्यावे दोन भारु सुवर्णाते । मग न्यावे आमते । स्वामिया ॥ १५ ॥ तव येरु म्हणे मि हीनयाति । परि मज व्यापार आहेति वहुति । ते म्हणजे करावे लागति । ( न करावे ते ) तुम्हासि ॥ १६ ॥ मग रावो म्हणे मांगाल ते करिन । परि येक विनाविन । त्यासि चित्त द्यावे प्रतिदिन । सोडने घटिका च्यारि पोट भरावया ॥२७॥ हे माजि अ.ईका जि विनंती । म्हणे तया डोंवाप्रति । जो ब्रम्हणे रायाप्रति । सुखे कोराम्न करावें ॥ १८ ॥ ते वेळि सोने दोन भार आणिले । हरिचंद्राचि वोपिले । ( ते ) राये समर्पिले । ( विश्वामित्र ) रुसिसि ॥ १९ ॥ मग लागला याच्या चरणासि । तुम्हि जावे अयोध्येसि । आम्ही कष्टविलें तुम्हासि । वहुत दिवस ॥ २० ॥ आतां मज करावे मोकळे । राज्य ‥भाळावे आपले । प्रजाप्रतिपालन करावे ( भलें )। वरविया रिति ॥ २१ ॥ विश्वामैत्रु म्हणे म्या तुम्ही शीणविले । देशोदेश हिंडविलें । सेखी वोला ठेविले । आमुचे माथा ॥ २२ ॥ ते वेळि तो ( डोंव ) हरिचंद्राते घेउनि निघाला । आपुलिया घरासि आला । थोर श्रमु पावला । हरिचंद्र ॥ २३ ॥ तव चहुकडे मास वाळत । दुर्गंध घानि तेथ । कोरडि करवडे तेथ । गणित नाहि ॥ २४ ॥ अस्थिपंजर भोवते पडिले ।

ते अरधे स्वानि बोढिले । घार गीध काउळे ( बैसले ) । भोवति आकाशि ॥ २५ ॥ मासाचि कर्पट घाणि । उभे राहो न सके ते स्थानि । भूमिवरि अशुद्ध सांडोनि । ( कीट जाले ) ते वेळि ॥२६॥ निंधुत होतो चक्रवर्ति । आंगी कांटाळे उठति । चालता आस्थिवरी पाये पडति । तयाचे ॥ २७ ॥ त्या डोंबाचि राणी । त्या येता देखिल नयेनि । रायामाजि मुगुटमनि । हारिचंद्र ॥ २८ ॥ मग म्हणतसे तया डोंबाते । कैसे कोणे चाळविले तुमते । काये विकत घेतले याते । काय देखोनिया ॥ २९ ॥ आणि याचिये आंगीचे देखोनि तेजे । यासि काये देव्हारा पुजिजे । तुवा आपुले महिमान नेणिजे । यासि काय काम सांगावे ॥ ३० ॥ याचे रातोत्पळासारिखे पाये । आंग नेताचि सरि लहे । इतुके काये । नेणसि तुं ॥ ३१ ॥ बरवे याते घेउ गेलासि । तुते भुलि पडलि कैसि । हा कवणा कामासि । येईल आम्हा ॥ ३२ ॥ तव रावो म्हणे आतां आले मरण । कष्टि फेडिले ब्राम्हणाचे रिण । ते मागुते मागीतले धन । तरि कोठोनि देवो ॥ ३३ ॥ मग रावो तया दोघाते विनवि । तुम्हि आमची चिंता न करावि । मज निरोपु देता केवि । करिन म्हटले तुमचे ॥ ३४ ॥ मी सेवकु तुमचा । पाईकु आठा प्रहाराचा । व्यापार अवघ्या घरिचा । न सांगता करिन ॥ ३५ ॥ तुम्हि दोघे उमा शंकरु । माझे भवानि विश्वेश्वरु । तुमचेनि जाला विस्तारु । ब्राम्हणाचा ॥ ३६ ॥ तरि सांगा जि निरोपु आतां । मज काये म्हणिये देता । ते आपलिये नि मुखे आतां । आज्ञा द्यावि ॥ ३६ ॥ ते वेळि तया राजकुमरा । पांचरावया दिधले पटकुरा । तेणें तितुकेचि सुख मानिले अवश्वरा । आतां भये नाहिं ॥ ३८ ॥ मग तो घरिचा व्यापारि । केरु झाडोनिया भरि । तो ठेउनिया शिरि । दूरी सांडो जाय ॥ ३९ ॥ जातियासि लज्ञ लाविति । हाति फोड येति । विळवरि दळविति । परि दुःख न मनि ॥ ४० ॥ जे हाति करावि पुजा । हरीहराते करी राजा । देवाऋपेश्वरा द्विजा । प्रतिदिनि ॥ ४१ ॥ तो रावो चांडाळाचा घरि । शिरि ठेउनि घागरि । पाणी वाहतुसे विळवरि । मनकर्णिकेचे ॥ ४२ ॥ तव विश्वामित्रु वरुन्यावरि । फोडि माथाचि घागरि । अदृष्ट होउनिया दूरि । पाहतुसे ॥ ४३ ॥ मग तिंवल कांवळ झरतु । रावो थरथरा कांपतु । डोंब देखिला येतु ।

दुरुनिया ॥ ४४ ॥ ते वेळि आणिक दिधलि दुसरि ( घागरि )। म्हणे आजि व्यर्थु अैसे न करि । तव तेथुनि निघता द्वारि । फोडिली विश्वामैत्रे ॥ ४५ ॥ तव डोंबिन शिविया दे आवेशे । म्हणे पापीया जोडलासि अनायासे । आम्हालागि महेशे । ठेविला होतासि ॥ ४६ ॥ मुहुर्त आमुचे द्वारि । फोडिली रिति घागरि । मग ते अवस्वरि आंगावरि । मारिला तो ॥ ४७ ॥ मग आणिक घागरि दिधलि । ते सरसी माथा ठेविलि । ते जतन भरुन आगिलि रिचविलि । रांजनाभीतरि ॥ ४८ ॥ तव विश्वामैत्रे फोडोनि रांजनु । आपण राहिला अदृष्ट होउनु । ते पाणि जातसे खालुनु । वरच्यावरि ॥४९॥ उदयो लागुन विळवरि । तो ( गवो ) रांजनु पाणिये भरि । परि न भरे कवणिये परि । तळि उदक जाये ॥ ५० ॥ तव डोंब आला आरोगणे । उदक मागितले तेणें । बटकियेते म्हणे । उदक देई ॥ ५१ ॥ तव रांजनि थेंबु नाहि पाणि । रिता तांविया आलि घेउनि । मग गवो आसुडला केसि धरुनि । खालिता पाडिला दिधली लात ॥ ५२ ॥ म्हणे सकाळपासुनि काय केले । पापिया जळो तुझे जियाले । आमुचे द्रव्ये वाया गेले । तुज घेउनिया ॥ ५३ ॥ हरिचंद्र म्हणे — । अवघ्या विळ वाहिले पाणि । ते काये जाले रांजनि । ते विश्वनाथु जाणे ॥ *५४ ॥ पाहा हा लटिके बोलत । अवघा विळ भरला रांजन । नुसते कोरान्न खाउन । बैसला असे ॥ *५५ ॥ मग म्हणे आता वेगु करी । कोरान्न करुन ये झडकरी । मनि दुःख ते भारि । ते सदाशिव जाणे ॥ ५६ ॥ मग डोंवास करुनिया विनंति । उदकाकारणे नवि घागर मागति । रंधनाचि केलि आईति । आला भागीरथिसि ॥ ५७ ॥ दिवसु जाला अस्तमान । मग करुनिया स्नान । निपजविले अन्न । मनकर्णिकेतिरि ॥ ५८ ॥ जयास तळवा अमृत जिरविति । तो रंधन करितुसे आपल्या हाती । खांडमिसिया करपति । चुल फुंकिता ॥ ५९ ॥ मग करुनिया सचिल स्नान । पाकनिस्पत्ति जालि म्हणोन । ते दोन ठाई सरसे करुन ( अन्न )। ( बरोबरी केले ) तये वेळि ॥ ५० ॥ सारुनि संध्या अनुष्ठान । करुनि देवतार्चन । आभ्यागतासि आवाहन । केले राये ॥ ६१ ॥ तंव तो स्वस्ति गा येजमाना म्हणत । मि येकु ब्राम्हण असे येथ । बहुत क्षुधा लागलि माते । अैसे बोले ॥ ६२ ॥ मग तयाते नमस्कारुन । अन्न पत्रावळिस वाढुन । मग संकल्प घालुन । आतां आरोगीजे जि ( म्हणे ) ॥ ६३ ॥ मग विश्वामित्रु गुप्त असे जेवितु

मि कालिचा जि उपवासि म्हणतु । तुझा पुरे मनोरथु । आम्हासि आहारु दिधला ॥ ६४ ॥ परी नावेकु नव्हे तृप्ती । येक कुसि राहिली रिति । मग दुसरा भातु आपुला हातिं । वाढिला त्यासि ॥६५॥ ते वेळि ढेकर देउन जेविला । आचउनि उभा ठेला । स्वस्ति रा येजमाना म्हणोनि निघाला । पुन्होनिया ॥ ६६ ॥ रावो उपवासि राहिला देखा । प्राण व्यापिला भुका । मग आंजुळ घेउनि उदका । पोट आवळिले ॥ ६७ ॥ त्यास नित्य अतितासि बोगरि । विश्वामैत्रु गुप्त ये झडकरी । अैसे वरुपे वरि । रावो राहिला अन्नेविण ॥ ६८ ॥ मग दृष्टिप्राण रायाचा राहिला असे । परि सत्वे वागतु असे । परि तया मरण नसे । ( अन्नेविण ) रायासि ॥ ६९ ॥ पाऊल नुचले अैसे जाले । ते वेळि बोल डोंबिने बोलले । आतां रोगीष्ट वर्तले । याचे आंग ॥ ७० ॥ तैच म्या सांगीतले । याचे आंग पिवळे जाले । आतां क्षयरोगें जिकिले । हे काये काम करिल ॥ ७१ ॥ आपुले दुःख न सांगे हा शाहाणा । याने फेडिले ब्राम्हणाच्या रुणा । आपणयाते केले उत्तीर्णा । बांधिले न जावे ॥ ७२ ॥ येणे नागविले आमते । सुवर्ण दोन भार दिधले याते । याचे पुर्विल लागत होते । ते याचे ( रुण ) फेडिले ॥ ७३ ॥ आतां याते स्मशाना राखण घाला । हा तेथें असेल बैसला । पापीये येणें राज्यान केला । आमुच्या जि सर्वस्वाचा ॥ ७४ ॥ हा नसावा आमचिया डोळ्यापासि । यासि देखिलिया आमचा जिव कुसकुसि । कैसा देवे ठेविला होता आम्हासि । पुर्विल रिंण याचे फेडिले ॥ ७५ ॥ आतां हा पाठवावा स्मशानासि । आणि तेचि नांव ठेवा यासि । हा आनिका कार्यासि । उपेगा नये ॥ ७६ ॥ मग म्हणति तुवा मसण राखावे । आणि आमते सांगावे । कवणाते जालो न द्यावें । द्रव्य घेतल्याविण ॥ ७७ ॥ मग तयाते नांव ठेविले स्मशानी । (म्हणती) राहावे जतन करुनि । मग बैसाविला तया स्थानीं । विळवरि ॥७८॥ उदई प्रातस्नान करुनि । मग बैसला स्मशानि । चहुमेरि पाहे स्थानि । मृत्यु प्रेते ॥ ८९ ॥ परि शरिर निरहारि । हरिहराचे ध्यान करि । त्याभोवती घरटि करि । सुद्रसेन *॥ ९० ॥ सदाशिव येउनि । हाति त्रिशूळ घेउनिं । हिंडतसे स्मशानी । भक्ताकारणे *॥ ९१ ॥ काशि जालि अमरपुरी । मृत्यु सके न रिघो भीतरि । आपण राखतसे त्रिपुरारी । त्रिशूळ घेउनि *॥ ९२ ॥ जरी मृत्यु रिघे भीतरि । तरि पडेल दोहिंचि येकतरि । म्हणउनि राहिलासे दूरि । भेवोनिया *॥ ९३ ॥ ते वेळि

१ अवघा दिवस—पाठ.

डोंब म्हणे कैसें उवडलें । रोग दुखणें कोणे नेलें । अवघि व्याधि कोणिकडे गेले । वांदवडि पडिलि काये ❋ ॥ ९४ ॥ मृत्यु कवण्या गावा गेला । त्याचा परिवारु काये जाला । हा महिना शून्ये गेला । कोन्हि लोक न मरेच ❋ ॥ ९५ ॥ हा पापीया घरासि आला । तैंचा उदिम गेला । याचा रिघाव जाला । तैचा रुका न पडे द्रिष्टिसि ❋ ॥ ९६ ॥ आधि कैसें बरवें होते । वाळवन मागुते जाले आमेत । आतां कोण्हि न मरे येथें । तये वेळि ❋ ॥ ९७ ॥ ज्याचि मरति त्याचि रडति । घरासि ये संपति । आमचे घरि गुढिया उभविति । ते अत्रवेचि राहिले ❋ ॥ ९८ ॥ वरवि मनकर्णिकेचि थडि । जळत असति फुडि । ते-जोडि । आतां नाही ❋ ॥ ९९ ॥ ऐसी डोंबिन सिविया दे हरिचंद्रासि । कैसा पापिया आलासि । तईचि जोडि नाहि आम्हासि । अरे चांडाळा[१] ॥ १०० ॥ तुझे दोनि भाग सुवर्ण दिधले । ते वृथाचि गेले । तैचे काहि नाहि मिळाले । ऐसा करंटा आलासि ॥ १ ॥ ऐसि दोघे सिविया देत । बोलो नये ते बोलत । ऐसे दुःख भोगित । राजा हरिचंद्र ॥ २ ॥ तव काळ-कौसिकाचा घरि । तारामती दासत्व करी । क्षण विसावा नाहि शरिरी । ध्यान करि हरिचंद्राचे ॥ ३ ॥ अहोरात्रि कष्ट करि । उसंतु नाही क्षणभरी । ऐसि तारामति सुंदरी घरी । त्या काळ-कौशिकाच्या ॥ ४ ॥ जें निजे पलंग सुपति । तिसि अंथरूण नाही क्षिती । पुत्र पुढे असती । ऐसे कष्ट भोगी ❋ ॥ ५ ॥ ऐसे कष्ट करि ब्राह्मणाच्या घरि । ह्रदई ध्यान हरिचंद्राचे करी । कां आम्हास रूसला श्रीहरी । तीघा जनाते ❋ ॥ ६ ॥ आतां कई भेटि होईल हरिचंद्रासि । ऐसे चिंतन करी मानसीं । आता ये जन्मि न देखेन रायासि । आपणाते कोठे विकिले असेल ❋ ॥ ७ ॥ अहो राया हरिचंद्रा । कोणाची सेवा करितसा दातारा । कष्ट होति शरिरा । भुकेले प्राण ❋ ॥ ८ ॥ निद्रा कोठे करित अससी । पांघुरणे नसेल तुम्हापासि । तु सत्वे कोण्हासि । न मागेसि ❋ ॥ ९ ॥ ऐसा धांवा नानापरि करी । म्हणे कां रुसलासि मुरारी । तीघे लागलो दारोदारीं । रे भगवंता ❋ ॥ १० ॥ देवा तु गुणगंभीरा । का रुसलासि दातारा । राखो

---

१ ही व हिच्या मागची धुळे प्रतीत ओवी—

"मसणी राहिला पुण्यपुरुष । म्हणोनि मृत्यु न पावेचि मनुष्य । ना सरी ये डोंबास । ऐसें जाले ॥ डोंब डोंबीण अविशी । रायाते म्हणती पापिया कोठें आलासी । आणी जैपासुन तु आम्हांपासी । तै पासुन रुका न देखु ॥"

गेला देशांतरा । आम्हा सांडोनिया ॥ ११ ॥ अैसे दुःख करूनिया मनि । रावो गेलासे कोण देश टाकुनि । आहो देवा चक्रपाणि । अैसे काये जाले ॥ १२ ॥ राजा हरिचंद्रकुमरु । सुखासनि बैसे निरंतरु । सवे अमित्य दळभारु । चालत त्यासि ॥ १३ ॥ ये जन्मि नव्हे भेटि । अैसि सनासि कारि गोष्टी । हाहाकारु तये सृष्टी । आम्हासि केला सदाशिवें ॥ १४ ॥ मग ते तारामति सुंदरि । काळकौशिकाचे घरी । पाच शत ब्राह्मणभोजन करी । तितुके अन्न तारामति करी । अैसे पूर्वकर्म भोगी ॥ १६ ॥ ( तव कोणे येके दिवसीं । कौसीक म्हणे त्या बडवीयासी । तुम्ही जा रें कमळे आणावयासी । देवार्चनालागी ॥ ) मग बडवे आणि रोहिदास । निघाले सरोवरास । पुष्पे वेचिति सावकाश । नाना जातीची[१] ॥ १७ ॥ रोहिदासे कमळा घातला हातु । तव विश्वामैत्र राखतु । तव ( संचारता ) जाला तक्षकु । तये वेळी ॥ १८ ॥ कमळ धरू लागला देठी । तव फल्हारी दिधली मिठी । ते बडवि देखिले दृष्टि । आपुलिये ॥ १९ ॥ ते वेळि बडवे बोभाइले । म्हणति किरडु लागले । तवं हातासरिसे आले । बोलकंवत ॥ २० ॥ मग डासि गरळ रिचवउनि । उलथले येरेवाणी । ते वेळि झाडिला तोडोनि । रोहिदासें ॥ २० ॥ तव तो ( निघोनि ) गेला विळी । येरासि आलि कळवळि । पडला सरोवराचे पाळि । विषे व्यापीला ॥ २२ ॥ ते वेळि बडवे बोभाति । म्हणति गेला रे आमचा सांगाती । आता त्याचियें मातेप्रति । काये सांगो ॥ २३ ॥ मग तयाते म्हणे रोहिदासु । तुम्हि न करावा आक्रोसु । माझिया आयुष्याचा दिवसु । पुरला आजि ॥ २४ ॥ आतां तुम्हि इतुके करा । रडत नव जावे घरा । माता होईल थोरा । दुःखा वरपडि ॥ २५ ॥ मज अवस्ता जालि अैसि । म्हणोनि न सांगावें मातेसि । ते बाढित असेल ब्राम्हणासि । ठाया वारे ॥ २६ ॥ माते जालि रेसि परि । म्हणोनि तुम्हि न सांगा घरि । माता आपला करि । प्राणत्यागु ॥ २७ ॥ तिसि मी( च ) येकु जाण । ते आईकोन सांडिल प्राण । जिव मजवरि ठेउन । राहिली होता ॥ २८ ॥ अैसे बोलत बोलत । तोंडा खरिसि आलि बहुत । प्राण गोलिया अवचित । निघोनिया ॥ २९ ॥ मग बडवे निघाले शंखध्वनि करित । उर कपाळ पीटित । बहुत वेगे धांवत । सांगो

---

१ या ओवी ऐवजी धुळे प्रतीत अनेक ओव्या आहेत.

आले मातेसि ॥ ३० ॥ तवं तेथें तारामतीसी । तिडिक निघालि डावे कुसि । म्हणे वेळु कां लागला पुत्रासी । मानसी खेद पावे ॥ ३१ ॥ मज आजि दुःख वाटे भारी । म्हणोन निघाली बाहेरी। तव डोळियासि आलि गीरिरि । चाचरोन पडिलि ॥ ३२ ॥ मग म्हणे काये चिन्ह उदेले । कांहिं पुत्रासि असेल जाले । तव बडुवियाते देखिले । करित कोल्हाळ ॥ ३३ ॥ त्यांत न देखे रोहिदासाते । मग जिव्हारि खोचलि तेथें । तव ते म्हणति तुझिया पुत्राते । सर्पे डंखिले ॥ ३४ ॥ अैसे उत्तर पडिले कानि । तव ते धडकर पडिली उतानि । मग म्हणे काय वा घेउनी । आलेती वार्ता ॥ ३५ ॥ केवि विसंवलेति रोहिदासा । अभिप्रावो घडला कैसा । कां माझा कुवासा । मोडिला देवें ॥ ३६ ॥ माझिया जिवित्वाचा आधारु । मज दुर्बळाचा तारु । तयाचेनि हा पुरु । उतरले मी ॥ ३७ ॥ तो कां आलेत सांडोनि । म्या स्नानासि आणिले पाणि । भुकेला ( असेल ) म्हणोनि। ताट केले ( सिद्ध ) ॥ ३८ ॥ म्हणे याचे काम करिता । सि.......... * मुचि माता । त्याचेनसि सर्वथा । सिनु नेणें * ॥३९॥ आता माझा सांभाळ करिल कवणु । माझा कवण हारिल सिणु । मज उवगला गेला सोडोनु । आतां ( बुझाउनि ) आणा रे ॥ ४० ॥ राहोने ग्रासिलि चंद्रकला । तैसे जाले मुखकमला । पडले वरपडे महाज्वाला । तये वेळि ॥ ४१ ॥ वातघाते कर्दलि जैसि । उन्मळुनि पडलि धरणिसि । म्हणे कटकटा रुपिकेसि । काय केले ॥ ४२ ॥ अैसि दुःखसागरि पडिली । तव विचारे उडि घातलि । तेणें मागुति काढिली। हाति धरुनिंया * ॥ ४३ ॥ मग सावरोनि आपणयाते । नेत्र पुसिले हाते । म्हणे आम्हा पापीयाते । कैंचा पुत्रु ( जिरेल ) ॥ ४४ ॥ म्हणे हे काय नवल जाले । आम्हि पूर्वी कोण्हासि वोरवटे केले । तयाचे फळ घडले । हाताचवरि ॥ ४५ ॥ म्हणोनि सत्वे सावरि प्राण । भुकेल होतील ब्राम्हण । तयासी घालुन भोजन । जावो तेथे शुद्धि करु ॥४६॥ मज रडता देखाति । आणि ते ठायावरुनि उठति । तरि मी जाईन अधोगाति । तेणे पापे ॥ ४७ ॥ अैसा विचारु करि ते अवस्वरि । कोण कर्म गा मुरारि । माहादेवा त्रिपुरारि । पावावें * ॥ ४८ ॥ मग म्हणे ब्राम्हणाचे भोजन जालिया । पडेन अवघियाच्या पायां । मग आपुलिया पुत्रराया । गिवसु जाईन ॥ ४९ ॥ अैसा धीर करुनिया चित्ता । येकिकडे ठेविले अवस्था । मग ब्राह्मणा समस्ता । वाढिले त्या ॥ ५० ॥ पांच शत ब्राह्मण । जेविले चतुरानन । समस्त कौशिकु प्रतिदिनिं अन्न । घालि तयासि ॥ ५१ ॥ तयाचि अवघि सेवा केलि ।

तव दुःखे वरलावो लागली । मग कौशिके देखिली । कोमायेलि ते ॥ ५२ ॥ मग तो म्हणे आवुलिये अस्तोते । तुं संवोखि समस्ता वायकाते । ईच्या अंगावरि काम पडते । म्हणोनि रडते हे ॥ ५३ ॥ येकलि श्रमतसे थोर । क्षीण जाले ईचे शरीर । आजि खोचले जिव्हार । दिसताहे ॥ ५४ ॥ तरि काय श्रम जाला तुज । ते सांग वो (बाई) मज । बहु कष्टलिसि तरि निज । नावेक विश्रांति करि ॥ ५५ ॥ तव तारामति म्हणे तयासी । तुम्ही जनकु जननि आम्हासि । मीं तुमचिया स्नेहासी । उत्तीर्ण नोहे ॥ ५६ ॥ तरि मी येणेचि जालि व्याकुल । सर्पे डंखिले माझें बाळ । ते बडवीं देखिले सकळ । तेहि सांगितलें मज ॥ ५७ ॥ तव कौशिके बडवीयाते पुसिलें । म्हणे कटकटा काये जाले । येरे म्हणती आम्ही पाहिलें । तेचि सांगितलें ईयेपासि ॥ ५८ ॥ सर्प लागला इचिया बाळा । तो आम्ही देखिला डोळा । तवे कौशिकु म्हणे जाळनीला । असे काय जाले ॥ ५९ ॥ वापुडीचा बाळ येकुलता । त्यावरि प्राण ठेविला होता । हे दुःखी जाली आतां । तया पुत्राविण ॥ ६० ॥ आतां तरि असे संध्यारात्रि । तुं येवढिये वेळे होतेस निवांती । येरी म्हणे ब्राह्मण भुकेले जाती । म्हणोनि न संगेचि मी ॥ ६१ ॥ तये वेळे कौशिकु म्हणे । हे श्रेष्ट ईचे करणे । आतां तरि रात्रि जाणे । न घडे तेथें ॥ ६२ ॥ श्रेधवांचि धर धीरू । उगरूं दे दिनकरू । मग पुढे विचारू । भलता करू ॥ ६३ ॥ आतां करू नको खंती । तु तरि असंसि बुद्धिवंती । भोगावि आपलि दैवप्राप्ती । ते तव न चुके ॥ ६४ ॥ असे सांगोन तयेसि । मग निद्रा आली कौशिकासी । येरी दुःखी होतसे मानसी । पोटि उबाळा उठिला ॥ ६५ ॥ ते वेळि ते ते तारामती । बडवयांते पुसे मागुति । वा रे रोहिदास सुतु तुम्हाप्रति । काये वोलिला ॥ ६६ ॥ तव ते बडवे म्हणती माते । तु काय पुससि आमेते । आतां सांगता मागुतें । हृदय फुटतसे ॥ ६७ ॥ म्हणे माता (पुसो) लागे तुम्हासी । शोक करू नेदावा तीसि । हा प्रळयेकाळु कोण्हासि । चुकला नाही ॥ ६८ ॥ तिचिया अन्न पानाचे रिण । मी नोहेचि उत्तीर्ण । असे बोलता प्राण । सांडिला तेणे ॥ ६९ ॥ मग आम्ही निघोन आलो तये वेळि । तो पडला सरोवराचे पाळि । आतां नेणवे इतुकें वेळि । काये जाले असेल ॥ ७० मग (ते) तारामति । निघालि मध्ये रात्रि । अरे पुत्रा म्हणोनि आळविती । थोर शब्दें ॥ ७१ ॥ तेणें नादे पडिसाद

उठिति । आपण धांवें केउति । पुत्रा सादु दे गा मजप्रति । तान्हुलया ॥ ७२ ॥ लटिकाचि विश्वामैत्रु स्वादु देतु । तेणेचि मार्गे धांवतु । (म्हणे) का रे वा नयेस येथु । पुत्रराया ॥ ७३ ॥ वा रे कोठें भेटसि माते । मी बुझावया येतुसे तुते । पुत्रा म्हणोनि आळविते । तेथे गिरिकंदरामाजि ॥ ७४ ॥ झाडासि अडखळत । धडधडा पडत । मूर्छना ( असे ) येत । पुत्ररायेशोकें ॥ ७५ ॥ खुंट कपाळि लागत । तेणे रगत निघत । ते दुःख न मानित । (पुढें) जातसे ॥ ७६ ॥ धांवतसे चौमेरी । त्या वनांतरभीतरी । व्याघ्र स्वापदे थोरी । गर्जना करिती ॥ ७७ ॥ भूमिवरी पडे नेटे । तेणे झोकें सिर फुटे । कपाळ धोंडिसि आपटे । वस्त्रें चिंधिया होये ॥ ७८ ॥ तंव विश्वामित्रु म्हणे आतां । उचित नोहे पाहता । प्राण जाईल अवचिता । मग काय कीजे ॥ ७९ ॥ म्हणोनि शव होते सरोवरि । आणिले ते अवम्वरि । मग अंधकाराभीतरी । ठेविले ते पुढे ॥ ८० ॥ ते वेळि पाई चालता आदळे । तव पुढे बाळ ठेविले । हाते स्पर्शोनिया वोळखिले । रोहिदासाते ॥ ८१ ॥ मग मेळविले लल्हाटि लल्हाटा । म्हणे विधातया कटकटा । वा रे न पुसता वैकुंठा । रोहिदासा गे(ला)सि ॥ ८२ ॥ मज कां सांडिले येथ येकलि राये । आतां काय करू गे माये । काय केले कैलास-राये । मज उपेक्षिले ॥ ८३ ॥ सूर्यवौंशिचिया दिनकरा । (आणि) माझेया माहेरा । मज लोटोन मायापुरा[1] । गेलासि पुत्रा ॥८४॥ तुझेनि पावेन पैलपारु । ऐसा हव्यास धरिला होता थोरू । तरि का रे नाभिकारु । नेदिसि मज ॥ ८५ ॥ म्या नवमास वाहिला कुसि । थोर सायासि । पुढें आस पुरविसि । म्हणोनिया ॥ ८६ ॥ ये रे तु माझा कल्पतरू । प्रतिपाळिता कुटुंबभारू । आतां माझा मोडला आधारू । सूर्यवौंशिचा ॥ ८७ ॥ मग लल्हाट मर्दुन वाट पाहे । दुःखें मोकलि धाये । म्हणे या पुत्रासहित जाये । कैला-सासि ॥ ८८ ॥ नेणे कवण देशु वासु । मज कोपला महेशु । म्हणे कृपाळु रुषिकेशु । ते लटिके जाले ॥ ८९ ॥ मग पोटाळुन गळा । भूमिसि घेतले कपाळा । ते वेळि जवळ आला । विश्वामैत्र (तो) ॥ ९० ॥ मग म्हणे तु कवणाचि गे सुंदरी । का रडतिस वनांतरि । म्या आइकिले थोरी । रोजना करित ॥९१॥ तव येरू म्हणे पुत्र सर्पे डंखिला । तो आतां म्या देखिला । ते

1 माहापुरामाजि—पाठ.

बोळि काय बोलिला । तो विश्वामैत्रु ॥ ९२ ॥ म्हणे येथवा आहे संध्यारात्रि । दिवस उगवलिया जाळो देति । डोंब द्रव्यें मागति । ते कैचें देसि ॥ ९३ ॥ ऐसे म्हणोनि घेउनि आला मनकर्णिकेसि । आपणच गेला काष्टासि । लाहानेसाहाने वेचुनि गासि । केलि तेथें ॥ ९४ ॥ स्नान करुन ताराति । थडिये आगीठ करिति । ती वे(उनि) (आला भीती) । बैसलि तेथें पैं ॥ ९५ ॥ मग सरण रचिले वेगेसि । अग्नि पेटवीले चौपासि । पुत्र होता तो तियेपासि । घेतला मागोनि ॥९६॥ मग तो घातला सरणावरि । म्हणें रुदन न करि । राखणाइत देखेल जरि । तरि तो जळो नेदि ॥ ९७ ॥ ऐसे म्हणोनि आपण गेला । अदृष्ट होउन राहिला । तवं तारामतिनें केला । कोलाहल ॥ ९८ ॥ तो बोभाट हरिचंद्रें आइकिला । आणि स्मशानि जाळु देखिला । ते वेळि तो धावला । बहु तवकें ॥ ९९ ॥ तव तारामतिये देखिला येतु । थोर आवेशें धावतु । म्हणे हाचि स्मशान राखतु । तोचि होईल ॥ १०० ॥ ते वेळि येतु तयेपासि । येके हाति वरिले केसि । म्हणें तु न पुसत आम्हासि । म्हणोनि चापट हाणितलि ॥ १ ॥ मग प्रेताजवळि आला । पाहा हो केव्हडा अन्याये केला । म्हणोनि तये वेळा । सरण विसकटिलें ॥ २ ॥ काष्टे टाकिली चहुकडे । पाइ धरुनि वोढियेलं मढे । आणवून तारामतिये पुढें । टाकियेलें ॥ ३ ॥ केस हुरपळले । पोळोनिया फोड आले । ते पोटासि धरिलें । तारामतीनें ॥ ४ ॥ मग पुढें घेऊन बाळकातें । तारामाति बैसली तेथें । करुें गवसिले आमते । भलतयापरि ॥ ५ ॥ बा रे कैसे जाले विचित्रपण । कैसे जाले पुत्राचि मरण । काय पाहतोसि नारायण । अनाथनाथ *॥ ६ ॥ सर्पे खादला[१] अवगति । वरि चांडाळु शिवला अंति । न मिळे मातिस माती । पुत्रा तुझि ॥ ७ ॥ मग न धरे दुःखाचि उकळी । वेळोवेळा लागे पोटाळि । ल्लहाट करस्थळी । पीटितसे ॥ ८ ॥ म्हणे हरिचंद्राचिया कुमरा । पुत्रा तुं गुणगंभीरा । सूर्यवंशी आंधारा । पाडिला तुवां ॥ ९ ॥ उत्तर पडिले रायाच्या कानि । मग मागुता आला धावोनि । म्हणे हे कैची कवणी । विचारि जावो ॥ १० ॥ तो तारामतीये येता देखिला । म्हणे हा का मागुता फिरोनु आला । या प्रेताते हिरोनु नेईल (बाळा । म्हणोनि धाकतु मनामाजि ॥ १० ॥ मग म्हणें तुं कवण कवणाची नारी । रडतेसी या स्मशानाभीतरी । येरि म्हणे उभराभरि । तुज कायेचि ॥ १२ ॥ तो सत्वाचा महामेरु । आणि मदनमूर्तिचा अवतारु । तुम्हि म्हणविता हरिहरु । दक्रे (?) विघ-

---

[१] म्हणें सर्पद्रष्टासि नाही गती—पाठ.

इल * ॥ १३ ॥ असावे आपुले सोसि । गोष्टी करु नये आणिखा अस्त्रियासि । तु ईतुकी पुसापुसी । आम्हा परदेशियातें ॥ १४ ॥ तवं येरू म्हणे आणि वो बाळक । पाहे तव हुरपळले अग्धे केस । तव हरिचंद्रे दुःख । जिवासि केले * ॥ १५ ॥ तु करितेसि शोकु । तरि हा कवणाचें कुळिचा दीपकु । याचा पिता तो कवणु ( नृप्र ) । सांग मज ॥ १६ ॥ म्हणसि अंत्येजाचा विटाळु जाला । वरि सर्प डंखिला । तरि काये समाचार जाला । तो सांग ॥ १७ ॥ तरि तु कवणाचि कुळवंति । कवण तुझि जाति । येरि म्हणे मी राणी तारामती । हरिचंद्राची ॥ १८ ॥ इतुके आयकोनि । हरिचंद्र खोचला मनि । असे दुःख शूळपाणि । काये जाले * ॥ १९ ॥ पुत्र होता तो कमळासि गेला । तो सर्पे डंखिला । म्या रात्रि जाळु आदरिला । द्रव्य मागति म्हणोनि ॥ २० ॥ ईतुके आइकोनि । हरिचंद्र विचारि मनि । काय केले सारंगपाणी । बापा कर्मा बळिवंता भोग न चुकें ॥ २१ ॥ जैसा पर्वत वज्राघाते हाणितिला । जैसा वृक्ष उन्मळला । तैसा रावो पडिला । भूमिवरी ॥२२॥ म्हणे महेशा काये केले । म्हणोनि भूमिसि कपाळ घेतले । ते वेळि तारामतिनें पुसिले । तु कवण म्हणोनियां ॥ २३ ॥ तो म्हणें मी हरिचंद्र चक्रवर्ति । ते वेळि बोलिली तारामती । तयाची सरि न पावती । स्वर्गी इंद्रादिक ॥ २४ ॥ तो सत्वाचा महामेरु । आणि मदनमूर्तिचा अवतारु । तुम्हि म्हणविता हरिचंद्रु । ( हे ) केवि घडेल ॥ २५ ॥ तव राव म्हणे तुज नसे विश्वासु । तुवा घेतला त्रासु । ( मी ) डोंबाचा दासु । म्हणोनियां ॥ २६ ॥ तुम्हाते विकिले ब्राह्मणाच्या घरी । आणि मी डोंबाची सेवा करी । आजि दिवसवरी । अन्न नेतले नाहीं ॥ २७ ॥ ते वेळि पोटाळुन येकमेकाचा गळा । दोघी घेतले कपाळा । दुःखाच्या महाज्वाला । वरि पडिले ॥ २८॥ मग पुढे घेऊन रोहिदासाते दोघे बैसलि तेथें । असति रुदन करिते । ( अनेकापरि ) ॥ २९ ॥ हरिचंद्रे म्हणे रोहिदासा । अर्धे हुरपळे केशा । आंगी असे मासा । उठिले फोड ॥ ३० ॥ मग म्हणें अरे पुत्रा शिरोमणी । तुज आपदा जाल्या कवणी । पापीयाने सरणावरुनी । वोहोडोन काडिलासि ॥ ३१ ॥ तुजसारिखे निधान । मी भोगो कैसा लाहेन । थोर मन भ्रमित त्रिगुण । विगुंतले होते ॥ ३२ ॥ तु आम्हासि प्रतिपाळिता । म्हणोनि दोघे ( रुदन ) करित असता । आतां असो बहु सांगता । असमविश ( ? ) ॥ ३३ ॥ मग हरिचंद्र म्हणे तारामतीतें । तुवां बैसले असावे येथें । मी पुसोन येईन डोंबाते । आपुलिया स्वामिस ॥ ३४ ॥ आतां मावळला दिनकरु । पडिल

सूर्येवौंशि अंधकारु । गेला तुजसारिखा कुमरु । गेहिदासु ॥ ३५[1]॥ त्या डोंवासि अवधि सांगेन वेवस्ता । अज्ञि घेउन येईन मागुता । तव तुवा असावे येथें ( आतां ) । आणि ( म्हणोनि ) निघाला ॥ ३६ ॥ तव विश्वामैत्रु म्हणे तारामतीसी । तु येथे वैसोन काय कारिसि । तुज देवता ग्रासि । ये स्मशानी ॥ ३७ ॥ येव्हडी रात्री अंधारी । रोदन करिसि या स्मशानाभीतरि । येथें यक्षिणी असे खेचरी । ते तुज सळिल ॥ ३८ ॥ आणिक भालवा सुकति ( वहुते ) । झोंव-तील तुझ्या बाळकातें । हरिचंद्रासि[2] येथे । येणें नाहि ॥ ४० ॥ आतां मी सांगेन ते करी । चाल पैल देउळाभीतरी । तुझा पुरुष ये तोवरि । असावे तेथें ॥ ४१ ॥ म्हणोनि ऋपिनाथु । तीते घेउनि आला देवळांतु । आईका तेथील वृत्तांतु । काय केलें तेथें ॥ ४२ ॥ मग तारामतिसि रचिलि निद्रा । ते घोरे लागली घर-घरा । ते वेळि फाडिले उदरा । तया बाळकाचे ॥ ४३ ॥ मग झडकरी काढिले । आतडि तिचे मुखी घातले । हात अशुद्धें तोंड माखिले । तारामतीचें ॥ ४४ ॥ हात पाय टाकिले चहुंमेरी । मास विदारिले भीतरी । मग उभा ठाकोनिया द्वारी । बोभाइला ॥ ४५ ॥ म्हणे धावां धावां । माणुस खादले लावा । म्हणोनि असकिया गांवा । आयेकिले ॥ ४६ ॥ तव भडकलेसि कोतवाल[3] होते । ते धांविनले तेथें । म्हणे खाईल गा तुमतें । राक्षेसि हे ॥ ४७ ॥ येथवरि आली धांवती । मग मी धांविनलो तुम्हाप्रति । तुमतें देखोन मागुति । भीतरि गेली ॥ ४८ ॥ या देउळाभीतरी । तुम्ही निघा झडकरी । मागुति निघाली बाहेरी । तरि आवरेना ॥ ४९ ॥ तुम्हि देवस्थाना चला त्वरित । येरवि ते अदृष्ट होईल निमिषांत । तुम्ही होतेत म्हणुन मृत्यु । चुकला माझा ॥ ५० ॥ त वेळि ते निघाले भीतरी । काहाडोन हातियेरी । तंव मास चहुमेरी । विदारले असे ॥ ५१ ॥ बाळ पडले असे तेथे । तीचें मुखि देखिले आंत्रे । मग केसि धरुनि तीते । आणिली बाहेरी ॥ ५२ ॥ मग उभी करुनि शिवदारि । तेथ मारित साटावरि । घाये लागती शरिरि । तारामतीचे ॥ ५३ ॥ मग बांधली मागुला हातीं । वटवाघुळी वोळकंवविति । घेउनि निघाले नगराप्रति । राजद्वारा ॥ ५४ ॥

---

१. ही ओवी मागे ३२ नंतर पाहिजे.

२. हरीश्चंद्र तेथें । येउनी काय करील - पाठ.

३. तराळ—पाठ.

डेल * ॥ १३ ॥ असावे अपुले सोसि । गोष्टी करु नये आणिखा अस्त्रियासि । तु इतुकी पुसापुसी । आम्हा परदेशियातें ॥ १४ ॥ तवं येरू म्हणे आणि वो बाळक । पाहे तव हुरपळले अर्धे केस । तव हरिचंद्रे दुःख । जिवासि केले * ॥ १५ ॥ तु करितेसि शोकु । तरि हा कवणाचे कुळिचा दीपकु । याचा पिता तो कवणु ( नृप्र ) । साग मज ॥ १६ ॥ म्हणसि अंत्येजाचा विटाळु जाला । वरि सर्पे डंखिला । तरि काये समाचार जाला । तो सांग ॥ १७ ॥ तरि तु कवणाचि कुळवंति । कवण तुझि जाति । येरि म्हणे मी राणी तारामती । हरिचंद्राची ॥ १८ ॥ इतुके आयकोनि । हरिचंद्र खोचला मनि । अैसे दुःख शूळपाणि । काये जाले * ॥ १९ ॥ पुत्र होता तो कमळासि गेला । तो सर्पे डंखिला । म्या रात्रि जाळु आदरिला । द्रव्य मागति म्हणोनि ॥ २० ॥ इतुके आइकोनि । हरिचंद्र विचारि मनि । काय केले सारंगपाणी । बापा कर्मा बळिवंता भोग न चुकें ॥ २१ ॥ जैसा पर्वत वज्राघाते हाणितिला । जैसा वृक्ष उन्मळला । तैसा राव पडिला । भूमिवरी ॥२२॥ म्हणे महेशा काये केले । म्हणोनि भूमिसि कपाळ घेतले । ते वेळि तारामतिनें पुसिले । तु कवण म्हणोनियां ॥ २३ ॥ तो म्हणे मी हरिचंद्र चक्रवर्ति । ते वेळि बोलिली तारामती । तयाची सरि न पावती । स्वर्गी इंद्रादिक ॥ २४ ॥ तो सत्वाचा महामेरु । आणि मदनमूर्तिचा अवतारु । तुम्हि म्हणविता हरिचंद्रु । ( हे ) केवि घडेल ॥ २५ ॥ तव राव म्हणे तुज नसे विश्वासु । तुवा घेतला त्रासु । ( मी ) डोंबाचा दासु । म्हणोनियां ॥ २६ ॥ तुम्हाते विकिले ब्राह्मणाच्या घरी । आणि मी डोंबाची सेवा करी । आजि दिवसवरी । अन्न नेतले नाहीं ॥ २७ ॥ ते वेळि पोटाळुन येकमेकाचा गळा । दोघी घेतले कपाळा । दुःखाच्या महाज्वाला । वरि पडिले ॥ २८॥ मग पुढे घेऊन रोहिदासाते दोघे बैसलि तेथें । असति रुदन करिते । ( अनेकापरि ) ॥ २९ ॥ हरिचंद्रे म्हणे रोहिदासा । अर्धे हुरपळे केशा । आंगी असे मासा । उठिले फोड ॥ ३० ॥ मग म्हणें अरे पुत्रा शिरोमणी । तुज आपदा जाल्या कवणी । पापीयाने सरणावरुनी । वोहोडोन काडिलासि ॥ ३१ ॥ तुजसारिखे निधान । मी भोगो कैसा लाहेन । थोर मन भ्रमित त्रिगुण । विगुंतले होते ॥ ३२ ॥ तु आम्हासि प्रतिपाळिता । म्हणोनि दोघे ( रुदन ) करित असता । आतां असो बहु सांगता । असमविश ( ? ) ॥ ३३ ॥ मग हरिचंद्र म्हणे तारामतीतें । तुवां बैसले असावे येथें । मी पुसोन येईन डोंबाते । आपुलिया स्वामिस ॥ ३४ ॥ आतां मावळला दिनकरु । पडिला

सूर्यवौंशि अंधकारु । गेला तुजसारिखा कुमरु । गेहिदासु ॥ ३५[1]॥ त्या डोंबासि अवघि सांगेन वेवस्ता । अझि घेउन येईन मागुता । तव तुवा असावे येथें ( आतां ) । आणि ( म्हणोनि ) निघाला ॥ ३६ ॥ तव विश्वामैत्रु म्हणे तारामतीसी । तु येथे वैसोन काय कारिसि । तुज देवता ग्रासि । ये स्मशानी ॥ ३७ ॥ येव्हडी रात्री अंधारी । रोदन करिसि या स्मशानाभीतरि । येथें यक्षिणी असे खेचरी । ते तुज सळिल ॥ ३८ ॥ आणिक भालवा भुंकति ( बहुते ) । झांघ-तील तुझ्या बाळकातें । हरिचंद्रासि[2] येथे । येणें नाहिं ॥ ४० ॥ आतां मी सांगेन ते करी । चाल पैल देउळाभीतरी । तुझा पुरुष ये तोवरि । असावे तेथें ॥ ४१ ॥ म्हणोनि ऋपिनाथु । तीते घेउनि आला देवळांतु । आइका तेथील वृत्तांतु । काय केलें तेथें ॥ ४२ ॥ मग तारामतिसि राचिलि निद्रा । ते घोरो लागली घर-घरा । ते वेळि फाडिले उदरा । तया बाळकाचे ॥ ४३ ॥ मग झडकरी काढिले । आतडि तिचे मुखी घातले । हात अशुद्धें तोंड माखिले । तारामतीचें ॥ ४४ ॥ हात पाय टाकिले चहुंमेरी । मास विदारिले भीतरी । मग उभा ठाकोनिया द्वारी । बोभाइला ॥ ४५ ॥ म्हणे धावां धावां । माणुस खादले लावा । म्हणोनि असकिया गांवा । आयेकिले ॥ ४६ ॥ तव भडकलेसि कोतवाल[3] होते । ते धांविनले तेथें । म्हणे खाईल गा तुमतें । राक्षेसि हे ॥ ४७ ॥ येथवरि आली धांवती । मग मी धांविनलो तुम्हाप्रति । तुमतें देखोन मागुति । भीतरि गेली ॥ ४८ ॥ या देउळाभीतरी । तुम्ही निघा झडकरी । मागुति निघाली बाहेरी । तरि आवरेना ॥ ४९ ॥ तुम्हि देवस्थाना चला त्वरित । येरवि ते अदृष्ट होईल निमिषांत । तुम्ही होतेत म्हणुन मृत्यु । चुकला माझा ॥ ५० ॥ त वेळि ते निघाले भीतरी । काहाडोन हातियेरी । तंव मास चहुमेरी । विदारले असे ॥ ५१ ॥ बाळ पडले असे तेथे । तीचें मुखि देखिले आंत्रे । मग केसि धरुनि तीते । आणिली बाहेरी ॥ ५२ ॥ मग उभी करुनि शिवदारि । तेथ मारित साटावरि । घाये लागती शरिरि । तारामतीचे ॥ ५३ ॥ मग बांधली मागुला हातीं । वटवाघुळी बोळकंवविति । घेउनि निघाले नगराप्रति । राजद्वारा ॥ ५४ ॥

---

१. ही ओवी मांग ३२ नंतर पाहिजे.

२. हरीश्चंद्र तेथें । येउनी काय करील . पाठ.

३. तराळ—पाठ.

पाट बांधला नेत्री । म्हणे माणुस छळिल मागुती । तव लोक उठिले रात्री । गजबजोन ॥ ५५ ॥ तवं तेथें म्हणति तराळ । हे वोळखा कवणाचे बाळ । लाव खात होती तये वेळा । वैसोनि देउळा ॥ ५६ ॥ मग सकळ दिवटियासि । जवळी आले तियेयासीं । म्हणती भयानक दिवसी । कैसी चुकली आम्हीं ॥ ५७ ॥ असें नगरीचें लोक बोलत । भवतें मिळाले असंख्यात । येकमेकातें पुसत । हे कवण म्हणोनि ॥ ५८ ॥ येक म्हणती काळकौशिकाचे घरी । जे विकिली होती नारी । ते पाहा गा माहामारी । माणसे भक्षित असे ॥५९॥ इतुकिये दिवस होती मावें । तव गीत्रसिली (?) देवें । म्हणति माणुस माणुस आवघे । खादले लावें तुवा ॥ ६० ॥ मग दोघे ब्राह्मण मेले । तईचे दृष्टि वरपडे जाले । त्या दोघासि काये केले । ते वरेच नोहेचि ॥ ६१ ॥ येक म्हणति ठायावरि ( जेवता )। घास घेता ईज देखता । तधिपासुनि वेथा । बांधिलि मज ॥ ६२ ॥ ऐसी मारावी हे पापीणी । ईसी कोणी केले भानवासिनी । म्हणोनि आणिली बांधोनि । रायापासि ॥ ६३ ॥ राये परिसिला वृत्तांतु । म्हणे हे लाउ होती देउळातु । तव राउ म्हणे घातु । करा ईचा ॥ ६४ ॥ नगरीचि खातुसे माणुसे । ईते राखो नका असे । तुम्हा लागलेसे पिसे । मग आणिली येथें ॥ ६५ ॥ होती बाळकाते खाती । हे वधावया द्यावि डोंबाहाती । मग बोलाउनि आणीती । वीरबाहो( सी ) ॥ ६६ ॥ मग ( ते ) तारामती । दिधली (वीर )बाहोच्या हाती । म्हणति प्राणमुक्ति । द्यावि ईसी ॥ ६७ ॥ तव त्या वीरबाहो( ने ) दिधली । मसणखांवाजवळी । म्हणे हें तोडावि बाहिलि । कवणा पुसो नको ॥ ६८ ॥[1] मग ते धरुन केसि । आणीली मनकर्णिकेसी । मग काये बोलिला ( तयेसी ) । मसणखांव ॥ ६९ ॥ तये ते म्हणे स्नान करी । हृदई श्रीहरीते धरी । घाव पडे मानेवरी । मग स्मरे विश्वनाथा ॥७०॥ करुनी मनकर्णिकेचे स्नान । तारामतीनें वोडविलि मान । अवघे नगरिचे जन । पाहात असे ॥ ७१ ॥ येरे हात उचलिला खर्गाचा । म्हणे स्मर आपुलिये वौशिचा । जो पाळकु विश्वाचा । तो विसरो नको ॥ ७२ ॥ ते वेळि म्हणतसे तारामती । व्हावा हरिचंद्रासारिखा पती । हेचि असे मागती । जन्मोजन्मी ॥ ७३ ॥ रोहिदासासारखा कुमरु । हरिश्चंद्रासारिखा भ्रतारु । वसिष्ठासारिखा गुरु । व्हावा जन्मोजन्मी ॥ ७४ ॥ आमचीया सुकृता । पवाडला विश्वामैत्रु दाता । तो व्हाया मागता ।

१. या ओवीनंतर धुळे प्रतीत हरिश्चंद्रविलापाच्या ओव्या आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वरूप
क्रमांक ७५८६२ वि: काव्य
(५१) २०७० नों दि. २२।३।७१

जन्मोजन्मी ॥ ७५ ॥ ईतुके आयोकोनिया वचना । येरे खर्ग उचलिये गगना । घावो घालाया ततक्षणा । पावला विश्वामैत्रु ॥७६॥ (घाव पडत ये अवस्वरी) । तेणें धरिले वरचावरी । म्हणे पुरे गा राया वधु न करी । पावले सत्व ॥७७॥ तेजे भरलिया दाहि दिशा । विश्वामैत्रु प्रगटला कैसा । कोटिगुणे महेशा । भासतुसे ॥ ७८ ॥ मग विमानी वैसोनि समस्त । तेहतीस कोडि देव आले तेथ । पाहावया चरित । हरिचंद्राचें ॥ ७९ ॥ तव नंदिवारि वैसोन । ईश्वर उमेसहित आपण । सवे साटि सहस्र गण । आले तेथें ॥ ८० ॥ आणि लक्ष्मीनारायण । वेगी आले गरुडा (वरि) बैसोन । हरिचंद्रास भेटावयाल.गोन । तयेवेळी ॥ ८१ ॥ तव भवानीसहित । आला देखिला विश्वनाथ । त्यासि कोपतसे[1] विश्वामैत्र । तुम्ही कां आलेती ॥ ८२ ॥ मग त्यासि भिडन तेथ । देव थरथरा कांपत । हरिहर म्हणत । भेटों तुम्हासि आलो ॥ ८३ ॥ मी करु सके कैला-साचा कोडि । वैकुंठे कायेसि बापुडि । तुम्हि आपुलि प्रौढि । दाखउ आलेति ॥ ८४ ॥ तव हरिहर म्हणत (ताता) । तुं आमुचा दाता । आम्ही स्वर्गी असता । तूझे वळे ॥ ८५ ॥ मग हरिचंद्र धरिला हातो-हाती । विश्वामैत्रे सोडविली तारामती । म्हणे माये श्रमलिसि बहुती । माझेन कृत्ये ॥ ८६ ॥ मग कुमरु उभा केला रोहिदासु । आंगी कोटि गुणें प्रकाशु । ते देखोन महेशु । संतोषला ॥ ८७ ॥ म्हणे वास पाहिली केउती । श्रमला वा चक्रवर्ती । विश्वामित्रे प्रेमप्रीती । आलं-गीला ॥ ८८ ॥ मग पाहोनी अमृतदृष्टी । तेणें जाली तुष्टपुष्टी । अवघ्या देवी पुष्पवृष्टी । केली तथावरीं ॥ ८९ ॥ देव आनंदले सृष्टी । मग तीघाते वैसउनि पाटी । सेस भरिला ललहाटी । तये वेळी ॥ ९० ॥ मग हरिहर आपुलिया हाती । तीघा सेश भरिती । लक्ष्मी आणि पार्वती । करिती अक्षवण ॥ ९१ ॥ आशीर्वाद दिधला नारायेणें । विजई जाली तीघेजणे । उभवितु गुढिया तोरणे । काशीखंडी ॥ ९२ ॥ तयाते देखोनि ईश्वरु । मनि हरिखेले थोरु । आनंदे वाजविला डमरु । डवडया ॥ ९३ ॥ तेथे तयाचि स्तुती । शिव केशव करिती । माझी काये मति । वर्णावया ॥ ९४ ॥ मग महेश आणि श्रीपती । दोघे विश्वामित्राते प्रार्थिती । म्हणति परियेसा विनंती । ऋपिराया ॥९५॥ हरिचंद्र द्यावा आम्हासी । आम्ही नेऊ या तीघासी । कैलासासि (आम्हापासि । असेल हा ॥ ९७ ॥ विश्वामैत्रु म्हणे दोघातें । मज अयोध्येसि नेणे त्यातें । लोक निंदिति आमते । तये वाळीये ॥ ९७ ॥ मग

१ मुळांत 'कांपतसे' आहे. संदर्भावरून व पाठांतरावरून 'कोपतसे' पाहिजे असें दिसतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७५५६८

संतोषोनि हरिहर ( म्हणती ) । अगा राया चक्रवर्ती । तुझे चारित्र जे अैकति । ते पावती मुक्तीते ॥ ९९ ॥ तुझे चारित्र अैकती । तयासि आम्ही देऊ मुक्ति । अैसे सत्य जाण निभ्रांती । तये वेळी ॥ १०० ॥ ते वेळि म्हणतसे पार्वती । तारामतीये आरुती । तुझी तीहीं लोकी जाली कीर्ति । आणि पुण्यकीर्ति हरिचंद्र ॥ १०१ ॥ तव लक्ष्मी ( आणि ) सावित्री म्हणे । जरि मृत्यलोकीं जन्मणें । तरि तुजसारिखे होणे । तारामतिये ॥ २ ॥ आम्ही बाहात्तरि कोडि । तपे केली प्रौढी। ते (तुज) घे जोडि । चोळियेसि ॥ ३ ॥ मग शंकर आणि शार्ङगधरु । दोघी बोलाविला हरिचंद्रु । मस्तकी ठेविला अभयकरू । रायाचिये ॥ ४[1]॥ ते वेळे पुत्रकलत्रसहितु । हरिचंद्रे केले दंडवतु । मग विजइ होई म्हणतु । देव निघते जाले * ॥ ५ ॥ तव वीरबाहो आला धांवत। तो मसणखांब माझा दूत । त्यासि कोण गा नेत । मज पुसलियां वाचुनि * ॥ ६ ॥ यासि कवण गा नेइल । माझे दोन-भार स्वर्ण देईल । हा कैसा मजपासुनि जाईल । पाहो आतां * ॥ ७ ॥ अवघ्या लोका देखत । म्या घेतला विकत । तुम्ही धनि होत । न्यावयालागी *॥ ८ ॥ माझे दोन भार सुवर्ण देणें । मग भलतयानें नेणें । तुमचेनि देवपणे । काय बाधो आम्ही * ॥ ९ ॥ यासि न्यावया कवणाचि प्राप्ती । म्हणोनि हरिचंद्र धरिला हाती । ते वेळि वाट पाहिली केउति । विश्वामैत्रे * ॥ १० ॥ पूर्वी मात्रुका ऋषि कोपला । तेणें धर्मासि श्रापु दिधला । डोंब होउनि जन्मला । ये नगरी * ॥ ११ ॥ ते वेळि देवे प्रार्थिले ऋषीते । म्हणती उश्राप करावा याते । तव पालटले तेथे । वीरबाहो डोंब * ॥ १२ ॥ ते रूप पालटोनि उभा ठेला । आपुले निजरूप पावला ।— तो धर्मरावो * ॥ १३ ॥ आंगीचि त्वचा पडलि तैं परती। दिसे झळझळ कांती । उपगला गभस्ती । सहस्रकीर्णी * ॥ १४ ॥ मग तो हात जोडोनि प्रार्थी । म्हणे गा हरिचंद्रा नृपती । तुझिये येणें पावलो मुक्ती । ईतुकिया दिवसा * ॥ १५ ॥ तो चांडाळपणा वेगळा जाला । मग तो आपलिया स्थाना निघोन गेला । मग विश्वामैत्र घेउनि निघाला । हरिचंद्राते ॥ १६ ॥ तव कौशिकु ब्राह्मण आला । तेणें हरिचंद्र नमस्कारिला । म्हणे स्वामी सांगते चला । तुमचे सुवर्ण देवो * ॥ १७ ॥ मग तारामति चरणासी लागली । काळकौशिके नमस्कारिली । माते देवि तुझी स्तुती केली । तुं सत्य पतिव्रता ॥ १८ ॥ तुझा

१ यानंतर धुळे प्रतीत एकच ओवी आहे-- " म्हणती तुवा अयोध्येस्सी जावें । रुषी म्हणेल तें करावें । स्वराज्य भोगावे । नीकीयापरी " ८३३

पुत्र आणि हरिचंद्र चक्रवर्ती । तीवे आतां भेटती । जाइन नगराप्रती । मज सुवर्ण पाठविजे * ॥ १९ ॥ मग वैसला हस्तीगुढारी । पुढें वाजती निशाण भेरी । अैसे क्षणा एका भीतरी । आले अयोध्येसी * ॥ २० ॥ मग हरिचंद्र आला राजा । म्हणोनि सामोरा धाविल्या प्रजा । गुढिया पताका ध्वजा । वोवाळिया नरनारी * ॥ २१ ॥ समस्त नगर सामोरे आलें । त्यासि रायाचे दरुपन जाले । मग भीतरी जाऊन मंगळतुरे । वाजविली * ॥ २२ ॥ तेहीं देखिले हरिचंद्रा । लोकासी परमानंद जाला । वहुत वोलावया बोला । काय काज * ॥ २३ ॥ मग प्रवेशोनी राजमंदिरी । वैसविल्या सिंहासनावरी । अक्षवाणे करिती नारी । नगरिचिया * ॥ २४ ॥ तारामतीसी भेटावया । नारी येती नगरीचिया । अैसे सकळ लोक पाहावया । आनंदे * ॥ २५ ॥ आतां तो असो वहु अपार । न ( भी ? ) वर्तला जयेजयेकार । अवघे लोक हरुषे निर्भर । पैं जाले * ॥ २६ ॥ मग विश्वामैत्रे आपुलेनि हाते । शेष भारिला तया दोघातें । मग म्हणे राज्य सांभाळा । आपुले राया * ॥ २७ ॥ अगा सूर्यवौंशिचिया भूपती । म्या देखिले कोण जाणे किती । परि नाही तुजसारिखा नृपती । त्रिभुवनी * ॥ २८ ॥ आतां अठरा सहस्त्र वरुषे वरी । पुढें राज्य नीके करी । अैसे आशीर्वचन । दिधले रायासी * ॥ २९ ॥ नामा म्हणे विष्णुदास । अैसी कथा सुरस । श्रोती स्मरावे तयास । येकचित्तें * ॥ ३७ ॥ प्रसंग ॥४॥

॥ संपूर्णमस्तु ॥

# विष्णुदास नामाकृत बुधबावणी

## ॥ १ ॥

येका खडीची बुदबावनि ॥

कल्पना वोखटी मोडीजे । कळीवरी उभे न राहीजे । कळावंतासी मानु दीजे । धुरू देखतां ॥ १ ॥ खचरा घोडीयावरी न बैसीजे । खवळा भुजंग न चालवीजे । खवसळी न कीजे ... ...[1] गोत्रजांशीं ॥ २३ ॥ मेलें त्यांचा शोक न कीजे । गंभीरपणें असीजे । गमन-अवेळे न कीजे । जाणत्यानि ॥ २४ ॥ घडीलें कार्य न मोडीजे । घरा श्रम संचक कीजे । घडीभरी न कीजे । पापगोष्टी ॥ २५ ॥ ज्ञाणीयाची सेवा कीजे । ज्ञान विद्या अभ्यासीजें । ... ... । ज्ञाणे तरी (जे).

१ मध्यें भाग गहाळ.

संसार हा ॥ २६ ॥ चतुर्भुज मूर्ती ध्याइजे । चमत्काराची वीद्या अभ्यासीजें । चालतें अन्नछेत्र चालवीजें । ज्ञाणे तरीजे संसार हा ॥२७॥ नव्हे जे गव्हार मूर्ख । छेत्रधर तो बोळगीजे । मंत्रु तो मैत्र न कीजे शक न धरीजे शंकराचा ॥ २८ ॥ जगन्नाथ ध्यायीजें । जन्म वाया जावों न दीजे । जमान न राहीजें । येत्रीसी मानसाभीं ॥ २९ ॥ झगडा भलत्यासी न कीजे । झाड फळाचें न तोडीजे । झडकरी उठीजें। स्वामीशब्दे ॥ ३० ॥ यात्रा हरीहराची कीजे । या कष्ट द्रव्यें मेळवीजें । यातायाती चुकवीजे । श्रीराम म्हणता ॥ ३१ ॥ कटकट वाया न कीजें । टनटनले हळु कीजे । टणनपणें न रीघीजे । माहा- पुरी ॥ ३२ ॥ ठाया ठाय स्वामीयांचा राखीजे । ठेंगु घोडा पारेसी न लावीजे । टनुकुपणे असीजे । मुनुशामाजी ॥ ३३ ॥ डंब धर्म तो न कीजे । डगळपणे अशीजे । डोंगरावरी न जायीजें । येकल्यानी ॥ ३४ ॥ ढळो भाकेंशी न देईजे । ढळले मंदिरी न राहीजे । ढसढळ मन कीजें । भोजन देतां ॥ ३५ ॥ नाना वीद्या अभ्यासीजें । नांव आपुलें जर्गी कीजें । नाणें तें पारखिजे । शुद्ध मुद्रेचें ॥ ३६ ॥ तरीजें दाने तरीजे पुन्ये । तरीजे शुद्ध अंतःकर्णे । ... ... । ... संसार हा ॥ ३७ ॥ घेतलें तरीं वीचारें घेईजें । थारा वोखटा न कीजे । धटकर वोलीजे । धर्म उतर ॥ ३८ ॥ दरूशेनासीं मानु दीजे । दंद लाहानावरी न कीजे । दशेमध्यें बोळगीजे । आपवर्गास ॥ ३९ ॥ धरत्रीं भावें वोळगीजे । धाकु रीणाच्या वाईजें । धरूं न दीजे । शरणागतासी ॥ ४० ॥ नये भक्षु ते न भक्षीजे । नये पाहो ते न पाहिजे । नरनारी ऐकिजे । हे बुधबावणी ॥ ४१ ॥ पापाचे भये धरीजे । पवीत्रपणें असीजे। पंक्तीभेद न कीजे । भोजण देतां ॥ ४२ ॥ फळ ईश्वरीं वाहीजें । फळ पवीत्र पावीजे । फावला उदाम न सोडीजे । सर्व व्यारीं ॥ ४३ ॥ वंध भलतयाचा सोडीजे । बरवे वाचेशीं लक्षण असो दीजे । वडवड न कीजे । जाणत्यापुढें ॥ ४४ ॥ भरवसा देउनी सत्ये कीजे । भक्ती श्रीगुरूची कीजे । भंग होऊं न दीजें । अन्नदाना ॥ ४५॥ मायेवापाचे रीण फेडीजें । कैशानें उतरायीं होयीजें । मातापीत्याची भक्ती कीजे । मग उतीर्ण होईजे संसारा आलीया ॥ ४६ ॥ येक- ल्यानें वेव्हारा न जायीजे । यशाचा वीडा घेईजे । यापरी पावीजे । पवीत्रपणा ॥ ४७ ॥ रंगरचना दुरी कीजे । राईतेल आंबट वांगें न खाईजे । रागें वैरागें नव जाईजे । जाणत्यानि ॥ ४८ ॥ लग्नघडी साधीजें । ळळा वाळकाचा चालवीजें । लांच घेउनी वेव्हार न कीजे। पर धर्माचें उतर ॥ ४९ ॥ वासना वोखटि मोडीजें । वाचा

सत्यग्राही बोलीजे । वर्म न बोलिजें । भांडणामध्यें ॥ ५० ॥ शाहाणा संगती असो दीजे । संसाराची गोडी घेईजे । सरीपाडे पर्णीजे । भार्या कुळवंती ॥ ५१ ॥ खानवळी वीहिरी । खाणवी बरवीयापरी । खरें माप जयाचें घरीं । तो नाडेनात कदां ॥ ५२ ॥ सायास न मोडीजे । साजेल ते लेणें लेयीजे । साजेल बरवे नटिजे । भलेत वस्तुचें ॥ ५३ ॥ हीरोणी भुमीवृती न घेईजें । पापाचें धन न जोडीजे । हाटा न जाईजे । प×कीयावीन ॥ ५४ ॥ अलंकार मीरवें तो लेईजे । अलंकारें मानु दीजे । अळंकारें सनीजे । तया वडीलांसी ॥ ५५ ॥ क्षेचराई न कीजे । क्षांतीवंत होयीजें । क्षुधार्थीयासी त्रुप्ती कीजें । म्हणे नामा विष्णुदास ॥ ५६ ॥ ऐसी हे बुधीबावन । सांगीतली वामदेवें आपण । जो अभ्यासील पणे । तो बरवें पावें ॥ ५७ ॥ म्हणे नामा विष्णुदास । हे बुधबवानी बुधीचा प्रकाश । जो प्राणी करील अभ्यास । तो राज्येमान्यु ॥५८॥ हे पुस्तक वाचावें । याचा धडकुडा श्रोत्याणें जानावें । जे अभ्यासीती ते शीप बरवें । श्रीगुरुरायाचें ॥ ५९ ॥ हें प्रथम वाचिजे । बोत्री मेळउनी शीकिजे । त्यावरूणी जाणीजे । थोराग्रही रीघु होये ॥ ६० ॥ होये बरवी मती । अक्षरें मेळत्रणीची गतीं । आज्ञानास देते मती । सारजा माता ॥ ६१ ॥ नामा विष्णुदास म्हणे। हे प्रथम पाहाणे । त्यावरुणी रीग करणें । थोर ग्रंथी रीगु होय ॥६२॥ परी येकमनोभावें । श्रीहरीतें भजावे । आणि श्रीगुरुतें स्मरावें । वेळोवेळां ॥६३ ॥ आतां श्रीगुरु म्हणे शीपांसी । शीकवीलें धरी पां मानसी । तरी संसारसागर तरसी । नीमीशेमात्रें ॥ ६४ ॥ संसारसागर सांडी। पडीलासी आज्ञा× पणें वांदवडी । अरे श्रीगुरुप्रसादें निखंडी । घेई अमृतधनी नामाची ॥ ६५ ॥ रामनाम तें अमृत । हें मानावें सत्ये । तरी भवसमुद्रांत । तरसी आतां श्रीहरीनामें ॥ ६६ ॥ सांडुनी सकळीक धंदा । येक घेईजे गोवींदा । न करावी नींदा । साधुजनाची ॥ ६७ ॥ आतां मुर्ख शतातुल्या वोविया । श्रीकृष्ण दुर्येधणापांसी जाउनिया । त्यासि वीवेक सांगोनीया । सिकवीलें बरवीयापरी ॥ ६८ ॥ तो नायीके माहामूर्ख । अभीमाने गेला वीन्मुख । त्यासी सीकवी सुलक्ष । वीदुर ज्ञानीयां ॥ ६९ ॥ श्रीकृष्ण गेलीयावरी । वीदुर म्हणे दुर्योधना अवधारी । सीकवीतो बरवीयापरी । ते ऐके बो राया ॥ ७० ॥ अरे समर्थु आपुलें पाइ येइजे । आणी त्याचे शिकवीलें नायीकीजें । हे येक जानीजे । मुर्खपण ॥ ७१ ॥ समर्थे जयाचा पाठीराखा । त्यासी वैर करीतां देखा । हेंची ऐक ... ।

येक मुर्खपण ॥ ७२ ॥ आपुलें न वीचारी बळ । समर्थासीं मांडी सळ । त्यासी म्हणती मूर्ख केवळ । बाळ आदी करूणी ॥७३॥ प्रथमु राजीं बैसला । आणी समस्त परीवार दुःखी जाला । कीं प्रधान वैरी केला । तोही मूर्ख ॥ ७४ ॥ आणी प्रधानपण असों आंगीं । जो रायासी जाय सलगी । हरयेक काम करील ग × वंगी । तोही मुर्ख ॥ ७५ ॥ आपण स्वयें भ्रष्ट । करी वीप्रकुळाच्या चेष्टा । तो सकळा-मांजी नष्ट । माहामूर्ख ॥ ७६ ॥ पुढीलांचे शेती गुरे नीघाली । ती ज्यानें रे हाकीली । त्याच्या आयुशा हाणी जाली । तोही बोलीजे मूर्ख ॥ ७७ ॥ आपुलें कार्य जंवं होये । तंवरी तो उगाची राहे । चुकुर नानापरी होये । तोही मूर्ख ॥ ७८ ॥ आपणची वार्ता सांगे । आपणची हांसों लागें । धुरू तें बळें मांगें । तोही मूर्ख ॥ ७९ ॥ हें बुधी-वावनी । गुरुपुत्रें अभ्यासुनी । शुद्ध मऱ्हाटी म्हणउणी । तरी पावीजे ईंद्रपदा ॥ ८० ॥ म्हणे नामा वीष्णुदासु । हे बुधवावणीचा प्रकाशु । म्हणे नामा वीष्णुदासु । समाप्त जाली ॥ ८१ ॥

## (२)

श्रीगणेशाये नमा ।

वोवीये शंभु गायीजे । वोखटें मनी न धरीजे । वोळखी न पडों दीजें । तस्करांसी ॥ १ ॥ नमन कीजे गोवींदा । न लागीजे सक-वादा । न कीजे नींदा । साधुजनाची ॥ २ ॥ मनी दृढ होयीजे । माहावीघ्न चुकवीजे । मती तर्कु घेईजे । पुढीलांचा ॥ ३ ॥ सीव सीव म्हणीजे । शीघ्र वीद्या सा × सांघीजे । सीकवीलें अैकीजे । वडीलांचे ॥ ४ ॥ धर्म धरीजें । धनुर्विद्या अभ्यासीजें । धुमाळी न खेळीजे । राणवशी ॥ ५ ॥ अवगुण सांडीजे । अपशब्द न बोलीजे । अनुवृत्त न कीजे । विष्णुकांजी ॥ ६ ॥ आदीनाथी भजीजे । आपपर वोळखीजे । आशाभंग न कीजे । याचकाची ॥ ७ ॥ ईश्वरीं भजन कीजे । ईंद्रीयें फांको न दीजे । इछा आपुलीया राहीजे । स्वकुळेंसीं ॥ ८ ॥ इछा कळीते न खेळीजे । इसाळी भलतैसे न खेळीजे । ईतरायीने न बोलीजे । कोन्हासी काही ॥ ९ ॥ उणा मैत्र वर्जीजे । उशीरें मार्गु न चालीजे । उणेंपुरें न बोलीजे । कोन्हांचें कांही ॥ १० ॥ उपीत न पीजे । उधार मैत्रासी न दीजें । उपकारू कीजे । अनाथांसी ॥ ११ ॥ रीणा वृध तोडीजें । रीझावें तो काळ जानीजे । रीपनीध वोळखीजे । वीचाराची ॥ १२ ॥ रीणे समर्थाचें न घेईजें । रीपुसी

न वीसंबीजे । रीताहाती न भेटीजें । गुरुदेवासी ॥ १४॥ लीखीत पैशु-न्याचे न लीहीजे । लीहीले कपाळींचे भोगीजें । लीन होउनी असीजें । लोकांमध्यें ॥ १५ ॥ लीहु चांगलें जाणीजे । लीखीत वेगें वाचीजे । लीप वोळखीजे । भलतैसी ॥ १६ ॥ येथीचें तेथें न लवीजे । येंणे शरीरें उपकारू कीजे । येकवीस उद्धरीजे । सत्य वदोनीयां ॥ १७ ॥ येक भाव धरीजें । येके परत्र जोडीजे । अैस्यापरी तरीजे । संसार हा ॥ १८ ॥ वोस नगरी न वसीजें । वोखटें वचन न बोलीजे । वोळें पुरें जाणीजें । भलेतेथें ॥ १९ ॥ अैस्यानें बरवें रक्षीजे । आयुश असेल तो पाहीजे । आयुश असता शरण जाईजें । सद्गुरुशी ॥ २० ॥ अंग वोखटें सांडीजें । अंध वाटे लावीजें । अन्नदाण कीजे । वीतासारीखें ॥ २१ ॥ आदीपुरुशे चींतीजे । आत्मतत्त्वा जाणिजे । ... ... ... । म्हणें नामा विष्णुदास ॥ २२ ॥ कनसंग्रह कीजे । काळबुद्धी कर्मीजें । कळयुगी तरीजे । रामनामें ॥ २३ ॥ रव म्हणीजे आकाशासी । रवं ब्रह्म नाम त्यासी । खरे करूणी आत्मयासि । नीवांत होयीजे ॥ २४ ॥ गगनासारीखा गंभीर । गगना जाणता ज्ञातार । गगनसाक्षी ज्ञानसागर । आत्मा परब्रम्ह हा ॥ २५ ॥ घनवट होईजें । घट घावो साहीजे । घन वस्तु मी आत्मा जाणीजे । गुरुव-चनें ॥ २६ ॥ ज्ञानप्रकाशे ज्ञानी असे । येणे मोक्ष सर्वास । ...... सद्गुरुप्रसादें ॥ २७ ॥ चमत्कारें गुरुने । चंचळ चीतसहीत मने । चरणी ठेवीले नीमग्ने । बुधीसी ब्रह्मसमाधी ॥ २८ ॥ छळीत होता काम । छळणा चुकवीस राम । छपण कोटी यादवांमाजी वीश्राम । सखा श्रीकृष्ण हा येक ॥ २९ ॥ जन जनार्दन अैसे । जनासी न कळे प्रपंचवसें । जरी सद्गुरुसी पुसोनी सोडी पीसे । तरींच कळे आज्ञाना ॥ ३० ॥ झणी आळसु करीसी । झडकरी जायीं संतापासी । झगडा सोडुनी मीपण तुंपणासी । करी येक ॥ ३१ ॥ यावें मनुश्ये जन्मासी । या वाचुनी सार नाही परीयेसी । या समान आणीक जन्मासी । ज्ञान कैचे ॥ ३२ ॥ टणत्कारू गगनी गाजे । टणत्कारू वोंकारु वोंलीजे । टपकरूणी गुरुशीं पुसुनी होयीजें । परमात्माची तो ॥ ३३ ॥ ठसा साधुनी ठाइं । ठाव करी सद्गुरूपायीं । ठसपण सोडुनी देई । होये शांत ॥ ३४ ॥ दंडळ नको करूं चीत । डंब सोडी अैके हीत । डंबे बुडालें लोक वहुत । प्रपंचामाजीं ॥ ३५ ॥ ढेंसाळ उदार गुरुभक्तीसी । ढळढळीत वस्तु दावीसी अैसी । ढळेना सीश्ये गुरू येकी रासी । अमुप परब्रम्ह ॥ ३६ ॥ नामरुप वस्तुशी । नाना वस्तु तु(ज)पासीं । ना त

वस्तु तुं जानसी । वस्तुज जाणें ॥ ३७ ॥ तनु मनु धन प्राण । तें तें सद्गुरुसी समर्पण । तन्मये होउनी गुरुध्यान । करीजे येकांगें ॥ ३८ ॥ थकात होउनीया राही । थान मान वोळखइ । थानक करून देहीं । निराळा वस्तुशी ॥ ३९ ॥ दनदणाट अनुवाचा । दशे नाद वाजती साचा । दम मदनासी नासी सत्ये वाचा । अवोलणे बोलणें बोलत ॥ ४० ॥ धन्ये ते भलेत वौंशी । धन्य रामनाम वाचेंसी । धन्ये धन्ये पुर्वजासी । उद्धरीले तेंही ॥ ४१ ॥ नामकीर्तण सप्तक-रीती । नामापासी च्यार्‍ही मुक्ती । नामेच प्राप्त मोक्ष ज्ञानभक्ती । हरी कीर्तनी असें ॥ ४२ ॥ पवीत्र तेची जाणावें । परमपद पावावें । जीवें परमार्थ म्हणीजे स्वभावें । स्वयें पदची असें ॥ ४३ ॥ फ म्हणीजे सेशासी । फार कीर्तनी आवडी त्यासी । फाटली जीव्हा परी प्रेमासी । रामनामासी न वीसंबे ॥ ४४ ॥ वळीराम कृष्ण कीर्तन । वळीने प्रीथ्वी दीधली दान । वळेची होउनीयां प्रसन्न । वळीद्वारी द्वारपाळ जाला ॥ ४५ ॥ भला सत्वधारि पूरेशराम । भले पीत्रुवचन पाळीले नेम । भले वुधी सहस्रवाहु छेदुनी रक्षीला धर्म । कामधेनु सोडविली ॥ ४६ ॥ महाराज सुर्येवंशी । माहा प्रता(प) पुरुषार्थ त्यासी । मारीला रावण कुंटुंवेशी । सीता घेउनी आला ॥ ४७ ॥ येथें येकायेकीं कृष्ण-नाथें । यमलोकासी शुशुपाळातें । येथुनी नीजभक्तातें । वैकुंठासी पाव-वीलें ॥ ४८ ॥ रमावें नीजरूपीं । रहस्ये प्रेम चीद्रूपि । रंगले मन स्वरूपी । नीमग्न जाले ॥ ४९ ॥ लक्षास जे अलक्ष । लक्षुनी पाहातां नीरापेक्ष । लक्षलक्षेणा स्वसाक्ष । तेंची ते पैं ॥ ५० ॥ वासना वासुदेवो । वसवींले विश्व स्वमेवो । वासनेसी वस्तीसी ठावो । नीर्गु-णासी केला ॥ ५१ ॥ सकळ वासनेची करणी । सर्वांपरी नांदे त्रीभुवनी । सर्वांहुणी जननी । वीस्वाची म्हणवी ॥ ५२ ॥ खरेच अवघे असे । खोटे कांहींच नसे । खोल उतळ न दीसें । अवघे अखंड ब्रह्म ॥ ५३ ॥ शाहाणा तोची जाणावा । शांतीसुखाचा मेळावा । शामसुंदर वोळखावा । आत्माराम म्हणोनी ॥ ५४ ॥ हाची येकु त्रीभुवनी । हा जनी वनी वोजनी । हाची ध्यानी मनी नयनी । पाहावा तो देव ॥ ५५ ॥ लक्षुणी जाणीजे । लक्षुणी वोळखीजे । लक्षासी होयीजे । शुन्ये साक्षत्वें ॥ ५६ ॥ क्षांती थोर समर्थाची । क्षणे रची क्षणे खची । क्षणे अवघेपणे अवघाची । होउनी होये ॥ ५७ ॥ ऐसा वोनामा येका-क्षरी । वुधीवावनी अक्षरी । अखंड वाचीता नीज नीर्धारी । वुधीवंतु होये ॥ ५८ ॥ म्हणे नामा विष्णुदासु । होइजे तत्वज्ञानी सौरसु ।

नाम उच्चारी सोहं हंसु । स्वये प्रकाशु केंकारु हा ॥ ५९ ॥ ईती श्री बुधीबावनी नामदेव वीरचीतें संपूर्णमस्तु ॥ ६० ॥

# ३

# बुधबावनी नामदेववीरचीत

श्रीगणेशायनमाः ॥ वोवियें शंभु गाईजे । सेवा श्रीगुरुचि कीजे । वोळखी पडों न दिजे । तयां तस्करांची ॥ १ ॥ नमन किजे गोविंदा । न लागीजे पुढिलीया झकवादा । न किजे निंदा । साधुजनाचि ॥ २ ॥ मूहूर्त पाहोन कार्य किजे । महाविघ्न चुकवीजे । मनी तर्क घेईजे । पुढिलांचा ॥ ३ ॥ शिव गीवा उच्चारिजे । शिवाची पुजा किजे । शिवाची रचना न मोडीजे । शीकवीलें अैकीजें । तयां वडीलांचें ॥ ४ ॥ धर्म वासना असुं दिजे । धन सायासि जोडीजे। आपुले परावे वोळखीजे । अन्नदान कीजे । सर्व भुती ॥ ५ ॥ अवगुण सांडीजे । वाचा सत्य बोलीजें । आस पुरवीजे । तया वडीलांची ॥ ७ ॥ ईष्टा वोखटी मोडीजे । ईष्टा मैत्री जोडीजे । ये बुधी वर्जे । जनांमाजी ॥ ८ ॥ ईमान पु(रु)शा जतन कीजे। यीश्वरीं गळती पाणी घालीजे । ईंद्रपद पावीजे । येणे व्रतें ॥ ९ ॥ उशीरें न चालीजे मार्गु । उणीयांशी न कीजे संगु । उपशमन कीजे रागु । स्त्री बाळकांवरी ॥ १० ॥ उपदेशे श्रीगुरु न वीसरीजे। उद्धार मित्राशी न दिजे । विरोध न कीजे । भ्रतारासी ॥ ११ ॥ रीतें हाती गुरुघरें न भेटीजे । रीतें हाती देवालया न रीघीजे। रीघनीघ जानीजे । युध्याची ॥ १२ ॥ रुत अस्त्रीयांचा चुको न दीजे । रिघावा वेळ पाहुन कीजे । रिसटपण न कीजे । जाणत्यांनी ॥ १३ ॥ लीला आपुलीये आसीजें । लीपों घातकाशी न दीजे । लीन होयीजे । संतचरणी ॥ १४ ॥ लींगाची पुजा कीजे । लीखीत हें लीहुनी वाचीजें । लीप्त मन न कीजे । परद्वारी ॥ १५ ॥ येक शंभु वोळगीजे । येक कुलस्वामिनी पुजीजे । येक सहस्त्र जोडीजे । संसारा आलीया ॥ १६ ॥ अैसा आठ उधरिजे । अहंकारू सांडीजे । अंतर न दीजे । स्वामीयांसी ॥ १७ ॥ अनजातीशी सोयरीक न कीजे । आंधळे बरवे वाटे लावीजे । अधीक न बोलीजे । श्रीगुरूपुढें ॥ १८ ॥ अहो सांडीजे अहंकार । अहो तजिजे मद मच्छर । अहो वोळगीजे

यीश्वर । तरी भले होये ॥ १९ अंत दुसमनासी न दीजें । अंतर शरणागता पडो न दीजे । अन्नदान कीजे । सर्व भुतीं ॥ २० ॥ आस दीजे देवाचि । आदी न सांडावी वडीलांची । आणी नींदा न कीजे कोन्हाची । जाणत्यानि ॥ २१ ॥
ईती श्री ॐ नामासी बुदबावनी समाप्त ॥ प्रसंग ॥ १ ॥

१

## ॥ मुळकासुरवध ॥

श्रीगणेशायेनमः ॥ आतां असो रामु भद्रिं बैसला ॥ जयजय-कारू प्रवर्तला ॥ सुग्रीव अंगदु बोलाविला ॥ दिधलि अळंकार भुशणे ॥ १ ॥ रामु म्हणे बिभीपणा नृपती ॥ कैसी जालि गा गति ॥ ते सांगो आम्हाप्रति ॥ निज नगराची ॥ २ ॥ तो म्हणे परियेसि रामचंद्रा ॥ गुणवंता महिंद्रा ॥ कुंभकर्णपुत्रे नरिंद्रा ॥ महा प्रळयो मांडिला ॥ ३ ॥ माहा पापी तो राक्षेसु ॥ तेणें बहु केला नासु ॥ देवधर्माचा विध्वांसु ॥ केला हो राघवा ॥ ४ ॥ देवाईले मोडिली ॥ तुळसि वृंदावणें तोडिलि ॥ हरिकीर्तणें मोडिली ॥ विप्र दुःखि केले ॥ ५ ॥ मोडलिया चित्रसाळा ॥ मोडलिया धर्मशाळा ॥ फोडलिया अन्नशाळा ॥ लोक दुःखि केले ॥ ६ ॥ राया काय सांगो तुम्हाजवळि ॥ आम्हांसि मांडिलि युध्याचि फळी ॥ म्हणे होणे मजहुनि कवण बळि ॥ कवणु असे ॥ ७ ॥ रामा तुझे स्मरण करितां ॥ आम्हा प्रवर्त्तला आघाता ॥ मग आलो जि रघुनाथा ॥ तुझें चरण देखिलें ॥ ८ ॥ आतां असो बहुत बोलणे ॥ बोलावा वांनरसैन्ये ॥ संग्राम दारुण करणें ॥ मुळकासुरासिं ॥ ९ ॥ मग सातहि जुत्पति ॥ बोलाउनि राजमुर्ति ॥ म्हणें येक वेळा तुम्हि आम्हाप्रति ॥ सहकारी होईजें ॥ १० ॥ तव सुग्रीव म्हणे जी श्रीरामा ॥ हे केवि बोलिलेति जि आम्हा ॥ आम्हि आज्ञाधारक तुम्हा ॥ दास तुझे ॥ ११ ॥ जे कार्य उत्कंठित तुम्हां ॥ ते स्वामि सांगावे आम्हा ॥ हा देह तुझिये कार्यि रामा ॥ समर्पीला असे ॥ १२ ॥ मग श्रीरामु म्हणें चला जावों ॥ लंकेवरि आला असे राक्षसरावो ॥ कुमरु कुंभकर्णाचा पाहो ॥ महाबळाढ्य ते ॥ १३ ॥ सात पद्मे दळभार ॥ रामे ठेविले अयोध्यानगरा ॥ रथ आणि असीवारा ॥ दोनि क्षोनि ॥ १४ ॥ पुढें लंकानाथु बिभि-

पणु ॥ पाठिसि भरथु लक्ष्मनु ॥ सुग्रीव हनुमंत आपणु ॥ अंगदु माहा बळि ॥ १५ ॥ अैसे चालिले वांनर ॥ चालतां पृथ्वि दाटलि संपूर्ण ॥ म्हणति केंवि राहे काळगण ॥ आम्हापुढें सर्वथा ॥ १६ ॥ रामाचे दळि अंतु ना पार ॥ सूर्येवौंशि नरवांनर ॥ येक करिती भुभुःकार ॥ मार्ग नवशते कर्मीला ॥ १७ ॥ वेगी आले समुद्रथडि ॥ तव समुद्र उदके कडकडी ॥ वांनर उभे राहिले थडि ॥ बैसका मांडिलि ॥ १८ ॥ तेथ विचारू करिति ॥ सागरु मागुता बांधा म्हणति ॥ येक उपसा म्हणति ॥ बाहुबळें ॥ १९ ॥ देखोनि राम निर्मळ ॥ समुद्र हरुपला केवळ ॥ रामासि म्हणे गोळंगुळ ॥ याचा प्रबंधु विचार ॥ २० ॥ तवं समुद्रिचे वाळ मार्गी ॥ रामा भेटो आले फिरंगी ॥ म्हणति रामा तुं निजयोगी ॥ धराणिधरु हा ॥ २१ ॥ म्हणति रामा तु निर्विकल्प नरु ॥ तुजकारणें आणिले असे तारु ॥ तु सर्वा जिवाचा आधारु ॥ यावरि प्रयाण करावें २२ ॥ तंव रामासि मानलि ते भक्ति ॥ म्हणे तुम्हि माझे सखे येथार्थी ॥ भेटो आलेति आमुचे प्रीति ॥ तरि आतां असा सुखें ॥ २३ ॥ आतां असो हा विचारु ॥ भेटो आला सागरु ॥ म्हणें रामा तु उदारू ॥ कृपानिधि ॥ २४ ॥ बहुत स्तुति केलि तेणें ॥ ते वारिली रघुनंदनें ॥ बहुत विस्मयो केला मनें ॥ वांनरगणि ॥ २५ ॥ म्हणति रामा तु सत्वधिरु ॥ न कळे तुझा पारु ॥ तुं आमचा आधारु ॥ रामचंद्रा ॥ २६ ॥ अहो जि अयोध्यानिवासा ॥ तु आमचा कुंवासा ॥ देवा तुं सूर्यवौंशा ॥ मंडण पैं ॥ २७ ॥ अैसि स्तुति समुद्रे केलि ॥ ते रामचंद्रें वारिलि ॥ मग समुद्रें वाट दिधलि ॥ लंके जावया पैं ॥ २८ ॥ सागरू मागे सरला ॥ वांनरभारू उतरला ॥ सुवेळेचिया तटा आला ॥ रघुनाथु ॥ २९ ॥ म्हणति जाला चमत्कारु ॥ रामासि भेटो आला सागरु ॥ तेणें वाट देउनि दळभारु ॥ उतरला समग्र ॥ ३० ॥ लंकेमाजि हडबड जालि ॥ थोर पडलि भुलि ॥ म्हणति मागुति धाड आलि ॥ मर्कटवेशाचि ॥ ३१ ॥ येक म्हणाति सीतेचा श्रापु जाला ॥ तेणें रावणु जिवें गेला ॥ कुंभकर्ण ईंद्रजित मारविला ॥ आम्हा देखतां ॥ ३२ ॥ म्हणति हनुमंत आला मागुता ॥ तो तव मारील समस्ता ॥ हा मुळकासुर आम्हा भोवता ॥ कैंचा उदेला ॥ ३३ ॥ आतां कैसे करावें ॥ आणि कवणिकडे जावें ॥ म्हणति आतां काये करावे ॥ क्षयो आला आम्हा ॥ ३४ ॥ अैसे समस्त विचारिति ॥ येक पळा रे पळा म्हणति ॥ येक म्हणति करा स्तुति ॥ रघुनाथाचि ॥ ३५ ॥ लंकेमध्यें हाका बोंबा ॥ वळसा मांडिला उभा ॥ येक

म्हणति स्वयेंभा ॥ काळु खवळला ॥ ३६ ॥ म्हणति कोपला महेशु ॥ आतां होईल नाशु ॥ बुडाला राक्षसाचा वौंशु ॥ क्षयो आला ॥ ३७ ॥ म्हणति गति नाहि ॥ आतां करावे काई ॥ अैसे लोक बोलति ठाई ठाई ॥ मिळोनि मांदि ॥ ३८ ॥ तवं मुळकासुरा मातु गेलि ॥ म्हणति रामें लंका वेढिलि ॥ वांनराचि धाडि आलि ॥ सवें विभिषण पैं ॥ ३९ ॥ तवं मुळकासुर अवेशला ॥ राक्षेसभारू संजोगीला ॥ वाजंत्राचा गजरु जाला ॥ दुमदुमिले भुमंडळ ॥ ४० ॥ दुर्गं दारवटे घातले ॥ आगळा हुडे बळकाविलें ॥ येक म्हणति आले आले ॥ नर वांनर ॥ ४१ ॥ येक म्हणति कैसे कराल ॥ येक म्हणति लंका राम..ि घाल ॥ किं संग्रामु कराल ॥ तो विचारा पां ॥ ४२ ॥ संग्रामु केला रावणें ॥ तोहि गेला मरोन ॥ इंद्रजितासारिखा प्राणे ॥ वेचला युद्धि ॥ ४३ ॥ महिकावतिये निवु जाला ॥ हनुमंतें घाला घातला ॥ अहिरावणु मारिला ॥ येकलिया वांनरें ॥ ४४ ॥ अैसे बोलति कथा ॥ भये वाटे समस्ता ॥ येक म्हणति कैसे आतां ॥ करा विचारु ॥४५॥ अैसे बोलति मुळकासुरापासि ॥ धाकु वाटे सर्वांसि ॥ तवं शुकसारणाच्या पुत्रासि ॥ अवेशु आला ॥ ४६ ॥ तो म्हणे मज असतां ॥ तुम्हा कांसि रे चिंता ॥ धरुनि वांनरा समस्ता ॥ आणिन येथें ॥ ४७ ॥ अहो हे वांनरे बापुडि ॥ तयावरि काये बोलो प्रौढि ॥ नलगता अर्ध घडि ॥ बाणें येक खिळिन ॥ ४८ ॥ कुंभाचा पुत्र कुंभासुरु ॥ तो दैत्य महा थोरु ॥ तयासि मान विघला[1] अपारु ॥ मुळकासुरें ॥ ४९ ॥ तवं क्रौंचेचा पुत्र अवेसि ॥ म्हणें तुम्हि न पडावें सायासि ॥ मिं येकला जाइन संग्रामासि ॥ माझे कौतुक पाहे ॥ ५० ॥ तवं ताटिकेचा पुत्रु तांबासुरु ॥ तो माहा दैत्य थोरु ॥ तो म्हणे लंका जाळिलि तो वांनरु ॥ धरुन आणिन ॥ ५१ ॥ मग मुळकासुरा वाटले सुख ॥ म्हणे तुम्हि माझे प्राणसखे ॥ तुमचियेनि तुके ॥ कोण्हि नाहिं ॥ ५२ ॥ तवं आसाळिचा पुत्र आश्राधिरु ॥ म्हणे मज आठवला विचारु ॥ माझि माता विटंविलि तो वांनरु ॥ परम वैरि माझा ॥ ५३ ॥ अैसे आपुलाल्या परि ॥ बोलति फरारि ॥ तवं कुंभकर्णभार्या सुंदरी ॥ बोलिलि मैनावति ॥ ५४ ॥ बा रे रामें केला आमचा निर्वंशु ॥ बुडविला दैत्याचा वंशु ॥ विभिषण आपुला वौंशु ॥ तो मिळाला रामासिं ॥ ५५ ॥ तवं धुम्रुन्म दैत्यु बोलिला ॥ थोर पुरुषार्थ आपुला ॥ म्हणें मीं संग्रामा जाईन येकला ॥

---

१ 'मान दिघला' किंवा 'मानविला पाहिजे.'

सुख्य रामासि ॥ ५६ ॥ ऐसे पुरुषार्थ बोलसि ॥ तंव मंदोदरी आलि धांवति ॥ तिणें मुळकासुर धरुनि हाति ॥ सोकविला नाना परि ॥ ५७ ॥ ते म्हणें बा रे आईक आतां ॥ रामासीं युध्य करु पाहातां ॥ परी हे बरवे न वाटे चिता ॥ सर्वथा कांहिं ॥ ५८ ॥ बा रे येकाहुनि येक पर्वतु ॥ उन्मळिला निमिशातु ॥ कुंभकर्णासारिखा बळिवंतु ॥ तोहि वधिला रामे ॥ ५९ ॥ इंद्रजित माझा कुमरु ॥ जेणें इंद्रासि केला मारू ॥ तोहि वधिला आणि अखयाकुमरु ॥ तोहि वधिला ॥ ६० ॥ बा रे जे जे युध्या गेले ॥ ते मागुते नाहि आले ॥ म्हणउनि माझे मन भ्यालें ॥ तया रामकटकासि ॥ ६१ ॥ तवं म्हणें तो कुमरु ॥ माते न धरि भयाचा विचारु ॥ जन्मलिया पुरुषा मरणाचारू ॥ तो तवं सत्य आहे ॥ ६२ ॥ परि मागें सरणें हे अपकिर्ति ॥ माझेनि तवं न करवे सर्वथि ॥ लाविन श्रीरामासि ख्याति ॥ आपुलियां भुजबळे ॥ ६३ ॥ असो हा ईकडिल विचारु ॥ रामें वानरेसि केला मेळिकारु ॥ तवं बिभिषणु सांग विचारू ॥ सावचित्त असावे ॥ ६४ ॥ तवं रामु म्हणें सुग्रीवासी ॥ नळा निळा अंगदासि ॥ सुषेणा हनुमंतासि ॥ सावध असा ॥ ६५ ॥ तंवं वांनर पुरुषार्थे बोलति ॥ आमचि अमित्य बळशक्ति ॥ लंका वेढनि त्वरिति ॥ निमिष नलगतां ॥ ६६ ॥ तवं बोलिला हनुमंतु ॥ रावना आईक माझि मातु ॥ धरुनि आणिन जितु ॥ मुळकासुर हा ॥ ६७ ॥ तवं जांबुवंतु बोले आपण ॥ लंकेसि धरणसारण ॥ अवधि मी जाणे विंदान ॥ तेथिल विचारू ॥ ६८ ॥ मग बोले वाळिचा बंधु ॥ म्या केला राक्षसाचा वधु ॥ आतां काईसा त्यामधु ॥ बोलों याचा ॥ ६९ ॥ इंद्रजितासारखा दुर्धरु ॥ या लक्षमणे केला चुरु ॥ दुसरा अतिकाया विरु ॥ तोहि मारिला ॥ ७० ॥ पाहो हो कुंभकर्णासारिखे धेंडे ॥ लोळविलें श्रीरामें प्रचंडें ॥ तेथ काईसे बापुडे ॥ मुळकासुर पैं ॥ ७१ ॥ मग आला अहिरावणु ॥ तेणें राम नेला चोरुनु ॥ तेथें संचरला पवननंदनु ॥ क्षणामधें मारिला ॥ ७२॥ ऐसि बलाढ्य धेंडि ॥ पुर्वि वधिलि काळदंडि ॥ तेथें काईसिं याची दंडि ॥ आम्हापुढें ॥ ७३ ॥ तंव राक्षेस हाका देति ॥ वांनर भुभुकार देति ॥ वानर घाला घालिति ॥ राक्षेस म्हणति आले आले ॥ ७४ ॥ ऐसा नेमासुर संग्रामा आला ॥ तंव तो वांनरि धरिला ॥ — तो सीळेखाले ॥ ७५ ॥ पुढे अहिरावणाचियां पुत्रा ॥ आणि सितेचिया पुत्रा ॥ दोघी मांडिले क्षत्रा ॥ घोरांधर पैं ॥ ७६ ॥ राक्षेसु हाणे गदेवरि ॥ लहु हाणे बाणवरि ॥ तोहि निमाले पर्वताखालि ॥ चूर केला देखा ॥ ७७ ॥ मग कुरु संग्रामा येउनि वेगे ॥ अंगदासि हाणितिले खर्गे ॥ येरे बळे दडपीला

वेगें ॥ शीळाघातीं ॥ ७८ ॥ ताटिकेचा पुत्रु तांबासुरू ॥ कुश सीतेचा कुमरु ॥ दोघां संग्रामु जाला थोरू ॥ झोटधरणि ॥ ७९ ॥ ऐसे भिडले माहायुध्यें ॥ तवं तो हाकिला अंगदे ॥ पर्वत उचलुनि क्रोधे ॥ सांडिला वरि ॥ ८० ॥ तो दडपला त्या ताळि ॥ तव असा धिरू राक्षस बाळि ॥ तेणें पसरुनि आवाळि ॥ ग्रासावया पैं आला ॥८१॥ तवं गजबजिले वांनर ॥ हाति घेति तरुवर ॥ येक करिति भुंभुंकार ॥ घोर शब्दें ॥ ८२ ॥ तवं राक्षसीं दिधलि हाक ॥ वांनर बोलति सकळिक ॥ देवां पडिला धाक ॥ (छ?)ळिल म्हणउनि ॥ ८३ ॥ तो ग्रासावया चालीळा ॥ येता हनुमंत दडपीला ॥ दोघा संग्रामु जाला॥ झोटधरणि ॥ ८४ ॥ मग हनुमंते माहाविरे ॥ चरणि धरुनि आपटिला त्वेरे ॥ प्राण सांडिला निशाचरे ॥ क्षणामाजि ॥ ८५ ॥ तवं सुखम दैत्यु म्हणें आतां ॥ बळे धरुयां हनुमंता ॥ पैज बोलोनि राक्षेसनाथा ॥ विडा प्रौढि घेतला ॥ ८६ ॥ मग आला संग्राम भुमिके ॥ वांनर हाकारिति तवके ॥ तवं रामचंद्रे सेना बाण काढुनि निके ॥ लक्ष साधिलें ॥ ८७ ॥ बाण गुणि लाउनि बोढिला ॥ राक्षेसावरी सोडिला ॥ येता मध्यैंचि तोडिला ॥ निमिशमात्रे ॥ ८८ ॥ तेणें धगधगीत बाण ॥ रामावरि केले संधान ॥ दोघे खवळले संपूर्ण ॥ रणामध्यें ॥ ८९ ॥ मग रामे प्रतापप्रौढि ॥ सीर उडविले बाणाचे परवडि ॥ मशक मेरुचि सरि कांढि ॥ हे केवि घडे ॥ ९० ॥ ऐसे राक्षेस थोर थोर ॥ रणिं पडिले माहाविर ॥ राक्षेसदळिं हाहाकार ॥ रघुवीर खवळला ॥ ९१ ॥ हे आईकोनि मंदोदरि ॥ रुदना करि दीर्वस्वरी ॥ म्हणे म्या पुर्विंच सीकविले तें कुमरीं ॥ आईकिले नाहिं ॥ ९२ ॥ पापे बुडाला राक्षेसवंशु ॥ रामें केला निर्वंशु ॥ म्हणोनि कोपला महेशु ॥ राक्षेसावरी ॥ ९३ ॥ लटिके नव्हे मंदोदरिचे वाक्य ॥ ऐसे बोलति सकळिक ॥ पुढे परिसा कथा अलोलिक ॥ नामा म्हणें विष्णुदासु ॥ ९४ ॥ प्रसंग ॥ १ ॥

## ॥ प्रसंग ॥ २ ॥

श्रीराम ॥ मग उठिला अंधकासुरू ॥ म्हणें येकि बुद्धि करू ॥ वांनराचा वेषधरु ॥ ठकुनि मारु राघवा ॥ १ ॥ ऐसा तो कपटि आला कटकांतु ॥ हिंडे चहुंकडे अद्भुतु ॥ तवं पुढे देखिला हनुमंतु ॥ तेथे जाउनि बैसला ॥ २ ॥ राक्षेस कपटवेशधरी ॥ तो बिभिषणे

बोळखिला ते अवस्वरी ॥ मग हनुमंतासि खुणाउनि नेत्रि ॥ धरविला करीं ॥ ३ ॥ जव पाई धरुनि उपटावा ॥ तंव तेणे स्मरिलें राघवा ॥ बिभीषनु म्हणे न्यावा ॥ रामापासि ॥ ४ ॥ तो नेउनि उभा केला ॥ श्रीरामु पुसों लागलां ॥ कां आलासि सांग वहिला ॥ यथार्थ मज ॥ ५ ॥ तो म्हणे सहज घडले येणें ॥ येणे मिसें तुझे चरण पाहाणे ॥ तुवां कृपा केलियां उधरने ॥ संसारापासुनि ॥ ६ ॥ मग रामे नाभिकारू दिधला ॥ शरणागता नुपक्षि हे लिळा ॥ जाणातिले तेचि सकळा ॥ प्रतित जालि ॥ ७ ॥ त्या अंधकासुराचा कंदनासुरू ॥ तो म्हणे मारिन वानेरभारू ॥ धरिन नळ निळ वांनरु ॥ म्हणोनि विडा उचलिला ॥ ८ ॥ मग तो आला संग्रामा ॥ तंव हनुमंत म्हणे श्रीरामा ॥ कंदनासुर आला रण आक्रमा ॥ खटाटोपें ॥ ९ ॥ तवं रघुत्तमें बाण लाविला ॥ राक्षेसु खर्ग घेउनि धांविनला ॥ तंव हनुमंते पुढें आला ॥ राहे राहे म्हणौनि ॥ १० ॥ दोघा जालि सवफळि ॥ मालयुध्येचि माहा कळि ॥ मग आफळिला भूमंडळि ॥ तेणें गतप्राण जाला ॥ ११ ॥ अैसा तो दैत्य मारिला ॥ तवं मुळकासुरू बोलिला ॥ समस्ताचा वधु जाला ॥ आम्हा कोपला शंकरू ॥ १२ ॥ जे युध्याकारणें गेले ॥ ते मागुते नाहि आले ॥ अैसे कुळ निर्दाळिले ॥ समस्त रामे ॥ १३ ॥ तंव उभा राहिला त्रुनासुरू ॥ राया समस्ता करिन संव्हारु ॥ मज असता चिंतातुरू ॥ केवि होसि नृपति ॥ १४ ॥ म्हणउनि विडा उचलिला ॥ तृणासुरू युध्यासी आला ॥ तो बिभि-षणे देखिला ॥ सांगे रामापासि ॥ १५ ॥ तेणें थोरू संग्रामु मांडिला ॥ बहुत वांनरुभार मोडिला ॥ मग अंगदु उटावला ॥ तया-वरि ॥ १६ ॥ पर्वतु उचालिला माहा थोर ॥ वळे टाकुनि केला चूर ॥ मग जाला हाहाकार ॥ राक्षसदळि ॥ १७ ॥ लंके-मध्ये बोभांटु ॥ म्हणति राक्षेसाचा भरिला घोटु ॥ कोण्हि जयवंत सुभटु ॥ उरला नाहिं ॥ १७ ॥ मुळकासुर सांगीतले ॥ म्हणति त्रुणा-सुर रणा आणिलें ॥ राया आतां न दिसे आपुले ॥ कार्य भले ॥ १९ ॥ मग मुळकासुर म्हणें आतां ॥ मीं संग्रामु करिन निरुता ॥ ख्याति लाविन रघुनाथा ॥ आणि समस्ता वांनरा ॥ २० ॥ तवं मेनासुर उठुनि ॥ म्हणें तुम्हि नव जावें युद्धालागुनि ॥ आज्ञा दिजे मज लागुनी ॥ वांनरवधालागी ॥ २१ ॥ तो दैत्य माहा दुर्जनु ॥ मग बोलिला बिभिषणु ॥ हा होये जि नंदनु ॥ सेंभरा दैत्याचा ॥ २२ ॥ त्यासि येतां रणांगणि ॥ लक्ष्मणे बाण लाविला गुणि ॥ दोघे वीर महा रणि ॥ खवळले देखा ॥ २३ ॥ मेनासुर म्हणे लक्ष्मणासि ॥ तु आलासि संग्रामासि ॥ तुवां

मारिले इंद्रजितासि ॥ ते न चले येथें ॥ २४ ॥ तुवा मारिलें माझिया पीतियासी ॥ दुचितें पंचवटिकेसि ॥ ते हावेनें आलासी ॥ ते न चले येथें ॥ २५ ॥ इंद्रजित हो मी दुचिता होता ॥ तो तुवा वधिला अवाचिता ॥ ते उसिने देई आतां ॥ मजपासि येथे ॥ २६ ॥ तव लक्ष्मणु क्रोधे खवळला ॥ तेणें वज्रबाण घातला ॥ तो येता हाति धरिला ॥ दैत्ये दुर्जने ॥ २७ ॥ मागुता लक्ष्मणे बाण लाउनि ॥ राक्षेसु भेदिला दोहि चरणि ॥ सिर उडविले गगणि ॥ बाणे येके ॥ २८ ॥ अैसा मेनासुर रणि पडला ॥ वांनरी भुभुकारू केला ॥ म्हणाति मेनासुर रणि पाडिला ॥ लक्ष्मणें माहा विरे ॥ २९ ॥ मग कनकासुर म्हणे मुळकासुरा ॥ माझा धाकु देवां आसुरा ॥ काईसा मज दरारा ॥ नरावांनरांचा ॥ ३० ॥ विडा द्या जि राया मज ॥ माझि स्फुरतसे भुज ॥ संग्राम करिण वोजा ॥ तया रामासि आजि ॥ ३१ ॥ यैसे बोलोनि संग्रामा आला ॥ जैसा गिरिवरू चालिला ॥ येता बिभिषणे वोळखिला ॥ सांगे रामापासि ॥ ३२ ॥ म्हणें हा पुत्र मातुळिचा ॥ याचा पिता सारथि इंद्रजिताचा ॥ थोर संग्रामु याचा ॥ माहा पराक्रमि हा ॥ ३३ ॥ तवं रामे भरथाकडे पाहिलें ॥ येरे चरण नमस्कारिले ॥ तुम्हीं युध्या जावे भलें ॥ संग्रामालागि ॥ ३४ ॥ आईकोनि श्रीरामु आज्ञा देतु ॥ संग्रामा आला भरथु ॥ कनकासुर अद्भुतु ॥ मारि बळे उठावला ॥ ३५ ॥ दोघा संग्रामु मांडला ॥ गगणि सूर्ये कांपीनला ॥ वांनरि भुभुकारू केला ॥ तये वेळि ॥ ३६ ॥ रणा आला कनकासुर ॥ भरथु विजई माहा विर ॥ हे देखोनि चिंतातुर ॥ लंकेशु आला ॥ ३७ ॥ म्हणति भरथु विजई जाला ॥ कनकासुर वधिला ॥ तवं चंद्रावतिनें शोक मांडिला ॥ ते अस्त्रि मातुळिचि ॥ ३८ ॥ येणें मुळकासुराचेनि गुणें ॥ पुत्र गेला प्राणे ॥ आतां वैधव्य करे[1] ॥ कैसेनि आम्हि ॥ ३९ ॥ अैसा बहु शोक करिता ॥ मुळकासुर जाला संबोखिता ॥ ईश्वरकरणिस आतां ॥ न चले माये ॥ ४० ॥ तो म्हणें आतां संग्राम करिन ॥ भुजासि माझ्या येतसे स्फुरण ॥ रामा लक्ष्मणा ख्याति लाविन ॥ सूड घेईन राक्षेसांचा ॥ ४१ ॥ तव वानर म्हणती श्रीरामा ॥ लंका घ्यावयाचि आज्ञा देणे आम्हा ॥ तवं बिभिषणु म्हणे तुम्हा ॥ मारणे असे पीठासुरा ॥ ४२ ॥ रामा पीठासुर तो माहा समर्थु ॥ तयाचा संग्राम अद्भुतु ॥ युद्धीं सुरवरासि कांपवितु ॥ बळाढ्यपणे

१ कंटणें ?

॥ ४३ ॥ तव मुळकासुर म्हणे पीठासुरा ॥ आजि बरवा संग्रामु करा ॥ संव्हारा समस्ता वांनरा ॥ शुड घ्यावा कुळाचा ॥ ४४ ॥ आतां दोघे उरले निर्वाणि ॥ आम्हा विन्मु(ख) शूळपाणि ॥ पारि आपुलि करू करणि ॥ सूड घेउ समस्तांचा ॥४५॥ आतां संग्रामा आला पीठासुरू ॥ सर्वे राक्षसांचा भारू ॥ वाद्ये वाजति भयासुरू ॥ रणांगणि ॥ ४६॥ तया देखोनि वांनर ॥ खवळले हाति घेति तरुवर ॥ येकि सिळा सिखर ॥ हाति वनविलें ॥ ४७ ॥ तेथें संग्राम मांडला थोर ॥ वांनर ठाकिति गिरिवर ॥ राक्षस बोचति वाडिवार ॥ शस्त्रे टाकिति माहा क्रोधे ॥ ४८ ॥ येकु येकासि झगडे ॥ जैसे पर्वते पर्वतु संघटे ॥ अैसे युध्य जाले आदटे ॥ वांनरा राक्षसां ॥ ४९ ॥ तंव अंगदु उठावला ॥ तेणे पीठासुर हाकिला ॥ दोघा संग्रामु जाला ॥ अद्भुत देखा ॥ ५० ॥ दोघे माहा बळि संकष्टि ॥ दोघे जुंझति मल-युध्य मुष्टि ॥ तेणें हालावलि श्रृष्टि ॥ दोघे अतुर्बळि ॥ ५१ ॥ अैसे युध्य मांडले ॥ तव आंगदे आगळे केले ॥ मुष्टिघात लोळविले ॥ राक्षे-सातें ॥ ५२ ॥ राक्षेस अंगदे मारिला ॥ जैसा पर्वतु कोसळला ॥ थोर प्रतापु केला ॥ वाळिकुमरे ॥ ५३ ॥ मग श्रीरामु मानवला ॥ आंगदु पोटेसि धरिला ॥ थोर आकांतु वर्तला ॥ लंकेमध्यें ॥ ५४ ॥ आतां चंद्रावति आदि करुनि माता ॥ शोक करिति जालि पुत्र दुःखा-वस्था ॥ कैसा विन्मुख पार्वतिकांता ॥ जालासि आम्हा ॥ ५५ ॥ तव पीठासुराचा पुत्र रत्नासुरु ॥ बोले पुरुषार्थ थोरू ॥ म्हणें मीं आतां करिन संव्हारू । रामवांनराचा ॥ ५६ आतां असो पुढिल कथा अैसी ॥ रत्नासुर येईल संग्रामासि ॥ तो लक्ष्मणा विरासिं ॥ जुंझेल देखा ॥ ५७ ॥ तों महाबळी राक्षेसु ॥ तयाचा श्रीरामावरि आवेशु॥ दोघा मांडला विर(र?)सु ॥ अद्भुत देखा ॥ ५८ ॥ तो म्हणें राक्षस-राया ॥ आजि मीं दंडिन रघुराया ॥ जाईन सुवेळेचीया ठाया ॥ सपाट करित ॥ ॥ ५९ ॥ अैसे बोलोनि पैजा ॥ बलकाविल्या भुजा ॥ माहाप्रतापु माझा ॥ युध्यसमई ॥ ६० ॥ माते नमस्कारु केला ॥ तीणें आसिर्वादु दिधला ॥ निघता शकुन बरवा जाला ॥ रामभेटिलाभाचा ॥ ६१ ॥ ते म्हणें बा रे सत्यच बोल रामापासि ॥ अक्षोम्य मुक्ति मग नेमेसि ॥ सार्थक करि देहासि ॥ जन्मा आलि-याचें ॥ ६२ ॥ जाउनि बिभिषणाचे मंदिरि ॥ आज्ञा पुसे झडकरी ॥ रामसेवेचि अवसरि ॥ बहुत असे मज ॥ ६६ ॥ ते म्हणें बा रे हित विचाराल ॥ जन्माचे सार्थक कराल ॥ तुम्ही आपुले स्वहित साधाल ॥ युगानयुगी ॥ ६४ ॥ तु जातोसी अमृतसागरा ॥ तरी

आमुचि हति लौकरि करा ॥ रामकरुणासागरा ॥ विनउनिया ॥ ६५ ॥ ऐसा पवनगती निघाला ॥ शकुन बरवा जाला ॥ जळपूर्ण कुंभेसि मेळा आला ॥ शुभांगनाचा ॥ ६६ ॥ ऐसा आनंदे जातु ॥ रामस्मरण करितु ॥ वांनर म्हणति हा भक्तु ॥ मावेचा होय ॥ ६७ ॥ येक भिडों पाहाति द्रुमपाणि ॥ तंव तो म्हणे मीं शरण आले रामालागुनि ॥ मज भेटवा कोदंडपाणि ॥ अयोध्याधिशु ॥ ६८ ॥ मग तो आला रामापासि ॥ येरु लागला चरणासि ॥ जये जये राघवा सूर्येवौंशि ॥ उदार चक्रवर्ति ॥ ६९ ॥ मग उठउनि रामे आळंगिला ॥ लक्ष्मनुहि भेटला ॥ हनुमंताचे चरणा लागला ॥ आळंगिला बिभीषणें ॥ ७० ॥ म्हणे रत्नासुरा भले केलें ॥ त्रैलोकिचे दैवत वोळगीले ॥ परब्रम्ह निज धारिले ॥ येकभावे ॥ ७१ ॥ रामनाम देउनि वैसविला ॥ रत्नासुरा तुं सखा जोडला ॥ मग विचारु पुसिला ॥ मुळकासुराचा ॥ ७२ ॥ मग म्हणे आईका जि रघुनाथा ॥ मुळकासुरांसी संग्रामु करिता ॥ परमकष्ट सर्वथा ॥ आहेति जाणा ॥ ७३ ॥ ऐसा रामसभेसि आनंद जाला ॥ वानेरि भुभुकारु केला ॥ लंकेमध्यें वर्तला ॥ आकांतु देखा ॥ ७४ ॥ परि आईका हो रघुपती ॥ सर्वथा जयो असे सीतापति ॥ तुवाचि दिधलि त्यासि शक्ति ॥ मी काय बोलो ॥ ७५ ॥ आज्ञा तुमचि सीतापती ॥ वानर म्हणति रघुपती ॥ करूं लंकेचि शांति ॥ आज्ञा दीजे आम्हा ॥ ७६ ॥ तंव बोले रामरावों ॥ लंका बिभिशेणाचा ठावो ॥ तेथिल जनासि अपावो ॥ करु नये सर्वथा ॥ ७७ ॥ तंव येरीकडे मानसि ॥ पाहा हो कैसे मिळाले वैरियांसि ॥ उत्कंठा मुळकासुरासि ॥ जिविं वरवे न वाटे ॥७८॥ आतां असो धीर धरूं मानसीं ॥ संग्राम करू रामाशीं ॥ येरें वानरे तें काईसि ॥ मशक मजपुढें ॥ ७९ ॥ वडिल वडिल गेले पुढें ॥ महावीर पैं वो गाढें ॥ आता मीं येकलाचि भिडे ॥ मानविन समस्ता ॥ ८० ॥ मिं मुळि आलों मुळकासुरु ॥ म्हणोनि याचा जाला संव्हारू ॥ आतां वाचोनि कोण प्रकारु ॥ निंद्ये धर्म ॥ ८१ ॥ आमचें आम्हा पारीखे जाले ॥ कोन्हि मरणमार्गे गेले ॥ आम्हासि शंकरें उपक्षिले ॥ येश दिधले वैरिया ॥ ८२ ॥ चंद्रावति म्हणें जालि जगबुडि ॥ सूर्यवौंशि येशाचि गुढि ॥ लंका घेतलि प्रौढि ॥ बिभिपणें ॥ ८३ ॥ आतां असो हा कथाविस्तारू ॥ जन्मेजयासी सांगे मुनेश्वरू ॥ पुढें कैसा वर्तला कथाविस्तारू ॥ तो सांगे नामा विष्णुदास ॥ ८४ ॥ संपूर्णमस्तु ॥

## ॥ प्रसंग ॥ ३ ॥

श्रीरामकर्ता ॥ तंव तेथें रात्रिचे पाहारि ॥ आलि रेणावत्ति मंदोदरि ॥ बा रे सकळ गेले रणसागरी ॥ बुडोनि देखा ॥ १ ॥ मंदोदरि सीकवि भावें ॥ बा रे अझुनि तरि हित करावें ॥ रामासी शरण जावें ॥ रक्षावे जिवित्व पैं ॥ २ ॥ तरि तो म्हणें माते वैरी भ्यावें ॥ तरि जन्मा कासीया यावें ॥ मारावे किं मरावे ॥ येथार्थ जाण ॥ ३ ॥ तंव रामाचे मेळिकारि आरोगणा ॥ समस्ती केली जाणा ॥ तंव प्रभात जालि अरुणा ॥ उदयो जाला ॥ ४ ॥ मुळकासुर संग्रामा निघाला ॥ पुढे अपशकुन जाला ॥ तो मनिं शंकला ॥ परि न मनि देखा ॥ ५ ॥ मग बोलिलि माता ॥ वैर केले रघुनाथा ॥ तुवां बुडविले समस्ता ॥ राक्षेसकुळा ॥ ६ ॥ येरु म्हणें जन्मासि यावे ॥ तरि वैरि सर्व जितावें ॥ किं आपणचि मरावें ॥ हेचि किर्ति माये ॥ ७ ॥ मागुता मंदोदरीपासि आला ॥ तीस नमस्कारू केला ॥ माते मीं जाईन येकला ॥ बा रे जाणसि ते करि ॥ ८ ॥ मग बोलिली मंदोदरि ॥ बा रे जानसि ते करी ॥ पुढें गेले सह परिवारि ॥ रावण कुंभकर्ण ॥ ९ ॥ अखया इंद्रजिता सारिखा कुमरू ॥ अशोकवना आला वांनरू ॥ तेणें जाळिलि तै जाला सव्हारु ॥ सर्व लंकेचा ॥ १० ॥ रावणे आणिलि सीता ॥ तैंच होळि जालि राक्षसां गोता ॥ माझि सिकवन सुता ॥ न मने कोण्हा ॥ ११ ॥ चौदा चौकड्याचें राज्य बुडविले ॥ सकळ कुळ प्राणे गेलें ॥ यासि विघ्न हेंचि भलें ॥ सीता लंकेसि आनीली ॥ १२ ॥ रावण बहुत सीकविला ॥ बिभिषणु चरणघातें हाणितिला ॥ तो शरण रामासि गेला ॥ वाचला प्रळयापासुनि ॥ १३ ॥ असो हे गत गोष्टि आठविता ॥ दुःख दुणावे होय सर्वथा ॥ जे तुज मानेल राक्षेसनाथा ॥ ते सर्वथा करी ॥ १४ ॥ मग तो चरणासि लागला ॥ वेगें संग्रामा निघाला ॥ आडवा भुजंग गेला ॥ मार्ग खंडितु ॥ १५ ॥ नग्न कुमारि देखिलि ॥ सिक (?) सन्मुख जालि ॥ तंव पुढे रामाचि कटके देखिली ॥ जैसा सागरू फुटला ॥ १६ ॥ जैसा वेष्टुनि पर्वतु ॥ भोवता सागरू अद्भुतु ॥ तैसा शोभे रघुनाथु ॥ सैन्येसागरामाजि ॥ १७ ॥ तवं पुढे अवचिता देखिला ॥ जैसा पर्वतु उभारला ॥ तैसा वांनरी देखिला ॥ मुळकासुर तो ॥ १८ ॥ तेणे बिभिषणाते देखोनि ॥ क्रोधें खवळला थोर मनिं ॥ जैसा घृतधारे करूनि ॥ आग्नि सिंपीजें ॥ १९ ॥ मग

म्हणें अरे चांडाला ॥ तुवां गीळिले सकळ कुळा ॥ तरि आधि तुज गिळिन सगळा ॥ अरे कुळकेता ॥२०॥ म्हणउनि धांविनला मुख पसरुनि ॥ बिभिषणा भये मनि ॥ तंव हनुमंतें धरिला धांवोनि ॥ येरे झाडिला करे ॥ २१ ॥ मुळकासुरे धांव घेतलि ॥ दोन च्यारि वांनर धरिलि ॥ ते काखेसी दडपिली ॥ मागुता धांविनला ॥ २२ ॥ दाढा दिसति विकटा ॥ पिंगटा दिसति बावरझाटा ॥ महाथोर विशाळ मोटा ॥ डोळे गुंजावर्ण ॥ २३ ॥ येक येका पाउलाचि गणणा ॥ योजनी येकाचि गणणा ॥ मस्तकाचे सांगता माना ॥ जैसा पर्वतु विशाळु ॥ २४ ॥ असा थोर माहा विशाळु ॥ जैसा प्रळई माहाकाळु ॥ धांविनला वांनरा गीळु ॥ तव लक्षमणे हाकिला ॥ २६ ॥ माहा विशाळ येता देखिला ॥ वानरां धाकु उपजला ॥ रामामागे जाला ॥ बिभिषणु तो ॥ २६ ॥ तव तो लक्षमनु पाचारिला ॥ हनुमंते भुभुकारु दिधला ॥ सुग्रीवें सत्राणे हाकिला ॥ राहे राहे म्हणोनु ॥ २७ ॥ तेथें तो दुचित जाला ॥ नावेक मागें सरला ॥ मग म्हणे रे तुम्हां समस्तांला ॥ गीळिन जाणा ॥ २८ ॥ तवं देखिले बिभीषणासी ॥ म्हणे मूर्खा निर्लजा तोंड दाविसि ॥ आतां भला सांपडलासि ॥ आधि ग्रासिन तुज ॥ २९ ॥ तवं बिभिषण म्हणे रे मूर्खा ॥ दीर्घदोसियां राक्षेस किटका ॥ तुम्हा-सहित उपदेश निका ॥ कारे मानेचना ॥ ३० ॥ शरण रिघो रघुवीरा ॥ हेचि माझि सिकवण करा ॥ जाणें कैवल्यपदगाभारा ॥ राज्य कराल सुखें ॥ ३१ ॥ पूर्वी रावणासि सांगता ॥ परि तो नाईकेचि हिता ॥ मरणमार्गि गेला तुझा पिता ॥ माझे वचन न मानिचि ॥ ३२ ॥ इंद्रजितु पडला प्रेतप्रवाहि ॥ ठाईं ठाईं निकुंबळेसि पाही ॥ तुटोनि पडला हे कायी ॥ तुं मूढ नेणसि ॥ ३३ ॥ माझे सिकवणे नाईकतां ॥ प्रहस्तादिक प्रधानाच्या माथा ॥ बैसोनि पर्वताच्या घातां ॥ जाले शतशूर्ण ॥ ३४ ॥ रामाचि तुम्ही आणिली कांता ॥ तयासि विरोधु तुम्हि करितां ॥ त्या पापें तुम्हा समस्ता ॥ बुडाले कुळ तुमचें ॥ ३५ ॥ सीता रघुनाथाचि कांता ॥ ते तुम्हासि कन्यारूप सर्वथा ॥ तीचा अभिलासु करिता ॥ पडिलेति दोपडोही ॥ ३६ ॥ जाले पापाचे डोंगर ॥ म्हणौनि तुम्हि उन्मळ-लेति तरूवर ॥ तुम्हा समस्तासि येमपुर ॥ प्राप्त असे अनयासे ॥ ३७ ॥ इतुके बिभिषणु बोलिला ॥ तंव सूर्ये अस्तमान पावला ॥ राक्षेसु निज ग्रामाप्रति आला ॥ बैसला मंचकि ॥ ३८ ॥ श्री रामु सुवेळेचें थडि ॥ भोवति वांनराचि परवडी ॥ बैसले प्रीति आवडि ॥ आरोगीति फळे ॥ ३९ ॥ असा प्रसादु जालियां केवळ ॥ रामें आदि करूनि

वांनरदळ ॥ भवते जागेकरि फिरति सबळ ॥ घरटिकार ॥ ४० ॥
असि च्यारी प्रहर रात्रि क्रमलि ॥ सूर्यकळा प्रकाशलि ॥ रामे नित्यकर्मे
सारिलिं ॥ समस्त सभा घनवटलि ॥ ४१ ॥ असा प्रथम प्रहरू
क्रमला ॥ राम सभेसी शोभला ॥ वांनरि भुभुकारू केला ॥ नमन करि-
ति परस्परें ॥ ४२ ॥ असे क्रमले दोनि प्रहर ॥ तवं युध्या आला
मुळकासुर ॥ आतां संग्राम होईल थोर ॥ लहु विरासि ॥ ४३ ॥
येकु पुत्रु कुंभकर्णाचा ॥ दुसरा तो जानकिचा ॥ संग्रामु तयां दोघांचा ॥
सांगतां असंभाव्य ॥ ४४ ॥ देव म्हणति पुत्र रामाचा ॥ हा तरि वरूषां
बाराचा ॥ जेणें समस्त वांनराचा ॥ जयो स्वयें मिरविला ॥ ४५ ॥
कुंभकर्णाचिया पुत्रा ॥ जन्म जाला मुळ नक्षत्रा ॥ यापासुनि रावणाच्या
गोत्रा ॥ क्षयो पुरला ॥ ४६ ॥ असो हे लहु संधान करि ॥ ते
राक्षसु गदेनें निवारी ॥ गदा हाणें लहुवरि ॥ धांवोनिया ॥ ४७ ॥
दोघा जालि मालमुष्टि ॥ उलथु पाहे अवधि श्रृष्टि ॥ लक्षमण कवळिला
पोटिं ॥ म्हणे जावो पाठिराखा ॥४८॥ लक्षमणे बाण घेतला ॥ तंव तो रामे
वारिला ॥ म्हणे क्षण येकु राहे उगला ॥ पाहे कवतिक ॥ ४९ ॥ असो मंगळ-
वारी सायेंकाळि ॥ लहु पडीला रणमंडाळि ॥ वानर धांविनले सकाळि ॥ तव
तो अदृश जाला ॥ ५० ॥ मग हा लहु उचलिला ॥ रामापासि
आनिला ॥ तंव निचेष्टितु उगला ॥ देखिला श्रीरामे ॥ ५१ ॥
पाहता पुत्राचे मुखकमळ ॥ श्रीराम देखे व्याकुळ ॥ सकळ सभा
हो विव्हळ ॥ लहुवाकरितां जालि ॥ ५२ ॥ बा रे पुत्रा तुजविण
कैसे ॥ सीतेसी लागले पीसे ॥ अयोध्यामंडण असे ॥ खचले
केवि ॥ ५३ ॥ तव हनुमंत म्हणे रघुनंदना ॥ न करणे शोक दुःख
रोदना ॥ मि तुझा सेवकु जाणा ॥ आणिन लहुवासि ॥ ५४ ॥
जरि नेले असेल काळें ॥ तरी मीं करीन त्यांचें वाटाळें ॥ धांडो-
लिन स्वर्ग मृत्यु पाताळें ॥ आणीन लहुवासी ॥ ५५ ॥ तवं
बिभिषणु म्हणे रामा ॥ आतां करावे जि क्षमा ॥ तु सकळाचा
आत्मा ॥ मायेबाप ॥ ५६ ॥ तंव लहुवाचि मूर्छना गेलि ॥ समस्त
सभा गर्जिनलि ॥ रामासि खूण दाविलि ॥ जये जये राम म्हणो-
निया ॥ ५७ ॥ तंव लक्षीमनु म्हणें रामा ॥ तुह्मि करावे हो क्षमा ॥
जाईन संग्रामा ॥ वधिन तो राक्षसु ॥ ५८ ॥ आस कर्मालि निसि
कालि ॥ उदयो जाला भुमंडळी ॥ सभा रामाचि घनवटलि ॥
निंत्य नेम सारोनि ॥ ५९ ॥ तवं प्रहर दिवसु क्रमला ॥ मुळकासुर
युद्धासि आला ॥ वानरा धाकु पडिला ॥ परम कठिंण राक्षेसु
॥ ६० ॥ तंव भरतु उठिला ततक्षणी ॥ माथा ठेविला रामचरणि ॥

विभिषणा लक्ष्मणा नमुनि ॥ संग्रामा निघाला ॥ ६१ ॥ रणभुमिसि भरत विरू ॥ तयासि पाचारि मुलकासुरू ॥ मारूं आलासि तुं कवणाचा कुमरू ॥ हे न कळे काहि ॥ ६२ ॥ तो म्हणे मिं बंधु रामाचा ॥ प्राण घेईन तुमचा ॥ सांडि अभिमानु कालिचा ॥ संग्राम विषई ॥ ६३ ॥ दैत्य म्हणे तुं बोळसि बरवा ॥ माझा तुज न साहावे यावा ॥ मीं काळ तुजलागी मानवा ॥ प्रगटलो असे ॥ ६४ ॥ मुळकासुरे गदा भवंडिलि ॥ ते भरतावरि टाकिलि ॥ येरे बाणें निवारिली ॥ क्षण न लगतां ॥ ६५ ॥ तंव ते राक्षसे टाकिली सीला ॥ तेहि भरथे फोडिलि अवळिला ॥ राक्षसु म्हणें भलाभला ॥ सावध होई ॥ ६६ ॥ दोघे राहिले तवके ॥ बोल बोलति कवतिके ॥ राम लक्ष्मण माझे सखे ॥ त्याचे बळ मज आहे. ॥ ६७ ॥ असि भरताचि देखोनिं आगलिक ॥ मग मुळकासुरे दिधलि हाक ॥ शुळ टाकिला अग्निमुख ॥ भरतावरिं ॥ ६८ ॥ तोहिं बाणि त्रासिला ॥ भरत महा वीर आगळा ॥ म्हणें राक्षसा रहे उगळा ॥ महामूर्खा ॥ ६९ ॥ असे दोघा वीरासि ॥ युध्य जाले माहानेमेसि ॥ तंव जालि निसी ॥ सुर्यो अस्तु जाला ॥ ७० ॥ भरतु आला रामापासिं ॥ तो लागला चरणासि ॥ लक्षमनु म्हणें भागलासि ॥ त्रिभिषणु म्हणें भलाभला ॥ ७१ ॥ मुळकासुर लंकेसी गेला ॥ मंचकावरी वैसला ॥ मातेनें आळंगिला ॥ सीनलासी पुत्रा ॥ ७२ ॥ बा रे संग्रामु असाचि करितां ॥ आव जाला राक्षसां समस्ता ॥ येश आले रघुनाथा ॥ विभिषणासि राज्य ॥ ७३ ॥ तंव बोलिला मुळकासुरू ॥ माते हा न करि विचारू ॥ करिन रामाचा संव्हारू ॥ वांनरांसहित ॥ ७४ ॥ तव दिवसु उगवला ॥ मागुता संग्रामा आला ॥ तो विभिषणे देखिला ॥ सांगितले श्रीरामा ॥ ७५ ॥ तवं रामे विचारिलें ॥ नळनिळाकडें पाहिले ॥ दोघे ततक्षणि उठिलें ॥ लागले चरणा ॥ ७६ ॥ आज्ञा घेऊनि वांनरवीर ॥ सांग्रामा निघाले सत्वर ॥ हाति घेउनि तरूवर ॥ चालिले देखा ॥ ७७ ॥ तव राक्षसु क्रोधे धांविनला ॥ वांनरविरि हाकिला ॥ समस्ति मिळोनि वेढिला ॥ रामा रामा म्हणौनि ॥ ७८ ॥ रत्नासुर म्हणें म्या जावें ॥ तरि म्या सीकविले होते बरवें ॥ आतां भाग्ये माझे राघवें ॥ कृपा केली आहे ॥ ७९ ॥ तवं बिभिषण म्हणे मि ॥ शरणांगतु तुमचा स्वामिं ॥ तुमचे कृपेंचि पोसनि आम्हि ॥ चरणसेवा इच्छितो ॥ ८० ॥ तव लक्षमणु उठिला वेगें ॥ रामचंद्रा वंदिले सर्वांगे ॥ म्हणे कायेसा राक्षेस विभागें ॥ पाडिन आतां ॥ ८१ ॥ म्हणोनि हाति धनुषबाण ॥ घेउनि पाडिले निर्वाण ॥ राक्षसदळाचें

निर्दळन ।। आरंभिलें ।। ८२ ।। असो हे दोघे ते अतुर्बळि ।। आतां भिडतिल सवदळि ।। थरारील महितळी ।। तेणें आदळे ।। ८३ ।। तीक्ष्ण बाण घातलें लक्ष्मणें ।। ते राक्षसे निवारिले गदेनें ।। दोघे खवळले सत्राणें ।। वीरश्रीया भरोनि ।। ८४ ।। राक्षसु म्हणे लक्ष्मणा ।। तुं आलासि रणांगणा ।। मागें रामाचि संबोखणा ।। कवण करिल ।। ८५ ।। म्हणोनि बाण गुणि लाविला ।। क्रोधें लक्ष्मणावरि सोडिला ।। तो येरें निवारिला ।। वरिच्यावरी ।। ८६ ।। देखोनी राक्षसाचें बळ ।। मग उठावले वानरदळ ।। तेथें युद्ध जालि प्रबळ ।। झोटधरणि ।। ८७ ।। तव नळ निळ जांबुवंतु ।। अंगद सुग्रीव हनुमंतु ।। मिळुनि हाकिले दैत्यनाथु ।। मुळकासुर तो ।। ८८ ।। राक्षेसु तोंड पसरुनि धाविनला ।। वानरासि पळ सुटला ।। म्हणति माहाकाळु आला ।। गिळावया ।। ८९ ।। वानर थोर थोर रणि ।। लाताबुक्किसरिसे पडिले रणि ।। मग गेलें पळोनि ।। रामाआड ।। ९० ।। तव रामचंद्र उठिला ।। बाण धनुषीं लाविला ।। तवं राक्षेसु अदृश जाला ।। गेला कोणिकडे ।। ९१ ।। बाण सोडिला रघुनाथें ।। तो न लगेचि राक्षसातें ।। निर्फळ गेला गगनपंथे ।। अपुर्व वाटलें श्रीरामा ।। ९२ ।। मग पुसे बिभिषणासी ।। सांगा याचि गति कैसि ।। तव रत्नासुरू म्हणें परियेसी ।। रावा स्वामि ।। ९३ ।। हा मुळावरी असे जन्मला ।। याचा पराक्रमु आगळा ।। हा कुंभकर्णाऐसा प्रबळा ।। आनिवार सर्वा ।। ९४ ।। मुळकासुर म्हणे रामा ।। विचारु पुसा बिभिषणा अधमा ।। येणें तुम्हासि आणिलें संग्रामा ।। येथें माराव्यालागी ।। ९५ ।। रामु जे जे संधान करी ।। ते मुळकासुर निवारी ।। गर्जन करुनि अंबरी ।। म्हणे रामा सावध ।। ९६ ।। ऐसा संग्रामु जाला थोरु ।। राक्षेसु नावरे अनिवारु ।। रामासि पडिला विचारु ।। त्याचिया वधाचा ।। ९७ ।। जन्मोजयो म्हणे मुनिराया ।। पुढिल कथेच्या अभिप्राया ।। सांगावे रामराया ।। वर्तले कैसे ।। ९८ ।। प्रसंग ३ ।। सपूर्णमस्तु ।। ।। छ ।। ।। छ ।। ।। छ ।।

## ।। प्रसंग ।। ४ ।।

श्रीराम ।। तव दिनु अस्तमाना गेला ।। राक्षेसु निज गृहा आला ।। राम समस्तासी बैसला ।। विचार करूं ।। १ ।। बोलति सातहि जुत्पति ।। अति दुर्धर राक्षेसगति ।। याचि कैसेनि होय शांति ।।

विभिषणा लक्ष्मणा नमुनि ॥ संग्रामा निघाला ॥ ६१ ॥ रणभुमिसि भरत विरू ॥ तयासि पाचारि मुलकासुरू ॥ मारूं आलासि तुं कवणाचा कुमरू ॥ हे न कळे काहि ॥ ६२ ॥ तो म्हणे मिं बंधु रामाचा ॥ प्राण घेईन तुमचा ॥ सांडि अभिमानु कालिचा ॥ संग्राम विषई ॥ ६३ ॥ दैत्य म्हणे तुं बोलसि बरवा ॥ माझा तुज न साहावे यावा ॥ मीं काळ तुजलागी मानवा ॥ प्रगटलो असे ॥ ६४ ॥ मुळकासुरे गदा भवंडिलि ॥ ते भरतावरि टाकिलि ॥ येरे बाणें निवारिली ॥ क्षण न लगतां ॥ ६५ ॥ तंव ते राक्षसे टाकिली सीळा ॥ तेहि भरथे फोडिलि अवलिळा ॥ राक्षेसु म्हणें भलाभला ॥ सावध होई ॥ ६६ ॥ दोघे राहिले तवके ॥ बोल बोलति कवतिके ॥ राम लक्ष्मण माझे सखे ॥ त्याचे बळ मज आहे. ॥ ६७ ॥ अैसि भरताचि देखोनि आगलिक ॥ मग मुळकासुरे दिधलि हाक ॥ शुळ टाकिला अग्निमुख ॥ भरतावरि ॥ ६८ ॥ तोहिं बाणि त्रासिला ॥ भरत महा वीर आगळा ॥ म्हणें राक्षेसा रहे उगळा ॥ महामूर्खा ॥ ६९ ॥ अैसे दोघा वीरासि ॥ युध्य जाले माहानेमेसि ॥ तंव जालि निसी ॥ सुर्यो अस्तु जाला ॥ ७० ॥ भरतु आला रामापासिं ॥ तो लागला चरणासि ॥ लक्षमनु म्हणें भागलासि ॥ त्रिभिषणु म्हणें भलाभला ॥ ७१ ॥ मुळकासुर लंकेसी गेला ॥ मंचकावरी बैसला ॥ मातेनें आळंगिला ॥ सीनलासी पुत्रा ॥ ७२ ॥ बा रे संग्रामु अैसाचि करितां ॥ आव जाला राक्षेसां समस्ता ॥ येश आले रघुनाथा ॥ विभिषणासि राज्य ॥ ७३ ॥ तंव बोलिला मुळकासुरू ॥ माते हा न करि विचारू ॥ करिन रामाचा संव्हारू ॥ वांनरांसहित ॥ ७४ ॥ तव दिवसु उगवला ॥ मागुता संग्रामा आला ॥ तो विभिषणे देखिला ॥ सांगितले श्रीरामा ॥ ७५ ॥ तवं रामे विचारिलें ॥ नळनिळाकडें पाहिले ॥ दोघे ततक्षणि उठिलें ॥ लागले चरणा ॥ ७६ ॥ आज्ञा घेऊनि वांनरवीर ॥ सांग्रामा निघाले सत्वर ॥ हाति घेउनि तरूवर ॥ चालिले देखा ॥ ७७ ॥ तव राक्षेसु क्रोधे धांविनला ॥ वांनरविरि हाकिला ॥ समस्ति मिळोनि वेढिला ॥ रामा रामा म्हणौनि ॥ ७८ ॥ रत्नासुर म्हणें म्या जांवे ॥ तरि म्या सीकविले होते बरवें ॥ आतां भाग्ये माझे राघवें ॥ कृपा केली आहे ॥ ७९ ॥ तवं बिभिषण म्हणे मि ॥ शरणांगतु तुमचा स्वामि ॥ तुमचे कृपेंचि पोसनि आम्हि ॥ चरणसेवा इच्छितो ॥ ८० ॥ तव लक्षमणु उठिला वेगें ॥ रामचंद्रा वंदिले सर्वांगे ॥ म्हणे कायेसा राक्षेस विभागें ॥ पाडिन आतां ॥ ८१ ॥ म्हणोनि हाति धनुपत्राण ॥ घेउनि पाडिले निर्वाण ॥ राक्षेसदळाचें

निर्दळन ॥ आरंभिलें ॥ ८२ ॥ असो हे दोघे ते अतुर्बळि ॥ आतां भिडतिल सवदळि ॥ थरारील महितळी ॥ तेणें आदळें ॥ ८३ ॥ तीक्ष्ण बाण घातलें लक्ष्मणें ॥ ते राक्षसे निवारिले गदेनें ॥ दोघे खवळले सत्राणें ॥ वीरश्रीया भरोनि ॥ ८४ ॥ राक्षसु म्हणे लक्ष्मणा ॥ तुं आलासि रणांगणा ॥ मागें रामाचि संबोखणा ॥ कवण करिल ॥ ८५ ॥ म्हणोनि बाण गुणि लाविला ॥ क्रोधें लक्ष्मणावरि सोडिला ॥ तो येरें निवारिला ॥ वरीच्यावरी ॥ ८६ ॥ देखोनी राक्षसाचें बळ ॥ मग उठावले वानरदळ ॥ तेथें युद्ध जालें प्रबळ ॥ झोटधरणि ॥ ८७ ॥ तव नळ निळ जांबुवंतु ॥ अंगद सुग्रीव हनुमंतु ॥ मिळुनि हाकिले दैत्यनाथु ॥ मुळकासुर तो ॥ ८८ ॥ राक्षेसु तोंड पसरुनि धाविनला ॥ वानरासि पळ सुटला ॥ म्हणति माहाकाळु आला ॥ गिळावया ॥ ८९ ॥ वानर थोर थोर रणि ॥ लाताबुक्किसरीसे पडिले रणि ॥ मग गेलें पळोनि ॥ रामाआड ॥ ९० ॥ तव रामचंद्र उठिला ॥ बाण धनुषीं लाविला ॥ तवं राक्षेसु अदृश जाला ॥ गेला कोणिकडे ॥ ९१ ॥ बाण सोडिला रघुनाथें ॥ तो न लगेचि राक्षसातें ॥ निर्फळ गेला गगनपंथे ॥ अपुर्व वाटलें श्रीरामा ॥ ९२ ॥ मग पुसे विभिषणासी ॥ सांगा याचि गति कैसि ॥ तव रत्नासुरु म्हणें परियेसी ॥ राघवा स्वामि ॥ ९३ ॥ हा मुळावरी असे जन्मला ॥ याचा पराक्रमु आगळा ॥ हा कुंभकर्णाऐसा प्रबळा ॥ आनिवार सर्वा ॥ ९४ ॥ मुळकासुर म्हणे रामा ॥ विचारु पुसा विभिषणा अधमा ॥ येणें तुम्हासि आणिलें संग्रामा ॥ येथें माराव्यालागी ॥ ९५ ॥ रामु जे जे संधान करी ॥ ते मुळकासुर निवारी ॥ गर्जन करुनि अंबरी ॥ म्हणे रामा सावध ॥ ९६ ॥ ऐसा संग्रामु जाला थोरु ॥ राक्षेसु नावरे अनिवारु ॥ रामासि पडिला विचारु ॥ त्याचिया वधाचा ॥ ९७ ॥ जन्मोजयो म्हणे मुनिराया ॥ पुढिल कथेच्या अभिप्राया ॥ सांगावे रामराया ॥ वर्तले कैसे ॥ ९८ ॥ प्रसंग ३ ॥ सपूर्णमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

## ॥ प्रसंग ॥ ४ ॥

श्रीराम ॥ तव दिनु अस्तमाना गेला ॥ राक्षेसु निज गृहा आला ॥ राम समस्तासी बैसला ॥ विचार करूं ॥ १ ॥ बोलति सातहि उत्पति ॥ अति दुर्धर राक्षेसगति ॥ याचि कैसेनि होय शांति ॥

ते सांगा विभिषणा ॥ २ ॥ तवं विभिषणु म्हणे रघुपति ॥ जरि येथें असति सीता सती ॥ तरि जयो येता आमुचे हाति ॥ तियेचेनि सत्व-बळें ॥ ३ ॥ तरि आइका हो रघुनाथा ॥ आज्ञा दिजे हनुमंता ॥ वेगी आणावि सीता ॥ तियेचेनि जयो तुम्हा ॥ ४ ॥ वचन मानलें श्रीरामा ॥ म्हणें हनुमंता पल्वंगमा ॥ सीता घेउनि येई आम्हा ॥ जयो तिचेयेनि असे ॥ ५ ॥ मग तो गगनमार्गे उडाला ॥ आयोध्या नगर पावला ॥ लवलाहे मंदिरा आला ॥ श्रीरामाच्या ॥ ६ ॥ सोमवारि रात्रि अवस्वरी ॥ सीता वैसलि मंचकावरि ॥ तंव हनुमंत देखिला समोरि ॥ देखोनि मनि वोचकलि ॥ ७ ॥ सर्वांगी वोसावलि ॥ मुखि कोमाईलि ॥ हनुमंताकडे पाहों लागली ॥ विव्हळ होउनियां ॥ ८ ॥ म्हणें बा रे हनुमंता ॥ सांग रामाचि वेवस्था ॥ सांडोनि आलासि रघुनाथा ॥ सांग आम्हा ॥ ९ ॥ मग सीतेपासि सांगे हनुमंतु ॥ माते सुखी आहे रघुनाथु ॥ भरत लक्ष्मणादि समस्तु ॥ सुखे आहेति ॥ १० ॥ संग्राम जाला प्रबल ॥ वायेवटले आमचे दळ ॥ बहुत आटले राक्षसकुळ ॥ परि नागवे दैत्यु ॥ ११ ॥ दैत्ये पीडिले वांनर ॥ राक्षस पडिले थोर थोर ॥ लहु घाई जाला जर्जर ॥ तव जानकि वोचकलि ॥ १२ ॥ म्हणें बा रे हनुमंता ॥ सत्य सांग वेवस्था ॥ माझिया पुत्राचि वार्ता ॥ कैसि आहे ॥ १३ ॥ बा रे स्वप्न देखिले लहुवरि ॥ सायंकाळि मंगळवारि ॥ लहु बाणे भेदिला शरीरी ॥ निचेष्टितपणें ॥ १४ ॥ माते आइक सत्य बोलि ॥ सर्वहि कल्याण युध्यकाळि ॥ तुं वो चाल पां वहिलि ॥ श्रीरामे बोलाविलें ॥ १५ ॥ मग सीता उठिलि ॥ सुमित्रे कौसल्ये पुसो लागलि ॥ वेवस्था सांगीतली ॥ लहुवाचि ॥ १६ ॥ मज रामे बोलाविलें ॥ म्हणौनि जाणे लागेल ॥ मग नमन केले ॥ दोघिजनिसि ॥ १८ ॥ मग निघाली बाहेरि ॥ हनुमंते वाइलि सिरि ॥ मग उडाला झडकरि ॥ गगनमार्गे ॥ १८ ॥ जैसा गगनि सूर्ये जातु ॥ तैसा हनुमंतु शोभतु ॥ आला रामचरण स्मरतु ॥ समस्ता देखता ॥ १९ ॥ सीता राम चरणा लागली ॥ सर्वांगी वोसावली ॥ भोवति सभा न्याहाळिली ॥ परि पुत्राते न देखे ॥ २० ॥ मग लक्ष्मणासि सीता पुसें ॥ म्हणें लहु कोठे असें ॥ तो म्हणें क्षेम असें ॥ चिंता न करी ॥ २१ ॥ मग सीतेने रामासी पुसिलें ॥ कामचे कार्य काय मांडलें ॥ उतावळे-पणें बोलाविलें ॥ ते सांगा स्वामी ॥ २२ ॥ तो म्हणें सीते पवित्र ॥ मुळकासुरासि करावे क्षेत्र ॥ ऐसे तुमचेनि नांवे सुत्र ॥ निर्मिले असे ॥ २३ ॥ तव सीता मनि हे हो संकीत ॥ आम्हा तुमचि आज्ञा समर्थ ॥ आजि देहाचे

मार्थक ॥ तुमचे कां जिवि नटले ॥ २४ ॥ मग बोलिली सीता ॥ काई काजि लक्ष्मिकांता ॥ तुम्हि विपरीत बोलता ॥ आम्हा चोज वाटें ॥ २५ ॥ रामु म्हणे तुम्हावेगळें छत्र नव्हे ॥ हा सत्य विचारू आहें ॥ तव सिता पाहे ॥ हनुमंताकडे ॥ २६ ॥ रामे सीतेसी रथ दिधला ॥ आपुला धनुषबाण समर्पिला ॥ हनुमंतासि आज्ञा करिता जाला ॥ तुम्हीं सारथि होईजें ॥ २७ ॥ येरि रामचरणा लागोनि ॥ चालिलि युद्धालागुनि ॥ समस्त विस्मित मनि ॥ जाले ते काळि ॥ २८ ॥ तव रथु जात रणपंथी ॥ हनुमंतासारिखा सारथि ॥ राक्षस पडिल क्षिती ॥ ते दावितु सीतेप्रती ॥ २९ ॥ पैल विकटासुर पडिला ॥ तो लहुवे वधिला ॥ आणि थोर पराक्रमु केला ॥ रायें भरतें ॥ ३० ॥ पैल पाडिला पीठासुरू ॥ बहुत झुंझनला भरत वीरू ॥ त्याचिया संग्रामाचा चमत्कारू ॥ किति सांगो माये ॥ ३१ ॥ आसाविरू गीळावया आला ॥ तो लक्ष्मणें वधिला ॥ थोर लांगुळ केला ॥ तवं पातली संग्रामभूमी ॥ ३२ ॥ ऐसी रणभूमीके आली ॥ तवं मुळकासुरा मातु गेली ॥ म्हणती रणभूमी जिंतिली ॥ रघुनाथे पैं ॥ ३३ ॥ तवं मुळकासुर संग्रामा आला ॥ तव श्रीरामु रथि देखिला ॥ हनुमंत सारथी बैसला ॥ रथाचे धुरे ॥ ३४ ॥ तंव राक्षेसु म्हणें पवनपुत्रा ॥ मागुता आलासि रे वांनरा ॥ लाज नाहि तुज पालेखाईरा ॥ तोंड दाखविली मजपासी ॥ ३५ ॥ जेणें रणि पळोनि जावें ॥ तेणें मागुते तोंड न दाखवावे ॥ मारावें कीं मरावें ॥ हाचि क्षत्रधर्मु ॥ ३६ ॥ तुम्हा वांनरां नाहीं लाज ॥ हे क्षत्रधर्मांची नव्हें बोज ॥ आतां माझि पाहें पैज ॥ मर्कटा तुं ॥ ३७ ॥ चोरुनि सीता शुद्धि करिसी ॥ वन विध्वांसिले निसि ॥ माळी मारीला ते आम्हासी ॥ न चले येथें ॥ ३८ ॥ तुझि जाणतो आंगवन ॥ तुवां जाळिले लंकाभुवन ॥ बापुडा भोळा रावण ॥ तुझिया बोला पातला ॥ ३९ ॥ तुं वानरु सदा कपटि ॥ तुझि बुद्धि सदा खोटि ॥ लंका जाळिली मर्कटचेष्टी ॥ ते न चले येथें ॥ ४० ॥ बोलता हडते भोवते पाहें ॥ तवं राम रथीं दिसत आहे ॥ मग आपणाकडें पाहे ॥ तंव रामु स्वयें दिसतु ॥ ४१ ॥ तवं मुळकासुरा नवल वर्तले ॥ पळो ऐसे विचारिलें ॥ भोवते रामातें देखिलें ॥ मग बोचकला मनि ॥ मी कोठे जावो पळोनि ॥ संग्रामु करू धीर धरोनि ॥ हेचि बुद्धि थोर ॥ ४३ ॥ मग मुळकासुर म्हणें रामा ॥ तु आला असासि संग्रामा ॥ तरि निर्वाणपणे तुज आम्हा ॥ युध्य करणें आतां ॥ ४४ ॥ तंव सीतेणें कास घातली ॥ हनुमंतावरी उभि राहिली ॥ धनुषबाण करीं

माउली ॥ शोभली रणि ॥ ४५ ॥ क्रोधें धनुपा वाईला गुणी ॥ तेणें दडपला पवननंदनु ॥ गर्जिनला भुभुकार देउनु ॥ चरणातली ॥ ४६ ॥ पाताळी धाकु पडिला ॥ शेषु चळवळिला ॥ समुद्र खळवळिला ॥ तेणें घोषें ॥४७॥ धनुषा वोढि काढिली ॥ तेणें सप्त पाताळे खवळली ॥ स्वर्गे येकवीस डळमळिली ॥ हालवली पृथ्वी ॥ ४८ ॥ चंद्र सूर्ये धाकिनले ॥ सर्व लोक वोचकलें ॥ धूमडंळ खळबळिलें ॥ म्हणती काये जालें ॥ ४९ ॥ तव मुळकासुरें पाहिलें ॥ रामासारिखें रूप भासलें ॥ आतां आस्त्रीचे रूप प्रगटलें ॥ थोर नवल वाटलें ॥ ५० ॥ पाहे तवं आस्त्रिचे रूप ॥ क्षण दिसे पुरूषांचें रूप ॥ म्हणें नवल हे समिप ॥ वोडवले आम्हा ॥ ५१ ॥ तंव तेणे बाण सीतेवरी सोडिला ॥ येरि पालवें करुनि वारिला ॥ देखोनि राक्षेसु विस्मित जाला ॥ निर्फळ जाले संधान ॥ ५२ ॥ पाहे तव शक्तिचे रूप ॥ महाविशाळ स्वरूप ॥ राक्षसा आंगी सुटला कांप ॥ बाण वोटें राहिली ॥ ५३ ॥ तंव सीतेनें बाणु घेतला करी ॥ लोपले सूर्यतेज अंबरी ॥ तारांगणे भूमिवरी ॥ येउनि पडिली ॥ ५४ ॥ हनुमंते वरते पाहिले ॥ तंव बिशाल रूप देखिले ॥ दृष्टिचे तेज खचलें ॥ नयने झांकिलें ॥ ५५ ॥ रामाचे कटकी बोलति ॥ संग्रामा गेली सीता सती ॥ काये होईल निश्चिती ॥ योजवेना ॥ ५६ ॥ आतां असो हे कथन ॥ सीतेनें टाकुनिया बाण ॥ शिर नेले पैं छेदुन ॥ समुद्रतीरीं पाडिलें ॥ ५७ ॥ शिर पडता दिधली हाक ॥ तेणें दचकलें तीन्ही लोक ॥ लंकेसि पडिले ठंक ॥ काये हो कोसळले ॥ ५८ ॥ मग हनुमंते उठुनि ॥ लागला सीतेचे चरणि ॥ माये तुं जगत्रजंदनि[1] ॥ चैतन्येगाभा ॥ ५९ ॥ जानकी म्हणें हनुमंता ॥ दैत्यसिर आणि पां सर्वथा ॥ येरे शिर आणावया त्वरिता ॥ आला समुद्रतीरीं ॥ ६० ॥ सदकष्टि शिर उचलिले ॥ मेरूऐसे देखिले ॥ सीतेपासी आणिलें ॥ आज्ञेसरिसें ॥ ६१ ॥ सीता म्हणें हनुमंता ॥ आम्ही वधिलें दैत्यनाथा ॥ ऐसे रामापासी सर्वथा ॥ बोलिजेत नाहीं ॥ ६२ ॥ आतां तुवां पुढे चलावें ॥ हाति शिरकमळ घ्यावे ॥ रामभेटिचेनि भावें ॥ उत्कंठा मज ॥ ६३ ॥ ऐसी येताति झडझडा ॥ रथचक्र धडधडा ॥ वांनर पाहाति चहुंकडा ॥ तंव सीता आली ॥ ६४ ॥ राम सांगे गोष्टी वांनरा ॥ माझि बाहु स्फुरतसे अवधारा ॥ आतां सीता येईल निर्धारा ॥ सत्यचि जाण ॥ ६५ ॥ तवं अंगदु धांवतु आला ॥ म्हणे विजई

१ ‘ जननी ’ किंवा ‘ नंदनी ’ पाहिजे.

जालि जनकबाळा ।। हनुमंते शिरकमळा ।। आणिल असे ।। ६६ ।। ग्रामापासी सीता आली ।। भावें चरणासी लागली ।। येरें आळंगिली ।। बैसविली सन्मुख ।। ६७ ।। रामे शिर पाहिले ।। तवं पर्वतासमान देखिले ।। म्हणें शंकरे वरदान दिधले ।। गणिता वेगळें । ६८ ।। रामु विस्मयो करितु ।। हनुमंतु श्वासु सांडितु ।। नळ नीळ जांबुवंतु ।। पाहाती माहा विशाळ ।। ६९ ।। येंके पोटे पीटितो ।। येक अतोतो म्हणती ।। येके भेगें लपती ।। पाहावया दृष्टी ।। ७० ।। येक म्हणति हनुमंते मारीला ।। येक म्हणती सीतेनें वधिला ।। परि निश्चयो कोन्हाला ।। नकळे तेथें ।। ७१ ।। रामु पाहे हनुमंताकडें ।। तरी तो खुणेंचि सांगे निवाडे ।। मग सीतेप्रति प्रीतिकोडे ।। बोलों आरंभिलें ।। ७२ ।। जवं रामु म्हणें सीते तुम्ही ।।[४] थोर कार्य केले संग्रामी ।। राक्षेसु मारिला पराक्रमी ।। दुर्धरू माहा ।। ७३ ।। तंव बोलिली सीता ।। म्हणें हे काइ बोलिलेति रघुनाथा ।। तुमचे कार्ये तुम्हि कर्ता ।। सर्वहि कांहीं ।। ७४ ।। मीं कोण किंकर ।। वधिन निशाचर ।। सकळासि तुमचा आधार ।। ब्रम्हांडधिशा रामा ।। ७५ ।। असो हे शिर ठेविले झांकोनि ।। बैसले वांनर सभास्थानीं ।। तवं मुळकासुराचें भुवनि ।। माहा आकांतु वर्तला ।। ७६ ।। श्रीरामु म्हणें हनुमंता ।। विडे द्यावे समस्ता ।। सीता म्हणें रघुनाथा ।। लहु कोठे आहे ।। ७७ ।। तवं रघुनाथें वांनरा ।। सांगोनि आणविले लहुवा वीरा ।। येरें येउनि अवधारा ।। चरणावरी लोटला ।। ७८ ।। तंव तो सीते आळंगिला ।। समस्ती जयजयकारु केला ।। चिंता उद्वेग फिटला ।। बिभिषणा रायाचा ।। ७९ ।। आतां जयेमुनि म्हणें जन्मोजया ।। तया मुळकासुराचि जे भार्या ।। कोण गती होईल त्या अभिप्राया ।। सांगें नामा विष्णुदासु ।। ८० ।। प्रसंग ।। ४ ।।

## ।। प्रसंग ।। ५ ।।

श्रीराम ।। रूद्रावती होती बैसली ।। तेथें लिंगावती आली ।। म्हणें मुळकासुरा मुक्ती जाली ।। काय बैसलिस निवांत ।। १ ।। तंव ते धरणिवरी लोळे ।। केंस सुटलें मोकळे ।। म्हणें आजि जास्वनिळे ।। उदास केलें ।। २ ।। म्हणें पती गेला निज वनि' जे ।। मागे

४ धामी ?

कैसेनि राज्य कीजें ॥ तयावीण केवि जि(णि)जे ॥ भुईभारु ॥ ३ ॥ म्हणती थोर संग्रामु जाला ॥ भ्रतारू तुझा पडिला ॥ हनुमंतु शिर घेउनि गेला ॥ रामापासा ॥ ४ ॥ आईकतांचि पडिली ते मूर्छित ॥ आली मेनावती धांवत ॥ मंदोदरी आली तेथें ॥ आक्रांतु जाला ॥ ५ ॥ मग सावध होउनि रूद्रावती ॥ म्हणे रडता हानि होय सत्वगती ॥ जाइन प्रियासंगे यथार्थी ॥ सत्वबळें ॥ ६ ॥ परी शिर नेलें राघवें ॥ यासि स्या काय करावें ॥ मग मंदोदरी सांगे बरवें ॥ हित तयेचें ॥७॥ तुवों सत्वधीर मानसी ॥ परि सांगो ते अग्नीसेवेसी ॥ तरि बुद्धि माझि परियेसी ॥ सांगेन येकी ॥ ८ ॥ रामासी जाउनि शरण ॥ मागावें पतिशिर आपण ॥ ते स्वधर्माचे आचरण ॥ आचरावे सर्वथा ॥ ९ ॥ म्हणसी वैरियांचे सभेसि ॥ केवि अस्त्रियेसि जाववें परियेसी ॥ दुष्ट भावें राखती तरि त्यासीं ॥ मी काय करूं ॥ १० ॥ तरि तुम्हा न करि विचारू ॥ तो येकपत्नि रघुवीरू ॥ परस्त्रीसोहदरू ॥ कृपाळु भक्ताचा ॥ ११ ॥ तो मायेबापु रामु आमुचा ॥ हनुमंत केवळ शंकरू नेमाचा ॥ ब्रह्मचारि अमुचा ॥ स्वामी सखा ॥ १२ ॥ बीभिषणु सासुरा ॥ असे आप्तवर्ग विचारा ॥ भावे बोळंगुनि रघुवीरा ॥ पतीशिर मागीजे ॥ १३ ॥ ऐसी बहुतापरि सिकाविली ॥ येरी तैसीच निघाली ॥ मनि रामुपाउलें स्मारिली ॥ जें भवदुःखदायकें ॥ १४ ॥ सांगा ते किंचित दळभारू ॥ लोक विचारवंत थोर थोरू ॥ भाट नागरिक चतुरू ॥ घेउनि वेगी चालिली ॥ १५ ॥ कटकाजवळीके आली ॥ तंव वांनरी देखिली ॥ भुभुकारें गर्जिनली ॥ वांनरदळें ॥ १६ ॥ येक तरूवर घेती ॥ येक गिरिवर झेलिती ॥ येक भुभुकारे हाकिती ॥ युध्यालागी ॥ १७ ॥ येक म्हणती माव करू ॥ राक्षस येईल कपटधरू ॥ याचा विश्वासु नये करू ॥ सर्वथा जाण ॥ १८ ॥ जवं सिळा घालूं पाहाति वरी ॥ तव ते रामनाम उच्चारी ॥ वांनर म्हणती झडकरी ॥ श्रुत करा श्रीरामा ॥ १९ ॥ ऐसा गजरू जाला ॥ राम बिभिषणु पाहिला ॥ तंव तो विनवु लागला ॥ हे राणि मुळकासुराची ॥ २० ॥ देवा ईचे नाव रूद्रावती ॥ आली तुझिया दरूपणाप्रती ॥ तवं बोलिली सीता सती ॥ येउं द्या तीसी ॥ २१ ॥ जयाचि दृष्टि निर्मळ ॥ जो भक्तजन कृपाळ ॥ तो पतिव्रता वंदिला केवळ ॥ राजारामु ॥ २२ ॥ हिरे रत्ने माणिके ॥ नीळ गोमदें अलोलिकें ॥ आणिली श्रीरामासी कौतुकें ॥ भेटीलागी ॥ २३ ॥ आजि देखिला अयोध्याराज ॥ विनवी मुळकासुराचि भाज ॥ म्हणे आतां सफळ

काज ॥ रामदरूषण माझे ॥ २४ ॥ भाट म्हणति सूर्यवंशा उत्तमा ॥ उदारा गंभीरा श्रीरामा ॥ जानकीवल्लभा आवाप्तकामा ॥ कृपानिधी ॥ २५ ॥ रामा तु उदाराचा उदारू ॥ रामा तुं परनारी-सोंहदरू ॥ रामा तुं निराधारा आधारू ॥ सर्व जिवाचा ॥ २६ ॥ रामा तुं निजाचें निज ॥ रामा तुं सर्व जिवाचें बीज ॥ आतां आमचे सफळ काज ॥ तुझिया दरूषणें रामा ॥ २७ ॥ रामा तुं अकळ न कळेसि ॥ रामा तुं सर्वरूपे अवतरसि ॥ रामा तु वज्रपंजर होसी ॥ शरणांगताळागी ॥ २८ ॥ अहिल्याउध्दरणा रामा ॥ जयेजये कृपाळुवा निजधामा ॥ धर्मस्थापक पुरूपोत्तमा ॥ परम कल्याण तुज ॥२९॥ ऐसा भाटिं वानिला ॥ तवं पतिव्रातेणें विनविला ॥ जये जये स्वामी कृपाळा ॥ सूर्यवंशा मंडना ॥ ३० ॥ तरि विनंति परियेसि रघुपती ॥ मीं शिर मागतसें तुज-प्रती ॥ जो तु कृपाळु सीतापती ॥ धर्मस्थापका ॥ ३१ ॥ निमालिया स्वपती ॥ मीं तव होईन सती ॥ हा स्वधर्म रघुपती ॥ सिध्धितें पाववी ॥ ३२ ॥ पतीशिर देउनि राघवा ॥ माझा स्वधर्म सिध्धि पावावा ॥ हेचि विनंती कृपाळुवा ॥ माझी आहे ॥ ३३ ॥ रामा तुझि गुण किर्ती वर्णिता ॥ शेपु श्रमला सर्वथा ॥ मौन्य पडिले वेदांता ॥ तेंथे मी मूर्ख ते किती ॥ ३४ ॥ विनंती आईक रे रघुनाथा ॥ तुं आमचा मोक्षदाता ॥ तरि शिर देउनि मोक्षपंथा ॥ पाठवी मज ॥ ३५ ॥ पुढें पती येकला गेला ॥ आम्हासी हाकारा अभे केला ॥ शंभु कैलासपती आम्हाला ॥ बोलाविले सेवेसी ॥ ३६ ॥ तव बोलिली सीता सती ॥ तुम्हा दोघां ऐसी प्रीती ॥ तरि शिर हांसवी आम्हाप्रती ॥ सत्व दाखवितु ॥ ३७ ॥ तव रामे हनुमंताकडे पाहिलें ॥ मग ते शिर आणीलें ॥ रुद्रावतीपुढें ठेविलें ॥ वांनरवीरीं ॥ ३८ ॥ पालव होते गुंडिलें ॥ ते उघडे वो पैं केले ॥ अशुध्द उदके पुसिलें ॥ कस्तूरी लल्हाटि लाविली ॥ ३९ ॥ कैसि विशाळ हनुवटी ॥ रुद्रावती पाहे दृष्टी ॥ तुम्हीं येणें केले वैकुंठी ॥ मज नाहीं पुसिलें ॥ ४० ॥ शिराप्रति बोले महा सती ॥ वांनर कवातिक पाहती ॥ कैसे निर्जिव शिर हांसेल युक्ती ॥ पाहो ईची ॥ ४१ ॥ आहो जि मुळकासुरा राया ॥ आलासि रामाचिया पायां ॥ आजि शून्य पडिली तुझि पया[१] ॥ वसविले वन ॥ ४२ ॥ अहो मुळकासुरा तुजप्राति ॥ तरि हासावें ये सभेप्रति ॥ कौतुक पाहति सत्वास्थिती माझि ये काळीं ॥ ४३ ॥ तुम्ही स्वर्गासी गेलेति येकले ॥ केवि मज विसरले तिये वेळें ॥ प्राणनाथा तुम्हाविण

१ शय्या.

येकले ॥ राहो केवि ॥ ४४ ॥ करूणाशब्दें म्हणें आजी ॥ परि सांडु द्या हो जि ॥ वेगीं रामसभेमाजि ॥ हास्य कीजे ॥ ४५ ॥ मग म्हणें मनांत ॥ जरि मीं पतिव्रता नेमस्त ॥ तरी शिर आतां हासो त्वरित ॥ म्हणोनि संकल्प करी ॥ ४६ ॥ तवं शिर गदगदा हांसिलें ॥ सभालोक तटस्त जालें ॥ रूद्रावतीने सत्व दाखविलें ॥ रामापासीं ॥ ४७ ॥ तंव राम कृपें कळवळिला ॥ म्हणें पतिविण नारीस प्रळयो आला ॥ या दोघाचा प्रतिकार मळा ॥ आम्ही विघडिला हे अनुचित ॥ ४८ ॥ मग रामु म्हणें अवो सत्वधिरें ॥ उठविन तुझा पति ये अवस्वरें ॥ तवं ते म्हणें उदारें रघुवीरें ॥ कृपा कीजे ॥ ४९ ॥ तेथें बिभिपणु वोलिला ॥ हा उठवितांचि पीडिल आम्हाला ॥ फोडिल धर्माचि सिळा ॥ अधर्म होईल जगीं ॥ ५० ॥ तरी हे सर्वथा अनुचित रघुनाथा ॥ केवि व्याघ्रासुखि गाये देता ॥ मग विभीपणाचे बोलें तत्वता ॥ निवांत राहिला ॥ ५१ ॥ मग म्हणें वानरपती ॥ बाई शिर घेउनि जाये त्वरिती ॥ आपल्या स्वधर्माचि गती ॥ सिद्ध पाववी ॥ ५२ ॥ मग नमन करूनि श्रीरामा ॥ म्हणें उदार मेघशामा ॥ कृपा केली आम्हा ॥ जन्मोजन्मी ॥ ५३ ॥ मग शिर घेउनि पतिव्रता ॥ आलि निकुंबळेंसि सर्वथा ॥ धडाचिं वेवस्था ॥ सांगीतली होती ॥ ५४ ॥ तेथें चंदन बेल काष्टाचे भारें ॥ राक्षेसि केले डोंगर ॥ अग्नि प्रजळुनि सत्वेरे ॥ उभि राहिली ॥ ५५ ॥ तेथें मंदोदरि आदि करूनि ॥ सासा आलिया ततक्षणि ॥ तयाचे चरण वंदुनि ॥ धर्मसिळेवरी आलि ॥ ५६ ॥ मग समस्त दिशा नमस्कारूनि ॥ शिव भवानी स्मरोनि ॥ उडिया घातलि ततक्षणिं ॥ अग्निमाजिं ॥ ५७ ॥ ऐसा जाला मुळकासुरवधु ॥ जेणें समस्ताचा पराभविला गर्व मदु ॥ अंकुशाऐसा वीर प्रबुद्धु ॥ राणि जिंतिलें ॥ ५८ ॥ म्हणोनि गर्व सर्वथा न किजें ॥ आहंकारू अवघा सांडिजे ॥ हीनपणें असिजें ॥ ईश्वर स्मरूनि ॥ ५९ ॥ ऐसि सति जालियावरी ॥ रामें बोलाउनि मंदोदरी ॥ ते आली झडकरी ॥ रामाजवळी ॥ ६० ॥ राम पाई ठेविला माथा ॥ म्हणें जये जये रघुनाथा ॥ कृपा करि आतां ॥ भक्तावरी ॥ ६१ ॥ रामु म्हणें विभीपणा ॥ मंदोदरिच्या कीजे पाळना ॥ मातेऐसें सरंक्षणा ॥ करूनि राहिजें ॥ ६२ ॥ मग मेनावती बोलाविली ॥ रत्नासुराचे हाति दिधली ॥ रामु कृपाळु माउली ॥ समस्तासी निवविलें ॥ ६४ ॥ मग वांनरी नेउनि बिभिपण ॥ भद्रिं बैसाविला पूर्ण ॥ वाजांत्रि गगन संपूर्ण ॥ जाले ते काळी ॥ ६५ ॥ आतां असो हे वित्पत्ती ॥ अयोध्ये निघाला सीतापती ॥ बिभिषणु लंकापती ॥ राहिला सुखें ॥ ६६ ॥ राम सागरू उतरला ॥

तव विभिषणु चरणा लागला ॥ तेथें रत्नागुरू बोलिला ॥ अगडु करावा लंकेभोंवता ॥ ६७ ॥ मग धनुष गोसा फिरविला ॥ लंकेसि अगडु जाला ॥ कोन्हि जावो न लाहे ऐसा केला ॥ अगडु देखा ॥ ६८ ॥ असो हे राम सीता आयोध्येसी ॥ आले भेटलें शत्रुघ्नासी ॥ नमन केलें कैकैयेसि ॥ समस्ता देखता ॥ ६९ ॥ अयोध्या नगरी शृंगारिली ॥ जैसिं शिवपुरी सिरवली ॥ आनंद गुढी उभारिली ॥ सर्व लोकी ॥ ७० ॥ तवं सुमित्रा कौसल्या ॥ येउनि भेटल्या रामराया ॥ तो आनंदु सांगता माझिया ॥ मना धनि उपरे[1] ॥ ७१ ॥ म्हणणे कैसे नवल या रामाचे ॥ राज्य बुडविलें रावणाचे ॥ सीतेचेनि कैवारी विभिषणाचे ॥ हित जालें ॥ ७२ ॥ रावणाचे मुळि सिता बैसली ॥ रावणा राज्याचि होळि केली ॥ कैसिं ढाळ या मांडिली ॥ धाकुटपणीची ॥ ७३ ॥ ऐसि कैकैयेचि दुष्ट वाणी ॥ रामु बैसला सिंहासनि ॥ समस्त लोक मिळोनि ॥ रामासी भेटलें ॥ ७४ ॥ मग किष्किंदेचियां लोकां ॥ भोजन करविलि सकळिका ॥ आदि करूनि देखा ॥ तयेवेळी ॥ ७५ ॥ विस्तारिल्या हो पंक्ती ॥ वांनर भोजनि बैसती ॥ वाढिति जाली सीता सती ॥ जनकात्मजा ॥ ७६ ॥ जैसि कामधेनु क्षीरसागरू ॥ तैसी जानकी अमृतकारू ॥ धाले देती ढेकरू ॥ सकळिक तेथे ॥ ७७ ॥ विडे दिधलें समस्तासी ॥ श्रीरामु भद्रासनि नेमसि ॥ बैसला सकळ सभा शोभेसी ॥ अधिष्ठान जाली ॥ ७८ ॥ मग सुग्रीव राजा वांनरू ॥ रामचरणा करी नमस्कारू ॥ आज्ञा पुसता रघुवीरू ॥ संतोष पावला ॥ ७९ ॥ तयासि मुगुट दिधला ॥ येरू चरणासिं लागला ॥ मग निघता जाला ॥ निज नगराप्रति ॥ ८० ॥ तवं अंगदे नमस्कारू केला रामासी ॥ हातीची मुद्रिका दिधलि तयासी ॥ येरू जयेराम म्हणौनि सीसि ॥ वंदिता जाला ॥ ८१ ॥ अंगदा म्या मारिलें वाळीसी ॥ ते दुःख विसरूनि आम्हासी ॥ थोर कार्या आलासी ॥ ऐसा उपकारि तु ॥ ८२ ॥ तव अंगदु म्हणें स्वामी ॥ तु सकळाचें अंतर्यामी ॥ तुझेनि सर्व कार्ये सिद्धी आम्ही ॥ तुझे दास ॥ ८३ ॥ मग नळनिळें नमस्कारू केला ॥ रामु त्यासि उचिता आला ॥ हारू कंठिचा दिधला ॥ अमोलिक रत्नाचा ॥ ८४ ॥ तैसेचि जांबुवंतें ॥ वंदिलें श्रीरामातें ॥ येरें आळंगुनि प्रेमभरीतें ॥ चिरंजीव केला ॥ ८५ ॥ याचीपरि वांनर थोरथोर ॥ जे देवाचें अवतार ॥ उचितें सुखी केले समग्र ॥ हनुमंत आदि करूनि ॥ ८६ ॥ मग वंदुनि तिहि रामराणा ॥ निघालें आपुल्या स्थाना ॥ अति हरुष सकळाच्या मना ॥

---

१ 'न पुरे' पाहिजे.

गगन आक्रमित चालिलें ॥ ८७ ॥ रामु म्हणें हनुमंता तुज काय द्यावे ॥ तुझे उपकार काये उत्तिर्ण व्हावे ॥ तुवा सर्वा ठाई असावे ॥ आम्हाकारणें ॥ ८८ ॥ तव येरु म्हणें हा असो उपचारू ॥ आम्हासी दिजे नाभिंकारू ॥ मागुता तुझे भेटिचा अवसरू ॥ लाधु-द्यावा ॥ ८९ ॥ तव रामु म्हणे कळिचें पाहारि ॥ भेटी देईन कृष्ण-आवतारी ॥ पश्चमे द्वारकेमाझारी ॥ गोमतितटी ॥ ९० ॥ तवं वांनर म्हणति राघवा ॥ आजि क्षीरसागरू जेविलो देवा ॥ तोचि मागुता आम्हासि द्यावा ॥ हेचि मागतसों ॥ ९१ ॥ रामु म्हणें अवतार गोकुळीं ॥ आम्हीं तुम्हीं गोपाळ मेळीं ॥ गाई चारो पांवळि ॥ तैं क्षीरसागरू संपूर्ण ॥ ९२ ॥ औसि भाक दिधली ॥ समस्तासी आज्ञा जाली ॥ मग सीता बोलिली ॥ हनुमंतासीं ॥ ९३ ॥ तु केवळ माये बाप येकु ॥ तु माझा कुळदीपकु ॥ तु माझा जनकु ॥ सखा सर्वथा ॥ ९४ ॥ म्हणौनि हार काढुनि कंठिचा ॥ हनुमंता दिधला प्रेमप्रीतीचा ॥ तो युगानयुगी सीतेचा ॥ प्रसाद हनुमंतासी ॥ ९५ ॥ औसि हे रामकथा पवित्र ॥ जे आईकति नित्य मुक्त ॥ भवदुःखाचे आवर्त ॥ तया न लगती जाण ॥ ९६ ॥ जयेमुनि म्हणें जन्मेंजया ॥ रामकथा संपूर्ण येथुनियां ॥ विस्णुदास नामा म्हणे श्रोतया ॥ प्रेम-भावें आईकिजे ॥ ९७ ॥ प्रसंग ॥ ५ ॥

॥ संपूर्णमस्तु ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु

श्री

# विष्णुदास नामाकृत लवकुशाख्यान

श्रीरामचंद्राय नमः ॥ श्रीगुरू तुझी कृपादृष्टि । मज सांपडली राम-नामाची पेटि ॥ तेणें अदृष्टाची कवटी । रेखा उजळली देखा ॥ १ ॥ अरे डोळेयां दैवं आलें । अनाथासि सनाथ केलें ॥ आपुलें म्हणोनि आपंगिलें । अमृत दिधलें बाळकासी ॥ २ ॥ आतां नमूं त्या श्रोत्या । जे परमार्थ परमार्थी ॥ ज्यांच्या दरुपणे संसारवेथा । नव्हे सर्वथा प्राणियां ॥ ३ ॥ सप्तहि सागर । मथुनि काढिलें सार ॥ लाहान थोर हें उतर । देहीं दृष्टी न ठेवा ॥ ४ ॥ पुराणाच्या अभ्यांतरीं । कथा रामायणी परिकरि ॥ व्यास बोलिला अंतरि । ते वालमीकि परियेसा ॥ ५ ॥ ऐका पुण्य-

पावन कथा । व्यास जन्मेजयासि सांगता ॥ रामायणामाजि भारता । रघुनाथचरित्र परियेसा ॥ ६ ॥ कवण येके अवेस्वरीं । रघुनाथ बैसले सिंहासनावरि ॥ रुषिसहित परिवारिं । अयोधें (माजी) परियेसा ॥ ७ ॥ जवळि वसिष्ठ विश्वामित्र । लक्ष्मण भरथ शत्रुघ्न विर ॥ आणि अगस्ति रुपेश्वर । त्यासि रामे पुसिलें ॥ ८ ॥ जाला श्रीराम वोलता । इतुका रावण होउनि आसक्ता ॥ तरि कां हो मागुतिं सिता । नेता जाला रावण ॥ ९ ॥ अगस्ति असे सांगता । म्हणति ऐकें गा रघुनाथा ॥ ज्या कारणे नेली सीता । तो वृत्तांत सांगेन ॥ १० ॥ नगर कोटि पद्मावति । तेथ राजा पद्माक्ष नृपति ॥ अयोनिसंभव पद्मावति । अग्निकुंडातुनि निघालि ॥ ११ ॥ तिचें मांडिलें स्वयंवर । मिळोल सकळहि नृपवर ॥ म्हणे आग्निसि जिती शरिर । त्यासि माळ घालिन ॥ १२ ॥ वरवें त्या सैंवराचें निर्मित ॥ वधु जाला सकळि-कांत ॥ तवं विमान अकस्मात । लंकानाथरायाचें ॥ १३ ॥ तवं त्या कुंडाचे हो तिरि । रावण देखे राजकुमरी ॥ म्हणें जिंकावें सैंवरि । तरि अनायासें सांपडलि ॥ १४ ॥ येरु म्हणे तुं राणि होय आमुचि । येरि उडि घालि कुंडामाजिचि ॥ रावणें विजवुनि सर्वेचि । तवं च्यारि रत्नें सांपडलि ॥ १५ ॥ मग ति सांडुनि मांदुसे । रावण विमानि घालुनि वैसे ॥ लंकेमाजि प्रवेसे ॥ थोर उल्हासे मानसि ॥ १६ ॥ तैसेंचि नेउनि ठेविलें । कित्येक काळ लोटले ॥ रत्नाचें विरोनि पाणि जाले । फुटले शाखापल्लव ॥ १७ ॥ ऐसि कवण येके अवे-स्वरि । रावणसेजे मंदोदरि ॥ क्रीडा करित होति मंदिरिं । तंव अश्रूणि वोलिली ॥ १८ ॥ म्हणे रावणा तुं निवांत । कां रे निसुर निद्रिस्त ॥ यां रत्नापासुनि तुझा मृत्य । हें निभ्रांत रावणा ॥ १९ ॥ येरु दचकला मानसि । मंदोदरि म्हणे रावणासिं ॥ विवसि आणिली तु घरासि । किति लपविसि रावणा ॥ २० ॥ तंव मंदोदरि उठि । कोपें उघडिलि पेटि । कन्यारत्न देखिलें दृष्टिं ॥ वेगिं दूत हाकारिलें ॥ २१ ॥ मग म्हणे प्राणेश्वरा । माझी विनंती अवधारा ॥ वेगिं दुत जि हाकारा । पेटी धाडा सागरा पैलीकडे ॥ २२ ॥ हें तवं अज्ञानबाळ । घरीं असतां माहाकाळ ॥ येरा मानलें ते वेळ । दुत प्रवळ पाचारिले ॥ २३ ॥ दुत आज्ञा घेउनि झडकरी । बैसले विमानावरि ॥ समुद्र लंघुनि विरिं । मैथुळभुवनि पातले ॥ २४ ॥ तेथें निंक्षेपुनि वहिलें । दुत निजस्थानासि गेलें ॥ या उपरि काय वर्तलें । तें सांगेन परियेसा ॥ २५ ॥ तेथें राज्य करि जनक । जो वरिष्ट नृपनायक । तेथें ब्राह्मण आला येक । केला वेदोक्त

आसिर्वाद ॥ २६ ॥ राजा म्हणे द्विजोत्तमा । काय पाहिजे वो तुम्हा ॥ येरू म्हणे राजोत्तमा । आम्हासि भुमिदान पाहिजे ॥ २७ ॥ रायें केला संप्रधारू । ब्राह्मणा दिधला क्षेत्रधारु ॥ तेणें जुंफिला नांगरु । हाकारुनि वाहातसे ॥ २८ ॥ नांगरु वाहे प्रथमे दिसि । तवं दांत जगडला पेटिसिं ॥ विप्र पाहे जवं दृष्टिसि । तवं पेटि जडित देखिलि ॥ २९ ॥ म्हणे रायें दिधलें भुमिदान । तयांमधे सांपडलें निधान । आतां द्यावें त्यासि नेऊन । म्हणोनि पेटि उचलिलि ॥ ३० ॥ अभिळास नाहिं विप्राच्या मना । कष्टें पिकेल तें आपुलें जाणा ॥ घेऊनि गेला ततक्षणा ॥ जनकापासिं दिधलि ॥ ३१ ॥ रायें उघडिलि पेटि । तवं कन्यारत्न देखिलें दृष्टि ॥ तेज प्रकाशलें श्रृष्टी । जनका पोटिं आल्हाद ॥ ३२ ॥ महितळीहुनि निघाली । म्हणोनि मैथिलि नाम पावलि ॥ नांगरिं होउनि निघाली । म्हणोनि सीता म्हणताति ॥ ३३ ॥ पूर्वि नावं वेदवति । दुसरें नांव पार्वति ॥ तिसरें नांव जानकि म्हणति ॥ चौथे नांव सिता ऐसें ॥ ३४ ॥ ऐसि वाढति जालि सिता। म्हणति हे जनकाचि दुहिता ॥ सैंवारि आलि तुमचे हाता । परि सिद्धांत चुकेना ॥ ३५ ॥ पुढील आश्रोणि बोलणें ॥ पुढे असे साच होणे ॥ म्हणोनि जानकिसि नेणें। रावणे परियेसा ॥ ३६ ॥ राया रामाचेनि हातिं । व्हावि रावणासि गति । म्हणोनिया पुढति । तुम्हासि वैर केलें ॥ ३७ ॥ ऐसें बोलिला अगस्ति मुनि । सवेंचि विसर्जिलि स्थानि ॥ शोडस घटिका जालि रजनि ॥ ॥ मग आरोगणा सारिलि ॥ ३८ ॥ मोहिला निद्रेचा भार । मनि विचारि रघुविर ॥ नगरिं बोलति साचार ॥ विचार केला पाहिजे ॥ ३९ ॥ घेउनि कांबळ्याचे भरण । नगरिं हिंडतसे आपण ॥ घरोंघर प्रवेशे आपण । क्षणाक्षणा उभा राहे ॥ ४० ॥ ऐसा करितां प्रदक्षिणा । रजकद्वारिं उभा रामराणा ॥ तवं सितेचा बोल उणा । तो चांडाळ बोलिला ॥ ४१ ॥ त्याचि रजकिणि दुखविलि । त्यासिं नावडे करणे काळीं ॥ घरामधे त्याचि वेळी । घाय दोनि चारिं मारिले ॥ ४२ ॥ ते रुसोनि बैसलि द्वारिं । सासु सासुरा पाचारि ॥ ते न समजे कवणे परि । म्हणे मि प्राण देईन ॥ ४३ ॥ येरु म्हणे तुं जाये घरांतुनि । तुझि चाड नाहि माझे मनि ॥ सितेनें चालविलें रामालागोनि ॥ तैसे आम्हा चालविसि ॥ ४४ ॥ रावणे नेलि होति दृष्टांता। राम म्हणे हे प्रतिव्रता ॥ दिव्य घडोनि मागुतां । गृहाप्रति आणिलि ॥ ४५ ॥ ऐसें रजकु बोलिला । तो शब्द कानि ऐकिला ॥ म्हणे सीता दवडा वहिला ॥ जगिं बोल न राहे ॥ ४६ ॥ म्हणे दिव्ये द्रश्य घेतली ।

आणि सिता दिव्यीं उतरलि ॥ तरि लोकांचि ऐसि बोलि । आतां काय करावे ॥ ४७ ॥ कोण प्रिति स्त्रियांचि । आशा सोडावि सितेचि । आज्ञा केलि मातेचि । तवं वचन प्रतिपाळि ॥ ४८ ॥ लोकअपवाद थोर । म्हणे सुर्यवंसि रघुविर ॥ सांडिला आचार विचार । सिता गृहाप्रति ठेविलि ॥ ४९ ॥ ऐसें श्रिराम विचारि । तवं लोटलि मध्यरात्रि । विरा लक्ष्मणासि विचारि । तयासि राम सांगतसे ॥ ५० ॥ म्हणे रथ आणि सजुनि ॥ जवं आहे पुर्ण रजनि ॥ तुवां जाउनि निरांजनि । सितेचा वधु करावा ॥ ५१ ॥ मन कंटाळले लक्ष्मणाचे । मग उत्तर न ये वाचे ॥ म्हणे कर्म कैसें सितेचे । ललाटरेखा चुकेना ॥ ५२ ॥ तवं बोलिले रघुपति । काय पाहातोसि पुढति ॥ मग बोलउनि सिता सति । रथावरि वैसविलि ॥ ५३ ॥ पुढें रथाचें महिमान । श्रोते बोलति मुनिजन । पापतापिं नाहि लक्ष्मणा ॥ जें चिंतन रामाचे ॥ ५४ ॥ भरतखंडि महा पुराणि । उत्तम कथा रामायणि ॥ नाम परिसतां श्रवणि ॥ माहापातके नासति ॥ ५५ ॥ रामरूप भासत । ग्रंथ जाला कोटि शत ॥ त्यामाजि येक मत । उत्तर कांड बोलिलें ॥ ५६ ॥ अनुसरलें रामनांमातें । वेगळे जालें भवभ्रमाते । शंकर ध्यान करि क्षणक्षणांते ॥ रामनामाचे ॥ ५७ ॥ भववृक्षा जालें उन्मळण । नामसमुद्रिं जाले उधरण । विनवि विवेक रघुनाथिं जाण । सिता वना पाठविलि ॥ ५८ ॥

इति श्रीरामायणे उत्तरकांडे । लवांकुशपुराणे सीतावनाभिगमनो नाम प्रथमोध्यायः ॥ १ ॥

॥ श्रीरामचंद्र ॥ घटिका बारा होतां रजनि । तेथुनि निघाला पवनाहुनि ॥ जाउनिया निरांजनि । त्या वनामाजि ॥ १ ॥ तेथें सिंहाचे चपेटें । प्राण सांडिजे गजघटें ॥ धुर्जेटि अरण्य नेहटे । रथ घडघडा जातसे ॥ २ ॥ तवं त्या चक्रवाटाताळि । प्राण सांडिजे भुतळि । ऐसे या वनि महितळि । लक्ष्मण नेतसे ॥ ३ ॥ दाट वृक्षांचिया जाळि । तेथें सावज असिजे विक्राळि ॥ भुभुकार देति वेळोवेळि । वनामाजि परियेसा ॥ ४ ॥ सिता म्हणे लक्ष्मणा । तुम्हा काय सांगितलें रामराणा ॥ तें करूनि ततक्षणा । तुम्ही अयोध्येसि जाणे ॥ ५ ॥ परि माझि सत्यवाचा । गर्भ आहे श्रीरामाचा ॥ तीनि मास दो दिसांचा । तुम्हांप्रति सांगतसे ॥ ६ ॥ इतुकें उत्तर एकोन । हृदइं खोंचला लक्ष्मण ॥

कैसा गोत्रवध करून । जानकिसि वधुं कैसे ॥ ७ ॥ मग उतरुनि रथातळि । वनि सोडिलि महितळि ॥ लक्ष्मण तये वेळीं । सांडुनि गेला नगरासि ॥ ८ ॥ तया अरण्यामाझारि । येकलि रामाचि अंतोरि ॥ तवं पळालि अंधारि । रवि अंबरि प्रकटला ॥ ९ ॥ वनि म्हणतसे सिता । देवा काय करूं आतां ॥ लक्ष्मण वधुनि जाता । तरि चिंता न लगति ॥ १० ॥ आतां देवा काय करूं । रामे केला अव्हेरु ॥ मज वनामाजि थोरु ॥ दुःखडोंगरु वाटला ॥ ११ ॥ जैं रावणें नेलें अशोकवनी । तेथें होत्या सांघातिणि ॥ आतां येकलि वनि । कवणेंकडे मि जाऊं ॥ १२ ॥ स्वांपदांचे बोभाटि । गिरि-कंदरि नाद उठि ॥ सिता म्हणे बा धुर्जेटि । काय पाहासि निर्वाण ॥ १३ ॥ वाचेसहि रामनाम । तेणें आंगि न वाटे श्रम ॥ परि सर्वांगि घाम सकुमार जानकिये ॥ १४ ॥ म्हणे रावणें मज नेलें । म्हणुनि त्यासि युद्ध केलें ॥ आतां कां मज उपेक्षिलें । वना धाडिलें वधावया ॥ १५ ॥ अरे निष्ठुरा प्राणा । हृदयि राहिलासि कवणा गुणा ॥ आतां गार्‍हाणें देऊं कवणा । तुजवाचुनि रघुविरा ॥ १६ ॥ मज आणिले सायासि । मागुतिं केले परदेसि ॥ ऐसि आक्रंदित जिवासि । ते काळी महावनि ॥ १७ ॥ सिद्धांत करि महा जिवसि । तरि भिते या गर्भासि ॥ सिता जंव चिंता करि मानसि । तवं रुषिपुत्रें देखिलें ॥ १८ ॥ करि घेउनि पुष्पांजुळि । समोर आलें सितेजवळि ॥ तंव ते आक्रंदति बाळि । वृक्षातळि परियेसा ॥ १९ ॥ म्हणति तुं कवणाचि अंतोरि । येकलि हिंडसि वनां-तरि ॥ तवं बोले जनककुमारि । तुम्हि कोण कोठिला ॥ २० ॥ आम्हि सिष्य वाल्मिकाचे । पैल आश्रम आमुचें ॥ स्वामि विद्या अभ्यासाचे । सिकविताति आमुतें ॥ २१ ॥ सिता म्हणे मि परदेसिणि ॥ येकलि हिंडतसे वनि । मज आणिक नाहिं कोणि । येक राम प्राणनाथ ॥ २२ ॥ येरु म्हणति चाल आश्रमासि—भय धरूं नको मानसिं ॥ ऐसं बोलोनि सितेसि । आश्रमासि आणिलि ॥ २३ ॥ आश्रमासि आलि सिता । तिणें देखिलें रुषिताता ॥ आणि रुषि समस्तां । देखति जालि जानकि ॥ २४ ॥ तवं वाल्मिके बोळविलि । म्हणे कां रे जानकि आलि ॥ येरि चरणासि लागलि । संबोखिलि वाल्मिकें ॥ २५ ॥ म्हणे मीं तुम्हां आले शरण । माझें करावें प्रतिपाळण ॥ तुमच्या अपत्यासमान । माझें वचन परियेसा ॥ २६ ॥ श्रीरामें केलें उदास । लक्ष्मणासवें धाडिलें वनास ॥ मि तरि गर्भिणि तिनि मास । सांडुनि गेला लक्ष्मण ॥ २७ ॥ इतुकें जानकि बोलिलि ।

तेणें रुपिसि आसुवें आलि ॥ चरणावरूनि उठविलि । आलिंगण दिधलें ॥ २८ ॥ आसुवे ढळति लोचनि ॥ येरु नेत्र पुसे करें करूनि ॥ चिंता करूं नको म्हणउनि । रुपिराये संबोखिलि ॥ २९ ॥ माझि ऐकें विनंति । तुं होसिल पुत्रवंति ॥ माझिया बोलाचि प्रचिति । सत्य मानि जानकिये ॥ ३० ॥ हें म्यां पुर्विंच भाष्य केलें । तें डोळा आपुल्या देखिलें ॥ म्हणोनि येणें झाले । वनामाझि जानकिये ॥ ३१ ॥ ऐसि तेथें राहिलि सिता । लक्ष्मण अयोध्येसि गेला त्वरिता ॥ तवं गया रघुनाथा । थोर चिंता वर्तलि ॥ ३२ ॥ म्हणे म्या कुडि बुधि केलि । अविचारें सिता वधिलि ॥ लक्ष्मणासि भुलि पडिलि । मज बुधी न सांगेचि ॥ ३३ ॥ पहा हो पुढीलाचेनि बोलि । कासया सिता मारविलि ॥ दश दिव्य उतरलि । कासया केलि विटंबणा ॥ ३४ ॥ जरि मि पुसतों भरता । तरि तो मज सिकविता ॥ बाप कर्मा रे वळिवंता । कासाविस होतसे ॥३५॥ राम येउनि येकांता । मनि आठवितसे सिता ॥ म्हणे पाहा हो विधाता । अजुनि पाठ सोडिना ॥ ३६ ॥ पंचवटिके असो तिघं । सिता राहे आम्हामागें ॥ आम्हि पाठि असो दोघे । लक्ष्मण जाय वनफळां ॥३७॥ मागे वनासि जातां । दंडवत केलें दशरथा ॥ तणे मज निरविलि सिता । तो मज बोल लागला ॥ ३८ ॥ आतां कैकये-कारणे । वनासि निघों तिघे जणे ॥ चौदा वरुषे हो असणे । येवढि दुःखे भोगिलिं ॥ ३९ ॥ येवढि दुःखे निस्तरितां । रावणे नेलि सिता ॥ कष्ट झालें युद्ध करितां । ते कोणासि सांगावे ॥ ४० ॥ मग सिळिं बांधिला सागर । बळे खंडिले डोंगर ॥ प्राणे वांचविले वानर । निशाचर म्या वधिले ॥ ४१ ॥ ते म्यां जानकिकारणें । केले येवढें धावणे ॥ जानकी सोडावयाकारणे । म्या राक्षस मारिले ॥ ४२ ॥ जैं मि सैंवरि जिंकिलि । तै मज जनके निरविलि ॥ ते मज भुलि पडलि । कासया वधिलि जानकि ॥ ४३ ॥ लक्ष्मण करितां वधु । कैसि कष्टलि असेल वधु ॥ अरे वैरिया बंधु । आलि वेळ नेणसि ॥ ४४ ॥ आतां बोल ठेवुं कवणा । तरि मिचि दैवे उणा ॥ काय म्हणावे लक्ष्मणा । करणि आपणा आपलि ॥ ४५ ॥ येसि राम करितां चिंता । तवं पावलि कैकैयी माता ॥ म्हणे रामा किती आतां । मनि सिता आठविसि ॥ ४६ ॥ स्त्रीयेचा कोण केवा । वृथा सिण करिसि जिवा ॥ उरि फुटला म्हणे देवा । कोमल मन रामाचे ॥ ४७ ॥ आणिक म्हणे केगामति । रामा आठउं नको चिति ॥ जे का अंतरलि पुढति । ते काय मागुति येइल ॥ ४८ ॥ तुजला सितेचा खेद । सितेसि रावणाचा वेध ॥ ते तवं कुडि गा सुबध । चित्रि लिहिला रावण ॥ ४९ ॥ लटिकें

म्हणसि तरि दाविन । चित्रीं लिहिला रावण ॥ तिचे कोठे नाही मन । लंकानाथावांचुनि ॥ ५० ॥ म्हणसि बोलते मावा । तूं विश्वासिलासि तिच्या भावा ॥ सितेसि विसर गा राघवा ॥ दृढ मत करूनियां ॥ ५१ ॥ रावणे नेलि सा मास । त्वां सोसिले वनवास ॥ धड नाहीं तिचें मानस । लटिकि आस सितेचि ॥ ५२ ॥ ते परपुरुषा आर्त । तिचें घरि नाहि चित्त ॥ रात्रि दिवस चिंतित । पर पुरुषालागोन ॥ ५३ ॥ रामा जाणसि स्त्रियांचे ढाळे । स्त्रिचरित्र तुज न कळे ॥ रामा तुज पिसे लागले । मागुति सिता आठविसि ॥ ५४ ॥ चाल दाखविन तुज पुढे । चित्रि लिहिले रावणाचें रुपडे ॥ विस भुजा निवाडे । दाहि सिरे दाखविन ॥ ५५ ॥ मग लिहिले आपणचि । सत्य मानि माझिया वचनासि ॥ लटिके नव्हे माझि भाष ऐसि । सांडि आस सितेचि ॥ ५६ ॥ इतुकेया केगामतिच्या बोला । अधिक कोप उपजला ॥ राम तेथुनि उठिला ॥ मग बैसला सिंहासनि ॥ ५७ ॥ इतुके इकडे वर्तले । तवं तिकडे काय वर्तले ॥ ते परिसा वहिले । चित्त देउनि ॥ ५८ ॥ सिता रुषिआश्रमि होति । राणि राघवाचि गर्भवति ॥ नवमास भरोनि पुरति । प्रसुत जालि ॥ ५९ ॥ दोघे पुत्र जाले निर्मळ । पहिला लहु अजिंक बाळ ॥ अतिस्वरुप वदन वर्तुळ । दुसरा अंकुश परियेसा ॥ ६० ॥ हेचि जन्मनाम दोघासि । प्रसुत झालि मुहुर्तेसि ॥ रुषि आनंदले मानसिं । गजर करिति वाद्यांचा ॥ ६१ ॥ शाम लहु रामासारिखा । अंकुश दृश्य जानकि देखा ॥ गौरवर्ण अति सुरेखा । देखोनि रुषिंसि आनंद ॥ ६२ ॥ रुषिभार्या बोवळिति । सिता झाली पुत्रवति ॥ म्हणति हे पुर्विल स्थिति । रुषि वाल्मिक बोलिला ॥ ६३ ॥ रुषिने जातक वर्तविले । येकाचे लहुवा आले ॥ दुसरीयाचे अंकुश बोलिले । मग घातले पाळखिं ॥ ६४ ॥ द्विज पाहति चरणि । चिन्हे उर्ध्वरेखा दोघां जणि ॥ रुषि म्हणति हे सुलक्षणि । राजे सकल जिंकिति ॥ ६५ ॥ ऐसे रुषिने वर्तविले । तैसे पुत्र दोघे जाले ॥ देव रुषि पुष्पी वरुषले । राज्य करा म्हणउनि ॥ ६६ ॥ लागलि पुढिल कथा रसाळ । ते परिसा श्रोते सकळ ॥ भविष्य वाल्मिकि केवळ । ते वचन सत्य होय ॥ ६७ ॥

इति श्रीउत्तरकांडे रामायणे लवांकुशपुराणे । लवांकुशजन्मकथन नाम द्वितियोध्याय : ॥ २ ॥

श्रीरामचंद्राय नम : ॥ छ० ॥ जाले सातां वरुषांचे ॥ व्रतबंधन

केले दोघांचें ॥ बळ येकाहुनि येकाचें । धनुर्विद्या सिकविलि ॥ १ ॥ मंत्रविद्या दोघांचि ॥ बहुसाल प्रतिज्ञा वाल्मिकाचि । वये द्वादश वरुषांची । क्षेत्री झाले विद्येने ॥ २ ॥ कवणे येके दिवसिं । दोघे पुसति मातेसि ॥ आमुचा पिता कोणे देसिं । आम्हा सांग जननिये ॥ ३ ॥ मग समुळ पूर्व कथा । पुत्रांप्रति सांगे माता ॥ म्हणे अवदशा आलि आतां । पुढिल कांहि नेणवे ॥ ४ ॥ रामराये उदास केले । मज वधावया पाठविलें ॥ होतें ललाटिं लिहिलें । तें न कळे सर्वथा ॥ ५ ॥ आतां सांघाति तिघे जणे । पाळण केलें रुषिने येणें । येश घेतलें लक्ष्मणें । म्हणोनि प्राण वांचले ॥ ६ ॥ ऐसि समुळ मागील कथा ॥ पुत्रांप्रति सांगे माता । लहु अंकुश आइकतां । अश्रुपात ढळताति ॥ ७ ॥ पुत्र हो सुर्यवंश तुमचा । यावरि वाल्मिकाचि वाचा ॥ तुम्ही अभिमान धरा पराक्रमाचा । राज्य करा पुत्र हो ॥ ८ ॥ ऐसि बोलिलि जानकि । दोघे बोलति येकमेंकि ॥ म्हणति आमुचि माता निकि । वाढविलें आम्हासि ॥ ९ ॥ दोघां वेसन पारधिचें । अरण्यामधें स्वापद कैचें ॥ बळ विनंड त्या दोघांचे । रुषेश्वरें जाणितलें ॥ १० ॥ मग बोलति रुपिजन । हे तवं न म्हणावें सामान्य । तयां देखोनि रुषि आपण । मनामाजि भिताति ॥११॥ ह्मणति थोर यांचि करणि । नित्य स्वापजें मारूनि ॥ अवघे वन विध्वंसुनि । स्वापजें आणिति येकेंयेक ॥ ॥१२॥ दोघांचे संधान अचुक । सवे पुत्र रुषींचे अनेक ॥ न करिति हत्येचा कांटाळा बाळक । भय उपजे रुषिकुळां ॥ १३ ॥ वाल्मिकासि वेळोवेळां । म्हणति सिकवा या बाळां ॥ येक म्हणति जाणवा रघुकुळा ॥ नातरि आज्ञा द्या आम्हासि ॥ १४ ॥ हे क्षेत्रि येतिल कोण कामा । केलि स्वापदांचि निक्षेपमा ॥ किवां मात जाणवा रामा ॥ ऐसे क्षेत्रि हे हत्यारे ॥ १५ ॥ वाल्मिक म्हणे वसिष्ठासि । तुम्ही जावें अयोध्येसि ॥ बरे सांगावे रामासि । अश्वमेध करा म्हणोनि ॥ १६ ॥ जे येइल तुमचे युक्ति । ते सांगावे रघुपति ॥ परि न सांगावि सिता सति । लवांकुश आहेति म्हणोनि ॥ १७ ॥ ऐकोनि वसिष्ठ निघाला । सवें द्विजांचा मेळा चालिला ॥ वेगि अयोध्येसि पातला । तवं भेटला रघुत्तमा ॥ १८ ॥ रामें आदर मान केला । सिंहासनि बैसविला ॥ चरणि मस्तक ठेविला । येरें दिधला आसिर्वाद ॥ १९ ॥ म्हणे पुत्रांसहित राज्य करावें । भक्तजन सांभाळावे ॥ तव उदक आणिले राघवें ॥ पादक्षाळण करावया ॥ २० ॥ मस्तकि वंदिले उदक । क्षणक्षणा करि कौतुक ॥ सर्वांगीं ललाटीं लाविले टिळक । कंठीं माळ तुळसीची ॥ २१ ॥ धुप दिप द्विजासि । वोवाळि रघुपति रुषिसि ॥ भोजन

जालेया सावकासिं । मग सभेसि बैसले ॥ २२ ॥ रुपि म्हणति रायवा । तुम्ही अश्वमेध करावा ॥ स्वर्गी तृप्त करावें देवां । आणि रुपेश्वर समस्तां ॥ २३ ॥ ऐसें वचन ऐकोनि । आणिला वारू श्रृंगारूनि ॥ ज्यासि वेग पवनाहुनि । शामकर्ण परियेसा ॥ २४ ॥ आले शुध स्नान करून । वारू पुजी रघुनंदन ॥ कंठीं रत्नमाळा घालुन । ललाटिं चंदन लाविलें ॥ २५ ॥ पांइ सुवर्णाचि नेपुरं । रत्न माणिकें झळकति हिरे । पत्रिका लिहिली रघुविरें । प्रधानाकरि परियेसा ॥२६॥ श्रीराम राजा अयोध्येचा । सुर्यवंसि राया दशरथाचा ॥ हा शामकर्ण वारू त्याचा । पृथ्वीवरी सोडिला ॥ २७ ॥ जो असेल बळियाढा विरु । तेणे धरावा हा वारु । सवें भरथ शत्रुघ्न विरु । जे कां बंधु रामाचे ॥ २८ ॥ ऐसि लिहिली पत्रिका । वारुमस्तकिं लिहिली देखा ॥ कंठि शोभे रत्नमालिका । विप्रां दानें दिधलि ॥ २९ ॥ वारू पुढां सोडुनि । सवें सैन्य घेउन ॥ दमामे गर्जति निशाणीं । ऐसीं वाद्यें वाजति ॥ ३० ॥ वाद्यें वार्जति ठणठणां । नाद उमटति अंबरीं जाणा । बंदिजनि वानिति क्षणाक्षणा । ऐसा परिवार चालिला ॥३१॥ रुपिआश्रमु अवलोकितु ॥ किं आमुच्या स्वामीस पहातु ॥ मागें शत्रुघ्न भरतु ॥ निशाण भेरि गर्जति ॥ ३३ ॥ पुढिल कथा अनुपम्य । युद्ध होईल दारुण ॥ विनवि विष्णुदासा नामा जाण । ऐका चरित्र रघुनाथाचें ॥ ३४ ॥ इति श्रीरामायणें उत्तरकांड लवांकुशपुराणे अश्वमेधप्रारंभ नाम तिसरा अध्याय ॥ ३ ॥

॥ श्रीरामचंद्र ॥ अंकुश वनफळासि गेला । लहु आश्रमि होता राहिला ॥ रुषिपुत्रां न लेखितां आला । तो दृष्टी देखिला शामकर्ण ॥ १ ॥ सर्वे पुत्र होते रुपिचे । खेळ खेळति नानापरिचे ॥ सुंदरपण देखोनि वारूचें । तिकडे लहु चालिला ॥ २ ॥ वारू भोंवता भोंवते । खालींवर पाहात ॥ कैसा घोडा बरवा ह्मणत ॥ हास्य करित खदखदां ॥ ३ ॥ सिरिंची पत्रिका सोडिली । करिं उचलुनि घेतलि ॥ कुंकुमसंडित देखिलि । मग वाचिं तये वेळीं ॥ ४ ॥ रामराजा अयोध्येचा । सुर्यवंसि राया दशरथाचा ॥ शामकर्ण वारू त्याचा । प्रथ्वीवरि सोडिला ॥ ५ ॥ जो असेल बळियाढा विरू । तेणें धरावा हा वारू । सर्वे भरथ शत्रुघ्न विरू । जे कां बंधु रामाचे ॥ ६ ॥ पत्रिका वाचुनि फाडिली । वारूचि रत्नमाळा घेतली । झळाळित देखिलि । मग घातली गळा ॥ ७ ॥ ह्मणे कैचा रामराणा । मी प्यालों आपुले मातचा पाना ॥ स्या वारू धरिला जाणा । ह्मणोनि बाहे पीटीली ॥ ८ ॥ वारू सोंडिसि धरिला । कर्दळीवनासि आणिला ॥ आउर्णव [1]

१ उपर्णव–पाट

काढिला । तेणें बांधिला खांबासि ॥ ९ ॥ तेथें असति रक्षपाळ । दिसति जैसे कृतांतकाळ ॥ अतिरथि महारथि केवळ । दाहिदिशा दाटले ॥ १० ॥ लवा उभा वारूपासिं । येक सांगति सितेपासिं ॥ तुझे पुत्रें धरिलें वारूसि । वहुत सैन्य पातळे ॥ ११ ॥ विरश्री रामाचे निज गडे । येक चालती येकापुढें ॥ पाठिसि धुरा चौंकडे । शत्रुघ्न विर चालिले ॥ १२ ॥ जे आंगवणें गहन । पुढें चालिले भरतशत्रुघ्न । सिहनादें गर्जोन । लहुवातें पाचारि ॥ १३ ॥ ह्मणे तुं कवणाचा कुंमरू । कां रे धरिला आमुचा वारू ॥ संधान करितां खडतरू । दुख तत्काळ पावसि ॥ १४ ॥ तंव बोलिला लहुवीर । साहें साहें माझा शर ॥ झुजार ह्मणसि महाविर । तरि वाण सांभाळिं ॥ १५ ॥ गुण वोढुनि धनुष्याचा । वाण काढिला भाताचा ॥ अंगिकरूनि मंत्र रूषिचा । मग कानाढि वोढिलि ॥ १६ ॥ ठाण मांडुनि देहुडा । संधान सोडिलें कडकडां ॥ ह्मणे विरा सांभाळिं पुढा । तेणें धरणी कांपत ॥ १७ ॥ वाण येकापासुनि गगनिं भरला ॥ शरजाळिं जै साम [1] घणाणिला । महा क्रोधें खवळला । महा क्रुरें करूनियां ॥ १८ ॥ जैस्या धारा प्रजन्याच्या । तैसा पुर वरूषे बाणाचा ॥ ते वेळिं शत्रुघ्न बोले वाचा । विरांप्रति अवघेंयां ॥ १९ ॥ हा सामान्य नव्हे म्हणतां । याणें गुरू केला पुरता ॥ वरवि धनुष्यदेवता । यांसि जालि प्रसन्न ॥ २० ॥ शत्रुघ्न आपुले प्रौढी । अभिमंत्रूनि वाण सोडी ॥ येकापासुनि लक्षकोडी । तैसे संधान सोडिलें ॥ २१ ॥ येरयेरा निवारिति बाण । दोघा मांडिलें निर्वाण ॥ सावध होउनि आपण । बाणें बाण हाणिति ॥ २२ ॥ साहें साहें लहुवा विरा । त्रिशुळ बाण खगधारा ॥ जरि तुज गुरू असेल पुरा । तरि आपणांसि सांभाळिं ॥ २३ ॥ येरु साधक विरगावो । अंगिं येऊं नेदि घावो ॥ पराक्रमि महाबाहो । जो कुमर सितेचा ॥ २४ ॥ शत्रुघ्नें स्मरिला सुर्यमंत्र । कोटि प्रकटले दिनकर ॥ लहु स्मरे वरुणास्त्र ॥ अंधकार पडियेला ॥ २५ ॥ अवघें व्यापिले अंतराळ । झांकोळलें रविमंडळ ॥ शत्रुघ्न स्मरे ते वेळं । मोहनास्त्र परियेसा ॥ २६ ॥ तें जातसे आकाशें । स्मरिला मंत्र घोषें ॥ लहुवासि नलगे कैसे । रामनाम जपतसे ॥ २७ ॥ जो रामनाम उच्चारि । त्यासि कुविद्या काय करि ॥ राजा शत्रुघ्न मनि विचारि । हा कैसेन आतुडे ॥ २८ ॥ येणें घेतलें येश । येकला नातुडे समस्तांस ॥ भरथ म्हणे शत्रुघ्नास । मंत्रभाप स्मरोनि ॥ २९ ॥

---

१ मेघ-पाठ

अवचित हाक देऊन । सत्राणे उडाला शत्रुघ्न ॥ लहुवा पाठि घालुनी । दुश्चित करून धरियेला ॥ ३० ॥ वेगिं बांधिला रथासि । कुंचा भवंडिला सैन्यासि ॥ मग निवाले त्वरितेसि । अयोध्येसि चालिलें ॥ ३१ ॥ इतुकें येथें वर्तलें । तें सितेनें ऐकिलें ॥ आंग भुमिसि टाकिलें । जालि असे व्याकुळ ॥ ३२ ॥ म्हणे माझें तानें सांघाति । त्याचेनि होतों वनाप्रति । कां कोपला लक्ष्मीपति । आतां कोण सोडविल ॥ ३३ ॥ अरे लहुवा बाळा । सुलक्षणा सुढाळा ॥ तुज केधवां देखेन डोळां । तुं रे माझा सांघाति ॥ ३४ ॥ आपुला सांडुनि सोहोदरू । येकला गेलासि युद्ध करूं ॥ आतां भेटवा माझें तारूं । वाल्मीकासि म्हणतसे ॥ ३५ ॥ इतुकें बोले जानकि । अश्रुपात ढळति नेत्रीं ॥ करूणा करिजे सकाळिकि । आदि करुनि ऋषिभार्या ॥ ३६ ॥ वाल्मिकि म्हणें वो सिते । त्यासि भय नाहि माते ॥ हे दोघे जिकिति रायातें । हे सत्यचि जाण पां ॥ ३७ ॥ हें म्यां भविष्य केलें ॥ ते तु देखसि बाळ आपुलें । म्हणसि माझें धाकुले । म्हणुनि चिंता न करावि ॥ ३८ ॥ सिते वो सुराचा बाळ । येकाहुनि येक सबळ ॥ वनफळें घेउनि अंकुशबाळ । म्हणे काय झालें माते ॥ ३९ ॥ सिता बोले तयासि । धरूनि नेलें लव्यासि ॥ बांधोनि शत्रुघ्न रथासि । अयोध्येसि नेतसे ॥ ४० ॥ आतां सि रे काय करूं । माझे सुख-सागरिचें तारूं ॥ कोण सोडविल लेंकरूं । तयासि कैसे पैं झालें ॥ ४१ ॥ आतां काय करूं देवा । कोण करिल माझा धावा ॥ केधवां देखेन बाळा लवा । ह्मणोनि कासाविस होतसे ॥ ४२ ॥ देखोनि मातेचि करूणा । माते ऐकें माझिया वचना ॥ धावोनि जाइन ततक्षणा । सोड विन बंधुसि ॥ ४३ ॥ जरि नेला असेल पाताळविवरिं । तरि हात करिन तक्षकावरि ॥ जरि नेला असेल असुरिं ॥ तेहि निर्धारि मारिन ॥ ४४ ॥ सुरवर जरि नेति । तरि मारिन अमरावति ॥ अथवा वैकुंठ पुरपति । तोहि संग्रामि जिंकिन ॥ ४५ ॥ घेइन अष्टकुळाचळ । उलथिन ध्रुवमंडळ ॥ स्वर्ग मृत्य पाताळ । धांडोळीन येकदां ॥ ४६ ॥ तेथ कायसे रामलक्ष्मण । तेहि खिळिन येकेचि बाणें ॥ नातरि धरून आणिन । तुजपासि जननिये ॥ ४७ ॥ इतुकिया अंकु-शाच्या बोला । सितेसि आनंद वर्तला ॥ ह्मणे तुं क्षेत्रि हासिल भला । आलिंगण दिधलें ॥ ४८ ॥ करि घेतले धनुष्यबाण । मातेसि करि नमन ॥ वंदुनि श्रीगुरूचरण ॥ लाग वेगें चालिला ॥ ४९ ॥ जैसा गजावरि केशरि । कि रवि चाले तमावरि ॥ कीं स्तंभि प्रकटे नरहरि । तैसा अंकुश चालिला ॥ ५० ॥ किं प्रलयकाळिचा रूद्र । निघे

सैहाराविया नरेंद्र ॥ तैसा चालिला सीताकुमर । वेगवत्र अवधारा ॥ ५१ ॥ करि घेतले धनुष्यबाण । चाले जैसा पंचानन ॥ हृदइं जानकिचें स्मरण । शत्रुघ्नासि पाचारि ॥ ५२ ॥ मग म्हणे शत्रुघ्नासि । युध्य करि रे मजसि ॥ साहें साहें रे बाणांसि । ह्मणोनि बाण सोडिला ॥ ५३ ॥ टाकिलें नारायणास्त्र । हृदइंजपोनि महामंत्र ॥ वर्तलें दारुण क्षेत्र । जाला चतुर्भुज नारायण ॥ ५४ ॥ नारायणे धरिले अद्वैत । शास्त्रें घातलि लिळावंत[1] ॥ गजबजोनि त्वरित । युध्य करूं विसरला ॥ ५५ ॥ सवेचि त्रिंधिला ततक्षणी । बीजमंत्र निद्रा स्मरोनि । शत्रुघ्न धरुनि चरणि । धरणीवरि पाडिला ॥ ५६ ॥ सवेंचि केला चपेटघात । तो लहुवा जाळा सोडवित ॥ बांधिला शत्रुघ्न त्वरित । लहुवाहाति दिधला ॥ ५७ ॥ सवेंचि भरथासि पाचारि । कोपें पेंटला महामारि ॥ ह्मणे विरा तुं सावरि । जैसा रूद्र क्षोभला ॥ ५८ ॥ अंकुश ह्मणे भरथ राया । तुह्मी पादुका रामाच्या पुजाव्या । कां येथ आलेत मराया । कवणे बुधि सांगितलि ॥ ५९ ॥ तुह्मि करावा वैराग्याचा भोगु । (युध्य करिता लागेल रोगु । तुमच्या वैराग्याचा भंगु ।) आजिच दाखविन ॥ ६० ॥ रामाकारणें जालेत जोगी । सुखे होतेत नांदिग्रामि । आतां सांपडलेत संग्रामि ॥ चिखलि गाय रुतलि जैसी ॥ ६० ॥ भरथ ह्मणे अंकुश विरा । साहें साहे माझ्या शरा ॥ नाहीतरि स्मरे रुपेश्वरा । जेणे तुज विद्या दिधलि ॥ ६२ ॥ ह्मणोनि संकिला काळदंड । कुट करित रे वितंड ॥ येरु साधक वितंड । वरिच्या वरि तोडिला ॥ ६३ ॥ मग विरें अंकुशें । घातलें बाणाचे फांसे ॥ भरथ जाला कासाविसे । मग तयासि बांधिला ॥ ६४ ॥ भरथ आणि शत्रुघ्न । दोघे आणिले बांधोन ॥ आले दोघे बाचोन । सितेनें दुरून देखिले ॥ ६५ ॥ दोघां आलिंगण दिधलें ॥ प्राण पांच चोवाळिले ॥ रुषीच्या चरणासि लागले । येरें दिधला आसिर्वाद ॥ ६६ ॥ पुढिल कथा अनुपम्य । पावन रसाळ अतिरम्य ॥ आतां येईल लक्ष्मण उत्तम । युद्ध दारूण होईल ॥ ६७ ॥

इति श्रीलवांकुशपुराणे वानरसैन्यपराभवो नाम अध्याय ॥ ४ ॥

॥ श्रीरामचंद्र ॥ रथिं होते मुर्छागत । मग ते झाले सावचित्त ॥ हळु हळु उठत बैसत ॥ अयोध्येसि चालिले ॥ १ ॥ येक कणथ कुंथत ॥ येक धाये विळपत । धाप उसासे दाटत । ऐसे नगरांत पातले ॥ २ ॥ सिंहासनिं रघुनंदन । वसिष्ठ विश्वामित्रादि करून । सभेमाजि येउन । बैसले रघुनाथ ॥ ३ ॥ रामें घातला पालखिति ।

---

१ बळीवंत–पाठ

भगवद्गिता ठेविलि पुढति ॥ बाण असे दक्षण हाति ॥ तंव घायाळ पातले ॥ ४ ॥ काय रे झाला समाचार । पुसे लक्ष्मण विर ॥ ह्मणति परिवार ॥ युद्ध थोर पै झाले ॥ ५ ॥ दोघे धाकुटे कुमर । बाल वरूपांचे महाविर ॥ येक शाम येक गौर । वाल्मिकाचे आश्रमिं ॥ ६ ॥ येकें तुमचा वारु धरिला । आम्हासि त्याणे झगडा केला ॥ मग शत्रुघ्नें धरिला ॥ तवं आला दुसरा बंधु ॥ ७ ॥ सांगता त्याचा पराक्रम । त्यास देखोनि पळे यम ॥ वाटतो जैसा सहस्त्ररस्म । ऐसा विर न देखों ॥ ८ ॥ आकाश बाणि व्यापिले । भरथ शत्रुघ्न धरुनि नेले ॥ ते रथासि बांधिले । नेउनि गेले आश्रमिं ॥ ९ ॥ आह्मि रामस्मरण केले । म्हणोनि प्राण वाचले । आम्हि चरण देखिले । तुमचे स्वामि ॥ १० ॥ इतुके ऐकोनि अववार । हांसे आले रघुविर ॥ म्हणे लक्ष्मण सोहोदरा । अपुर्व कैसे वर्तलें ॥ ११ ॥ हांसोनि बोले रघुनायक । ते दोघे धाकुटे बाळक ॥ कटकासहित मुख्यनायक । कैसे धरिले जाणा ॥ १२ ॥ वसिष्ठ म्हणे राघवा । पृथि लहान थोर न म्हणावा ॥ त्यांचा पुरुषार्थ आवघा । आम्हासि ठाउका असे ॥ १३ ॥ कोण येक क्षेत्रियाचे कुमर । विद्या सिकवि वाल्मिक रुषेश्वर ॥ महा बळियाढे विर ॥ कांहि अपुर्व न म्हणावे ॥ १४ ॥ यावरि लक्ष्मण बोलिजे । स्वामि मज आज्ञा दिजे । दोघे धरून आणिन वोजे । बंधु राजे सोडविन ॥ १५ ॥ रामे विडा दिधला लक्ष्मणा । म्हणे पाळाणा रे पाळाणा ॥ सकळ सिध करा रे सेना । घावो निशाणा घातला ॥ १६ ॥ घोडे राउत बोलाविले । हस्तिवरि गुढार घातले ॥ रथिं लक्ष्मण बैसले । तवं पावले जुम्रति ॥ १७ ॥ नळ निळ जांबुवंत । अंगद सुग्रिव हनुमंत ॥ सुषेण गंधमादन विख्यात । अवघे जुम्रति पातले ॥ १८ ॥ साटि सहस्त्र नृपवर । अठरा पद्मे वानर । बहात्तर कोटि गुळांगुळ । आपेआपण पातले ॥ १९ ॥ निघाले नगरबाहेरि । पावले क्षेत्रि महागिरि ॥ मयोरपत्रांचि झल्लरि । कनक दंडे ढाळितांति ॥ २० ॥ लक्ष्मण विरराजो । अरिराजा महाबाहो ॥ पुढें पाहे ब्रह्मकटाहो ॥ अगणित सैन्य पातलें ॥ २१ ॥ तेथ वाजंत्रांचि घायि । श्रवणि नाइकिजे कांहीं ॥ मुक्तमाळा वारुचे पायि । डोले पताका निलवर्ण ॥ २२ ॥ तेथ रामनाम लिहिलें । डोल पताकि शोभलें । जेणें त्रिभुवन तारिलें । तें नाम रामाचे ॥ २३ ॥ ऐसा रथाचा घडघडाटि । मागां पुढां कुंजरथाटि ॥ गळां सांखळा येकदाटि । मद गळित गजघंटा ॥ २४ ॥ अश्वधियां पुढें कुंजरथाटि । गुढिया तोरणें छत्र डोलति ॥ आश्रमासि पातले त्वरिति । वाल्मिक रुषिच्या ॥ २५ ॥ सिना

पाहे दुरून । तवं देखिला लक्ष्मण । म्हणे आले वानरसैन्य । आतां काय करूं सदाशिवा ॥ २६ ॥ ह्मणे इतुके दिवसवरि । पडिले दुःखाचे सागरिं ॥ दोहिंकडेचि सोहिरि । यावरि सैन्य चालिलें ॥ २७ ॥ तवं अंकुश ह्मणे वो माये । चिंता न करावि जननिये ॥ अवघे मारिन दळभाये । रणि धेंडा नाचविन ॥ २८ ॥ मात मि तुझे कुसिचे पुत्र । ऐसें असेल निभ्रांत ॥ तरि करिन त्यांचा घात । हें तत्वतां पाहासिल ॥ २९ ॥ विद्या दिधलि वाल्मिकि । ते प्रकट करिन तिहिं लोकिं ॥ स्वर्गि देव करिन सुखि । तरिच पुत्र होइन तुझा ॥ ३० ॥ ऐसे अंकुशाचे बोल ऐकिले । तेणें हृदय निवालें ॥ दोघांसि प्रेमें आलिंगिलें । वोवाळिले पंचप्राणें ॥ ३१ ॥ जानकि बोलिली स्वभावें । कोणासि जिवें न मारावें । अवघे जिवंत धरावे । इतुकें करि पुत्रराया ॥ ३२ ॥ तवं वंदिले मातेच्या चरणा । सवेंचि केलि प्रदक्षिणा । नमस्कारूनि श्रीगुरूचरणा । धनुष्य बाण घेतले ॥ ३३ ॥ दोघे चालिले सामोरे । अंगद होता पुढिले मोहरे ॥ पाचारिलें अंकुशें विरें । ते अवसरि परियेसा ॥ ३४ ॥ राहें साहें ह्मणत । अंगद पर्वत टाकित । येरू बाणें निवारित ॥ पर्वत टाकित छेदुनि ॥ ३५ ॥ ह्मणे अंगदा विरा । पळों नको सैरावैरां । लंकेचा मंडप आणिला चोरा । वरवि सिष्टाइ त्वां केलि ॥ ३६ ॥ आतां साहे माझा बाणा । विंधिला कानाडि वोढुन ॥ त्याणें खोंचला त्याचा प्राण ॥ अंगद मुर्छीत पै झाला ॥ ३७ ॥ मग सावध करूनि लवें । बंधन केलें स्वभावें ॥ भरथ शत्रुघ्न जेथें होते । नेउनि तेथें बांधिला ॥ ३८ ॥ झाला सुग्रिव बोलता । काय करावें हो आतां ॥ या मुलांसि युध्य करितां । अनर्थ सर्वथा होइल ॥ ३९ ॥ अंगद नेला धरून । आतां काय वांचोन ॥ जरि सोडवेना भरथ शत्रुघ्न । तरि स्वर्गि देव हांसति ॥ ४० ॥ म्हणोनि सुग्रिव चालिला । सावध रे ह्मणत वहिला ॥ माथांचा जार नाहिं वाळला । तु रे लान लेकरूं ॥ ४१ ॥ ऐकोनि अंकुशा आलें हासें । ह्मणे मर्कटा तुं तवं पिसे ॥ पालेखाइरे बहुवसें । तुज संग्राम नाहिं बोलिला ॥ ४२ ॥ वाप श्रीगुरू वाल्मिक । अंकुश जाण पुरा येक ॥ शस्त्रें प्रेरिलिं अनेक । तेणें त्रिभुवन व्यापिलें ॥ ४३ ॥ महाधुम्रें व्यापुनि ज्वाळा । अग्निकल्लोळ चालिला ॥ वानरां पळ सुटला । रामनामें गर्जति ॥ ४४ ॥ वाण लागति सणसणां । वानर सांडुं पाहति प्राणा ॥ म्हणति रक्षीं गा लक्ष्मणा । त्याचे पाठिसि रिघति ॥ ४५ ॥ गगनिं भोंवति सैरावैरां । वळसा मांडिला वानरां ॥ निघति अनंत वाण सैरा । तेणें दिशा भुलल्या ॥ ४६ ॥

देव पाहाति विमानि । गगनि अंतरीक्षाहुनि ॥ वानर भयभित तेथुनि । बाण येति म्हणउनि ॥ ४७ ॥ येक वानर बोलति । काय बोलिला रघुपति ॥ तवं पुढारे देखति । जाण दुसरा रघुनाथ ॥ ४८ ॥ येक शामसुंदरनयन । दुसरा राजिवनयन । म्हणति कोपला रघुनंदन । आतां कोण राखेल ॥ ४९ ॥ समस्त वानर पडिले । अठरा झुझति आटले ॥ शक्ति वेगळे बांधिले । ते कोण कोण आइका ॥ ५० ॥ नळ निळ जांबुवंत । सुग्रिव सुषेण विख्यात ॥ गंधमादन वळिवंत । इतुके विर बांधिले ॥ ५१ ॥ जेथें होते भरथ शत्रुघ्न । तेथें नेले बांधोन ॥ मागुतिं आले वेग करून । दोघे बंधु येके ठाइं ॥५२॥ तव लक्ष्मण बोले तत्त्वतां। ह्मणे कैसे करूं रे हनुमंता । अपेश वैसले माझे माथां । अवघे झुझ ति धरूनि नेले ॥ ५३ ॥ येवढे झुजार थोर थोर । त्यांसि धरिति हे कुमर ॥ वाग वरुपांचे लेंकुर । ख्याति केलि केवढि ॥ ५४ ॥ किं हे होति अकरा रुद्र । किं बाराहि भास्कर ॥ किं प्रळयकाळिंचे सागर । हें कांहिच कळेना ॥ ५५ ॥ किं हे नवग्रह राहो । किं हे अष्टहि भैरवदेवो ॥ किं हे शक्तिदेविचे अवयवो । ऐसे भासति मज-लागिं ॥ ५६ ॥ अजानबाहो दोघेजण । प्रळयानळासमान ॥ ऐसे भासति तें जाण । वायुनंदन परियेसिं ॥ ५७ ॥ किं आम्हासि शाप बाधला । किं रावणाचा हत्या वध झाला ॥ येकाकार होउनि आपुला । सुड घेउं पाहे पां ॥ ५८ ॥ नातरि इंद्राजित कुंभकर्ण । किं सितेच्या क्रोधा पासोन । वनि तिच्या धांवयालागोन । आम्हावरि चालिले ॥ ५९ ॥ किं सिता सांडिलि वनि । ते होति गर्भिणि ॥ कि हे पुत्र तिचे दोनि। शाम गौर दिसताति ॥ ६० ॥ येक रघुनाथासारिखा । सादृश्य दिसतसे देखा ॥ हनुमंता वाटतसे शंका । हें तुं सत्य जाण पां ॥ ६१ ॥ जरि ह्मणावें धाकुटें लेकरू । तरि झुजति जैसे सहस्रकरू ॥ ऐसा आतां येक विचारू । करावा तो ऐक पां ॥ ६२ ॥ कैसें रामासि मुख दावावें । परि अपेशा पात्र नोहावे । रणि झुजतां मरावे । ह्मणे लक्ष्मण हनुमंता ॥ ६३ ॥ आतां पाहे माझा पुरूषार्थ । सुमित्रा तुचि माझा नाथ ॥ ऐसें बोलोनिया त्वरित । हाक देउनि चालिला ॥ ६४ ॥ पाळिलि पुंपाचि साटि । क्रोध न साहवे पोटि ॥ करूनि भवयांचि मुरकुटि । हाक देउनि उडाला ॥ ६५ ॥ सहजचि याचे वदन काळें । अग्निसारिखि बुबुळें ॥ काय बोले तये वेळे । महा बाळिया हनुमंत ॥ ६६ ॥ मग ह्मणे रे कुमरा । माझें वचन अव-धारा ॥ जरि ह्मणो येंकसरां तरि तुं लाहान लेकरूं ॥ ६७ ॥

अंकुश बोले तये वेळे । जळो रे तुझे तोंड काळे ।। लाज नाहिं रे तये वेळे । अरे निर्लज्जा मर्कटा ।। ६८ ।। ह्मणे त्वां लंका जाळिलि । बापुडि राक्षसें चाळविलि ।। तेथिचि विसर अवघि बोलि । येकेचि बाणें खिळिन ।। ६९ ।। सक्रोध पाहे वायुनंदन। ऐसे बोल ऐकेन ।। कोपें खवळोनि हनुमान । गगनमार्गे चालिला ।। ७० ।। येक पर्वत उरावरि । येक घेतला शिरावरी ।। दोनि दों खांद्यावरि । येक करिं घेतला ।। ७१ ।। हनुमंत पांच पर्वतेसि । कैंसा देखिला आकासि ।। वज्रबाण जपोनि मानसि । वेगिं संधान सोडिले ।। ७२ ।। पुढति बोढुनि कानाडि । अभिमंत्रुनि बाण सोडि ।। पर्वत वरचेवरि तोडि । बाण हृदयि भेदला ।। ७३ ।। हनुमंत पडिला धरणिवरि । सप्तसागर अरुवारि ।। बाण भेदला जिव्हारि । पैळ-तिरि पडियेला ।। ७४ ।। वळिलि आंगाचि मुरकुंडि । मान पडिलि देहुडि ।। प्राण सांडु पाहे कुडि । वाचा बोंबडि पै झालि ।। ७५ ।। श्रीरामनाम स्मरतां । काल न बाधि सर्वथा ।। ऐसें झालें हनुमंता ।। भवंता पाहो लागला ।। ७६ ।। वज्रशरिर हनुमंताचें । ह्मणोनि प्राण वांचविले त्याचे ।। हृदइं भय त्या बाणाचें ।। रामराम मुखें ह्मण-तसे ।। ७७ ।। ह्मणें म्यां बहुतेक युध्य केलें । परि ऐसें नाहि देखिलें ।। काय लक्ष्मणासि आठवलें । विडा उचलिला रामाचा ।। ७८ ।। मग तेथुनि उडाण करून । आला वायुचा नंदन ।। आपुल्या कटकांत येउन । लक्ष्मणासि भेटला ।। ७९ ।। म्हणे नामा विष्णुदास । पुढें कथा अति सुरस । लक्ष्मण आणि लवांकुश । युद्ध सत्राणे होईल ।। ८० ।। इति श्रीरामायणे उत्तरकांडे लवांकुशपुराणे पंचमोध्यायः ।। ५ ।।

श्रीरामचंद्र ।। अरण्यांत जैसा पंचानन । धेनुवरि चाले गर्जोन ।। तैसा उठिला लक्ष्मण । धनुष्य बाण घेउनि ।। १ ।। चंद्रबाण लावुनि गुणि । विरें सोडिला ततक्षणिं ।। अंकुशें सांडिला तोडुनि । दिशा भासति पीतवर्ण ।। २ ।। येरु साधक विररावो । आंगि येउं नेदि धावो ।। शस्त्रें सोडि अजानबाहो । विस्मयो करि लक्ष्मण ।। ३ ।। बाण तोडि वरिचेवरि । अंकुश वर्षला शस्त्र धारिं ।। हस्ति घोडे वरिचे-वरि । मारित जैसा रुद्र कोपें ।। ४ ।। येक लक्ष्मणासिं भिडतो । दुजा गजें गज उलथितो । दोघि केला अनर्थ तो ।। स्वर्गिं देव पाहाति ।। ५ ।। सितानंदन तये वेळि । भैरवास्त्र मोकळि ।। अष्टभैरव समेळि । तये वेळि पातले ।। ६ ।। अष्ट भैरव ह्याति डौर । भुमिसि लोळति जटाभार ।। खणखणा करिति मार । अश्व गज रथ पळति

देखा ॥ ७ ॥ ते निवारित लक्ष्मण । भैरव चालिले दारुण । अवघे खळ-
वळिलें गगन ॥ त्रिशुळ तिक्ष्ण वाजति ॥ ८ ॥ तवं तो पवनाचा
नंदन । पुढां चालिला हांक देउन ॥ भैरव पळाले जिव घेउन । वज्र
शरिर म्हणोनि ॥ ९ ॥ पळाले क्षेत्रपाळ । मग अंकुशें घातलें
बाणजाळ । मोहनास्त्र अतिप्रबळ । अवघा धुम्र दाटला ॥ १० ॥ हातिचे
गळाले हातियेर । तटस्त जाला लक्ष्मण विर ॥ आणि पवनाचा कुमर ।
मग अंकुश बांधिता झाला ॥ ११ ॥ पुसि धरून हनुमंत । लहु
बागि बोढित ॥ अंकुश लक्ष्मणा चालवित ॥ ऐसे विनोदें आणिले
॥ १२ ॥ दोघांसि बंधन केले । येउनि मातेसि भेटले ॥ चरणि
मस्तक ठेविलें । नमस्कारिलें श्रीगुरुसि ॥ १३ ॥ पुढें मनोहर
कथा । युद्ध होईल रघुनाथा ॥ दोघे पुत्र आणि सिता । रघुनाथासि
भेटी ॥ १४ ॥ उमेसि म्हणे महेश । ऐक रामकथा सुरस ॥ राम-
भेटीचा सौरस । उमा रामरस सेवि पां ॥ १५ । [ अध्याय ६ वा संपूर्ण ]

श्रीरामचंद्र ॥ येक घायाळ वानर । संकटि पावले नगर ॥ ह्मणति
पाव गा दातारा । शंखनाद करिताति ॥ १ ॥ ह्मणति झाला प्रळयांत ।
येकचि उरला रघुनाथ ॥ तैसा देखिला सुत । सैन्याविणे परियेसा ॥ २ ॥
जवळि वसिष्ठ विश्वामित्र । बिभीषण शरणागत ॥ सभा दाटलि बहुत ।
ते कोणासि न वर्णवे ॥ ३ ॥ तवं ते घायाळ पातले । ह्मणति काय रे
वर्तलें ॥ येरि सांगों आदरिलें । ह्मणति ऐके स्वामिया ॥ ४ ॥ लहान
देखोनि कुमर । ह्मणोनि चालिले वानर ॥ तवं ते संधान करिति
खडतर । आकांत थोर प्रवर्तला ॥ ५ ॥ जिंकिले अठरा जुपति । मग
चालिले कपिपति ॥ त्यांची केलि हो विपति । सांगतां कथा वाढेल
॥ ६ ॥ यावरि चालिले लक्ष्मण । संग्राम जाला जि दारूण ॥
परि तो नावरे विर आपण । लक्ष्मणहि बांधला ॥ ७ ॥ दिसति
वारा वरूवांचे । पराक्रम न बोलवे वाचे ॥ धन्य धन्य माता तयाचे ।
जनक आणि जननि ॥ ८ ॥ राम ह्मणे वसिष्ठासि । आट केला
जि सैन्यासि । आतां चाला वेगेंसि । ह्मणोनि अवघे उठिले ॥ ९ ॥
अयोध्येचे नृपवर । होते राये थोर थोर ॥ शस्त्रें घेउनि अपार । रथ
घडघडाटें चालिले ॥ १० ॥ हस्तिशाळा घोडेशाळा । धनुर्धारि
चालिले खळाळा ॥ अश्वरथ ते वेळां । रामाजवळि पातले ॥ ११ ॥
येक दिधला वसिष्ठासि । दुसरा दिला विश्वामित्रासि ॥ तिसरा दिला
शरणागतासि । मग आपण आरूढला ॥ १२ ॥ आधिच घनशाम
सांवळा । कोटि लावण्याचा पुतळा ॥ कासे शोभे सोनसळा । वरि
मेखळा रत्नजडित ॥ १३ ॥ आंगि चंदनाचि उटि । कस्तुरि

टिळक ललाटि ॥ श्रवणि कुंडलें गोमटिं । सुर्य कोटि प्रकाशले ॥ १४ ॥ निळोत्पळ राजीवनयन । मुकुटि शोभे रत्नाकिरण ॥ हिरे माणकें तेजपूर्ण । ठाई ठाई शोभति ॥ १५ ॥ ऐसिये रथि रघुनंदन । करि घेतले धनुष्यबाण । छत्र घेउनि बिभिषण ॥ कनकदंडे ढाळित ॥ १६ ॥ पुढें काठिकर धांवति । हास्ति पुढारा शोभति ॥ रथ चालति पवनगति । ऐसे रघुपति निघाले ॥ १७ ॥ निघाले अयोध्येमधुनि । शकुन होति ततक्षणि ॥ काडिये पुत्र घेउनि । सोवासिणि भेटलि ॥ १८ ॥ काग दक्षिणेसि गेला । नकुळ भारद्वाज भेटला ॥ चास वामांगि गेला । उजवा गेला पैं मृग ॥ ॥ १९ ॥ डाव्या गेल्या कुरंगिणि । तवं रघुनाथ हरूषे मनि ॥ महास्तोत्रे मंत्रध्वनि । शब्द गगनि न समाति ॥ २० ॥ माझे बाहु स्फुरण होति । जिवासि आनंद वाटति ॥ राम ह्मणे रूषिप्राति । लोचन लवति आमुचे ॥ २१ ॥ जैसा भेटे पाठिचा वा पोटिचा । तैसा आनंद वाटे जिवि आमुच्या ॥ आणि शकुन होति साचा । उजवि बाहे स्फुरतसे ॥ २२ ॥ दिशा दिसति उजळा । सोज्वळा अति निर्मळा ॥ स्फुरण होत वक्षस्थळा । कवण लाभ होईल ॥ २३ ॥ कवण लाभ होईल ॥ जिवासि आनंद वाटेल ॥ कि दारूण युद्ध मांडेल । रुषिराये सांगावें ॥ २४ ॥ तवं रूषि म्हणे गा राघवा । तुं तरि दुर्लभ सकळ देवां ॥ लाघव न कळे तुझि माया । नाना कथा चरित्र जालेया ॥ २५ ॥ गजभारेंसि दाटत । भारें पृथ्वी कांपत ॥ घंटानादें अंबर गर्जत ॥ अश्व किंकिळिया देति ॥ २६ ॥ धनुर्धर पुढें धांवति । वाल्मिकआश्रम देखति ॥ नारद तुंबर नाचति । करि विणा घेउनि ॥ २७ ॥ म्हणे युद्ध जोडेल परिपूर्ण ॥ हें मि कौतुक पाहेन ॥ देव विमानि बैसोन । आले कौतुक पाहावया ॥ २८ ॥ इंद्र ऐरावति आरूढोनि । आले ब्रहस्पति मुनि ॥ तवं तेथें थरारिलि मेदिनि । कथा येथुनि परियेसा ॥ २९ ॥ येरिकडे दोघांजणा । लवांकुश विरराणा । मातेसि बोलति प्रतिज्ञा । युधि जिंकु रामाते ॥ ३० ॥ दोघिजणि श्रृंगार केला । सर्व आलंकार शोभला ॥ धनुष्यबाण करि घेतला ॥ नमस्कार केला श्रीगुरूसि ॥ ३१ ॥ मातेसि केलि प्रदक्षिणा । मातेनें आळिंगिलें दोघांजणा ॥ वंदन केलें चरणां ॥ म्हणे निर्वाण न करावें ॥ ३२ ॥ शंभु म्हणे पार्वतिसि । अपुर्व कथा परियेसिं ॥ युध्य पितेया पुत्रांसि । सुर्यवंसि रघुविर ॥ ३३ ॥ पितेया पुत्रांसि भेटि । कथा ऐकावि गोमटि ॥ रामनाम रत्नपेटि । येणेचि मज समाधान ॥ ३४ ॥ सार म्हणउनि दोनि अक्षरें । तिं म्यां घेतलि मनोहरें ॥ या समान

आणिक दुसरें । नाहि साजिरे सर्वथा ॥ ३५ ॥ देखोनि यां दोघांजणा । विस्मित झाला रामराणा । म्हणे कैसे धरिलें इतुकेया सैन्या । हे लहान वाळक ॥ ३६ ॥ दिसति वाळकें राजसें । याचे वाण रुतले कैसे ॥ वंधु धरिले येकासरिसे । ब्रह्मांड कैसे खंचले ॥ ३७ ॥ जरि म्यां युध्य न करावें । तरि सैन्य कैसें सुटावें ॥ म्हणोनि रथ पेलिला राघवें । निर्वाण युध्य मांडलें ॥ ३८ ॥ कोप आला ते अवसरि । भये वसुधा थरारि ॥ देव पाहाति अंवरि । युध्य पित्यापुत्रांचे ॥ ३९ ॥ येकमेकांतें बोलति । कोपलेया रघुपति ॥ कैसे दोघेजण वांचति । तरि यांसि भय नाहि ॥ ४० ॥ राया रामाचे पुत्र । होते महावळिये थोर । तव रामे धनुष्या लाविला शर ॥ म्हणे सावध रे मुलानो ॥ ४१ ॥ तुम्ही पुरुषार्थ थोर केला । तो मि कानि ऐकिला ॥ कैसे राहाल वाणातळा । ते मि आतां पाहेन ॥ ४२ ॥ आतां दोघां मारिन । वालिमकिचा आश्रम मोडिन ॥ सकळ सैन्य सोडविन । तरिच मि सुर्यवंसि ॥ ४३ ॥ तवं अंकुश वोले हांसोनि । तुमचा पुरुषार्थ कळला मनि ॥ घरिंचि लक्ष्मी सोडुनि । वाहिर किर्ति मिरवितसा ॥ ४४ ॥ ताटिका वधिलि निशाचरि । सुर्पनखा विटंविलि नानापरि ॥ ते तुम्ही वळिये थोरि । केलें युध्य पुरुपार्थें ॥ ४५ ॥ तुम्हि वडिल पितयासमान । म्हणोनि राखावें महिमान ॥ जरि याल रुपि वाल्मिकासि शरण । तरि तुम्हासि सोडिन ॥ ४६ ॥ माझा गुरु वाल्मिक प्रसिध । तेणें विद्याप्रसाद ॥ त्याचेनि वळें करितों युध्य । हें निरुते ऐक राया ॥ ४७ ॥ यां वानरांचेनि वळे । वंधु सोडुं आले हिंसाळें ॥ लक्ष्मण भरथ शत्रुघ्न येकेचि माळे । बंधनि पाहा शोभति ॥ ४८ ॥ आतां तुम्हास तैसिच गति । विमुख झालि सिता सति ॥ तुमची अवघि गेलि शक्ति । हें निभ्रांत ऐक राया ॥ ४९ ॥ इतुके ऐकोनि राम रावो । म्हणे तुं साहें रे माझा घावो । जेणें आपुला होय ब्रह्मकटाहो । ऐसें संधान सोडिलें ॥ ५० ॥ ठाण मांडुनि माहेश्वरि । वाण वरुपला पर्जन्यधारि ॥ अंकुश तोडि वरचेवरि । वाण साधक निजगडा ॥ ५१ ॥ रामें घातलें विष्णुशस्त्र । दारुण प्रवर्तले घोरांदर ॥ कैसे न कळे देवाचें चरित्र । विष्णुरूप प्रकटला ॥ ५२ ॥ शंख चक्र पद्म गदा । तो महा विष्णु प्रवर्तला विरोधा ॥ भावरूपें कैसा द्वंदा । दाहि दिशा व्यापिल्या ॥ ५३ ॥ अंकुश विरे ततक्षणि । लक्ष्मिशस्त्र लाविलें गुणि । करि आरति घेउनि । वोवाळित विष्णुसि ॥ ५४ ॥ लक्ष्मी विष्णु गेले गगना । विस्मित झाला रामराणा ॥ म्हणे याचा गुरु धन्य । कैसि अस्त्रे सांधितलि

मराठी ... ग्रंथ क्र. ५५८८२ दि: ८/१०/८ ९५५७८ ... २०८० ... सं. दि. २२।३।८



॥ ५५ ॥ आणिखि तुझि रे अद्भुत शक्ति । तुं महावळिया तिहि लोकिं ॥ तुझे हातें झालों सुखि । ऐसा विर न देखों ॥ ५६ ॥ तरि तुझा कवण मातापिता । ऐसें सांग रे तत्वता ॥ ब्रह्मवंसि नव्हसि सर्वथा ॥ क्षेत्रवंसिचा तुं प्राणि ॥ ५७ ॥ अंकुश म्हणे तये वेळीं । सांगणें नलगे ये काळि ॥ तुम्हासि जिंकेन रणाळि । मग येकांति सांगेन ॥ ५८ ॥ जाति कुळा तुम्हा काय चाड । तुमसि युध्य करिन प्रचंड ॥ युधि पुरविन तुमचे कोड । तरि मि सिष्य वाल्मिकिचा ॥ ५९ ॥ होता आम्हासि तुमचा भरंवसा । युधि विरासि होति तुमचि आशा । तुम्हा मागें कोण ऐसा । या सैन्यांसि सोडविल ॥ ६० ॥ आतां झालि निराश । त्यांहि स्मरावें कवणास ॥ इतुके दिवस होति आश । राम सोडविल म्हणोनि ॥ ६२ ॥ म्हण(त) होतों कि क्षेत्री राम । हा तवं फिटला अवघा भ्रम । आगिल अवघा भ्रम ॥ याचिपरि चालविला ॥ ६३ ॥ आणिखि आहे बुद्धि गाढि । जेणें फिटति सकळ सांकडि ॥ ऐसि मिळउनि मागुति पुढि । क्षेत्रधर्म चालवावा ॥ ६४ ॥ ऐसें अंकुश बोलिता । हांसे आलें रघुनाथा ॥ म्हणे तु क्षेत्रि होसि समर्था । आतां हें शस्त्र सांभाळि ॥ ६५ ॥ पंचमुख बाण लावुनि गुणि । व्याघ्र सोडिले धरणि ॥ येरें सिंहास्त्र जपोनि । येरयेरां निवारिले ॥ ६६ ॥ कोप आला रघुपति । वारू हिंसकार करिति ॥ आणि संधान स्मरे चित्तिं । अमित्य बाण सोडिले ॥ ६७ ॥ जितुके येति रामाचे बाण । अंकुशा देति आलिंगण ॥ आणि अंकुशाचे बाण । श्रीरामचरणें लागति ॥ ६८ ॥ पितियाचे बाण जाण । पुत्रासि देति आलिंगण ॥ आणि पुत्रांचे बाण । पितयाचरणि लागति ॥ ६९ ॥ कि त्या बाणि जाणितलें । पिता पुत्र ऐसें वोळखिलें ॥ म्हणोनि भेटते जाले । बाणमिसें परियेसा ॥ ७० ॥ कि आज्ञा दिधलि वनवासिं । म्हणोनि भेटति प्रेमेसि ॥ तंव रघुनाथ प्रेमें मानसि । येकमेकांसि उल्हास ॥ ७१ ॥ कि तो कृपाळु रघुपति । आपुल्या बाळकांवरि प्रिति ॥ बाणासि आज्ञापि चित्तिं ॥ हें रुषिप्रति कळों आलें ॥ ७२ ॥ देव वरुषति सुमनें । ऐसें कौतुक देखोनि ॥ हरुसें नाचे नारदमुनि । जयजयकार प्रवर्तला ॥ ७३ ॥ इतुकें तेथें वर्तलें । सकळ रुषि प्रेमें डोले ॥ विश्वामित्र म्हणे ते वेळे । हे पुत्र तुझे राघवा ॥ ७४ ॥ तवं राम म्हणे अहो जि रुषि । कैंचे पुत्र हो आम्हासि । सिता वधिलि वनासि । होउनि गेलि वरुषें बारा ॥ ७५ ॥ हें आम्हासि ऐकतां चोज । तुम्ही त्रिकाळज्ञानि रुषिराज ॥

माझे धरूनि नेले बंधुराज । आणिखि कपि समस्त ॥ ७६ ॥ वसिष्ठ बोले तये वेळा । खुणे वाल्मिक घालि डोळा ॥ म्हणे वारू सोडा वहिला । आणि बंधु रामाचे ॥ ७७ ॥ वाल्मिक धावे लवलाहि । म्हणे गुरूदक्षिणा मज देई । येरू म्हणे स्वामि आज्ञा मज देई । वारू सैन्य सोडावया ॥ ७८ ॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन । येरू म्हणे तुमचि आज्ञा प्रमाण ॥ मग सांडिलें सकळ सैन्य । बंधु वारू समवेत ॥ ७९ ॥ बंधु भेटले श्रीरामासि । आनंद झाला सकळांसि ॥ तवं बोलिले वाल्मिक रूषि । हे पुत्र तुझे राघवा ॥ ८० ॥ तवं अगस्ति म्हणे श्रीरामा । परब्रह्म मेघ-शामा ॥ हे पुत्र तुझे पुरुषोत्तमा । लक्ष्मणासि पुसावें ॥ ८१ ॥ रामें लक्ष्मणाकडे पाहिलें । तवं त्याचें मन गहिवरलें ॥ बोलों पाहे परि मन कांटाळलें । अश्रूपात ढळताति ॥ ८२ ॥ मग सावध होउनि लक्ष्मण । बोलता जाला गहिंवरोन ॥ तई तुम्ही आज्ञा देउन । सीता वधावया पाठविली ॥ ८३ ॥ मग सिता नेउनि वनासि । ते वेळि ते बोलिलि मजसि ॥ गर्भ उदरिं असे तिन मासि । ठाउके असो लक्ष्मणा ॥ ८४ ॥ ऐसें वचन ऐकोन । दुख आठवितें झालें मन ॥ मग तया वनामाजि सोडुन । मि आलो तुम्हापासि ॥ ८५ ॥ मग तयावरि वाल्मिक बोले । माझे विद्यार्थि पुष्पांसि गेले ॥ त्यांणि देखिलि ते वेळे । वनामाजि जानकिये ॥ ८६ ॥ मग ते आश्रमासि आलि । आमुच्या चरणासि लागलि ॥ सिता आह्माप्रति बोलिलि ॥ म्हणे मि गर्भिणि तिन मास ॥ ८७ ॥ दिवस पूर्ण झाले । दोघे पुत्र जन्मले ॥ लव अंकुश नाम ठेविलें । तुझेया दोघां पुत्रांचे ॥ ८८ ॥ आम्हि आपुले शिष्य केले । पूर्ण विद्या अभ्यासिले ॥ आतां पुत्र सांभाळि आपुले । म्हणोनि भेटविले श्रीरामा ॥ ८९ ॥ ऐसें ऐकतां रघुनंदन । पुत्रांसि देत आलिंगण ॥ सजळ जाले लोचन । मांडिवरि बैसविले ॥ ९० ॥ लक्ष्मण भरथ शत्रुघ्न । आलिंगति प्रिति करून ॥ सुग्रिवादि हनुमान । बिभीषण भेटले ॥ ९१ ॥ नारद म्हणे वाल्मिकासि । वेगि आणा जानकिसि । समारंभ करा आनंदेंसि । चौक भरविले मुक्तांचे ॥ ९२ ॥ तवं आणिलि जनकबाळा । येरि वंदि चरणकमळा ॥ आसुवें आलि श्रीरामडोळां । मग अर्धांगि बिनटलि ॥ ९३ ॥ दोघे पुत्र मांडिवरि । रघुनाथ जानकि सुंदरि ॥ ब्राह्मण गर्जति मंत्रोच्चारि । रुषि नारि सेंस भरिति ॥ ९४ ॥ मस्तकि टाकिति अक्षता । विजयि होणे रघुनाथा ॥ अकरा सहस्र वरुषें आतां ॥ राज्य करा अयोध्येचे ॥ ९५ ॥ ऐसा झाला महोत्साहो । सिता पुत्रांसह रामरावो ॥ ब्राह्मण करिति उछावो ।

जयजयकार प्रवर्तला ।। ९६ ।। रुषि करिति बहुत स्तुति । म्हणति जयजया सितापति । तुझेनि नामें उत्तम गति । होय विश्रांति प्राणियां ।। ९७ ।। रामा तुझें नाम अद्भुत । योगियां पुरति मनोरथ ।। शंभु पार्वतिसि उपदेसित । ऐसें बोलति पुराणि ।। ९८ ।। ऐसें वसिष्ठें बोलिलें । मुहुर्ते वरत्रे निघाले ।। अयोध्येसि पातले । म्हणति रथ आणा वेगेसि ।। ९९ ।। रुषि वैसविले रथीं । मध्यें पुत्र आणि सितासति । कनकदंडें ढाळिताति । चामरें भरथ शत्रुघ्न ।। १०० ।। म्हणे नामा विष्णुदास । श्रीरामा भेटले लवाकुश ।। सिता रामचंद्र अयोध्येस । राज्य करिति येकाज्ञा ।। १०१ ।।

# वस्त्रहरण

श्रीगणेशाय नमः ।। श्री रेणुका जयती ।। अथ वस्त्रहरण लिख्यते ।। नम(न) करुयां गणपती ।। करकमलिं करूं आरती ।। मज द्यावी विमला मती ।। हे विनती पर्यसा ।। १ ।। नमिन द्वारकेचे नाथु ।। ते महाविष्णु वैकुंठांतु ।। त्यास साष्टांग प्रणीपातु ।। हृदयींकमलीं गोविंदु ।। २ ।। झाले ते ब्रह्मयापासुनी ।। देवी त्रिभुवनपावनी ।। चहुं वेदांची जननी ।। हंसासनी सारजा ।। ३ ।। आधीं नमु ब्रह्मकुमरीं ।। ते सारजा परमेश्वरी ।। मग नमुं वागेश्वरी ।। वेदमाता भवानी ।। ४ ।। कवणा न कळे ईचा पारू ।। ब्रह्मादीकां अगोचरू ।। कानीं धरूनी शंकरू ।। नाचवीले कैलासीं ।। ५ ।। धृतराष्ट्ररायाचा नंदन दहापूरी ।। हस्तनापूरमाझारीं ।। दुर्योधन राज्य करी ।। वैराकार स्मरत ।। ६ ।। सकळीक मीळोन कौरव ।। कांहीं येक रचूं माव ।। वन लंघीती पांडव ।। ऐसा प्रबंध वीचारिजे ।। ७ ।। तवं तो शकुनीया बोलत ।। दुर्योधना देई चित्त ।। तूज येक सांगेन त्वरीत ।। फांसे करिन कपटाचे ।। ८ ।। तु द्युतकर्मी खेळ खेळिजे ।। राज्य धर्माचें जिंतिजे ।। या वेगळें अन्न नेघिजे ।। तरी दंडिजे आह्मासी ।। ९ ।। एसा मंत्र आठवला ।। सकळिकासी उत्साह जाला ।। विदुरू बोळाउ पाठविला ।। भेटीकारणें ।। १० ।। लिखितें लीहिलें मावचि ।। भावभक्ति अहंता याची ।। आह्मांला चाड नाहीं राज्याची ।। तुह्मी अपलें सांभाळा ।। ११ ।। विदुरू रीघे झडकरी ।। पावे वरूणा(व)ती नगरी ।। धर्मु भेटे अवस्वरी ।। क्षेम आलिंगन जाळीं ।। १२ ।। देखिलें धर्माचें मंदीर ।। वैष्णवांचे गजर थोर ।। त(व)कें झळकती अंबर ।। शंखशब्द

वाजती ॥ १३ ॥ मोह न धरितील ब्रह्मचारी ॥ कमंडलु घेउन आदर करी। यज्ञोपवीत उदरावरी ॥ कृष्णाजिनें घालीती ॥ १४ ॥ चरणकमळ प्रक्षालुनी ॥ चंदन अक्षता लाउनी ॥ वीडे कर्पूरेसी येउनी ॥ मग बोलती जीवीचे ॥ १५ ॥ पूसीयेले धर्मराजें ॥ बहुतां दीसां केले वीजे ॥ तुम्ही आलेती कवणा काजे ॥ तरी सांगीजे आह्मासी ॥ १६ ॥ विदुरू म्हणे पांडुनंदना ॥ आलो तुमचीया दर्शना ॥ उत्कंठा दुर्योधना ॥ थोर असे भेटीची ॥ १७ ॥ तुम्ही यावया कारणें ॥ ह्मणोन पाठवीलें जाणा ॥ हस्तनापुरासी आपण ॥ प्रातःकाळी चालीजे ॥ १८ ॥ धर्म बोले वीदुरासी ॥ तेहि काय केलें हो आम्हासी ॥ विख घातलें बंधुसी ॥ लाक्षाघरी जाळीलें ॥ १९ ॥ उपाय रचिले अनेक ॥ तेहि तरी लाविली शिक ॥ अैशी त्याची सोईरीक ॥ शब्दी सांभाळु करिजें ॥ २० ॥ विदुरू म्हणे पांडुनंदना ॥ ते काही न धरावे मनि ॥ ते वेळे बोलिली कौंति जननी ॥ यास मान देईजे ॥ २१ ॥ तवं त्यो सारथी हाकारूनी ॥ त्यास संज्ञा करूनि ॥ रथ संजोगा म्हणोनि ॥ मग निघाति झडकरी ॥ २२ ॥ प्रस्थानाचे वेले ॥ धर्म पायी अडकोले ॥ डाव जातील कावळे ॥ सर्प वाट पाडिली ॥ २३ ॥ आडवा टिला जो रेखिला ॥ पुढें येक विप्र जो देखिला ॥ हानि सांगतो पिंगला ॥ यैसें द्रुपदि बोलिली ॥ २४ ॥ आजी-चीया दिवसें तुम्ही ॥ येणे न करावे स्वामी । अपसकुन तुम्ही । सकळही विचारा ॥ २५ ॥ जोशी बोलाउन आणुनी ॥ बरवे मुहूर्त पाहुनी ॥ सर्वहि शिणगार करुनि ॥ मग पांचा वीर जा करिजे नगरा हस्तिनापुरा ॥ २६ ॥ द्रुपदा रायाची कुमरी ॥ बैसविली रथावरी ॥ पांचा आरूढहि झाले ॥ घवघवतील निशाने ॥ घरघरतील तोडर वांकी ॥ पाईक परिवाराचा दाटी ॥ नगरा हस्तनापुरा ॥ २७ ॥ नगर पावतो अरजुन ॥ हातीं दत्तशंख घेउनी । वाजविला तरहादुनी ॥ नांदे अंबर गर्जे ॥ २८ ॥ येतो रे पंडुचा नंदन ॥ जैसा राजा युधिष्ठिर ॥ सवें बंधूचा दळ-भार ॥ मेरू जैसा महिमेचा ॥ २९ ॥ देखुन उठे दुर्योधन ॥ थोर करी आदर मान ॥ बहु सूनिच वाया घालुन ॥ अर्घ्यपाद करीती ॥ ३० ॥ तीकडू(न) आलि भानामती ॥ तीणे आलींगिली द्रुपती ॥ करी धरुनी सुंदरी (ती) ॥ मग गांधारी भेटली ॥ ३१ ॥ भानामतीनें आळिंगिली ॥ धृपदी गांधारी भेटली ॥ करि धरूनियां नेली ॥ बसविली मंदरीं ॥ ३२ ॥ तवं त्या भानवमा पाहाती ॥ दिव्य रसांच्या ज्या परि ॥ षड्रसपक्वान्न निपजती ॥ मग वेळिती राजाने ॥ ३३ ॥ शाखा मांडिया परिवाडि ॥ घार्‍या गुळवर्‍या

कुमरी ॥ नानापरीची अन्ने भारी ॥ लाडु तिळवे अळीती ॥ ३४ ॥ फुगसा केळांचा शिखरणी ॥ कैश्या निपजवी सुगरणी ॥ कर्पूरेंसी वास देउनी ॥ मग त्या कालवणा करिती ॥ ३५ ॥ चोखोट सुरगळया पाहती ॥ दुध क्षीरी आळविती ॥ पापड फेणिया तळिती ॥ मग वेळी दिव्यान्ने ॥ ३६ ॥ पाक प(क्का)न्न प्रतालिती ॥ पंडु-पुत्र आरोगीती ॥ भानामती ऐसे वाढिते ॥ त्या प्रचीत ऐसें दाविती ॥ ३७ ॥ उष्ण उदकें आंचवती ॥ बावन चंदन लाविती ॥ विडे कर्पूरेंसी घेतां ॥ मग ते जाती साळेसी ॥ ३८ ॥ दिल्ही अळंकार भूषणें ॥ सर्वही रत्नें सुलक्षणें ॥ आणिक पाटोल्या कोरील्या ॥ राणिया देती ॥ ३९ ॥ नगर शिणगार ऐसें ॥ राव दुर्योधन बोले ॥ उभवा गुढिया तोरण ॥ हस्ति घोडे निजवार ॥ ४० ॥ चित्रसाला ज्या पावनी ॥ मदलसपुतळीया झळकती ॥ इंद्रनील खणोखणी ॥ गोमेध कळसी झळकती ॥ ४१ ॥ सूर्यक(र) मोत्यांच्या च्येवती ॥ जैस्या लेपांच्या ठेवणी ॥ माणीकांच्या प्रभा-वळी ॥ विश्वकर्मा हिंदाण ॥ ४२ ॥ त्यांची वीसरजन जालीं ॥ तेही पाहिलें येराकडे ॥ सकळीक सभेसी वैसले ॥ मग बोलती जीवीचें ॥ ४३ ॥ कांहीं येक न गमेचि वेळु ॥ ऐसा दीनु परिवळु ॥ द्यूतकर्मीचा खेळिजे खेळु ॥ मग जायी जैसी घरु आपुलिया मंदिरा ॥ ४५ ॥ वैसे दुर्योधन राजा ॥ धर्म सोमवंशी दुजा ॥ वेळ कम याच्या काजा ॥ सारीपाट मांडला ॥ ४६ ॥ खण सारीले अपार ॥ दुर्वा नवरत्नांचे हार ॥ नानापरीचे अलंकार ॥ हातसर मुद्रीका ॥ ४७ ॥ फासें ढाळीले कपटे ॥ पांडवासी पडिले नाटे ॥ डाव वळताती विकटे ॥ दुर्योधनरायाचे ॥ ४८ ॥ जितली अलंकार भूषणे ॥ सर्वही रत्नें सुलक्षणे ॥ खण नूपरचि ऊणे ॥ मग भंडारें वडवीती ॥ ४९ ॥ जितले जितले कोठारनीळा ॥ गाई ह्मेशीयाच्या शाळा ॥ कापड चौकीया सकळा ॥ हस्ती घोडे निजवार ॥ ५० ॥ जितली जितली समस्त शहरे ॥ देश दुर्गे पुर पाटणें ॥ राज्य आणविले यारों ॥ धुर्योधनें कौरवें ॥ ५१ ॥ जितिला गांडीव(धर) अर्जुन ॥ गदासहित वृकोदर ॥ आणिक धरणीधर वीर ॥ नकुळ सहदेव जितीले ॥ ५२ ॥ इत्का वृत्तांत गा जाला ॥ दुश्यासन हाकारीला ॥ तयास नीरोप दीधला ॥ वेगीं आणा द्रूपदी ॥ ५३ ॥ तंव तो शब्दासरिसा नीघे ॥ चित्रसालीमाजी रीघे ॥ जवळी बोलाउनी वेगें ॥ सांगु लागे वृत्तांतु ॥ ५४ ॥ आवो द्रुपदी सुंदरी ॥ तुम्हास हरवीले भर्तारीं ॥ दुर्योधने झडकरी ॥ पाचारीलें तुम्हासी ॥ ५५ ॥

भोंवरा पलंग मंचकावरी ॥ पडली द्रुपदाची बाळी ॥ परिचारीका शतचारी ॥ तीचीं सेवा करिताती ॥ ५६ ॥ बोले द्रुपदाची बाळा ॥ मी तरी आजी रजस्वला ॥ येरु म्हणे अवकळा ॥ सत्तेकरून नेयीन ॥ ५७ ॥ मग ऊठीला झडकरी ॥ वोढुन बाहेरी काढीली ॥ तवं ते बाळा दचकली ॥ मग शंकली मानेसीं ॥ ५८ ॥ विस्मो करीते मनेंसी ॥ भीऊन नीघाली अपेसी ॥ चंद्रवदनी केली जेसी ॥ पवन चाळे कंपत ॥ ५९ ॥ पुढें दुशासन चाले अंतरें ॥ मागें द्रुपदी येते स्थीरें ॥ चरणीं रुणझुणती नपुरे ॥ अंदुगजरें वाजति ॥ ६० ॥ चाले सत्यांशिरोमणी ॥ पांडवांची येते राणी ॥ पृष्टीवरी रुळे वेणी ॥ माझा तनकां होते धुणी ॥ ते स्वामीणी स्मरल्या ॥ ६१ ॥ आंगें सुगड पातळ ॥ डोळे व्यंकट विशाळ ॥ ललाटीं मृगनाभि अभिनीशल[1] ॥ ह्रदयींकमळीं भेदत ॥ ६२ ॥ निढली अर्धचंद्रटीळा ॥ मुखीं अमृताची कळा ॥ नासिकीच्या मुक्ताफळा ॥ उपमा कोणा देयीजे ॥ ६३ ॥ कौरव तुकावीती माथा ॥ पहा पहा इची स्वरूपता ॥ इचे अवयव न्याहाळीतां ॥ दृष्टी नव जाय खालचि ॥ ६४ ॥ कौरव बोलतील आतां ॥ जरी हें निधान येईल हाता ॥ पूजा बांधो विश्वनाथा ॥ मुक्ताफळीं लाखोली ॥ ६५ ॥ बोले दुर्योधन राजा ॥ ऊणा डाव पडिला तुझा ॥ भर्त्तारासहित तुझें स्यां ॥ सकळही जिंतिले ॥ ६६ ॥ बोले दुर्योधन राजा ॥ अंगीकार झाला माझा ॥ भर्तारासहित तुझें स्यां ॥ परीवार जिंतीलें ॥ ६७ ॥ अवो द्रुपदी सुंदरी ॥ तुझें राज्य तुं सावरी ॥ आतां कांहीं न मनी धरीं ॥ हे येक दुसरे वांचुनी ॥ ६८ ॥ अवो द्रुपदी सुंदरी ॥ येउं वैसे जानूवरी ॥ इतक्या अवळा कां उत्तरीं ॥ कोपें अग्नी प्रजळली ॥ ६९ ॥ तुझे मांडवरी ॥ वैसे ह्मातारे गांधारी ॥ ते तरी शतपुत्राधारी ॥ ते पर्यंकी वैसो कां ॥ ७० ॥ तुझे मांडवरी ॥ वैसो माता रे गांधारी ॥ आणीक पाठीची सहोदरी ॥ ते पर्यंकी वैसो कां ॥ ७१ ॥ तुझे मांडी वैसो काळ ॥ झडकरि उठो वडवानळ ॥ पडो वीज नलगे वेळ ॥ जिव्हे काळ डसो कां ॥ ७२ ॥ तुझी मांडी रे कर्पो ॥ तुझें सकळही सर्वही भस्मो ॥ तुझे जिव्हे उठतील खु...मे ॥ तुझें राज्य जालीन ॥ ७३ ॥ अडवी दृष्टी मज पहासीं ॥ येरे वाचेनें बोलसी ॥ उगाच सर्वांगी जळसी ॥ याच सभे देखतां ॥ ७४ ॥ येरे वाचेनें बोलसी ॥ अडवी दृष्टीनें मज पहासी ॥ उभाच उरीं रे फुटसी ।

१ अतिनितळ ?

याच सकळां देखतां ॥ ७५ ॥ अरे मज ह्मणसी रे अनाथ ॥ माझे पांचही जण जीत ॥ तुझा करितील घात ॥ हें तूं जाण निभ्रांत ॥ ७६ ॥ तुझे मज लागो रे हात ॥ याच सकळां देखतां ॥ ७७ ॥ चंद्रसूर्याच्या ज्योती ॥ जरी ह्या उप्रास्या उगवती ॥ कोरडा होईल समुद्रपती ॥ तरी मी तुजसी अनुसरे ॥ ७८ ॥ गंगे जरी दिसेल मुदु ॥ आणि मर्यादा सांडील सिंधु ॥ स्त्रीविपु होईल नारदु ॥ तरी मी तुजचि अनुसरे ॥ ७९ ॥ प्रतिज्ञा पाहेरे बोलाची ॥ गदा बैसो रे भीमाची ॥ वाचा वदतें आमची ॥ ब्रह्मादिकां न कळे ॥ ८० ॥ इतक्या उत्तरीं खवळला ॥ कोपें क्रोधे क्रांत जाला ॥ थोड्या तवंकी गर्जीनला ॥ मग बोलला हव्यासें ॥ ८१ ॥ धरा रे धरा ईस मारा ॥ वस्त्रें घेउन नग्न करा ॥ थोर विटंबा हे सुंदरा ॥ या भर्तारा देखतां ॥ ८२ ॥ इतकेया अवस्वरी ॥ मनामाजी स्तुती करी ॥ पावें पावें बा श्रीहरी ॥ जरी अनाथा कैवारी ॥ ८३ ॥ होसील बंधु जरी सोयरा ॥ जतन करी या उत्तरा ॥ वेळ न लावी दातारा ॥ लवलाहीं पाविजे ॥ ८४ ॥ भक्ता प्रल्हादालागुनी ॥ अवतरलेती वैकुंठीहुनी ॥ असू (र) नगरीं प्रकटुनी ॥ नरसिंव्हरुपीं पावलेती ॥ ८५ ॥ तैसें मजलागी पावीजे ॥ वेग नीश्चल बीजें करिजे ॥ देवराया अपत्य तुझें ॥ शरणागत ह्मणोनीयां ॥ ८६ ॥ तुं अवधारी घननीळा ॥ तुं बा आमची जीवनकळा ॥ रक्षीं रक्षीं बा गोपाळा ॥ हे अवकळा चुकवी ॥ ८७ ॥ तुं अवधारी नृत्य[1] खरी ॥ तुं बा आमचा कैवारी ॥ धांवोनी यावे झडकरी ॥ रव- ॥ ८८ ॥ संभवी माधवा ॥ तुं अवधारी केशवदेवा ॥ परमानंदा रे मुकुंदा ॥ धांवोनि यावे श्री अनंता ॥ ८९ ॥ मज मांडले निर्वाणा ॥ आतां मी जाउं कोणा शरणा ॥ धांवोनी यावें पुरुषोत्तमा ॥ जगजीवना स्वामीया ॥ ९० ॥ धांवोनि यावें चक्रपाणि ॥ पहुडलेती सुखशयनी ॥ विडिया देती भीमकबाळी ॥ तेथें मन तुझे रहि जालें ॥ ९१ ॥ तुझें तीचे येक चित्त ॥ कुडी वेगळी प्राण येक ॥ आतां विसरलासी मज ॥ कृपासिंधु गोविंदा ॥९२॥ इतुकी कारुण्याची वचनें ॥ तें अयीकीली नारायणें ॥ पीतांबरु जनार्दनें ॥ मुखावरुन वारीला ॥ ९३ ॥ इतकी कारुण्याची ध्वनी ॥ ते पडली श्रीहरीचे कानीं ॥ मग उठीले गजबजोनी ॥ सुदर्शन घेतले ॥ ९४ ॥ कवणास कवणे रे गांजीनले ॥ कवणे धावा पोखारिला ॥ गरुड वेगेसी पातला ॥ तो आला द्रुपदीजवळी ॥ ९५ ॥ गरुडावरी बैसो-

१. नृत वैखरी ?

नीयां आला ॥ घननील सावळा ॥ पीतांवरु झळकत्या ॥ तें द्रुपदीनें देखीले ॥ ९६ ॥ आले द्रुपदीजवळी ॥ देव द्वारकेचे हरी ॥ चहुंभुजीं आलिंगिली ॥ नाभी नाभी ह्मणतसे ॥ ९७ ॥ चहुंभुजीं आळिंगीली ॥ सभेमाजी उभे केली ॥ भौताली कौरवें वेढिली ॥ काळ जैसे पहाताती ॥ ९८ ॥ दुःशासनें खुणाउनी ॥ त्यास नीरोप देउनी ॥ उभे वेणीं धरूनी ॥ झडकरी निरी असोडा ॥ ९९ ॥ इतक्या असोडिल्यावरी ॥ आतां करीसील काय नारी ॥ भीतरी देखीली सेलारी ॥ पाळवधारी मोत्यांची ॥ १०० ॥ कौरव हांसती समस्त ॥ पहा पहा स्त्री बुद्धिवंत ॥ सेला नेसली गुपीत ॥ वस्त्राभरण दुसरा ॥ १०१ ॥ इतका असोडीला हेळा ॥ भीतरी देखिला पाटोळा ॥ पत्रवेलीचा पीवळा ॥ सोनेसळा खिरदोकु ॥ १०२ ॥ दुजा पांचि चांपा नीळा ॥ शुद्ध कीरमेज कुजळ काळा ॥ मनीं संतोषे द्रुपदवाळा ॥ तां गोपाळा रक्षिलें ॥ १०३ ॥ येकें धारर्या तिंवटें ॥ शुद्ध नीलें सुवर्णपाटें ॥ येकें चक्र घनदाटे ॥ येके पाटरीं कृष्णवर्ण ॥ १०४ ॥ सुरंग रंगलें घणवट ॥ वरतां दीडीचे पाट ॥ कासें मीरवतो परवंठ ॥ नेत्रवटें साजिरी ॥ १०५ ॥ कालचा कडतारी सेलारी ॥ पुजा वं... धुचीहि ( अ ) वधारी ॥ चिरी नीरी आणि सेंदुरी ॥ दाहीं अवतारी मीरवतो ॥ १०६ ॥ काळाना किमका पांढरा ॥ सोनेभरीत सेंदूरा ॥ नेसली द्रुपदाची वाळा ॥ माळगंठि साजिरी ॥ १०७ ॥ येक स्वस्तिक तोरण ॥ वनरस पक्षी आणी पेहरण ॥ सुवर्णनंदन सजिवन तळ घोंटण ॥ आलें असे ॥ १०८ ॥ येकें गंगावसागरें ॥ येकें लांजीयरे चीरें ॥ येरूळचि परि काळे ॥ अति सुरंग तसताउ ॥ १०९ ॥ येक हारगल्या पुतळयांचें ॥ येक लाहणा गुंजुराचें ॥ येक झांजुरा मेचुचें ॥ येक गुंजुवर्णी सेले ॥ ११० ॥ येक कस्तुरि मोडि चीरे ॥ रायचुरें हे बहुतें ॥ येकापरीस्म येक नीटे ॥ कोण पेठें निपजली ॥ १११ ॥ येक कस्तुरि मोडि चीरें ॥ रायचूरें हे धुवट ॥ येकापरीस येक नीट ॥ वैजात गरी पोपळी ॥ ११२ ॥ अमदा कदेच्या चौधरया ॥ संगमनेरीच्या चुनड्या साचंडा ॥ वाळापुरीचे चंद्रकळा ॥ नांदगावीचे परी काळे ॥ भोंवर देतील साजिरे ॥ ११३ ॥ लाहोर माहोर मंजीष्ठ ॥ कळंववट हें वरवंट ॥ अलिजापुरीचें पुलीवट ॥ नांदीयेडें मिरगणें ॥ ११४ ॥ तेलंगे त्रीगुळ तुळजापूर ॥ कर्नाटक आले असे ॥ पैठणीची गंगावर्णी ॥ कारल्याची कवण सुरंगें ॥ ११५ ॥ देवगी( री )च्या उंच धटया ॥ ऐसी कवणापासी परि ॥ द्वारकेचा जो श्रीहरी ॥ तो अंबरीं वरसत ॥ ११६ ॥ वीडीची सरवर सेलारी ॥ कांठीं मोतीयांचा धारी ॥ पदरीं हीरीया खणी ॥ आणि वेली पोवळयांच्या ॥ ११७ ॥ देवगिरीच्या

ंच पटश्या ॥ खांदारीच्या पीवळ्या पट्या ॥ उद्गीरीच्या वाळपटया ॥ गेरोजवाली पात्रीची ॥ ११८ ॥ नगरींचीं नानापरी ॥ जिंतूरीची सुरवर गेशिमधारी ॥ कोंकणीची नागमोडी ॥ तेहीं परी नेसली ॥ ११९ ॥ अंच... डनुरीचा झुणा नेसली ॥ श्रीदाकेची कास घेतली ॥ ...आंकोलांचें तम्रांड कुसरी ॥ बुन्हाणपुरी करळे ॥ १२० ॥ पडतुरांची हिरवी पीवळी ॥ कारळ्याची सुरंगधारी ॥ वायी देशीची मेवंती फुली ॥ गुलालवर्णी घोरीची ॥ १२१ ॥ चौळीची चौळ साडी ॥ टेंभुर्णीची काळी धारी ॥ वाल्कीची बागळाडी ॥ अतिकुसरी पुणतांबाची ॥ १२२ ॥ आंद्री पांर्ञीची चोखट साडी ॥ का. री नारीची तांबडी धारी ॥ निसगांवींची हिरवी पिवळी ॥ त्याहुन चढ पंडोची ॥ १२३ ॥ कासीयेची अमृत वेली ॥ द्वारकेचीं समुद्र नीळवर्णी ॥ पंढ( र )पुरीची देवरील साडी ॥ कमळवर्णी कळियांचें ॥ १२४ ॥ त्रिंबकीचें खसखसवानें ॥ त्रिमलेचें अति नेसनें ॥ नरसींपुरीचें अखतवाणें ॥ पीवळे पानल आंकोलाचें ॥ १२५ ॥ वांकळाचे मुठडी साडी ॥ वजुळीची गजावर्त नीळी ॥ त्याहुन चढ दर्यापुरीची ॥ ॥ १२६ ॥ कोरीव धूवट परि परिकाळा ॥ नेसली द्रुपदाची बाळा । नेसली राया वंदन काया ॥ वस्त्रें कैसी खोविली ॥ १२७ ॥ तुळजापुरीची आलि पेंठ ॥ दिंडे येकेरीचे ठसे ॥ वेलां घागर वेली दुरवें ॥ ऐसी चित्र सोडिली ॥ १२८ ॥ ईश्वरासरसी पारवती ॥ नळाखालती दमयंती ॥ रामासरसी सीता जानकी ॥ ऐसीं चित्रें सोडिली ॥ १२९ ॥ चंद्रासरसी रोहिणी देवी ॥ आदित्याची राणा देवी ॥ इंद्रासरसी इंद्रायणी ॥ ऐसीं चित्रें सोडिली ॥ १३० ॥ पिवळें पापेचें पानळ ॥ लाहाण गृतांचे जें वस्त्र ॥ नेसली राया वंदत[1] काया ॥ वस्त्रे कैसीं खोविली ॥ १३१ ॥ येक लवणा पाटाउं ॥ मधें लेहिले गोकुळ ॥ राहि रुक्मीण... सत्यभामा ॥ मध्यें कृष्ण रुक्मिणी ॥ १३२ ॥ पिवळें नेसली तेंही बाळा ॥ वर घननीळ सावळा ॥ गोकुळ द्वारका लेहिली सकळा ॥ आणिक रायी गोपाळा ॥ १३३ ॥ मज पाहतां नवल परी ॥ कंठीं मुक्ताफळांच्या हारी ॥ सोळा सहस्त्र गोपिका नारी ॥ मध्यें कृष्ण रुक्मणी ॥ १३४ ॥ मज पाहतां होईल थोर ॥ महिम खुमाईत धार ॥ गुंजाळ तुर हेळा सर जैतापुर ॥ आलें असे ॥ १३५ ॥ ऐस्या पेंठा ज्या आपार ॥

---

१ वंदित.[?]

आल्या द्रुपदी कैवारा ॥ संभ्रम सिल्यीचा व्यव्हारा ॥ त्यानें होकारा घेतला ॥ १३६ ॥ वस्त्रें झाली असंख्यात ॥ भागले दुश्शासनाचे हात ॥ पुरे पुरे ह्मणत ॥ दुर्योधन वारी तयासी ॥ १३७ ॥ दुश्शासन खुणावीत ॥ मोटा बांधा रे ह्मणत ॥ परतोन पाहे प्रतिव्रता ॥ आपेंआप जळालीं ॥ १३८ ॥ आतां होईल परे पतिव्रता ॥ ईची वस्त्रें न येत हाता ॥ या समस्ता देखतां ॥ आपेंआप जळाली ॥ १३९ ॥ फांसे करतळीं घेतलें ॥ मग द्रुपदी ढाळीयेलें ॥ पहिलें पद जें जिंतिलें ॥ मग सोडवीले आपणासी ॥ १४० ॥ सोडिला सोडिला धर्म भत्तारू ॥ गदासहित वृकोदरू ॥ आणिख धरणीधर वीरू ॥ नकुळ सहदेव सोडविले ॥ १४१ ॥ सोडीली सोडीली धनुष्यभातें ॥ येरें अन्येगें समस्तें ॥ लुगडी कापडें अळंकारसहीते ॥ पांचहीं नगरे सोडीवीली ॥ १४२ ॥ इतकें पैजेसी सोडवीलें ॥ दुर्योधनें जाणितीलें ॥ फांसे करतळीं घेतलें ॥ नेऊन समुद्रीं टाकिले ॥ तेथुन वैर जे प्रगटलें ॥ मग सांगा ते आपार ॥ १४३ ॥ ह्मणा रे गोविंदु गोविंदु ॥ परमात्मा परमानंदु ॥ पुरुषोत्तम कदलीकंदु ॥ तो सारथी द्रुपदीचा ॥ १४४ ॥ ह्मणा रे नरहरी नरहरी ॥ असूर कुळ-ताति तोडरी ॥ सुदर्शन ज्याच्या करी ॥ तो कैवारी पांडवा ॥ १४५ ॥ शरणागतां वरपंजरू ॥ कृष्ण कृपेचा सागरू ॥ हरी नामया दातारू ॥ तो आधार पांडवांचा ॥

इति श्री वस्त्रहरण समाप्त ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# ॥ श्रीतुळसी आख्यान ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीतुळसीआख्यानप्रारंभ ॥
गणगवरिचा कुमरू । सिद्धिबुद्धीचा दातारू ॥
आता श्रीवोथ गणेश्वरू ॥ मंगळमूर्ति मोरया ॥ १ ॥

मग नमिली सारजा सुंदरी । बैसोनि आलि हंसावरि ।
तुज विनवीले वागेश्वरि । चरित्र पुढे चालवि ॥ २ ॥

अता नमु श्रीगुरुमाउली । तेणे मजवरि कृपा केली ।
ज्ञानदृष्टी उघडली । पातके पळति चहुकडे ॥ ३ ॥

मग नमिले साधुजन । चौदा विद्याचे निधान ।
मी यासि अनन्य शरण । दोन्हि कर जोडोनिया ॥ ४ ॥

व्यास सांगे जन्मोजयालागुन । कथा ऐका पुण्यापावन ।
तुळसिदेविचे अख्यान । ऐका चित्त देउनिया ॥ ५ ॥
तुळसिवृंदावन जया घरि । धन्य प्राणी तो संसारि ।
आपुले पुर्वजाचे कुळ उद्धारि । ऐक राया जन्मोजया ॥ ६ ॥
नित्य तुळसि नमस्कारि । तया देखोनि येम पळति दुरि ।
विमान येउनी झडकरी । विष्णुदुत नेति त्या ॥ ७ ॥
तुळसिमंजुरि चढविती । ते विष्णुचरणि पावति ।
धन्य ते प्राणी संसारि येति । कथा सांगे व्यास तो ॥ ८ ॥
तुळसिचे जे पत्र घालति कानि । त्याचे पातकाचि होय हाणि ।
तो माझा भक्त म्हणोनि । त्याचि आवडि फार आसे ॥ ९ ॥
तुळसिमृतिका । जो कपाळी लावि ठीळका ।
तो भक्त माझा निका । म्हणेल कृष्णदेव ॥ १० ॥
तुळसिस जे पाणी घालति । त्यांची पातकें नासति ।
अंति त्यासि गति । विष्णुलोकी ॥ ११ ॥
तुळसिमाळा । जो प्राणि घालि गळा ।
माझे स्वरुपसोहळा । मीच आहे तेथे उद्धवा ॥ १२ ॥
ब्रह्मा विष्णु महेश्वरा । तिन्हीदेव असति तुळसीचे घरि ।
तुळसी सविता भेटे श्रीहारी । तुळसि पूजिली ह्मणोनिया ॥ १३ ॥
नित्य करिता तुळसी पुजा स्मरण । तेणे संतोष पावे श्रीकृष्ण ।
तो होय सुखसंपन्न ॥ धन्य तो भक्त माझा ॥ १४ ॥
फुकाचि तुळसि पूजिता । त्यासी येमकाळाची नाही चिंता ।
बळे येउनि विष्णुदुता । वैकुंठासि पै नेति ॥ १५ ॥
जयासि वैकुंठासि जाणे । ते वैकुंठ तुळसिपासी जाणे ।
नमन करोनि स्थिरपणे । तुळसिपुजा करावी १६ ॥
तुळसिआळया जो घाली उदक । त्या प्राणिया कैचे दुःख ।
सदा पावे अक्षयि सुख । विष्णुपदि सर्व काळ ॥ १७ ॥
तुळसिची अक्षई करिती पूजा । अंति पावे गरुडध्वजा ।
कृष्ण म्हणे भक्त माझा । अति प्रीय सहोदर ॥ १८ ॥
तुळसिवृंदावन । जयाचे अंगणी जाण ।
प्रातः काळी तुझे दर्शन । तेणे पातके नासति ॥ १९ ॥
फुकाचे घालिति पाणी । येमदुत सांगिति येमालागुनि ।
बळे विष्णुदूत घेउनि । नेति हिरोनि वैकुंठासि ॥ २० ॥

कुंभपाक पडले वोस । प्राणियासी नाही दोष ।
बळे घेउनि विष्णुदास । अक्षापासुनि नेति ॥ २१ ॥
ऐसे तुळसिचे महिमान । तयापासि नारायण ।
हे सांगतो प्रमाण । एक राया चित्त देवोनिया ॥ २२ ॥
धुप दीप नैवेद्य आरती । भावे भक्ति जे करिती ।
त्या प्राणिया पापे न लागति । नाहि नाहि सत्य पाहा ॥ २३ ॥
तुळसिची करोनि स्मरणी । रामनाम स्मरे नित्यानि ।
दरिद्री नाहि तो प्राणी । ऐक राया जाण ॥ २४ ॥
तुळसिपुढे दीप जे लाविती । नित्यावधि धुप जळति ।
त्याचि न सरे संतति । अंति प्रीय होय तो ॥ २५ ॥
तुळसिस जे विनविति । जे प्राणि सेवा करिति ।
जे जवळ बैसोनि प्रार्थिती । ते प्राणी माझें खरे उद्धवा ॥ २६ ॥
उद्धव म्हणे सारंधरा । तुळसीपुजने तारिले अपारा ।
जयासि हे पूजा नाही अवधारा । त्याचा काय विचार ॥ २७ ॥
तो उद्धवा सांगे सारंगपाणि । अधोगति त्या लागोनि ।
प्राणी संसारि येउनि । नाना योनि भोगिति ॥ २८ ॥
जे प्राणी तुळसिचे मोडीत आले । त्या पातकीयाचे तोंड काळे ।
सदा प्राणी तळमळे । माझें दर्शन नाही त्याला ॥ २९ ॥
जे प्राणी पाडिति तुळसिवृंदावन । येमदुत गांजिति तयालागुन ।
कुंभपाकी घालिति जाण । सत्य जाण रे उद्धवा ॥ ३० ॥
उद्धव म्हणे देवा श्रीपति । पूरुपांचि गति सांगीतली ।
आतां स्त्रियांची कैसी रीती । तें सांगावि स्वामिया ॥ ३१ ॥
उद्धवासी सांगे नारायण । हे कथा एक चित्त देउन ।
तु तरि माझा सखा सज्जन । एक चित्त देऊनिया ॥ ३२ ॥
ज्या नारि करिती तुळजी पूजन । त्या अक्षई भोगति आहेवपण ।
ते पतिव्रता सति जाण । अक्षई सुख भोगिती ॥ ३३ ॥
तुळसिपासी रांगोळिया । ज्या घालति भाव धरोनिया ।
सौभाग्य जाण त्या स्त्रीया ॥ तुळसिप्रसादे ॥ ३४ ॥
ज्या नारि तुळसीपूजा करिती । पूर्वजन्मी सौभाग्य होति ।
हे वार्ता सांगाते श्रीपति । उद्धवालागुनी ॥ ३५ ॥
ज्या नारि करिती तुळसिपूजन । नित्य त्यासी माझे ध्यान ।
म्या ठाव केला त्या लागोन । वैकुंठासी राहावया ॥ ३६ ॥

वैकुंठलोकिची तुळसि । सत्य आलि मृत्यलोकांसी ।
पातकी उद्धरावयासी । म्या आणिली सत्य जाण ॥ ३७ ॥
मृत्यलोकी ज्या अभिमान । ते न वोळखिती तुळसीलागुन ।
म्हणुनि यमपुरि जाण । घडे त्या हो प्राणिया ॥ ३८ ॥
तुळसी संताचे माहेर । रात्रंदिवस आसे सारं(ग)धर ।
तेथ नाही दुसरा विचार । सत्य जाण रे उद्धवा ॥ ३९ ॥
उद्धवा तुळसि झाड ह्मणति । ते झाड नव्हे मी विष्णुमूर्ति ।
अठ्यांसि सहस्त्र ऋषि त्या प्रति । शुक सांगे ॥ ४० ॥
जे प्राणि तुळसि पुजति निकाळी । मी त्याचा बाळक ते माउली ।
तळहातची साउली । म्या केली तयावरि ॥ ४१ ॥
तो तरी माझा सखा । आणि मी त्याचा पाठीराखा ।
तुळसीपुजा करितो सखा । म्हणोनि संकट वारितो ॥ ४२ ॥
भावे जो तुळसिपुजा करि । तो तरि माझा साहाकरि ।
माझी जाणि त्याची प्रीति थोरि । ऐक रे उध्दवा ॥ ४३
तुळसीचि पुजा ज्या नारि करीति । त्या सदा सौभाग्य भोगिति ।
माता पितयाचि कुळे उंध्दरिती । मग तुळसिप्रसादे ॥ ४४ ॥
तुळसिवृंदावनी । जे हारिकिर्तन नीत्यानी ।
त्याचि चुके यमजाचणी । तेची जाले वैकुंठवासी ॥ ४५ ॥
तुळसीस करिती प्रदक्षणा । त्याची चुके येमयातना ।
वळे नेती वैकुंठभवना । त्यासी रे उद्धवा ॥ ४६ ॥
तुळसीस घालति लोटांगणे । ते माझे प्रेमभक्त जाणे ।
कृष्ण म्हणे तुळसिभक्तिकारणे । तो औषं माझा रे उध्दवा ॥ ४७ ॥
एक प्राणी करिती तुळसीचे लग्न । त्याचे चुके बहुत विघ्न ।
ते जिंतिती वैकुंठभवन । सत्य जाण रे उध्दवा । ॥ ४८ ॥
व्यास सांगे जन्मेजयालागुन । जे करिति तुळसीचे पाणी ग्रहण ।
त्यासी नाही जन्मावरि विघ्न । म्हणे व्यास ऋषी तो ॥ ४९ ॥
स्त्री पुरुष दोघे जण । तुळसी पुजिति प्रीति करून ।
तेच फीटे वांजपण । मग म्हणे व्यास ऋषी ॥ ५० ॥
जो प्राणि घाली तुळसीस तेलवात । कृष्ण म्हणे तो माझा भक्त ।
त्याचे माझे एक चित्त । म्हणे व्यासऋपि ॥ ५१ ॥
तुळसीस बोलति जे उणे । त्याचे हृदय करि चुर्ण ।
तो माझा वैरी प्रत्यक्ष जाण । ऐक रे उध्दवा ॥ ५२ ॥

उणे बोले जो तुळसिस । त्याचा करिन मी नीर्वंश ।
कृष्ण म्हणे उध्दवास । आसे सत्य जाण पा ॥ ५३ ॥
मजसी बोलति नून्यता । त्याचि काहि नाहीं चींता ।
उणे तुळसीस बोलता । आनर्थि प्राणि ते होति ॥ ५४ ॥
जो करि तुळसीपूजा । आवडी शाळीग्राम पूजा ।
तो प्रीतिचा भक्त माझा । वैकुंठासि नेतो त्यासी ॥ ५५ ॥
तुळसिनाम उच्चारि नित्यानी । तो भक्त माझा भक्तसीरोमणी ।
त्याचीया संताचि खाणी । उध्दरिली आहे की ॥ ५६ ॥
उध्दव म्हणे देवा श्रीपति । दोन्ही कर जोडोनि वीनंती ।
बरवी सांगीतली उध्दरा गति । पातकीयाची श्री कृष्णा ॥ ५७ ॥
जेणे तुळसिची पुजा केली । वैस ह्मणे कृष्ण माउली ।
लाडके बाळपणे आत्मबोली । उध्दवाप्रती सांगे ॥ ५८ ॥
तुळसीकथा ऐकोनि कानि । कृष्ण सांगे उध्दवालागोनि ।
म्या ठाव केला वैकुंठभुवनी । मग त्या प्राणीयासी ॥ ५९ ॥
फुकाचे घडले तुळसीपूजन । त्यासी प्रसन्न नारायण ।
हे श्रीकृष्णकृपें देणे । ह्मणे उध्दव देवासी ॥ ६० ॥
त्रैलोक्य आमति तुळसीजवळी । हेचि आवडी गोपाळी ।
पातकीयाची तोंड काळी । तुळसीआनंदे ॥ ६१ ॥
मी सदा नारायण । तुळसीपासी आसे जाण ।
मजविण ते जाण । मग ते दुःख पावतिल ॥ ६२ ॥
मी साक्षात जाण वैकुंठ । माझे भक्तासी नाही दुःख ।
लटके करिती वटवट । मज न वोळखती पाखंडी ॥ ६३ ॥
उध्दवा काय रे जाणती माझे भक्त । कैसा आहे कृष्णनाथ ।
हे जाणावया माझे मत । मग मी अवतरलो ॥ ६४ ॥
मी निर्गुण निर्वीकार । मी जालो साकार ।
मज कैचा आकार । मम भक्तालागी ॥ ६५ ॥
मज कैचे सीपासुत्र । मज कैचे इष्ट मीत्र ।
मज नाही कर्म तंत्र । हा समजोनीया भाव ॥ ६६ ॥
जैसी दुपारची सावली । तैसी माया मज माउली ।
हे खुण तुज सांगीतली । सत्य जाण रे उध्दवा ॥ ६७ ॥
कल्पवृक्षाचि पडली छाया । तेथें बैसलिया विश्रांति तया ।
तैसी भक्ति माझी माया । आसे जाण रे उध्दवा ॥ ६८ ॥

उध्दवा मज भक्तीनें गोविले । म्या भक्ताघरि दाशत्व केले ।
धर्माघरि उचिष्ट काढिले । भक्तालागी रे उध्दवा ॥ ६९ ॥
उध्दवा धर्म माझा सखा । सर्व ठाई नेठका ।
मी त्याचा पाठीराखा । सर्वकाळ त्यापासी ॥ ७० ॥
नीत्य धर्म जया घरी । तो माझा भक्त साहाकारी ।
मी त्याचा अंगीकारि । ऐक रे उध्दवा ॥ ७१ ॥
उध्दव कृष्णासी काय म्हणे । माझी विनंती स्वामीने ऐकणे ।
येक आसे पुसणे । ते सांगणे मजलागी ॥ ७२ ॥
कोण स्वामीचे ठीकाण । हे सांगावे मजलागुन ।
मी पुसतो बाळक अज्ञान । येव्हढे सांगावे स्वामीया ॥ ७३ ॥
उध्दवा ऐक सावध होऊन । तुज सांगतो माझे ठीकाण ।
जेणें होय समाधान । तुझीया मनाचे ॥ ७४ ॥
एक ठीकाण भक्ताचे हृदयकमळी । दुसरे ठिकाण तुळसीजवळी ।
तिसरे ठीकाण लक्ष्मीघरि वनमाळी । ऐक की रे उध्दवा ॥ ७५ ॥
मग हे ऐकूनी वार्ता । उध्दवेचरणी ठेविला माथा ।
धन्य धन्य गोपिनाथा । ह्मणे उध्दव ॥ ७६ ॥
उध्दवासी म्हणे नारायण । संत माझे चित्ताचे चिंतन ।
माझे सुख दुःख त्यांवीण । कोण जाणे रे उध्दवा ॥ ७७ ॥
संत माझे गुरु । मी त्याचे लेकरु ।
माझीये नामाचा उच्चारु । त्याहि विस्तारू हा केला ॥ ७८ ॥
वैकुंठाची तुळसी । सत्य आणली मृत्यलोकासी ।
तुळसी अंगेसी मज सति । नाव जाले रे उध्दवा ॥ ७९ ॥
उध्दवासी सांगे नारायण । ऐसे तुळसीचे आख्यान ।
म्यां सांगितले प्रमाण । ऐकीले की रे उध्दवा ॥ ८० ॥
हे कथा नित्य करि श्रवण । त्याचे चुके आयागमन ।
तो जितचि पावे वैकुंठभुवन । ते नर जाण रे उध्दवा ॥ ८१ ॥
उध्दव ह्मणे धन्य वननिळा । तुझी न कळे माव निळा ।
तुळसीपुजा सांगितली सकळा । उध्दव म्हणे रे रायासी ॥ ८२ ॥
नामा ह्मणे विष्णुदास । हे कथा ऐक सावकास ।
जेणे होय महापातकनाश । ब्रह्महत्या दुर होति ॥ ८३ ॥
इतिश्रीतुळसीअख्यानसंपूर्णमस्तु ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥
॥ श्रीरामचंद्रपर्णमस्तु ॥ ॥ श्रीहनुमानजीसाहाय ।

# ॥ श्री गरुडाख्यान ॥

श्रीगणेशाय नमः । गरुडअख्यान लिखीतें ॥
ॐ नमोजी गणनाथा । चरणावरि ठेविला माथा ।
हरेल संसारिचि वेथा । श्रीकृष्णकथा ऐकता ॥ १ ॥
कोणे येके दीवसी । श्रीकृष्ण सांगे रुक्मीणीसी ।
आतां थोडेच दिवसी । अवतार संपुर्ण होईल ॥ २ ॥
रामअवतारी स्वर्गासी जातां । हणुमंत जाहाला करुणा भाषीता ।
कृष्णअवतारि भेटेन त्वरीता । म्हणोनि भाक दीधलि ॥ ३ ॥
तव तो पाहात असेल वाट । त्यासि देणें लागेल भेट ।
रामअवतारि उत्कृष्ट । भोगीले कष्ट पैं तेणे ॥ ४ ॥
ऐसे बोलोनि श्रीरंगे । भेट देणें लागेल वेगें ।
गरुड सत्यभामाही दोघे । बहुत गर्वाते पातली ॥ ५ ॥
या दोघांचा गर्व जाय । आम्हा हनुमंता भेटी होय ।
रुक्मीणीसी पुसति यादवराव । तुझीया चित्ता कैसे येतें ॥ ६ ॥
रुक्मीणी म्हणे जी गोपीनाथा । आम्हां जवळी काय पुसता ।
जे येईल तुमच्या चित्ता । तेची कीजे स्वामीया ॥ ७ ॥
श्रीकृष्ण बैसले सभेसी । यादव आले वेगेंसी ।
नमस्कारीलें केशवासी । वेदध्वनि गर्जति ॥ ८ ॥
श्रीकृष्ण म्हणे रे कशपात्मजा । त्वां जावें येका काजा ।
मळयाचळि आहे हणुमंत माझा । तयासी बोलाउनी आणीजे ॥ ९ ॥
येरु शब्दासरिसा उडे । जाय पर्वति हणुमंताकडे ।
म्हणे वानरा तुझे दैव गाढें । तुज रामकृष्णे बोलाविलें ॥ १० ॥
तुझीये भेटीची आवडी । रामकृष्णासी तुझी गोडी ।
न लागता येक घडी । चाल झडकरि वान्नरा ॥ ११ ॥
रुद्र बैसलासे ध्यानि । राम राम जपे वदनि ।
मग त्या गरुडाचें वचनि । काय बोलता जाहाला ॥ १२ ॥
हासें आलें वान्नरा । आणिक राम कैचा दुसरा ।
गरुड म्हणे पालाखाईरा । तुजप्रति काय सांगो ॥ १३ ॥
तुं तर वनिचे मर्कट । तुझा जन्म रे फुकट ।
मृत्यलोकी वैकुंठ । उभविलें ते नेणसी ॥ १४ ॥

सोळा सहस्त्र अंःतपुरें । ऐसी सहश्र कन्याकुमरें ।
छपन कोटी यादववीरें । ईतुका भार जयाचा ॥ १५ ॥
फेडिला भुमिचा भार । केला दैत्याचा संव्हार ।
तो रामकृष्ण राज्यकर । द्वारकेसी नांदतो ॥ १६ ॥
ईतुकियावरि बोलें पल्वगम । माझा येकपत्नी श्रीराम ।
दुसरा सांगसी तो उत्तम । परि श्रवणी ऐकों नये ॥ १७ ॥
मग गरुड बोले कोपें । म्हणे रे वान्नरा तुज धरुनि नेईन झेपें ।
तया उठोनियां थापे । हाणीतले गरुडासी ॥ १८ ॥
घायत्राणे उसळें । गरगरां भोवडी डोळें ।
येऊनि चरणावरि लोळे । श्रीकृष्णाचीया ॥ १९ ॥
श्वासोश्वास न समाय पोटी । कृष्णकृपा जपे वोठी ।
मग उठोनिया जगजेठी । आळंगीला गरुडासी ॥ २० ॥
आळंगीला चौभुजा । बोले द्वारकेचा राजा ।
म्हणे रे कशपात्मजा । तेणे तुज काय केलें ॥ २१ ॥
रामकृष्णे बोलावीलें । ऐसे वान्नरासी म्हणीतलें ।
तो दुसरा राम न बोलें । रुद्रराज सर्वथा ॥ २२ ॥
म्हणे माझा राम एकपत्नी । दुसरा न ऐकों श्रवणी ।
मग मि निष्ठुरा वचनि । बोलिलो तयासि ॥ २३ ॥
तेणे हाणीतलें चपेटघाई । तेथें माझा प्राण जाई ।
थोरा दैवे तुमचे पाई । पावलो जी स्वामीया ॥ २४ ॥
श्रीकृष्ण गरुडासी म्हणे । मागुतां येक वेळ लागेल जाणें ।
गरुड श्रीकृष्णासि म्हणे । तुमचे पाय अंतरिल ॥ २५ ॥
हासोनि बोलीलें केशवे । मागुतां त्या वान्नरासि बोलावें ।
रामरुप आठवावें । ह्रदयामाजीं ॥ २६ ॥
स्वर्गासी जातां राघवें । तुज सांगितलें ते आठवावें ।
सीताराम भेटो यावे । ऐसे निगर्वें बोल तिया ॥ २७ ॥
जाई जाई कृष्ण म्हणें । येरु उडला सत्राणें ।
म्हणे रुद्रराया परिसणे । बोलणें येक माझें ॥ २८ ॥
स्वर्गासि जाता राघवें । तुज सांगितलें तें आठवावे ।
तो जाणुनी दृढ भावे । पाठवीले मजलागी ॥ २९ ॥
ईतुकियांत संतोषोनि रुद्रराजु । आळंगीला कशपात्मजु ।
आम्ही ये रा तुज पुजु । कनकाचीये कमळीं ॥ ३० ॥

हणुमंत हरुषें निर्भरू । आधी ये गा तुझें पुजन करूं ।
येरु म्हणे न लावी उशीरू । सर्वेही आदरू पावला ॥ ३१ ॥
आज राम भेटले मज । तरि तुं माझा पुर्वज ।
गरुड म्हणे चाल तुज । सीताराम भेटवीतो ॥ ३२ ॥
हस्तें हस्त धरुनि द्वयमुहुर्ति । गमन केलें उर्ध्वगति ॥
तयाचा वेग धरुनि चित्ति । गरुड लजीत पै जाहाला ॥ ३३ ॥
मार्ग आकाशनभपोकळि । कर्मिता धाकें अंतराळी ।
श्रीराम न देखतां जवळि । प्राणनाश होईल ॥ ३४ ॥
आधीच कोपीष्ट वानर । जवळी न देखतां रघुवीर ।
मग पेटेल मार । काळअग्नीसारीखा ॥ ३५ ॥
ऐसा गरुड धाके चीति । मग पावले द्वारावति ।
गरुड म्हणे हणुमंताप्रति । त्वां शरयुतिरा बैसावें ॥ ३६ ॥
गरुड पावला कृष्णसभा । म्हणे जय जया जी पद्मनाभा ।
पैला पाहे हणुमंत उभा । गोमतिचे तिरि ॥ ३७ ॥
श्रीकृष्ण बळिभद्रासीं म्हणे । रामवेश लागेल धरणे ।
हणुमंतासी सुखी करणें । त्वां व्हावे लक्षुमण ॥ ३८ ॥
पाचारुनि सत्यभामा । तीसी बोले पुरुशोत्तमा ।
आज आमुची महीमा । कैसीयापरि वांचेल ॥ ३९ ॥
जाई जाई सीता होय । येरि निघालि लवलाहें ।
नीजमंदिराप्रति जाई । मनामाझी दुष्चीत ॥ ४० ॥
वस्त्रें पालटुनि पाहे । म्हणे कैसे करू गे मायें ।
कैसीयांपरि होय । रुप तये सीतेचें ॥ ४१ ॥
नवरत्नाच्या माळा । त्याही पालटी वेळोवेळां ।
सखीयाप्रति पुसे वेल्हाळा । आजीचें रुप कैसे दीसे ॥ ४२ ।
सखीया म्हणति अहो मायें । आम्ही सांगावें काय ।
कैसी सीता आहें । ती आम्ही देखीलींच नाही ॥ ४३ ॥
सदा तुझे रुप असे । त्याहुनि आजी उणे दीसें ।
सत्यभामा म्हणे हासें । जहालें सकळ जनाचें ॥ ४४ ॥
इतुक्यावरि गोपाळ । म्हणे सत्यभामेन कां लावीला वेळा ।
गरुडा जाई उतावीळ ॥ पाचारुनि आणीजें ॥ ४५ ॥
गरुड उभा असे दारि । म्हणे जी कोपले मुरारी ।
ते वेळे सत्यभामा सुंदरी । श्रीकृष्णासमोरी पातलि ॥ ४६ ॥

श्रीकृष्ण तीकडेच पाहि । म्हणे पा गेवतीस ग काय ।
जाई जाई सीता होय । आतां न लावी उसीरूं ॥ ४७ ॥
सत्यभामा लागे चरणा । म्हणे म्या पुजीलें नाही पुरुषोत्तमा ।
सीतीचे तप आम्हा । केवी जोडेल स्वामीया ॥ ४८ ॥
मग श्रीकृष्ण बोलें रागें । येथुनि निघोनि जाई वेगे ।
रुक्मीणीसी वेगें । पाचारुनि आणीजे ॥ ४९ ॥
सत्यभामा चाले उताविळ । पातालि रुक्मीणीचे राउळ ।
तिशि देखोनिया भिमकबाळ । या या बैसा म्हणतसे ॥ ५० ॥
सत्यभामा म्हणे बैसो काय । आजि हणुमंत आला हे ।
बोलाउ पाठविले यादवराये । सत्वरेशि चाला ॥ ५१ ॥
रुक्मीणी निघाली शब्दासरसि । श्रीकृष्णपुढे पातलि पुण्यराशि ।
तिशि देखोनि हृषिकेशी । खदखदा हासीन्नले ॥ ५२ ॥
ह्याचिया मनिच्या खुणा । त्या मानल्या दोघांजणा ।
बोले द्वारकेचा राणा । आतां सीता व्हावें ॥ ५३ ॥
हासोनि बोले भीमकतनया । सीता व्हावें कोणा कार्या ।
देव म्हणे भेटावया । आला असे हनुमंत ॥ ५४ ॥
मग त्याचीया बोला । जानकि जाहाली अवलिळा ।
आपण घनसांवळा । जाहाला असे श्रीराम ॥ ५५ ॥
जया वीश्वाची जननी । अर्धांगी शोभे मृगनयनि ।
तो रघुराज सिंव्हासनी । शोभला कैसा ॥ ५६ ॥
जया वैष्णवी माया थोर । यादव तेचि जाले वान्नर ।
बळिदेव जाहाला लक्ष्मणवीर । सत्वरेंसी पै देखा ॥ ५७ ॥
असुर्या तेचि गोमति । द्वारका तेचि अयोध्यावति ।
वानर भुभुकारे गर्जति । पुढा जुम्रति उभा असे ॥ ५८ ॥
कनकळस झळकति । तेण झाकोळला गभस्ती ।
हणुमंतासी पडीलि भ्रांति । सभोवता पाहु लागला ॥ ५९ ॥
म्हणें स्वप्न कीं साचार । मनामाजी करि वीचार ।
पूर्वी अयोध्येभोवता सागर । देखीलाची नाही ॥ ६० ॥
परि न कळे काळगति । सभोवता पाहे पुनरावृति ।
गरुड म्हणे हणुमंताप्रति । तुज सीतापती बोलवीतो ॥ ६१ ॥
हणुमंत लोटांगणी निघाला । प्रेमप्रीती वोथंडला ।
आनंदे डुलों लागला । भक्तिभावें करुनियां ॥ ६२ ॥

हणुमंतासि म्हणे सीतापति । तुझी पुरवावया आर्ती ।
द्वारका तेची अयोध्यावति । वानर नव्हति हे यादव ।। ६३ ।।
हा अवतार आठवा । जन्मलों कुळी यादवा ।
कौंसें केलें देवकि वसुदेवा । त्याचा वधु म्या केला ।। ६४ ।।
बारा वरुषें गोकुळा । गाई राखिल्या नंदाराउळा ।
कौंसें केलें मायाछळा । त्याचा मुळछेद पैं केला ।। ६५ ।।
त्याणे स्मरोनि वैरसंमंध । दैत्य मेळवीला जरासंद ।
त्याचा सतरा वेळ वेध । मीच केला असें ।। ६६ ।।
तो दैत्य शरण गेला काळयौ(व)नापुढा । म्हणे मथुरेसी घातला वेढा ।
बंदीजण वर्णीती पवाडा । युध्दासी पावे कृष्णा ।। ६७ ।।
आमुचे हस्ते नाही मृत्य । त्याचा परस्परें केला घात ।
वीश्वकर्मा पाचारुनि त्वरीत । समुद्रनगरी उभवीली ।। ६८ ।।
नांवे ठेविलि द्वारका । उध्धराया तिही लोका ।
गोमतिच्या स्यानें देखा । नरनारी पवित्र ।। ६९ ।।
जयासी शडमास घडे वास । त्याचा चुकला गर्भवास ।
ते पावति वैकुंठास । हणुमंतासीं सांगे सीतापती ।। ७० ।।
ऐसी रघुराज सांगे कथा । मग हणुमंते चरणी ठेविला माथा ।
जन्मोजन्मी विश्वनाथा । अनेक खेळ पैं तुझें ।। ७१ ।।
आता बहुत काय बोलावें । आपल्या आश्रमाप्रति जावें ।
मग उठोनिया राघवें । आळंगीला हुणुमंता ।। ७२
सभेसी करुनि प्रदक्षिणा । लागला श्रीरामाच्या चरणा ।
करुनि भुभुकार गर्जना । नीज भुवनासी चालला ।। ७३ ।।
नामा म्हणे विष्णुदास । अखंड रामनामाचा घोष ।
तुटे भवकाळीचा पाश । रामनाम ऐकता ।। ७४ ।।
ईती श्रीगरुडअख्यान संपुर्ण ।। छ ।। छ ।। छ ।।

# विष्णुदास नामाकृत

## संतावळी आख्यान

## कमळाकर ब्राह्मणाची कथा

श्रीगणेशायनमः ।। वंद्नमोजि सद्गुरु ।। तु भक्ताचा अंब्रुनकरु ।। तुझिया स्वरुपाचा निर्धारु ।। न कळे ब्रह्मादिका ।। १ ।। तुझिया

कृपेचि पै स्थीति ॥ मुकियासि काव्ये विप्रति ॥ गर्भि अंधासि देसि दिप्ति ॥ ऐसा तु दातारु ॥ २ ॥ आता संतसेवेचि महिमा ॥ जेणें वश केले सर्वोत्तमा ॥ ते कथा अर्पिण तुम्हा ॥ त्यासि चित्त द्यावे तुह्मी ॥ ३ ॥ गरुडध्वज मिरवति ॥ वरि पताका शोभति ॥ टाळ मृदांग वाजती ॥ गर्जति नामघोश ॥ ४ ॥ ऐसे गजरे मिरवत ॥ आनंदे सप्रेम डुल्लत ॥ नामगजरेसि मिरवत ॥ पंढरपुरासि पावले ॥ ५ ॥ तेथे कमळाकर ब्राह्मण ॥ असे अति अकिंचन ॥ हृदई विठलाचें ध्यान ॥ अहिर्णिसि करितसे ॥ ६ ॥ सदा शुक्लभिक्षा करि ॥ विठलि अर्पुणिया वैखरि ॥ ऐशा किर्तनाचे गजरि ॥ नगरामाजि फिरतसे ॥ ७ ॥ सवे पद्मकर बाळ ॥ पाचा वरुशाचा वेल्हाळ ॥ परंतु हरिभजणि प्रेमळ ॥ दोघेहि किर्तनकल्लोळ करिति ॥ ८ ॥ तव तया अवस्वरि ॥ किर्तण पडले श्रवणद्वारि ॥ टाळ घोळ मृदांग गजरि त्राप्रती काय बोले ॥ ९ ॥ ह्मणे ऐक रे पद्माकरा ॥ संत समुदाय आला नगरा ॥ पै किर्तनाचिया गजरा ॥ होत असे भीमा-तिरि ॥ १० ॥ नित्य कर्म असो द्यावे ॥ संताचे दरुशन घ्यावे ॥ अवश्य म्हणोनि पुत्रे तवे ॥ दोघेहि झडकरि चाल्लिले ॥ ११ येउनिया संताजवळि ॥ दोघेहि लोटांगणें घातलि ॥ करुणिया बध्धांजुळी ॥ प्रार्थना करिते जाले ॥ १२ ॥ धन्ये धन्ये आजिचा दिन ॥ धन्ये धन्ये आमुचे नैन ॥ देखिले संताचे चरण ॥ त्रिविध ताप पळाला ॥ १३ ॥ आजि जन्माचे सार्थक जाले ॥ स्वये वैकुंठ-निधान भेटले ॥ ह्मणउन पायावरि लोटले ॥ करा स्वामि मज सनाथ ॥ १४ ॥ म्हणे संत तुह्मी करुणाकर ॥ करिता दिनाचा उध्धार ॥ परि आश्रम पवित्र ॥ केला पाहिजे स्वामिया ॥ १५ ॥ तव बोलति संत सज्जन ॥ धन्ये तुझे गा शुद्ध मन ॥ परि समुदाय असे गहन ॥ आता उगलेच असावे ॥ १६ ॥ येरु ह्मणे काये ऐसि चिंता ॥ विठोबा माझा पुर्ण दाता ॥ त्याचे कृपेने सर्व पुर्णता ॥ तो विस्वांभर माझा १७ ॥ तुम्हि चिंता हो न करणें ॥ आताचि चालावे स्वामिणे ॥ तव ते म्हणति धन्ये धन्ये ॥ तुझा ठाई निश्चये ॥ १८ ॥ स्नान करुनि भिवरेसि ॥ येतो तुझिया आश्रमासि ॥ तुंवा जावे वेगेसि ॥ द्विज घरासि पैं आला ॥ १९ ॥ तवं सुमति नाम तयाचि कांता ॥ तियेप्रति जाला वदता ॥ आजि भाग्यउदयो आमुचा होता ॥ म्हणोनि संत आले नगरासि ॥ २० ॥ काहि सिद्धता गृहि आहे ॥ तव ते काय बोलताहे ॥ विठल आमुचा बाप माये ॥ तो पुर्ण आहे सर्वदा ॥ २१ ॥ जो जो पदार्थ पाहता ॥ तो विठोविन न दिसे रिता तेथें कैचि

न्युन्येता ॥ सर्व पुर्विति पांडुरंग ॥ २२ ॥ मग करुनि शुद्ध स्नान ॥
हृदई आठविला भगवान ॥ नाना परिचि पक्कान ॥ निपजविति पैं
जालि ॥ २३ ॥ तवं ते भ्रतारप्रति बोले ॥ संत बोलावि जि
वहिले ॥ इकडे सर्वही सिद्ध जाले ॥ येका क्षिरि वाचुनि ॥ २४ ॥
तियेचे वचन अैकिले ॥ येरे त्वरेने गमन केले ॥ मग काय अपुर्व
वर्तले ॥ ते श्रोते सज्जेनि अवधारा ॥ २५ ॥ मग कास्टाचि नुपर
गेलि ॥ तव ते पुत्राप्रति बोलिलि ॥ बारे क्षिर अपक्क राहिलि ॥
आता आईक वचेन माझे ॥ २६ ॥ उडवियामाजि जाउन ॥ दोनि
शोभानिका घेउन ॥ आयकोन मातेचे वचेन ॥ उडवियामाजि प्रवे-
शला ॥ २७ ॥ तव आपन वैकुंठवासि ॥ तयाचे सत्व पाहावयासि ॥
स्वये येउनि रुपिकेसि ॥ काये करिता पैं जाला ॥ २९ ॥ बाळके
शोमनिस घातला हाता ॥ ह्मणे वो माये धाव त्वरित ॥ तव माता
आली धावत ॥ मजलागी काळे दौंशिले ॥ ३० ॥ माता पाहे
दृचकोन ॥ नेत्रि पाहे अवलोकुन ॥ तव ते गतप्राण जाण ॥ देखिले
बाळक ॥ ३१ सर्प झोंवलासे करि ॥ बाळक पडिले धरणिवरि ॥
ते देखोनिया सुंदरि ॥ व्याकुळ जालि पुत्रशोके ॥ ३२ ॥ शोक
करिता नानापरि । तुजवाचोनिया सौंसारि ॥ धिग्ये जिवित्वे पैं
माझे ॥ ३३ ॥ अैसी आक्रंदोनि वेल्हाळि ॥ जळेविन जैसी मासोळि ।
म्हणे दोहि पदार्थि नाडलि ॥ स्वार्थ ना परमार्थ स्वामिया ॥ ३४ ॥
आहो जि नारायेना ॥ असे आले तुझिया मना ॥ मग बाळक
उचलुनीया जाना ॥ पाळनियामाजि घातले ॥ ३५ ॥ वरि पत्र
झाकुन ॥ मग केले सडा संमार्जेन ॥ तव संताते घेउन ॥ कमळाकर
येतसे ॥ ३६ ॥ तव संत घरासि आले ॥ दोघेहि पुजेन आरंभिले ॥
चरन क्षाळोनि तिर्थ घेतले ॥ पुजेन केले यथाविधि ॥ ३७ ॥ अैसि
सत्वाचिया रासि ॥ तजुनिया पुत्रममतेसि ॥ बिनटलि संतसेवेसि ॥
गुज भ्रतारासि न सांगे ॥ ३८ ॥ मंत्रे करुनिया शुध्ध स्नान ॥ पात्र
वाढिलि संपुर्ण ॥ घृत कथिका आदिकरुन ॥ सर्व पात्र शुध्द केलि
॥ ३९ ॥ अनुक्रमे बैसविल्या पंक्ति ॥ सिघ्र आपोशन करा ह्मणति ॥
तव ते नामघोश गर्जेति ॥ घे का विठले ह्मणोनिया ॥ ४० ॥ तव
नामयाकारण ॥ अंतरि जानवलि खुण ॥ तव तो समस्ताप्रति ह्मणोन
॥ स्वामि क्षण येक धिर धरा ॥ ४१ ॥ तव तो ब्राह्मणासि बोले ॥
तुह्मि आवंतायासि आले ॥ तेव्हा बाळक दृष्टिसि देखिले ॥ ते भोज-
नासि पाचारा ॥ ४२ ॥ तव ते सुमति बोलत ॥ तुह्मि करावे जि
स्वस्त चित ॥ भोजन करा त्वरित । आता निद्रा केलि असे ॥ ४३ ॥

नामा म्हणे न घे आन्न ॥ तया बाळकांवाचुन ॥ आम्हासि विठोबाची आण ॥ सत्य जान जननियें ॥ ४४ ॥ तव अवघे बोलती ॥ यासि लागलि वो भ्रांति ॥ आता तिस्टत बैसावे किति ॥ पिसे लागलें नामयासि ॥ ४५ ॥ ह्मणति नामयाकारण ॥ तुज काये नसे रे याविण ॥ उगलाचि करि का रे भोजंन ॥ किति आह्मि बैसावे ॥ ४६ ॥ नामा म्हणे स्वामि अवधारा ॥ तुम्हि आताचि भोजन करा ॥ बाळक उठलियाविण अवस्वरा ॥ मग मि भोजेन करिन ॥ ४७ ॥ तव ते सुमती बोलत ॥ तुम्हि करावे जि स्वस्थ चित ॥ भोजेन करावे जि त्वरित ॥ आता बाळक उठेना ॥ ४८ ॥ तव ते बोलतीं समग्र ॥ हे छयांदस सिंपियाचे पोर ॥ काहि न कळे यासि विचार ॥ जळो याचि संगति ॥ ४९ ॥ नामा ह्मणे तुम्ही संत म्हणविता ॥ परि तुमचे ठाई असंतता ॥ न जाना परात्र्याचि वेथा ॥ म्हणोनि त्वरित उठिला ॥ ५० ॥ तव उठला पात्रिहुन ॥ करि टाळ-दंडि घेउन ॥ मांडिले पांडुरंगाचे स्मरन ॥ उर्ध वदन करोणिया ॥ ५१ ॥ पावे कृपावंता कृपाळा ॥ तु दिनबंधु दिनदयाळा ॥ तु तव करुनाकरकल्लोळा ॥ पावे त्वरित मजलागि ॥ ५२ ॥ पाव पाव गा अच्चुता ॥ दिनानाथा श्रीभगवंता ॥ न जाणे मि काहि तत्वता ॥ क्रुपावंता क्रुपाळुवा ॥ ५३ ॥ माझि आईक गा करुना ॥ वेगी यावे जगजिवना ॥ इतुकि करुनि स्तुति स्तवना ॥ परि पंढरिराना न पवेचि ॥ ५४ ॥ तु भक्ता करुणाघन ॥ तु दाता सदा प्रसन्न ॥ पात्रि तिटस्ति संतजन ॥ बैसले गा विठोबा ॥ ५५ ॥ तु माझे गा जीवन ॥ तुं माझे पंचप्राण ॥ आता न येता जाण देईन प्राण ॥ ह्मणोनि दीर्घ स्वरे रुदना करि ॥ ५६ ॥ आता पावे गा श्रिहरि । माझि क्रुपा न ये गा अंतरि ॥ आता मजलागि नुपेक्षि ॥ ५७ ॥ मि चातक तु घन ॥ बोलोन देई प्रेम जीवन ॥ इतुके मागतसे तुजकारण ॥ हे बाळक उठवि ॥ ५८ ॥ तुज वाचोनि स्मरू कवणा ॥ का माझि न ये तुज करुणा ॥ इतुके करिता स्तुतिं स्तवना ॥ परि पंढरिराना न पवेचि ॥ ॥ ५९ ॥ मग नामदेव कोपला ॥ म्हणे तु कपटि अधम भला ॥ निरार्थक प्राण घेतला ॥ या बाळकाचा ॥ ६० ॥ हा ब्राह्मण कमळा-करू ॥ संतमेरु माहाधिरू ॥ याचा डंकिला तो कुमरु ॥ कपटि थोर विठोबा ॥ ६१ ॥ जे स्वभावें पुजिति ॥ त्यास छळिंसि नानारिति ॥ ऐसे जाणोनि कोण भजति ॥ तुज देवा ॥ ६२ ॥ पाहा पा आजि पासुन ॥ जरि मि करिन गा तुझे स्मरण ॥ तरि मज तुझिच आण । सत्य

जाण गा विठोबा ॥ ६३ ॥ ऐसे वचन आईकिले ॥ हृदये विठोबाचे डहुळले ॥ वैकुंठभुवन सांडिले ॥ आला धावन्या नामयाच्या ॥ ६४ ॥ नामा देहेभान विसरला ॥ तव विठोबाने देखिला ॥ प्रेमे हृदई आळंगिला ॥ म्हणे श्रमलासि सखया तु ॥ ६५ ॥ काये पडले तुज कठिन ॥ का पाचारिले मजलागुन ॥ नामा म्हणे हे रन ॥ काय मजलागिं पुससि ॥ ६६ ॥ अता बाळके उठवि गा झडकरि ॥ सकळाते संतोर्सवि भारि ॥ तव पाळनिया माझारि ॥ बाळके झडकरिं शद्ब केला ॥ ६७ ॥ म्हणे आवो जेननिंये ॥ उदक दई लवलाहे ॥ हे वचेन अैकोन पाहे ॥ बाळक तिन्हे उचलिले ॥ ६८ ॥ घातले नामयाच्या चरनि । तुचि होसि गा चक्रपाणि ॥ पुत्रदान मजलागुणि ॥ दिधले स्वामि नामया ॥ ६९ ॥ तव संत ह्मणती काय जाले ॥ तिणे सकळ वर्तमान निवेदिले ॥ सर्वासि आश्चिर्य जाले ॥ म्हणति धन्ये निश्चेये ॥ ७० ॥ सकळ लोटांगणे घालिति ॥ ह्मणति नामा नव्हे रे विठलमुर्ति ॥ तयास हृदई आळंगिति ॥ म्हणति धन्ये मुर्ति नामयाचि ॥ ७१ ॥ सकळ पात्रि बैसुन ॥ नामयाने केले समाधान ॥ नामाविठल येकत्र बैसुन ॥ केले भोजन प्रेमप्रिति ॥ ७२ ॥ ऐसे संतसेवेचे महिमान ॥ म्हणउन संतासि जावे शरण ॥ त्याचे चुकेल जन्ममरण ॥ म्हणे विष्णुदासनामा ॥ ७३ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ इति श्री संतावळी आख्यान संपुर्ण ॥ शुभंभवतु

परिशिष्ट : १ टीपा

## नामदेव तीर्थावळी व कृष्णकथा

धुळें येथील राजवाडे संशोधन मंदिरांतली ( द. ३, क्र-४ ) ही दोन प्रकरणें शके १५५६ मध्यें या वर्षी नकललेली भरतभेट ज्या बाडांत आहे त्याच बाडांत आढळली व त्यामुळ ही दोन्ही प्रकरणें जुनी व एकनाथपूर्वकालीन असावीत असें वाटतें. 'ख' ऐवजी 'प' 'ज्ञ' ऐवजी 'ग्न' 'स्थ' ऐवजी 'स्छ' 'ण' ऐवजी 'न' 'क्त' ऐवजी 'ल्क' 'श' ऐवजी 'स' 'भ' चे जुनें वळण इत्यादि वैशिष्ट्यें त्यांत दिसून येतात. 'नामदेव तीथवळी' हें नांव काव्याच्या वर लिहिलें असून काव्यांत आरंभीहि तें नांव आढळतें. पण प्रत्यक्ष कथानक मात्र नामदेवांनी मृत गाय उठवली त्याचें आहे. या प्रसंगासंबंधी हिंदी पद नामदेवांच्या गाथेंत आढळते ( जोग गाथा, आ. २. क्र-२१४४ ). या काव्याची रचना एकंदरीत अभंगवज। पण कांहीं ठिकाणीं ती ओवीबजाहि असल्याचें दिसेल. ८२-८५ या ओळी ओवीरुपानें विप्र विश्वनाथाच्या अभिमन्यूविवाहांत आढळतात ही गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे. या ओळी खालीलप्रमाणें :– " पुढें नैसले नानवटी। रत्नें विकिताती हाटोहाटी। घेउनीया चंदनाची उटी। मीर्वताती ॥ २४४ ॥ थटीयार मनीयार। सोनें विकिताती सोनार । बैसले परिकर । वानपुत्र ॥ २४५ ॥ " ( पुणें प्रत ). कांहीं प्रतींत 'तटिहार मणिहार " अशी शब्दरूपें आढळतात. दुसऱ्या काव्याला मुळांत नांव नाही, 'कृष्णकथा' हें नांव सोईसाठी दिलें आहे.

दोन्ही हस्तलिखितें अशुद्ध असून अनेक शब्दाबद्दल त्यामुळ संदेह वाटतो व अनेक शब्द दुर्बोध आहेत. अगदी उघड चुका दुरुस्त करून जरूर तेथें अनुस्वार घातले. सुबंधु गाथेंतले 'तीर्थावळी' प्रकरणहि असेंच जुनें आहे ( हस्तलिखित श. १५०३ ).

## हरिश्चंद्र पुराण

या पुराणाचें हस्तलिखित तंजावर सरस्वती महाल क्रमांक M. S. ९०५ आहे. हस्तलिखित अत्यंत अशुद्ध असून जागोजागीं चरण नाहींत व अक्षरें गळली आहेत. कांहीं ठिकाणीं अक्षरें तर कांहीं ठिकाणीं शद्ब उलटसुलट पडले असल्याचें उघड दिसतें. त्यांची आणखी वैशिष्ट्यें म्हणजे 'द्ध' ऐवजी 'स्थ' येतो. 'स' ऐवजी 'श' व 'श' ऐवजी 'स' व 'न' ऐवजी 'ण' वारंवार येतो. अनुस्वार बऱ्याच ठिकाणीं नाहींत. अशुद्ध लेखनाचें एक उदाहरण, 'अस्थिवरी' हा शद्ब 'हस्तिवरी' असा आढळतो. ही प्रत थोडीफार शुद्ध करणें एरवीं अशक्य झालें असतें, परंतु धुळें येथील श्रीसमर्थवाग्देवता मंदिरामधील वाडांक १२० मधील

'हरिश्चंद्राख्यान' या आख्यानांशीं बरीच जुळतें असल्याचें आढळलें व त्या प्रतीचा उपयोग करून प्रस्तुत प्रत शुद्ध केली. तंजावर प्रतीत नसलेले पण जरुर वाटणारे शब्द व ओव्या धुळे प्रतीवरून कंसांत दिल्या आहेत.

## धुळें प्रत

धुळें प्रत बरीच शुद्ध पण त्रुटित आहे. तिच्या प्रथम बारा ओव्या व मग तिसऱ्या प्रसंगाच्या ६ व्या ओवीपासून पुढचा भाग शेवटपर्यंत मिळतो. ही ३।६ ओवी तंजावर प्रतींत २।६ येते. धुळे प्रतीचा आरंभ एकदम अयोध्यावर्णनानें होतो. या तीन ओव्या त्रुटित असून त्याची सुरवात स्वाभाविक वाटत नाही. पुढील ४ ते १२ ओव्या तंजावर प्रतीत १।३०–३८ अशा होत. शेवटच्या २६ ओव्या ऐवजी धुळें प्रतींत एकच ओवी आढळते. धुळें प्रतींत शेवटी येणारा ८३३ ओवी सख्येचा आकडा खालीलप्रमाणें होईल. कांहीं ठिकाणीं मधेंच ओव्यांचे आकडे कमीजास्त झालेत ते निराळे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ व २ प्रसंग | -- | ओव्या | २०३ |
| ३ रा प्रसंग | -- | ,, | ८९ तंजावर ३।९७ पर्यंत |
| ४ था ,, | — | ,, | १०० |
| ५ वा ,, | — | ,, | ५० |
| ६ वा ,, | — | ,, | १०० |
| ७ वा ,, | — | ,, | १७७ |
| ८ वा ,, | — | ,, | ११४ |
| | | | ८३३ |

तंजावर प्रतींत ८९६ ओव्या होतात. त्यांतून चवथ्या प्रसंगांत नसलेल्या १२, १४, १७९–१८८, २१५, ३३९ व ३९६ या १५ ओव्या वजा केल्या तर ही संख्या ८८१ होईल. या दोन्ही प्रतींचे मूळ एकच असावें. दोन्ही प्रतीत साम्य असलें तरी विष्णुदास नाम्याच्या इतर आख्यानाप्रमाणें फरक पुष्कळ आहे. त्यामुळें फक्त उपयुक्त पाठ तेवढेंच दिले आहेत. या दोन्ही पोथ्यांचे मूळ सुमारें ७०० ओव्यांचें आसावे.

## पुणें प्रत

हरिश्चंद्र आख्यानाची एक त्रुटित प्रत पुणें येथें भारत इतिहास संशोधक मंडळांत आहे ( क्र. २१।८७ ) तीत सुमारें १३०० ओव्या असाव्यात. ही प्रत वरील प्रतीपेक्षा मोठी व भिन्न आहे. प्राचीनत्व तंजावर प्रतीत जास्त राखलें गेलेलें दिसतें. या प्रतीतली ओवीसंख्या खालील प्रमाणें :–

| प्रसंग | ओवीसंख्या | माहिती |
|---|---|---|
| १ | २०५–२४३ | आरंभीच्या २०४ ओव्या नाहीत. २०७ ओवी तंजावर १३३ बरोबर जुळते हा प्रसंग साधारण तंजावर प्रतीच्या प्रथम प्रसंगाशी जुळतो |
| २ | २४४–४८३ | तंजावर प्रतीच्या दुसऱ्या प्रसंगाशी जुळतो. |
| ३ | ४८४–५९४ | तंजावरच्या तिसऱ्या प्रसंगाशी जुळतात |
| ४ | ५९५–६९१ | तिसरा प्रसंग धुळें प्रती इतका. |
| ५ | ६९२–७२६ | तंजावर ४–२२ पर्यंय जुळतो. |
| ६ | ७२७–८६९ | डोंबडोंबीण विनवणीपर्यंत (तंजावर ४–१२२) |
| ७ | ८७०–१०२४ | (१०२५ ते ८२ नाहीत) |
| | १०८३–१११९ | तारामतीला मारण्यासाठीं हरिश्चंद्र शस्त्र उगारतो या प्रसंगापर्यंत. |

ही प्रत वरील दोन प्रतीसारखी पण वाढवली असल्याचें दिसतें.

## भिन्न प्रती

या शिवाय आणखी एक त्रुटित हरिश्चंद्राख्यान उपलब्ध आहे व ते वरील प्रतीहून सर्वस्वी भिन्न असावे. त्यांत प्रथम प्रसंगांत ५५, दुसऱ्यांत ८४, तिसऱ्यांत १३८, चवथ्यांत ४४, व पांचव्यांत रोहिदासास सर्पदंश होतो तिथपर्यंत ११२ मिळून ४३३ ओव्या आहेत. या ४३३ ओव्या म्हणजे तंजावर प्रतीच्या ६८३ ओवींपर्यंत मजकूर येतो. एका विद्वानांच्याकडून ही प्रत अवलोकनार्थ मिळवण्याचें प्रयत्न फुकट गेले व पत्रांना उत्तरहि मिळूं शकलें नाही.

तथापि अहमदनगरपालिकेच्या ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयांतील पाठक संग्रह विभागांत ५० क्रमांकाची हरिश्चंद्राख्यानाची त्रुटित पोथी आहे. तिच्यात प्रथम प्रसंगांत ५४ ओव्या व ७ व्यात ९८ ओव्या आहेत. हे दोन्ही प्रसंग तंजावरप्रती-पेक्षां फार निराळे आहेत व या प्रसंगाचें वरील न मिळालेल्या प्रतीशी साम्य असावें प्रथम प्रसंगांत वसिष्ठाचे हरिश्चंद्राकडे आगमन असून सातव्या प्रसंगांत विश्वामित्र इंद्रादिकांना मी श्रेष्ठ कां वसिष्ठ श्रेष्ठ हें विचारून पेंच घालतो त्याचें वर्णन आहे. या प्रतीचा आरंभ व शेवट खालीलप्रमाणे आहे. –

आरंभ— तकं धर्म म्हणे आपण सोमवंशीं नृपती । तरी ते असो या वनाप्रती । यैसी हे कर्मगती । कोण आम्हां वोढवली ॥ १ ॥ मग रुसी म्हणती धर्मास । आगा राजे होते पृथिवीस । परी कर्मगती तयास । धर्मा नाही सोडीले ॥ २ ॥

शेवट- तरी ते कथानामे करुन । नावेक सांगो तुज लागुन । तव रुसी म्हणे वैसंपायेन । परीस गा राया जनमेजया ॥ ९७ ॥ तरी आनंदे रुसी । नळाख्यान सांगती । मी तेच कथा श्रोतयासी । नामा म्हणे विष्णुदास ॥ ९८ ॥

यावरुन हे हरिश्चंद्राख्यान महाभारताचा भाग होता असें दिसतें.

## महानुभावीय प्रत

अलिकडे आणखी एक हरिश्चंद्राख्यान महानुभवीय मठांत उपलब्ध झालें. हें आख्यान ऋद्धिपूरचे गोपिराजबुवा यांनी दिलें. या आख्यानाच्या ८९० ओव्या असून एकंदरींत त्याचा आशय व अनेक ओव्या तंजावर प्रतीशी जुळतात पण भिन्नता फार आहे. त्याचा आरंभ " श्री परेशायनमाः ॥ दावीनो ज्ञानाचा प्रकाशु : तो वंदीजे गनेसु सकळ सीर्थाचा अवकासु : जयापासी : ॥ " असा असून शेवट " हरीचंडपुरान : नामा ह्मने जालें संपूर्न : ये कथेचें पुन्य : कल्मषें हरीती ॥ ८८९ ॥ हे कथा आईकतां : पुन्ये घडे नीभ्रांतां : पापें जाती सर्वथा . पळोनीया ॥ ८९० ॥ " असा होतो. या आवृत्तींत " श्रीपरेशाय नमा " या शब्दाव्यतिरीज महानुभावीय काव्य असल्याची कांहीं खूण नाहीं.

## ख्रिस्तपुराण व हरिश्चंद्रपुराण

ख्रिस्तपुराणकार फादर स्टीफन्स याच्या समोर हरिश्चंद्रपुराण होतें. हें डॉ. स. गं. मालशे यांनी 'ख्रिस्तपुराणाचा भाषिक आणि वाङ्मयीन अभ्यास या P. h. D, साठीं लिहिलेल्या प्रबंधांत (विष्णुदास नामा आणि फादर स्टीफन्स, प्रकरण १०, पृ.-४२७) दाखविलें आहे. मरी आणि अन्य स्त्रियांचे विलाप व ईसाची कर्तव्य-परायणता यांचें तारामतीशोक व रोहिदासाचें वर्तन याच्यावरोवर फार साम्य दिसतें. ओव्यांचें साम्य असल्याची दोन उदाहरणें पाहा-

| ख्रिस्तपुराण | हरिश्चंद्रपुराण |
|---|---|
| (१) घृतें सिंपिला वस्वानरु । | तेवेळिं विश्वामैत्र कोपला । |
| तसा कोपें प्रजळला थोरु | जैसा घृतें सिंपीला । वैश्वानरु ॥ |
| १-१२-३३ | १।४० |
| (२) वारेन आंदोळे कदळी जसी । | वातघातें कर्दळि जैसी । |
| ती उन्मळोनि पडे भूमिर्मी ॥ | उन्मळुनि पडे धरणिसि ॥ ४।२४२ |
| १-२८-५ | |

## दुसऱ्या हरिश्चंद्रकथांशी साम्य

हरिश्चंद्राख्यानाचें इतर हरिश्चंद्र आख्यानांशीं बरेंच साम्य असल्याचें दिसतें. कांहीं उदाहरणें खाली दिली आहेत. :-

( १ ) मुक्तेश्वरांचें हरिश्चंद्राख्यान
५ अ, ५९५ ओव्या

(मुक्तेश्वरांची स्फुट काव्यें. काव्यसंग्रह ५४) माजी निघाले ज्ञाननयन। घेतले सूर्याचे दर्शन। आणि वातांबुपर्णाशन। केले वर्षे कोटि दहा ॥ १।४५ ॥ लोहचूर्ण सेवुनी वनी। तपली पंचाग्नी साधुनी। रेतकुंडी पद्मासनी। जपलो वर्षे कोटि दहा ॥ ४६ ॥

विष्णुदास नाम्याचें आख्यान

जे उन्मेष लोचन। म्या केलें सूर्याचें अवलोकन। निरोग्वी सूदले मन। वरुपे कोटी दहा ॥ १।५३ ॥ आणि भोजनि ग्रासी लोहचूर्ण। तपता सूर्ये माध्यान। केले पंचाग्निसाधन। उष्ण-काळीं ॥ ५४ ॥ आणि रितकुंडी हिंवतु। होतो दाहा सहस्त्र कोटि जपु। म्हणे म्या जिंतिला मृत्यु। तपोबळ ॥ ५५

रोहिदास म्हणे जी ऋषि। मी गाहाण राहीन तुम्हापासीं। पितृवचनऋणासी। उत्तीर्ण होईन सर्वथा ॥ २।६०

अहो मि जी राहेन गाहाणा। निस्तरेन तुमची दक्षिणा। उतराई होईन तुमचे ऋणा। रुसिराया ॥ २।१२०

( २ ) नामदेवांचें हरिश्चंद्रराजाचें चरित्र
(२६४ अभंग ओळी (साखरे गाथा इ. स. १९०८)

शरीरे तयांची करपोनि गेली। तृषा ते लागली रोहिदासा ॥ ३७.

चालता तेणें मार्गे। करपली तिघांची अंगें। कासाविस जाली पाणी मागे। रोहिदास पुत्र ॥ २।१६०

पूर्वेचा हा सूर्य पश्चिमे उगवेल। समुद्र सांडील मर्यादेसी।

मर्यादा सांडिल सागरु। पश्चमे उगवेल दिनकरु। ... ३।२१.

ऐकोनि हरिचंद्र खोचला तो मनी। आला तो धावोनी तीजपाशी ॥ २१३.

मग मागुता आला धावोनी। ४।३१०.
ईतुके आयकोनी। हरिचंद्र खोचला मनी ॥ ४।३१९

( ३ ) जनाबाईचें हरिश्चंद्रआख्यान
(साखरे गाथा). अभंग

रोहिदास म्हणे त्यासी गाहाण राहिन तुम्हापासी ॥ पितृवचनाचे ऋण। त्याचा उतराई होईन ॥ ३०६।६

वर २।१२० पहा

( ४ ) श्रीधरांचा पांडवप्रताप (१८८७ प्रत)

तिसावा अध्याय–ओव्या ३५०
कोपें कांपे थरथरा। देवळांत आला सत्वरा। म्हणे चांडाळकुमरा। मज विश्वामित्रा नेणसी ॥ ४० ॥

मग म्हणे अरे चांडाळाच्या कुमरा ॥ पापीया अधमा हरिचंद्रा। तुज नाही लागला दरारा। माझा बिश्वामैत्राचा ।२।१६

त्रिशंकूची मुद्रिका । नृपहस्ती होती देखा। ती विकुनीया एका । तृण पेंढी घेतले ॥ २७५

त्रिसिखाची मुद्रिका होती । ते देऊन घेतले गवती । ते वेळि तो चक्रवर्ती तिंनें बांधले मस्तकी ॥ ४ । २३

अरे सूर्यवंशी पडिला अंधकार । गेला रोहिदासा ऐसा कुमर ॥ ३०० ॥

आतां मावळला दिनकरु । पडिला सूर्यवौंशि अंधकारू । गेला तुजसारिखा कुमरू । रोहिदासु ॥ ४ । ३३५

परवा दोघे ब्राम्हण मेले ॥ ३१६ ॥

मग दोघे ब्राम्हण मेले । ४ । ३६१

५ ) कथाकल्पतरूमधील हरिश्चंद्रकथा सात्रक ७ वा, अध्याय १४ व १५ ( हस्तलिखित प्रत )

एकंदर ओव्या २१३+२२६ = ४३९

मग विश्वामैत्र त्वरितें । आव्हानिलें सूर्यातें । म्हणे तपावें कीर्णातें । द्वादशकला ॥ १४ । १५४

मग विश्वामैत्र म्हणे सूर्यातें । तुम्ही द्वादशकळी तपावे येथें ॥ २। २५२

विश्वामित्रभेणें । सूर्य तपे दारूणे १४।१७६

कथा कल्पतरूप्रमाणें २।१८७

मज जाला उदास । माझा कां घेतला त्रास । शून्य जाला सूर्यवंश । तुजवीण पुत्रा ॥ १४ । २०९

कां गा मजसि जाला उदासु । कां माझा घेतला त्रासु । आतां निढळ सूर्येंवंशु । राहिला तुजविण ॥ ३।६९

## बुधबावणी

बुधबावणीची तीन प्रकरणें धुळे येथील श्रीसमर्थवाग्देवता मंदिरांतील बाडांक ७०२ मधें मिळाली. तुकाराम रामदासांच्यापूर्वी उपदेशपर काव्य व मूर्खलक्षणें सांगणारा हा पहिला कवि दिसतो. या काव्यांत ओव्यांच्या आद्याक्षरावरून अ पासून ज्ञ पर्यंत अंकलिपी तयार करण्याचा प्रयत्न आढळतो. ही प्रकरणें विष्णुदास नाम्याची असल्याचें कविनामावरून कळतें. त्याची आणखी एक बुधबावणी छापली आहे ( नवें नवनीत, प्रथम आवृत्ती, पृष्ठ १२२–२५ ). तिच्यांत २।३० ओवींत खुद्द नामदेवांचा उल्लेख येतो. हा उल्लेख प्रस्तुत तीन प्रकरणांत नाही. त्यापैकीं पहिल्या प्रकरणांत वामदेव, दुर्योधन, श्रीकृष्ण यांचा उल्लेख असल्यानें तें एकाद्या महाभारताचा भाग असण्याची शक्यता वाटते. या काव्यांच्या कर्तृत्वाबद्दल संदेह आहे. तंजावर येथें अनेक कवींची (बहुतेक अनामिक) उपदेशपर काव्यें आढळतात. त्यापैकीं एक बुधबावणीच असून ती महालिंगदासाच्या नांवावर आहे, व ती जवळ जवळ छापील काव्यासारखी आहे. तिच्यांत नामदेवांच्या उल्लेखाची ओवी नाही.

( महाराष्ट्र साहित्य पत्रिका जानेवारी १९६३. ) एका महानुभावीय बाडांत तर लुघबावणी दत्तराज कवीच्या नांवें आढळली.

हस्तलिखितांत अनुस्वार वेलांटीच्या आंत, 'ए' व 'ऐ' 'ओ' व 'औ' असे, 'कु' हें अक्षर लिहिण्याची विशेष पद्धत, 'ळ' या अक्षराला खालीं शेपूट, अनुस्वारांचा अभाव, 'जन्म' सारखे शब्द 'जम्न' असें लिहिणें अशी अनेक वैशिष्टयें आढळतात. अशुद्धता फार असल्यानें जरुर तेथें शुद्ध करुन घेतली.

## मूळकासुरवध

तंजावर येथें सरस्वतिमहाल ग्रंथालयांत M. S. १०५८ मधें हें प्रकरण आहे. या प्रकरणाचें दुसरें हस्तलिखित उपलब्ध झालें नाही. गोष्टीचें कथानक आनंदरामायणाच्या राज्य कांडावरुन घेतलें असावे.

या काव्यांत फिरग्यांच्या उल्लेख ( १।२१ ) आढळतो. 'गोसा' हा परभाषीय शब्द ५।६८ या ओवींत येतो. एकंदर प्रकरण ४५३ ओव्यांचें आहे.

## लवकुशाख्यान.

प्रस्तुत ४२२ ओव्यांचें विष्णुदास नाम्याचें रामायणावरील आख्यान औरंगाबाद येथील एकनाथ संशोधन मंदिरांतून तेथील पूर्वीचें कार्यवाह श्री. वा. ह. घारपुरे यांनीं पाठवले. आख्यानांत व्यास जनमेजयाला रामकथा सांगतात. ५।४ ओवींत गीतेचा उल्लेख येतो. या आख्यानाच्या अन्य प्रतींची माहिती खालीलप्रमाणें आहे :–

१ ) धुळें बाडांक १५८८ उत्तरकांड:– हें हस्तलिखित त्रुटित आहे. त्यांत प्रसंग १, ३ व ४ मध्यें कविनाम मतिविवेकनामा व ५ व्या नंतर विष्णुदास नामा येतें. ओवी संख्या प्रसंगवार–१–५८, २–५३ ( नंतर पृष्ठें गहाळ ), ३–३४ ते ३६, ४–६८, ५–९४ व प्रसंग ६–१०८ ( नंतर पृष्ठें गहाळ ) अशी आहे.

२ ) धुळे बाडांक १५९३ लहुकुश पुराण :– प्रथम तीन प्रसंगांत कविनाम मतिविवेकनामा. पांचवा प्रसंग अपूर्ण. प्रसंगावार ओवीसंख्या– ५७, ६५, ३५, ६७ व १७ आहे.

३ ) धुळे बाडांक २२७५ रामायण उत्तरकांड:– दोन अध्याय उपलब्ध. प्रथम अध्यायाशेवटी 'मतिविवेक रघुनंदन' व दुसऱ्या अखेर 'म्हणे मतिविवेकु नामा असें येते'

४ ) नगर ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय, पाठकविभाग, पाठकसंग्रह ३२– प्रकरणाचें नांव अश्वमेध असून औरंगाबाद प्रतींशी बहुतेक जुळते.

३।२९ ओवीनंतर नगर प्रतीत "वारू पुढां सोडुनी । सर्वें सैन्यें घेउनी। जेंव्हां वारू सोडिला ठाणाहुनि । भरत शत्रघ्न चालीले ॥" अशी तिसावी ओवी असून शेवटच्या ओवींत 'विनवी मतिविवेक जाणा' अशी तिसरी ओळ आहे.

औरंगाबाद प्रतिची ५।८० ओवी तीमधें नाही. नगर प्रतींत शेवटल्या प्रसंगांत ४२ ओवीनंतर "तुम्ही कैचे कोणाचे ठाई । माझे बंधु नेले सवही । आतां मी उसणें घेईन पाही । बंधु आपले सोडवीन ॥" ही ओवी येते व औरंगाबाद प्रतीची ७६ ओवी तीत नाही. औरंगाबाद प्रतींत ६१ हा आंकडा गळला आहे. तिच्या १०१ ओवी ऐवजी शेवटीं नगरप्रतींत खालील ओव्या आहेत—

"छत्र विभीषणाचें करी । विंजण लक्षुमण वारी । वेणु हनुमंताचे करी । पुढें स्थीर स्थीर म्हणतसे ॥ १०० ॥ ऐसे पातले अयोध्येसी । नगरी शृंगारिली आनंदेसी । वेगी आले राउळगणासी । राम कौसल्येसी भेटला ॥ १०१ ॥ सीतेंने चरणी ठेविला माथा । म्हणे कष्टलीस हो आतां । परी सार्थक जालें विनवीता । पुत्रवंती जालीसी ॥ २ ॥ तैसी भेटली दोघीजणींसी । केकेया सौमित्रजननीसी । लहु अंकुश भेटोनि त्यासी । मंदिरांत प्रवेसली ॥ ३ ॥ पीतापुत्र सिंहासनी । सकळ केली पाठवणी । वस्त्रें भूषणें देउनी । रूपिराये पाठविले ॥ ४ ॥ म्हणती राज्य करी गा रामराया । रुपिराजे जांती आपुल्या ठाया । कथा वाल्मीकी मराठीया । प्राकृती सांगितली ॥ ५ ॥ पुराणिचा इतिहासु । ग्रंथ रचिला सौरसु । येथुनि रामायणाचा कळसु । उत्तमी जाणिजे ॥ ६ ॥ राजमतिविवेक विष्णुदास आतां येथुन । राज्य करी रघुनंदन । श्रोते व्हावे सावधान । म्हणे विष्णुदास नामा ॥ १०७ ॥

या प्रतींत एकंदर ओवीसंख्या ४२८ (५८, ६७ १०२, ७९, १५, १०७) असून तिसरा प्रसंग खरोखरी ३५+६७ अशा दोन प्रसंगांचा आहे.

५ ) बडोदे येथील ओरिएंटल इन्स्टिटयूट मधील दोन प्रती— यापैकीं एक प्रत २५० ग्रंथसंख्येची असून दुसरी ५०० ग्रंथसंख्येची आहे.

## वस्त्रहरण

प्रस्तुत आख्यानाचें हस्तलिखित तंजावर M. S. ८७१ क्रमांकाचें आहे. या आख्यानावरुन 'प्राचीन मराठी कविता' खंड २ मधील नामा पाठकांच्या वस्त्रहरण कथानकाचें स्मरण होतें. दोन्ही प्रकरणांतील कांहीं ओव्यांचें साम्य वाटते. 'वोढुनि काढिली बाहेरी (५८) हा ओवी चरण नामा पाठकांच्या ११९ ओवींतहि आढळतो. या काव्यांत अनेक लुगड्यांच्या पेठा नमूद केल्या आहेत. मुळांत ओवीसंख्यांचे आकडे अर्धवट आहेत. काव्यांत मधून मधून ओवी नसून पदे असावीत असें वाटते. हस्तलिखित फार अशुद्ध असल्यानें अनेक ठिकाणी दुर्बोध आहे.

## तुलसीआख्यान

हें आख्यान पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळाचें संग्रहांत २१।१५८ क्रमांकाचें आहे. गाथेंत छापलेलें तुळसीमाहात्म्य यासारखेंच पण बरेंच भिन्नहि आहे. हें आख्यान जनमेजयाला सांगितलें असल्यानें एकाद्या महाभारताचा भाग असावा.

## गरुडाख्यान

पुणें येथील भा. इ. सं. मं. क्रमांक ४७।३३२ मध्यें हें हस्तलिखित आढळतें. 'प्राचीन मराठी कविता' खंड २ मधील नामा पाठकांचें हनुमंत गरुडाख्यान थोड्या फार फरकानें विष्णुदास नाम्याच्या नांवानेंहि आढळतें. आरंभीच्या १०।१२ ओंव्या, शेवटल्या २०।२५ ओव्या व मधील कांहीं ओव्या कमी केल्या कीं विष्णुदास नाम्याचें आख्यान तयार होतें. या प्रकरणाची धुळें येथील श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरांतील हस्तलिखितें खालीलप्रमाणें आहेत :—

| | | | |
|---|---|---|---|
| १) बाडांक ५२ | हनुमंतभेटी. | | ओव्या २९३. फार खोडाखोड |
| २) ,, १२३ | ,, | | जीर्ण अपूर्ण बाड |
| ३) ,, १५१ | ,, | | ओव्या २९५ |
| ४) ,, १५९ | गरुडाख्यान | ,, | २८९ शेवटची ओवी १५१ प्रमाणें. |
| ५) ,, १५०६ | हनुमंतभेटी | ,, | २९४ |
| ६) ,, ११७४ | गरुडाख्यान | ,, | २९४ मधून मधून ओव्या गहाळ. आरंभीच्या ६५ ओव्या नाहीत. |

प्रस्तुत आख्यान या सर्व आख्यानापेक्षां लहान व निराळें असून त्यांत फक्त गरुड व हनुमान यांच्या झगड्याचें वर्णन आहे. अलिकडे असें एक छोटें ५५ ओव्यांचें आख्यान धुळे येथील राजवाडे संशोधन मंदिरांत असल्याचें कळलें (४१० पृ २०). त्याची प्रारंभाची ओवी "ओंम् नमोजी गणनाथा। म्हणुनी चरणावरी ठेविला माथा। हारेली संसारवेथा। कृष्णकथा ऐकतां॥" व शेवटची "नामाम्हणे विष्णुदासु। अखंड रामनामाचा घोष। प्राणीयाचे गर्भवास। हे चुकती जाण पां॥" अशा आहेत.

## संतावळी आख्यान : कमळाकर ब्राह्मणाची कथा

धुळें येथील श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरांत बाडांक १५२२ मधील हें आख्यान आहे. हेंच आख्यान बाडांक १५३९ मध्यें 'संत कमळाकर ब्राम्हणचरित्र' यांत निराळ्या स्वरूपांत आढळतें. दोहोंना आशय एकच. दुसऱ्या प्रकरणांत आरंभीच्या ओव्यांत संतमंडळींत खुद्द नामदेवांचाच उल्लेख येतो. हें दुसरें प्रकरण मराठी संशोधन पत्रिकेंत छापलें जाणार आहे. त्या सारखें एक प्रकरण मराठवाड्यांत उपलब्ध आहे (प्रतिष्ठान, सप्तेंबर १९५६) या सर्व कथानकांत विष्णुदास नामा नामदेवांची गोष्ट सांगतो. मह्रीपतींच्या संतलीलामृतांत कमलाकर भुमतीची गोष्ट २९ अध्यायांत आहे.

परिशिष्ट : २

# शब्दकोश

अखय–अक्षय
अगड–खंदक
अत्वाना ( ती. १६६ )–?
अनवसन ( ह. पु. ३।९९ )–वस्त्रविरहित अवस्था
अनारिसें–दुसरें, भांडतें.
अप्येसी–अपेशी
अभिचार–जारणमारण
अरळ–फूल, मृदु मृदुशय्या
अरुता–इकडे, अलिकडे
अलाट अलोट–अनिर्वचनीय
अवस–पूर्वरात्र, प्रदोष
अशन–उपास
असक–सर्व
असम–उपमा नाहीं असें
असिवार–घोडेस्वार
असोडणे, असूडणें–हिसकणें
अक्षवण–लहान मुलांच्यासाठीं अरिष्टे टळावी म्हणून देवतेला दीप ओवळण्याचा विधी
आइती–तयारी
आगट–प्रेत नेताना वापरण्याचें विस्तवाचें मडकें
आगिल–पुढील ( सं–अग्रे )
आट–नाश, आटापीट
आतुडणें–सांपडणें, स्वाधीन होणें
आंत्रें–आंतडें
आदान–कुयोग, कठीण प्रसंग
आदी -मान, श्रेष्ठता
आपंगणें–सांभाळणें, पोसणें
आपोशन–आचमन
आरोगण–भोजन
आव–डौल, आविर्भाव
आवंतणें–आमंत्रण करणें
आवागमन–येणें जाणें
आवाळी–जबडा
आस्त्रनी ( कृष्णकथा )–अशरीरिणी, आकाशवाणी
आळक आळकेपण–आवड. इच्छा
ईसाळी–स्पर्धा, हेवा
उगला–उगी, स्वस्थ
उडवी–गंजी, रास
उत्संग–मांडी
उपीत पिणें–उच्छृंखल वागणें
उबडणें–उत्पन्न होणें
उभडा–गहिंवर, उमाळा
उभराउभरी–भरीवर भर
कटक–सैन्य
कटकटा–हाय हाय !
कटकाई–शिपाईगिरी
कडियाळ–कडे, सांखळा
कद–रेशमी वस्त्र
करवड–खरवड
कल्हार–पांढरें कमळ
कादावा–शोध
कानाडी–कनापर्यंत
कांबळ, कंबळ–फुटका भाग
कावा–मंडळ, फेरा
किमका–( व. ह. १०७ –) ?
किराण–उडी, नेम
कुवासा–आश्रय
केकनी–घायपात
केगामती–कजाग ( केकयी वरून )

केवा–प्रौढी, किंमत
केविता–केउता, कोठें. कसा, कशाला
खचर–खेचर
खरस–कोरड
खवसळी–घाणेरडेपणा
खांडा–तरवार
खांडमिशा–खंड पडलेल्या मिशा
खिरोदक–क्षीरोदक
गडी–शिपाई, साह्यकारी
गभस्ती–सूर्य
गर–फणसाचा गर
गाज्यान–गाजावाजा
गुढरणें– सजवणें
गुढार–अंधारी
गोसा–धनुष्याचें टोंक
घरटीकार–गस्त घालणारा
घुर्मि–झांपड, सुस्ती
घोलि–गुहा, दरी
चपेट–चापट
चहुमेरी, चौमेरी–चहूं बाजूंनी
चुनडी–बुटीदार लुगडें
चुंभळ–डोक्यावर ठेवलेली कपड्यांची
गुंडाळी
चौघटी–चार प्रकार असलेलें वस्त्र
जगडणें–जखडणें, ताणणें
जमान–जामीन
जागेकर–पहारेकरी
जासनीळ, जास्वनीळ–शंकर
जियालें–जिणें
जुत्पती–योद्धा
जोहारणें–नमस्कार करणें
झांझुर–झिरझिरित
झोटधरणी–केशाकेशी, केस धरून युद्ध
टांगें–तंगडी, शिर
डौर–डमरू
ढाळ–रीती, तऱ्हा
तरहाटुनी, त्राहाटुनी–ओरडून
तराल–गांवकामगार, पाहारेकरी
तवक–आवेश
तसराउ–जाडे भरडे रेशमी कापड
तस्कर–चोर
तिंबल–थबथबणारा
थटी–गर्दी
थट्टी–जनावरें
थोट–खुंट, खोड
दडक–चेप, दडपणें
दडवा दडवा–धांवत, लौकर
दमामा–नगारा, नौबत
दांत–फाळ
दिडे, दिडी–दिडके, दीडपट पासोडी
दुरंधर–घोरांधर, घोरयुद्ध
देखत्र–देखत
देहुडा–वक्र
दोला–डोळा
द्वादशकळा–सूर्याच्या बारा कला आहेत
अशी कल्पना
धडफुडा–प्रज्वलित
धडौती–कामरू, सुदृढ
धनि–तृप्ती
धरण– धारणी, धाटणी
धरणसारण–एकंदर धाटणी
धावनी–धावणी, धांवाधाव
धारण–बाजारभाव
धुरू–मुख्य, समोरचें
धूमंडळ–धरामंडळ, भूमंडळ
नाट–अडचण
नानावटी– सराफ
नाभिकार–भिऊ नको असें आश्वासन

निकर्मिणी–निकामी आळशी.
निकंठ–कडक.
निखडणें –हुसकावून लावणें.
निगुती–लवकर
निढळ, निढाळ–निस्तेज.
निरवणें–स्वाधीन करणें.
निरंजन–एकांतस्थळ, ओसाड प्रदेश.
निर्धूत-नागवलेला, कंगाल
निवडें–निश्चयानें.
नीसुध–फक्त (नसुध). निशुद्ध असाहि हा शब्द असू शकेल.
निसुर–निष्काळजी, बेफिकिर.
निक्षेपमा–निक्षेपणा, फेकाफेकी.
नी–आणी.
नुपर–टंचाई.
नृत–खरें.
नेहटणें–लक्ष लावून पाहाणें.
पढियंता–लाडका
परवड–पद्धत, पक्वान्न.
परवंट– साडीचा, नेसण्याचा प्रकार.
परारें–फरारे.
परावा–परका.
परावी–वेगळी, नवीन.
परि–प्रकार.
परिवडणें–कालवणें, प्रकार करणें.
पव्हे-पाणपोई.
प्रतालणें–पडताळणें, मापणें.
पाखरणें–पसरणें
पाटंग–एक कापड.
पाटोळा–रेशमी वस्त्र.
पानेड–जलाशय
पानवडी–अळवाच्या पानाची वडी.
पाबळ–तीर.
पाऱ्हेटी–पारठी, पौढ
पालव–पदर.
पालाणणें–सज्ज करणें.
पालेखाइर–पाला खाणारे, वानर
पास–काळजी, आस्था.
पाळ–कांठचा भाग.
पिळनी–पिळून काढण्यांत
पुरुमत (कृ. क–११८)– ?
पुंसा– पोपट
पेखणें–नृत्य, नृत्यनाट्य.
पेणें–मुक्काम
पोखरणी–पुष्करिणी, सरोवर
पोव्हा–प्रवाह
पोश–स्वतःच्या मुलाप्रमाणें वाढवलेलें मूल
फरारी–बडबड, ओढ
फुफा–तापलेली वाळू, राखेसारखी जमीन
बडवा–विठोबाचा पुजारी
बहुवस–विस्तृत, पुष्कळ.
बहुसाल–पुष्कळ.
बांदोडी–बंदिखाना.
बावरझोटी–अकाळविकाळ.
बोधड (ती. १७५)– ?
बिदी–रस्ता.
बोभाइणें–आरडाओरड करणें.
ब्रम्हस्व–ब्राम्हणाचें ऋण.
भकलणें–ढकलणें.
भडसळ, भडखल–पाहाऱ्याची जागा, महाद्वार.
भसर–तोंड सुजण्याचा आजार
भाजा–स्त्री.
भालु–कोल्ही.
भीतरी–आंत.
भोज–आनंद, भूषण
मणियार, मण्यार–जवाहिऱ्या, सराफ
मलवंस–मलीन वंशाचा, यवन

मसणखांब–मसणांत ठेवलेल्या खांबासारखा पाहारेकारी
माइक–मायेचें.
माणकुल–लहान माणीक
मांदल–मृदंग
मांदी–मंडळी, समूह
मांदुस–पेटी.
मीनणें–मिळणें
मुरगळी–एक पक्वान्न. चकलीसारखें असावें (मुरकु– दक्षिणेतलां शब्द)
मुरडवणें–फिरवणें.
मुरविया–एक वनस्पती, मरवा किंवा तशी असावी
मेच–बांबू.
मोहर–अग्रभाग
यावा–प्रभाव, आगमन.
येविस–येणें, कर्ज असलेला
रजक–परीट
रवण–रांक
रवंदळ–चुराडा, नाश.
रहि–रहिवासी.
राणवसा–अंतःपुर
रातोत्पल–तांबडें कमळ
रित– रिक्त
रिसट–चिडका.
रुक्मांगद–ऋतुध्वजपुत्र. मोहिनीशी लग्न ठरल्यानें त्याच्यावर पुत्राचें शीर देण्याची पाळी आली.
रोजना–रोदना
लाग–ध्येय, उद्दिष्ट
लाव–राक्षसी
वडवणें वोडवणें–ओढणें
वरपड–विव्हल, स्वाधीन
वळसा–धामधूम
वाबुर–जाळें
वाड–मोठें, पुष्कळ
वानपुत्र–वणिमपुत्र
वार–समुदाय
वाळवण–सुकणें
विजन–पंखा
विभागें–विभजन करून
विवर्जणें–काढणें, टाकणें
विवशी–हडळ
विसंचणें–त्रासणें, बिघडणें
वीत–वित्त
वीळ–वेळ, सबंध दिवस अथवा दिवसाचा भाग.
वेगवगत्र–वेगवत्तर
वेव्हार–व्यवहार, व्यापारी
वेळाइत–कैवारी
वैजात–निरनिराळ्या जातीचें
वोखे–वाईट
वोत–ओहोळ
वोथर–भय, भीती
वोलणें–निथळणें, गाळणें
वोल्हावणें–ओलावणें
वोवरी–कोठार, खोली
व्यारी–वारी
व्रीथा–(ती. ७२ मुळांत व्रीथ्या) वृथा, फुकट
शाळा–घर. दालन
शिवाइल–शिवालय, शंकराचें देऊळ
शिवार–शेत जमीन, राई
शुक्ल–फक्त ब्राम्हणाकडे याज्ञिक, अथवा भिक्षा करणारा
शोभनिका–दिवा असलेली रोवळी, शोभा प्रकाश देणारी वस्तू

संकष्ट–त्रासलेला, कष्टी
संघटणें–संयोग होणें
सचील–सचैल, वस्त्रासहित स्नान
सणजणें–शृंगारणें
सत्राण–आवेश, जोर
संप्रधारु–निश्चय
समेळ–एक वाद्य, समूह
सराटा–खराटा
संवफळी–टक्कर, धडक
सांकडे–संकट
सागळ–पखाल
साजण–सख्य, मैत्री
साट–चाबूक, साठा
साष्टी–साठी, षष्ठी
साम–साममंत्र
सारणी–पद्धत, तऱ्हा
सिद्धांत–निर्णय
साहान–साधन, सामुग्री, सैन्य
सावचित्त–सावधान
सीराणी–आवड
सुगड–चतुर, शहाणा
सुचितपणें–शांतपणें
सुपती–गादी
सुरवा–सुरळी, एकपात्र
सूनि–रिकामी
सेलाद्री–दासी, सैरंध्री ( नरेंद्र रुक्मिणी-स्वयंवर ११९ )
सेश–मळवट
सौरस–इच्छा, प्रसाद
हडती–हनवटी खालचा गळ्याचा खलगीचा भाग, खाली
हडपेकरी–विडा देणारे नोकर
हाट–बाजार
हिंदाण–विंदान, कौशल्य
हिंवणें–गारठणें
हिंसाळ–हिंस्र
हेत–आवड, इच्छा
क्षेचराई–खेचराई, दुराग्रह
क्षेवणें–क्षेपणें.
क्षोणि–संख्या.

# शुद्धि पत्र

| पृष्ठ | ओवीक्रमांक | मजकूर | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| १ | २ | धुरुसोत्तमा | पुरुसोत्तमा |
| ३ | ६२ | नाभा | नाभी |
| ४ | ९७ | उच | उंच |
| ५ | १३३ | तथुनी | तेथुनी |
| ७ | तळटीप २ | वो | वे |
| ८ | तळटीप १ | वद्या | वधा |
| ९ | ६६।२ | स्तुस्टीचे | स्रुस्टीचे |
| ९ | ७४।२ | उभवर्ग | उभवर्गे |
| ११ | १०३।२ | अस्पष्ट | ह्मने. |
| ११ | १२३।१ | ,, | सदा |
| १२ | १२।२ | जाहि | जालि |
| १३ | ३१।३ | ग्राष्यापुरति | ग्राव्यापुरति |
| १६ | ९७।२ | कुंडाभाजि | कुंडामाजि |
| १८ | ६।२ | जिष्हारि | जिव्हारि |
| १९ | २५।२ | कला | केला |
| २० | ६१।३ | गर्ज तसे | गर्जतसे |
| २२ | ८९।१ | आज्ञा | आज्ञा |
| २२ | ९५।३ | अनरिसे | अनारिसे |
| २३ | ११०।४ | रोजन | रोजना |
| २३ | १११।१ | वेष्हारे | वेव्हारे |
| २३ | ११५।१ | येउ | येरु |
| २४ | १४९।२ | परतवि | परतविले |
| २५ | १५६।१ | अनेक | अनेके |
| २९ | ६३।३ | तयोसि | तयेसि |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | ७२।१ | कले | केले |
| ३२ | ११३।१ | ब्रह्महत्येमेण | ब्रह्महत्येमेण |
| ३२ | ११९।४ | तयोसि | तयेसि |
| ३२ | १२१।१ | वगाळे | वेगळि |
| ३५ | ५५।३ | शाकर | शंकर |
| ३६ | ६८।१ | पुण्यपावना | पुण्यपावन । |
| ३६ | ७६।१ | भकतिलि | भकलिलि |
| ३७ | १०१।३ | आल | आला. |
| ३७ | १०२।२ | | 'नाहि भिति' हे शब्द गाळावे. |
| ३८ | ११७।१ | अस्पष्ट | सांगाल. |
| ३८ | १२१।२ | ,, | सांभाळावे. |
| ३९ | १२७।१ | निधुत | निर्धुत. |
| ४१ | १७८।४ | विळवरि | विळवरि' |
| ४१ | १९२।२ | मृल्यु | मृत्यु |
| ४३ | १२६।४ | ठायावारे | ठायांवरि |
| ५७ | ३१।२ | सतांपासि | संतांपासि |
| ५७ | ३७।३ | ना त | ना ते |
| ५८ | ३९।१ | थकात | थकीत. |
| ६५ | १०।३ | हनुमंते | हनुमंतु |
| ६७ | ६२।२ | अक्षोभ्य | अक्षोभ्य |
| ६९ | १०।३ | सव्हारु | संव्हारु |
| ७१ | ५९।१ | आस | ऐसि |
| ७३ | ९४।३ | कुंभकणाऐसा | कुंभकर्णाऐसा |
| ७४ | ५।४ | अस | असे |
| ७५ | ३२।१ | आसाधिरू | आसाधिरू |
| ७५ | ४२।४ | मनि ॥ | मनि ॥ ४२ ॥ तव तेणें विचारिलें मनीं ॥ |
| ७७ | ७०।१ | पीटितो | पीटिती. |
| ७७ | ७९।२ | समत्ती | समस्ती |
| ७८ | ४।२ | भ्रतरु | भ्रतारु |
| ७८ | ४।४ | रामापासा | रामापासीं |
| ७९ | ४३।३ | सत्वस्थिती | सत्वस्थिती ॥ |
| ८१ | ७२।१ | म्हणणे | म्हणे |
| ८४ | ३५।३ | सैंवारि | सैंवरि |

| | | | |
|---|---|---|---|
| ८४ | ४०।१ | कांवळ्याचे | कांबळ्याचे |
| ८६ | १४।३ | घाम | घाम । |
| ८६ | २३।१ | आश्रमासि | आश्रमासि । |
| ९० | २५।१ | श्रुघ | श्रुब |
| ९४ | १३।२ | अपस्ष्ट | युधिं |
| ९६ | ५३।४ | जुस ति | जुसति |
| ९६ | ६७।३ | येकसरा | येकसरां । |
| ९८ | ७।३ | थिर | विर |
| १०१ | ६८।२ | आळिग ग | आळिंगण |
| १०५ | ४५।४ | जायी जेसी धरु | जायीजे सीघरु |
| १०५ | ४६।३ | कम | कर्म |
| १०६ | ६५।२ | निघान | निधान |
| १०८ | १०७।२ | सेंडूरा | सेंदुरा |
| १०९ | १२०।२ | श्रीव्राकची | श्रीव्राकेंची |
| १०९ | १२८।४ | चित्र | चित्रे |
| १०९ | १२९।२ | दमयती | दमयंती |
| ११९ | ४७।२ | ग काय | गे काय |
| ११९ | ४८।३ | सीतीचे | सीतेंचे |
| ११९ | ५०।२ | पाताळि | पावलि |
| १२१ | ८।१ | पद्मकर | पद्माकर |
| १२१ | १४।४ | अस्पष्ट | करावे |
| १२२ | २७।२ | शोभानिका | शोभनिका |
| १२२ | ३०।१ | हाता | हात |
| १२२ | ३८।३ | बिनटलि | विनटलि |
| १२४ | ६६।३ | र न | (ऋा) रन |
| १२५ | ओळ ३ | त्यामुळ | त्यामुळें |
| १२५ | ओळ ९ | अभगवजा | अभंगवजा |
| १२६ | ओळ १० | सख्येचा | संख्येचा |
| १२७ | ' भिन्न प्रती ' खाली | | |
| | पहिली ओळ | कुटित | त्रुटित |
| १२७ | ,, | आह | आहे |
| १२९ | उजवी बाजू ८ वी ओळ | तपोबळ | तपोबळें |

| | | | |
|---|---|---|---|
| १३० | डावी बाजू ८ वी ओळ | सात्रक | स्तत्रक |
| १३२ | २ री ओळ | सवही | सर्वही |
| १३३ | गरुडाख्यान शेवटून ४ थी ओळ | ४१० पृ २० | ४१० पु २० |
| १३४ | 'उपीत पिणें' पहा | उच्छृंखल | उछृंखल |
| १३४ | 'कटक' पहा | सन्य | सैन्य |
| १३५ | " | धोलि | घोलि |
| १३८ | 'सेलाद्री' पहा | सैरंश्री | सैरंध्री |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७५८६२ दि: ७।८।९७
क्रमांक २०७९ नों दि: २२।३।८९
म. ग्रं. संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ९५५७८
मुंबई शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0015578